## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर सुधारित पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ या योजनेची सुधरित वाढीव रक्कमेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहर हे अत्त्यंत जुने शहर म्हणुन ठाणे जिल्हयात ओळखले जाते, सन १९४८ पुर्वी येथे लष्करी छावणी होती. त्या वेळेस शहरात बदलापुर येथील बरेज हेडवर्क्स मधुन पाणी पुरवठा होत होता. वेळोवेळी म्हणजे सन १९६७, सन १९७७ व सन १९८१ मध्ये येथील लोकसंख्या वाढीनुसार पाणी पुरवठा योजनेत किरकोळ सुधारणा करण्यात आल्या.

सद्यस्थितीतील शहराची झपाट्याने वाढलेली लोकसंख्या विचारात घेवून मजीप्रा यांचे मार्फत व मे. किर्लोस्कर कन्सलटंट पुणे यांच्या मागदर्शनाखाली सुधारीत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना सन १९९४-९५ मध्ये सर्वेक्षण करून त्याचा अहवाल तयार केला होता. सदर योजना दोन टप्यात करावयाची असून एकूण ५१.०० कोटी रूपयाचे अंदाजीत खर्च योजनेला अपेक्षित होता.

पहील्या टप्यात उंच जलकुंभ, मुख्या जलवाहिन्या व संप व पंपगृह इत्त्यादीचा समावेश होता सदर खर्च अंदाजे १८.८० कोटी रूपये अपेक्षीत होता. परंतु पाहिल्या टप्यात काही महत्त्वाचे बदल करावे लागेल.

मंजुर योजनेच्या आखणी नुसार महा. औद्यो. वि. मंडळाच्या पाले येथील जोडणी मधुन ७२ द. ल. लि. (प्रति दिन) व रमाबाई टेकडी येथील म. औ. वि. मं. च्या मुख्य संतुलन टाकीतुन ३० द. ल. लि. (प्रतिदिन) पाणी घ्यावयाचे प्रस्तावित होते व आनंदनगर येथील बुस्टर पंपीग स्टेशन पासून रेल्वे क्रासींग वरून कॅम्प ४ मधील जिजामाता बाग व विठ्ठलवाडी येथील साठवण टाक्यांना पाणी पंप करण्याचा प्रस्ताव नव्हता परंतु बारावी पाईप लाईन मधुन पाले कनेक्शनला ज्यादा पाणी देण्यास महा. औ. वि. मंडळाने नकार दिल्याने हा प्रस्ताव मजीप्रा ला बदलावा लागला आहे. व आनंदनगर येथील बुस्टर पंपीग स्टेशन खूपच जुने झाल्याने व तेथे नविन पंप बसविणे पुरेशी जागा नसल्याने नवीन पंप हाऊस ही बांधावे लागणार आहे. सध्या जरी अस्तित्त्वातील पंप वापरून कॅम्प ४ भागास तात्त्पुरता फायदा करून दिला तरी आनंदनरग येथील नविन पंप हाऊस बांधणे, येथे नविन पंप बसविणे इत्त्यादी कामे हाती घ्यावे लागतील त्यामुळे व इतर कारणांनी या योजनेचा खर्च वाढला असून त्यानुसार रूपये. २५०० लक्ष सुधारीत खर्चाची (मुळमंजुरी १८८० लक्ष) योजना तयार केली असून ती शासनास मजीप्रा तर्फे सादर करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेच्या ठरावाची आवश्यकता आहे. सदर ठराव करण्याकरिता कार्यकारी अभियंता मजीप्रा बांधकाम विभाग ठाणे यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. TB-I/2214दि. १६.८.२००१ नुसार कळविले आहे.

सदरची सुधारीत ठरावाची आर्थीक बाब खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नांव | टक्केवारी | मुळयोजनेप्रमाणे | सुधारीत योजने प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जी.आय.अे. | २३.३३ टक्के | ४३८.६० | ५८३.०० |
| २ | एल.आय. सी. | ३१.४४ टक्के | ५९१.०० | ७८६.०० |
| ३ | ओ.एम. बी. | ४५.२३ टक्के | ८५०.४० | ११३१.०० |
| | | १००.०० टक्के | १८८०.०० लक्ष | २५००.०० लक्ष |

उपरोक्त महत्त्वाचे बदल झाल्याने मुळ योजनेची रक्कम १८८० .०० लक्ष वरून २५००.०० लक्ष इतकी वर दिल्याप्रमाणे वाढली आहे. सदर वाढील रकमेस मंजुरी मिळण्याकरिता खालील प्रमाणे ठराव महासभेकडुन अपेक्षीत आहे.

## अटी व शर्ति

१. महा. जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे यांनी उल्हासनगर साठी तयार केलेल्या सुधारीत उल्हासनगर पा. पु. योजना टप्पा १ या योजनेची सुधारीत रक्कम रू. २१२७. १९ लक्ष निव्वळ व रूपये २५०० लक्ष ढोबळे, रक्कमेस महानगरपालिका मान्यता देत आहे. योजनेची किंमत वाढल्यास व योजना सुधारण्यात आल्यास जास्तीचा आर्थीक भारही सोसण्यास महानगरपालिका तयार आहे. तसेच योजनेच्या आकृती बंधास (२३. ३३ टक्के शासकीय अनुदान, ३१.४४ टक्के आयुर्विमा कर्ज, ४५.२३ टक्के खुल्या बाजारातील कर्ज ) ही महानगरपालिका मान्यता देत आहे.

२. प्रस्तूत योजना पुर्ण झाल्यानंतर शासनाच्या/ मंडळाच्या आदेशानुसार ती एक महिन्याच्या आत ताब्यात घेवून राबविण्यास उल्हासनगर महानगरपालिका तयार आहे.

३. योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आवश्यक ती पाणी पटटी बसविण्यास व आवश्यकता असल्यास पाणी पटटी दरात वाढ करण्यास तयार आहे.

४. योजना राबविताना अस्थाई आस्थापना खर्चाच्या तसेच यंत्र घसारा, मशिनरी दुरूस्ती वगैरे खर्चासाठी ही महानगरपालिका शासनाकडुन कोणत्त्याही अनुदानाची मागणी करणार नाही ही उल्हासनगर महानगरपालिका हा खर्च योग्य तो कर बसवुन भागविण्यास तयार आहे व त्यासाठी लागणारा निधी राखून ठेवील.

५. जर महानगरपालिकेने वरील बाबीचे अनुसरण न करता योजना ताब्यात घेण्याची व राबविण्याची जबाबदारी टाळण्यास सदर योजना राबविण्याच्या व्यवस्थेसाठी शासनाच्या /मंडळाच्या झालेला सर्व खर्च उल्हासनगर महानगरपालिका करीता शासनाकडुन मिळणा-या पैशातुन किंवा अनुदानातुन शासनाने वळता करून घेण्यास ही महानगरपालिका मान्यता देत आहे.

६. योजना पुर्ण झाल्यानंतर येणारा देखभाल व दुरूस्ती व कर्ज फेडीसाठीचा वार्षिक बोजाही महानगरपालिकेस मंजुर आहे.

उपरोक्त अटीच्या अधिन राहून उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा योजना टप्पा १ साठी वाढीव रक्कम रू. २५.०० कोटीचा महा. जीवन प्राधिकरण यांचे तर्फे राबविण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरी करीता महासभेपुढे सादर.



<u>महासभा ठराव क्र.</u> ८५ <u>दिनांक:-२८ १ २००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ ठाणे यांनी उक्त प्रस्तावात प्रस्तावित केलेल्या अटी व शर्तीवर उल्हासनगर सुधारित पाणी पुरवठा टप्पा क्र. १ या योजनेची मुळ रक्कम १८८०.०० लक्ष वरून २५००.०० लक्ष एवढया सुधारित वाढीव रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता व अंर्तभुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> मुकादम पदोन्नती देण्यांत आलेल्या ३९ कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. उमपा/२२९८/२०३०/प्र.क्र.२५०/९८/नवि-२३, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २८ सप्टेंबर, १९९९ अन्वये ४४ मुकादम पदावर पदे मंजुर झालेली होती. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/आवि/आस्था २४५ ते २८३ दिनांक २२.२.२००१ अन्वये खालील ३९ सफाई कामगारांना ६ महिन्याच्या परिक्षाविधीन कालावधीकरीता त्यांचे परिक्षाविधीन कामाचा समाधानकारक अहवाल जोपर्यंत प्राप्त होत नाही. तोपर्यंत त्यांची केलेली नेमणुक तात्पुरत्त्या स्वरूपाची राहील. जर परिक्षाविधीन कालावधीमध्ये त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. अशा अटीवर मुकादम पदावर पदोन्नती करण्यात आली होती.

| अ. क्र. | सफाई कामगाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. भगवानजी मोहन चव्हाण |
| २. | श्री. राजू शंकर हरीजन |
| ३. | श्री. जेठा काना मकवाना |
| ४. | श्री. मदनलाल अंगना चटोले |
| ५. | श्री. सखाराम कचरू मगरे |
| ६. | श्री. मनीराम ननुराम वाल्मिकी |
| ७. | श्री. रजनिस रामनिवास वाल्मिकी |
| ८. | श्री. कालीदास बालू चव्हाण |
| ९. | श्री. कांजी पूजा वाघेला |
| १०. | श्री. मुलजी विश्राम वाघेला |
| ११. | श्री. सुमन लक्ष्मण शेलार |
| १२. | श्री. एकनाथ महादेव देवकर |
| १३. | श्री. भगवान रामभाऊ कसारे |
| १४. | श्री. रमेश सुखराम चव्हाण |
| १५. | श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडेराव |
| १६. | श्री. शशी रामप्रसाद चव्हाण |
| १७. | श्री. रामकिशन ताराचंद वाल्मीकी |
| १८. | श्री. रमेश सुमेरा वाल्मिकी |
| १९. | श्री. रमेश मख्खन चव्हाण |
| २०. | श्री. नामदेव केरु पाखरे |
| २१. | श्री. शालीक बळीराम मडवी |

| | |
|---|---|
| २२. | श्री. अशोक एस. खंडागळे |
| २३. | श्री. रामजी नारायण हरीजन |
| २४. | श्री. टिल्लू रामभाऊ सोनवणे |
| २५. | श्री. दादू विठ्ठल गायकवाड |
| २६. | श्री. रामधारी सोरणदास हरीजन |
| २७. | श्री. सुरेश रामलाल हरीजन |
| २८. | श्री. इकबाल अहमद शेख |
| २९. | श्री. दिलीप प्रभाकर ससाणे |
| ३०. | श्री. देविदास त्रंबक केदार |

--2--

| | |
|---|---|
| ३१. | श्री. गौतम भाऊराव घोडेराव |
| ३२. | श्री. मनोहर भिमा भालेराव |
| ३३. | श्री. विलास शिवराम कांबळे |
| ३४. | श्री. राजेंद मख्खन चव्हाण |
| ३५. | श्री. फत्तुमल थावरदास कारा |
| ३६. | श्री. वासू टिकमदास फेरवानी |
| ३७. | श्री. राजेश मनविर वाळगुजर |
| ३८. | श्री. छिददी कन्हैया वाल्मिकी |
| ३९. | श्री. किशोर हिरालाल चव्हाण |

वरील मुकादम पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचा-यांचा परिक्षाविधीन कालावधी कामाचा समाधानकारक अहवाल संबंधित आरोग्य निरीक्षक यांचेकडून प्राप्त झालेला आहे.

तरी वरील कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेण्याबाबत महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांक:-२० १ २००३.</u>

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मुकादम पदोन्नती देण्यांत आलेल्या ३९ कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर शहराच्या मालमत्ता धारकांना त्यांच्या मालमत्तेमध्ये/ इमारतीमध्ये घरगुती, व्यापारी कचरा साठवणुकीसाठी कचरा कुंडीची तरतुद करण्यासाठी उद्युक्त करणे बाबत.

प्रस्तावना :-

मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९९ मध्ये प्रस्थापित केलेल्या सर्वोच्च कमिटीच्या शिफारसीप्रमाणे व भारत सरकारचे राजपत्र भाग २ मध्ये २५ सप्टेंबर २००२ रोजी प्रसिध्द केलेल्या महापालिका घनकचरा Management and Handling Rules 1998/2000 नियम ६ (१)(३) व नियम ७ (१) प्रमाणे प्रत्येक मालमत्ताधारकाने त्यांचे मालमत्तो/ इमारतीमध्ये कचरा कुंडीची तरतुद करणे आवश्यक आहे. उल्हासनगर शहरातील नागरिकांची सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याची प्रवृत्ती लक्षात घेता सदरच्या सुचनांची अंमलबजावणी करणे इष्ट ठरेल. मा. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्ती केलेल्या कमिटीने मालमत्ताधारकांनी त्यांच्या मालमत्तेमध्ये दोन छोटया कचरा कुंडया (Dustbin) ठेवणे आवश्यक आहे. एका कचरा कुंडीमध्ये अन्नपदार्थ, सेंद्रीय पदार्थ, जैविक कचरा साठविण्यात यावा व दुस-या कचरा कुंडीमध्ये घनकचरा व पुर्नवापर करता येईल असा कचरा साठविण्यात यावा. पहिल्या कुंडीचा रंग हिरवा असावा व त्यामध्ये भाजीपाल्याचे अवशेष, फळांचे अवशेष, लाकडे, अंडयाची कवचे, केस, नखे, उरलेले अन्न इत्त्यादी सेंद्रीय पदार्थ पाठविण्यात यावे तसेच दुस-या कुंडीचा रंग पांढरा असावा व त्यामध्ये कागदाचे तुकडे, प्लास्टिक, धातुचे तुकडे, रबर इत्त्यादी पुर्नवापर होवू शकणारा सुका कचरा साठविण्यात यावा. पुर्नवापर होणारा सुका कचरा शक्यतो नागरिकांनी कचरा जमा करणा-या व्यक्तींना परस्पर देणे इष्ट ठरेल. तरी उल्हासनगर शहरातील मालमत्ता धारकांना अशा प्रकारची व्यवस्था करणेबाबत लोकजागृती करणेसाठी आव्हान करण्यात यावे. तसेच नागरिकांनी सदरचा कचरा इतर सार्वजनिक ठिकाणां ऐवजी महापालिकेने निश्चित केलेल्या जागेवरच टाकणेबाबत नागरिकांना आवाहन करण्यात यावे व यासाठी लोकजागृती कार्यक्रम महापालिका अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांना राबवावा. नागरिकांनी कच-याचे वर्गीकरण करून वेगवेगळी साठवणुक/ सुक्या कच-यापासुन पुनर्निर्मीती करण्यासाठी उद्युक्त करण्यासाठी एक मोहिम सुरू करणेसाठी महासभेची मान्यता मिळणेसाठी सादर.

महासभा ठराव क्र. ८६ दिनांकः-२८ ७ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहराच्या मालमत्ताधारकांना त्यांच्या मालमत्तेमध्ये / इमारतीमध्ये, घरगुती /व्यापारी कचरा साठवणुकीसाठी कचरा कुंडीची तरतुद करण्यास उद्युक्त करण्याचे प्रस्तावास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर-१ येथील ठाकुर स्टुडीओ ते मनच्छाराम बंगलो या गल्लीला ''हरीसिंग मिलापसिंग लबाना'' यांचे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार नमुद करण्यात येत आहे की प्रभाग क्र. २२ येथील ठाकुर स्टूडीओ ते मनशाराम बंगला रस्त्याला हरीसिंग मिलापसिंग लबाना यांचे नाव देण्याकरिता प्रस्ताव आलेला आहे. महानगरपालिके मध्ये उपलब्ध असलेल्या यादीवरून उपरोक्त रस्त्याला आतापर्यंत कोणतेही नाव दिल्याचे निदर्शनास आलेले नाही तसेच उक्त रस्त्यांवर कोणत्त्याही नावाचा फलक दिसत नाही.

त्यामुळे ठाकुर स्टुडिओ ते मनशाराम बंगला या उल्हासनगर-१ या रस्त्याला दिवंगत हरीसिंग मिलापसिंग लबाना यांचे नाव महासभेकडुन मान्यता मिळण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ८७ दिनांकः-२८ ७ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ येथील ठाकुर स्टुडीओ ते मनच्छाराम बंगला या गल्लीला ''हरीसिंग मिलापसिंग लबाना'' असे नाव देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषयः-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व १०६ अन्वये जमा खर्च कर्मचा-यांच्या नियमबाहय प्रकरणी माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट २००२ च्या मुख्यलेखा परिक्षकांच्या अहवालावर स्थायी समितीने दि. १३.१२.२००२ रोजीच्या ठराव क्र. ७० व्दारे केलेले आदेश विचारात घेणे बाबत.

**प्रस्तावना :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम १९४९चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट २००२ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल सोबत सादर केलेला आहे. कृपया वरील अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा

मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम १९४९ चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे एप्रिल २००२ व ऑगस्ट २००२ पर्यंत या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल .

वित्तिय वर्ष २००२ -२००३ च्या "अ" व "क" अंर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व ऑगस्ट २००२ पर्यत पहिल्या पाच महिन्या मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शाविलेले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षीत जमा |
|---|---|
| "अ" | १,०९,०३,६०,००० |
| "क" | ४८,८५,७५,००० |
| एकुण | १,५७,८९,३५,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत .

| | | |
|---|---|---|
| १ | महसूल जमा | १,३२,१२,५१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ३,७७,००,००० |
| ३ | कर्ज ( भांडवली) | ५,००,००,००० |
| ४ | अनामत रकमां/दायित्वे इ . | १२,९०,५०,००० |
| | एकूण | १,५३,८०,०१,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | ४,०९,३४,००० |
| | | १,५७,८९,३५,००० |

वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु १,३२,१२,५१,००० अपेक्षित धरलेली होती माहे ऑगस्ट २००२ पर्यंत समप्रमाणात रु . ५५,०५,२०,५०० महसूल उत्पन्न अपेक्षित होते . प्रत्यक्षात रु .२८,११,८२,३००/- (२१%) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑगस्ट २००२ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षानिहाय खालील प्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे ऑगस्ट २००२ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष (रु . १००पुर्णांकांत ) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जकात कर | ५३,७५,००,००० | २२,३९,५८,००० | १८,९२,३२,३०० | ८४ . ५% |
| २ | मालमत्ता कर | २७,२०,००,००० | ११,३३,३३,३०० | २,९६,५८,२०० | २६ % |
| ३ | एम आर टी पी वसुली | ६३,०५,००० | २६,२७,१०० | १८,१७,९०० | ६९ % |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | महानगरपालिकेस मालमत्तेपासून प्राप्त झालेले उत्पन्न | १३,४५,००० | ५,६०,४०० | ५४०० | १ % |
| ५ | मार्केट | ३५,००,००० | १४,५८,३०० | १,०८,८०० | ७ % |
| ६ | रुग्णालय फी | २,१८,००० | ९०,८०० | ६९,००० | ७६ % |
| ७ | परवाना व इतर फी | ९७,७८,००० | ४०,७४,१०० | ६७,३९,००० | १६५ % |
| ८ | संकिर्ण | ४१,८०,००० | १७,४१,७०० | १४,११,००० | ८१ % |
| | एकूण-अ | ८३,४८,२६,००० | ३४,७८,४३,७०० | २२,९०,४१,६०० | ६६ % |
| | अर्थ संकल्प "क" | | | | |
| ९ | पाणी पुरवठा देयके | ४३,००,००,००० | १७,९१,६७,००० | ४,५८,१९,६०० | २६ % |
| १० | मालमत्ताकर | ५,६०,००,००० | २,३३,३३,००० | ५७,९९,००० | २५ % |
| ११ | परवाना/ इतर फी | ३,२०,००० | १,३३,००० | ४,३३,३०० | ३२६ % |
| १२ | संकिर्ण | १,०५,००० | ४३,८०० | ८८,८०० | २०३ % |
| | एकूण - "क" | ४८,६४,२५,००० | २०,२६,७६,८०० | ५,२१,४०,७०० | २६ % |
| | एकूण- "अ" व "क" | १,३२,१२,५१,००० | ५५,०५,२०,५०० | २८,११,८२,३०० | ५१ % |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. १,५७,८९,३५,०००/- ( प्रांरभिक शिलकेसह)अपेक्षित केलेले असून प्रत्यक्षात ऑगस्ट २००२ पर्यंत रु ३७,९९,८५,७०० उत्पन्न प्राप्त झालेले आहे. (२४%). महसूल उत्पन्न माहे ऑगस्ट २००२ पर्यंत केवळ ५१ % प्राप्त झालेले असल्यामुळे उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करणे अथवा खर्चात काटकसर करणे या व्यतिरिक्त पर्याय नाही.

<u>खर्च :-</u>

माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट २००२ या कालावधीमध्ये रु. ३६,०१,५४,६४४ खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी अधिन आहे.

माहे ऑगस्ट २००२ चे तसेच पर्यंतची जमा/खर्चाची पत्रे सोबत जोडलेली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे ) :-

मालमत्ता कर विभाग

<u>आक्षेप कमांक १. श्री. जे. के. इसराणी, लिपिक, मालमत्ता कर विभाग यांनी केलेला अपहार</u>

<u>१) रक्कम रु. २०८६५/- चा अपहार</u>

श्री. जे. के. इसरानी, लिपीक यांनी पुस्तक कमांक ५७ मधील खालील पावत्यान्वये एकूण रक्कम रु. २०८६५/- (रुपये वीस हजार आठशे पासष्ट फक्त )वसूल केले

आहेत . परंतु सदरची रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नसल्याने दिनांक २७/५/२००२च्या अर्धसमास ज्ञापनाव्दारे मालमत्ता करविभागाकडून याबाबत खुलासा मागविला असता सदरची रक्कम दिनांक २९/५/२००२रोजी महानगरपालिकेच्या कोषागारात जमा केल्याचे त्यांनी त्यांचे दिनांक २४/६/२००२चे पत्रान्वये कळविले आहे . सदरची रक्कम जवळ जवळ दीडवर्षानी व लेखा परिक्षणाने निदर्शनास आणून दिल्यानंतर भरणा केली आहे . परंतु रक्कम उशिरा भरण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही .

| अक्र | पा . क्र | दिनांक | वसुलीची रक्कम रु . |
|---|---|---|---|
| १ | ५६९२ | १/१२/२००० | ३४९८ |
| २ | ५६९३ | ,, | २८८४ |
| ३ | ५६९४ | ,, | १२७० |
| ४ | ५६९५ | ,, | १७०० |
| ५ | ५६९६ | ,, | १३३५ |
| ६ | ५६९७ | ६/१२/२००० | १६८८ |
| ७ | ५६९८ | ,, | ३११२ |
| ८ | ५६९९ | ,, | ४०९७ |
| ९ | ५७०० | ७/१२/२००० | १२८१ |
| | | एकुण | २०८६५ |

<u>आक्षेप क्रमांक २ . श्री . जे . के . इसराणी, रोखपाल, मालमत्ताकर विभाग यांनी केलेला तात्पूरता अपहार</u>

<u>१) रक्कम रु . २००००/- चा तात्पूरता अपहार</u>

श्री . जी .के . वानखेडे यांनी दिनांक ७/२/२००१ रोजी श्री . रवि मेलखुंडे बॅरेक नंबर ए ४३१ वार्ड नंबर ४० खाता क्रमांक ४७८/३८८ उल्हासनगर ४ यांचेकडून पुस्तक क्रमांक १९६ मधील पावती क्रमांक १९५६४ अन्वये रु . २० ,०००/- (रुपये वीस हजार फक्त) चा धनादेश क्रमांक ९०२४०९ स्विकारलेला आहे व सदर धनादेश न वटता बॅकेतून परत आल्यानंतर संबंधीत लिपीक श्री . जी .के .वानखेडे यांनी दिनांक ७/३/२००१ रोजी सदर धनादेशाच्या बदल्यात रोख रक्कम रुपये २०००० (रुपये वीस हजार फक्त) कर विभागातील रोख पाल श्री . जे .के इसरानी यांचेकडे जमा केली .परंतु श्री इसरानी यांनी सदरची रक्कम दिनांक १७/७/२००१ रोजी महापालिकेच्या कोषागारात भरलेली आहे श्री . इसरानी यांनी ही रक्कम ४ महिने उशीरा भरलेली आहे .. तसेच रक्कम उशिरा भरण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही ..

<u>२) रक्कम रु . २५००० चा तात्पूरता अपहार</u>

श्री . नरेश बी मारवीजा यांनी दिनांक २०/१/२००१ रोजी श्री . तुळशीराम टी मुलचंदानी ५२/१६६६ बॅरंक नंबर १७१८ हरीजनपाडा उल्हासनगर ५ याचेकडून पुस्तक क्रमांक १४४ मधिल पावती क्रमाक ०१४३७१ अन्वये रु . २५०००/- (रुपये पंचविस हजार फक्त)चा धनादेश क्रमांक १२२९२७ स्विकारलेला आहे व सदर धनादेश न वटता बॅकेंतून परत आल्यानंतर श्री .नरेश एम मारवीजा यांनी धनादेशाचा बदल्यांत मालमत्ता धारकाकडून रोख रक्कम वसूल करुन दिनांक २९/१/२००१ रोजी रोखपाल श्री . जे . के . इसरानी यांच्याकडे जमा केली . सदरची रक्कम श्री . इसरानी यांनी दिनांक २७/३/२००१ रोजी महानगरपालिकेच्या कोषागारात भरल्याचे त्यांनी त्यांचे दिनांक २४/६/२००२ च्या पत्रान्वये कळविले आहे . सदरची रक्कम जवळजवळ दोन महिने नंतर भरणा केलेली आहे . रक्कम उशिरा भरण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही .

<u>आक्षेप क्रमांक ३ :- श्री . अनिल खतुराणी लिपिक, मालमत्ता कर विभाग यांनी रु . २०००/- रकमेचा अपहार केल्याबाबत</u>

श्री . अनिल अे खतुराणी, लिपीक यांनी पावत्ती क्रमांक ९४७५१ , दिनांक १९/३/२००० अन्वये वसुल केलेली रक्कम रुपये २०००/- (रुपये दोन हजार मात्र)

महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नसल्याने श्री . अनिल अे खतुराणी ,यांनी केलेल्या अफरातफरीची रक्कम त्यांचेकडून तात्काळ वसुल करुन ती महापालिकेच्या कोषागारात भरणा करुन तसा अहवाल लेखा परिक्षणास देणेबाबत अर्ध समास ज्ञापन पत्र क्रमांक उमपा / लेपवि / कर विभाग / असज्ञा / ७० , दिनांक २४/७/२००२ अन्वये करनिर्धारक आणि संकलक , मालमत्ता कर विभाग यांना कळविले आहे . परंतु त्यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही . .

<u>आक्षेप क्रमांक ४ :- श्री . दामोदर टी . शर्मा, लिपिक, मालमत्ता कर विभाग यांनी रु . २०३७/- रकमेचा अपहार केल्याबाबत</u>

श्री . दामोदर टी शर्मा, लिपीक यांनी पावत्ती क्रमांक ९९१११ दिनांक १०/४/२००० व ९९१७९ ,दि . ३/५/२००० अन्वये वसुल केलेली रक्कम अनुक्रमे रु . १६६७ व रु ३७० एकूण रु .२०३७ (रुपये दोन हजार सदोतीस मात्र) महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नसल्याने श्री . दामोदर टी शर्मा, यांनी केलेल्या अफरातफरीची रक्कम त्यांचेकडून तात्काळ वसुल करुन ती महापालिकेच्या कोषागारात भरणा करुन तसा अहवाल लेखा परिक्षणास देणेबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक :उमपा / लेपवि / करविभाग / असज्ञा / ७१ दिनांक <u>१३/८/२००२</u> अन्वये करनिर्धारक व संकलक मालमत्ता कर विभाग यांना कळविल्यानंतर सदरची रक्कम श्री . दामोदर टी . शर्मा यांनी दिनांक ९/८/२००२ रोजी व त्यावरिल व्याजाची रक्कम रु . ४९८ दिनांक १६/८/२००२ रोजी महापालिकेच्या कोषागारात भरणा केल्याचे करनिर्धारक व संकलक यांनी कळविले आहे .

## <u>पाणी पुरवठा विभाग</u>

<u>आक्षेप क्रमांक ५</u>

<u>श्री . एन . ए डोंगरे, टपाली, पाणी पुरवठा देयक विभाग उल्हासनगर ५ यांनी रुपये ५८६३७/- रकमेचा अपहार केल्याबाबत .</u>

श्री . एन . ए . डोंगरे, टपाली यांनी खाली दर्शविलेल्या पावत्त्यांव्दारे रक्कम रुपये ५८६३७ (रुपये अठ्ठावन्न हजार सहाशे सदोतीस) वसुल करुन ती महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा न केल्याने दिनांक १६/६/२००२ च्या अर्धसमास ज्ञापनाव्दारे पाणी पुरवठा विभागाच्या निदर्शनास आणले होते .

अपहार रकमेचा तपशिल

| अनु . क्रमांक | पावती क्रमांक | दिनांक | ग्राहक क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ११९६७८ | <u>२५/४/०१</u> | यु-३-८७७९ | २००० |
| २ | ११९६७९ | <u>२५/४/०१</u> | यु-३-१२४८७ | २९२० |
| ३ | ११९५७९ | <u>१८/७/०१</u> | यु-३-५७१५ | ५००० |
| ४ | ११९५८३ | <u>९/८/०१</u> | यु-३-१३८४९ | ४००० |
| ५ | ११९५८४ | <u>९/८/०१</u> | यु-३-१२६४२ | ५००० |
| ६ | ११९५८६ | <u>१/९/०१</u> | यु-३-५४६६ | ४०२ |
| ७ | ११९५८७ | <u>१/९/०१</u> | यु-३-५६०७ | २१३ |
| ८ | ११९५८८ | <u>१/९/०१</u> | यु-३-४३४३ | ४०२ |
| ९ | १३३५०४ | १०/९/०१ | यु-३-६०४० | ७४८ |
| १० | १३३५०५ | १२/९/०१ | यु-३-७४३२ | ३२२८ |
| ११ | १३३५१९ | १३/१०/०१ | यु-३-३७० | ४०७१ |
| १२ | १३३५१३ | २०/१०/०१ | यु-३-१३२७० | २४८९ |
| १३ | १३३५१४ | २५/१०/०१ | यु-३-४३२४ | १२०० |
| १४ | १३३५१५ | २६/१०/०१ | यु-३-१६७० | १४२ |
| १५ | १३३५२२ | २६/१०/०१ | यु-३-२०७२ | ५००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | १२९५८९ | ३/११/०१ | यु-३-१५४७ | १३९६ |
| १७ | १२९५९० | ३/१२/०१ | यु-३-३७६० | ३८७ |
| १८ | १३३५३७ | ४/१२/०१ | यु-३-१०३२३ | ४०० |
| १९ | १३३५३८ | ५/१२/०१ | यु-३-६९७५ | ४०० |
| २० | १३३५३९ | ५/१२/०१ | यु-३-६९५५ | ४०० |
| २१ | १३३५४० | ५/१२/०१ | यु-३-९५३४ | २९५ |
| २२ | १३३५४१ | ५/१२/०१ | यु-३-१२६०७ | १५०० |
| २३ | १३३५२१ | २७/१२/०१ | यु-३-६१८५ | ८८ |
| २४ | १२९५९१ | १२/१/०२ | यु-३-३७६५ | ५००० |
| २५ | १२९५९२ | ९/२/०२ | यु-३-५१०३ | १९४४ |
| २६ | १२९५९३ | ९/०२/०२ | यु-३-२१७२ | १९४४ |
| २७ | १२९२९४ | १०/२/०२ | यु-३-४५४७ | १९४४ |
| २८ | १२९५९५ | १०/२/०२ | यु-३-१६२६ | १०४४ |
| २९ | १२९५९६ | १४/२/०२ | यु-३-५७१८ | १२९६ |
| ३० | १२९५९७ | १४/२/०२ | यु-३-२३१८ | ३४१ |
| ३१ | १२९५९८ | १८/२/०२ | यु-३-८१७८ | १९८५ |
| ३२ | १२९५९९ | २५/२/०२ | यु-३-१६ | १४५८ |
| | | | एकूण | ५८६३७ |

अपहाराची वर उल्लेखिलेली रक्कम रुपये ५८६३७ श्री. डोंगरे यांनी खाली दर्शविलेल्याप्रमाणे पालिका कोषागार कार्यालयात भरलेली आहे.

अपहाराची रक्कम भरणा केल्याचा तपशिल

| अनुकमांक | अपहाराची रक्कम भरणा केल्याचा दिनांक | भरणा करण्यांत आलेली रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | २/३/२००२ | ४१५९/- |
| २ | १२/७/२००२ | १६४१३/- |
| ३ | १५/७/२००२ | ८८८८/- |
| ४ | १७/७/२००२ | २९१७७/- |
| | एकुण | ५८६३७/- |

परंतु खालील खुलासा पाणी पुरवठा विभागाने अद्याप केलेला नाही .

१) श्री . डोंगरे, हे टपाली या चतूर्थ श्रेणीतील पदावर काम करत असताना त्यांना वसुलीचे काम कोणत्या नियमान्वये दिलेले होते .

२) पावती पुस्तक कमांक १२९७ (अनुकमांक १ व २ उल्लेखिलेल्या पावात्त्या) हे श्री .के. एम बागुल यांना दिनांक ११/९/२००० रोजी दिले होते श्री. बागुल यांनी सदरहु पुस्ताकातील १२९६०१ पासुन १२९६३९ पर्यंत पावत्त्या फाडलेल्या आहेत व न वापरलेल्या पावत्त्यासहित ( १२९६४० पासून १२९७०० ) पावती पुस्तक अधिक्षक, श्री शेख यांना दिल्याचे दिसते . परंतु श्री . शेख यांनी पुस्तक प्राप्त झाल्याच्या स्वाक्षरीवर दिनांक घातलेला नाही मात्र ह्याच पावती पुस्तकातील पावत्त्या श्री . डोंगरे यांनी उपयोगात आणून अपहार केला आहे. श्री. डोंगरे यांना हे पावती पुस्तक दिल्याची त्यांची स्वाक्षरी घेतलेली नाही .

३) तसेच १२९६ कमांकाचे पावती पुस्तक श्री. बा-हाते यांना देण्यात आले होते . श्री बा-हाते यांनी या पुस्तकातील पावती कमांक १२९५०१ पासून १२९५६६ पर्यंत पावत्त्या उपयोगात आणल्या आहेत व अशत: उपयोगात आणलेले पावती पुस्तक श्री . शेख , अधीक्षक , यांना परत दिल्याची तसेच श्री . शेख यांनी स्विकृत केल्याची नोंद दिसते . म्हणजेच १२९६ व १२९७ ही अशंत: शिल्लक असलेली पावती पुस्तके श्री . शेख यांच्याकडे असताना पावती पुस्तक कमांक १२९६ श्री डोंगरे यांना कोणी व केव्हा दिले व त्याची रजिस्टरमध्ये नोंद का केली नाही तसेच पावती पुस्तक कमांक १२९७ हे श्री. डोंगरे यांना दिल्यानंतर त्यांची स्वाक्षरी का घेतली नाही. याचा शोध घेऊन त्यास जबाबदार असलेल्या कर्मचा-यांच्या नावासहित अहवाल लेखापरिक्षणास सादर करावा.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७०</u> <u>दिनांकः-१३ . १२. २००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

हि स्थायी समिती वरील प्रमाणे मुख्य लेखा परिक्षकांचे माहे एप्रिल २००२ ते माहे ऑगस्ट २००२ पर्यंतच्या जमाखर्चाच्या लेख्यांच्या छाननी अहवालाची नोंद करीत आहे व प्रशासनाला या सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुर्नसमायोजन करणे करीता योग्य पाऊले उचलणेस निर्देशित करीत आहे.

तसेच अहवालातील काही नियमबाहय प्रकारासंबंधी मुख्य लेखा परिक्षकांचे महानगरपालिका कर्मचा-यांच्या वर्तणुकीच्या आक्षेपाबाबत प्रशासनास शास्ती लादण्याची कार्यवाही किंवा इष्ट वाटेल तर पोलिसांकडे गुन्हा नोंदणीचे आदेश देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र</u>. ८८ <u>दिनांकः-२८.१.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा माहे एप्रिल २००२ ते माहे ऑगस्ट २००२ पर्यंतचे महापालिका लेख्यांचे व त्यातील नियम बाहय प्रकरणांबाबत मुख्यलेखा परिक्षकांचे अहवालावर स्थायी समितीने दि. १३.१२.२००२रोजीचे ठराव क्र. ७० व्दारे केलेले आदेश कायम करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व १०६ अन्वये जमा खर्च कर्मचा-यांच्या नियमबाहय प्रकरणी माहे एप्रिल २००२ ते ऑक्टोबर २००२ च्या मुख्यलेखा परिक्षकांच्या अहवालावर स्थायी समितीने दि. १३.१२.२००२ रोजीच्या ठराव क्र. ७१ व्दारे केलेले आदेश विचारात घेणे बाबत.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०५ व कलम १०६(१) अनुसार माहे ऑक्टोंबर २००२ व ऑक्टोंबर २००२ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल सोबत सादर केलेला आहे .कृपया वरील अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे ऑक्टोंबर २००२ व ऑक्टोंबर २००२ पर्यंतच्या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल .

वित्तिय वर्ष २००२ -२००३ च्या "अ" व "क" अंर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्त्पन्न व ऑक्टोंबर २००२ पर्यत पहिल्या सात महिन्या मध्ये प्राप्त झालेले उत्त्पन्न हे पुढे दर्शविलेले आहे .

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा |
|---|---|
| "अ" | १,०९,०३,६०,००० |
| "क" | ४८,८५,७५,००० |
| एकुण | १,५७,८९,३५,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत .

| | | |
|---|---|---|
| १ | महसूल जमा | १,३२,१२,५१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ३,७७,००,००० |
| ३ | कर्ज ( भांडवली) | ५,००,००,००० |
| ४ | अनामत रक्कमा/दायित्त्वे इ . | १२,९०,५०,००० |
| | एकूण | १,५३,८०,०१,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | ४,०९,३४,००० |
| | | १,५७,८९,३५,००० |

वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु १,३२,१२,५१,००० अपेक्षित धरलेली होती माहे ऑक्टोंबर २००२ पर्यंत समप्रमाणात रु . ७७,०७,३०,००० महसूल उत्त्पन्न अपेक्षित होते. प्रत्यक्षात रु. ४२,०२,०६,०००/- (२१:) महसूल उत्त्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑक्टोंबर २००२ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षानिहाय खालील प्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे ऑक्टोंबर २००२ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष (रु १००० पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जकात कर | ५३,७५,००,०००० | ३१,३५,४२,०००० | २८,७४,१४,००० | ९२ % |
| २ | मालमत्ता कर | २७,२०,००,०००० | १५,८६,६७,०००० | ४,४०,५०,००० | २८ % |
| ३ | एम आर टी पी वसुली | ६३,०५,००० | ३६,७८,००० | २६,७६,००० | ७३ % |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | महानगरपालिकेस मालमत्तेपासून प्राप्त झालेले उत्पन्न | १३,४५,००० | ७,८५,००० | २१,००० | ३ % |
| ५ | मार्केट | ३५,००,००० | २०,४२,००० | १,४४,००० | ७ % |
| ६ | रुग्णालय फी | २,१८,००० | १,२७,००० | ९३,००० | ७३ % |
| ७ | परवाना व इतर फी | ९७,७८,००० | ५७,०४,००० | ७०,४३,०००० | १२३ % |
| ८ | संकिर्ण | ४१,८०,००० | २४,३८,००० | १९,५६,०००० | ८० % |
| | एकूण-अ | ८३,४८,२६,००० | ४८,६९,८३,००० | ३४,३३,९७,००० | ७१ % |
| अर्थ संकल्प "क" | | | | | |
| ९ | पाणी पुरवठा देयके | ४३,००,००,०००० | २५,०८,३३,००० | ५,६७,१०,००० | २३ % |
| १० | मालमत्ताकर | ५,६०,००,०००० | ३,२६,६७,००० | ८५,०७,००० | २६ % |
| ११ | परवाना/ इतर फी | ३,२०,००० | १,८७,००० | ५,९४,०००० | ३१८ % |
| १२ | संकिर्ण | १,०५,००० | ६१,००० | ८९,००० | १४६ % |
| | एकूण - "क" | ४८,६४,२५,००० | २८,३७,४८,००० | ६,५९,००,००० | २७ % |
| | एकूण- "अ" व "क" | १,३२,१२,५१,००० | ७७,०७,३१,००० | ४०,९२,९७,००० | ५३ % |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु . १,५७,८९,३५,०००/- ( प्रांरभिक शिलकेसह)अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात ऑक्टोंबर २००२ पर्यंत रु ५३४६१६०००/- उत्पन्न दर्शविलेले आहे. परंतु या रकमेमध्ये खालील अतिरिक्त रक्कमा समाविष्ठ आहेत.

१ नोव्हेंबर १९९९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सुधारित वेतनाच्या थकबाकीच्या रकमा प्रदान करण्या करिता वेतन राखीव निधीतून रुपयाची गुंतवणूक त्यावरील व्याजासह रु .. ९७,२६,८२७/- काढलेली रक्कम .

२ कर्मचा-यांना दिवाळीपूर्वी वेतन आदाईसाठी तसेच सण अग्रीमसाठी तरतूद म्हणून दि. ६/११/२००२ रोजी देय असलेली जकात वसुलीचा घेतलेला आगावु हप्ता रु. १,०९,०९,०८७/- .

त्यामुळे माहे ऑक्टोंबर २००२ मध्ये प्राप्त झालेले प्रत्यक्ष उत्पन्न रु .७,७८,३६०००/- आहे . म्हणजेच माहे ऑक्टोंबर २००२ अखेरचे उत्पन्न रु ४७,३०,४७,०००/- आहे . (३०%) :महसूल उत्पन्न माहे ऑक्टोंबर , २००२ पर्यंत केवळ ५३% प्राप्त झालेले असल्यामुळे उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करणे अथवा खर्चात काटकसर करणे या व्यतिरिक्त पर्याय नाही .

याकरिता खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे .



मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०४ नुसार सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी मंजूर केलेला खर्च सम प्रमाणात कमी करणे किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १५० नुसार सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात कोणत्याही करात अनुपूरक कराधान लादून वाढ करणे .

<u>खर्च :-</u>

माहे एप्रिल २००२ ते ऑक्टोंबर २००२ या कालावधीमध्ये रु . ४९,९१,८२,१६० खर्च लेखांकित झालेला आहे .

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी आधिन आहे.

माहे ऑक्टोंबर २००२ चे तसेच पर्यंतची <u>जमा/खर्चाची</u> पत्रे सोबत जोडलेली आहेत .

<u>लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी ;मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ ;१ ) अ च्या तरतुदीप्रमाणे .</u>

## <u>सार्वजनिक आरोग्य विभाग</u>

आक्षेप कमांक :- १ <u>सार्वजनिक आरोग्य विभागातील श्री . रमेश कुडीया लिपीक, यांनी रु . ९४ ,३६३/- (रुपये चौ-याण्णव हजार तीनशे त्रेसष्ट फक्त ) रकमेचा केलेला अपहार :-</u>

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २००१-२००२ व २००२-२००३ या आर्थिक वर्षाचे जन्म मृत्यू दाखले फी, जन्म मृत्यू अर्ज , कत्तलखाना फी तसेच फेरीवाले फी इत्यादी जमा रक्कमांचे लेखा परिक्षण केले असता त्यांच्या कार्यक्षेत्रातील कॅम्प कमांक १ ते ५ च्या स्वच्छता निरिक्षकांनी वसुल केलेल्या रकमांचा भरणा आरोग्य विभागातील लिपीक श्री . रमेश कुडीया यांचेकडे जमा केला असता त्यांनी रु . ९४ ,३६३/- (रु .चौ-याण्णव हजार तीनशे त्रेसष्ट मात्र) रक्कम महापालिका कोषागारात न भरता कायम अपहार केल्याचे आढळून आल्याने सदरची अपहारित रक्कम संबंधीताकडून तात्काळ वसुल करुन महापालिकेच्या कोषागारात भरणा करण्याबाबत तसेच सदरच्या रकमेच्या अपहाराबाबत संबंधीतावर योग्य ती कारवाई करण्याबातचा अहवाल मा . आयुक्त यांना सादर करण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र कमांक उमपा / लेपवि / आवि / असज्ञा / ३७ / दि . १६/११/२००२ अन्वये उप आयुक्त (आरोग्य ) यांना कळविल्यानंतर त्यांनी श्री . रमेश कुडीया यांचेकडून वरिल रक्कम वसुल करुन दिनांक २१/११/२००२ रोजी महानगरपालिकेच्या कोषागारात जमा केल्याचे त्यांचे पत्र कमांक उमपा / आवि / आस्था ६४१ / दिनांक २७/११/२००२ अन्वये कळविले आहे .

## <u>मालमत्ता कर विभाग</u>

आक्षेप कमांक :- २ <u>रक्कम रु . १७०००/- चा धनादेश न वटता सदरची रक्कम मालमत्ता धारकाच्या खात्त्यावर जमा दाखविल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत .</u>

मालमत्ताकर विभागाचे सन २०००-२००१ ते २००१-२००२ या आर्थीक वर्षाच्या कालावधीचे लेखा परिक्षण करतांना श्री.व्ही . व्ही . कानडे , लिपीक (से नि ) यांनी पावती पुस्तक कमांक ३०७ मधिल पावती कमांक ०३०६१९ दि <u>२७/३/००१</u> व्दारे श्रीमती केसरबेन ए.ढेढीया मुरबाड रोड येथील शॉप वार्ड नंबर १ खाता नंबर ११९/८७ उल्हासनगर १ यांचेकडून मालमत्ता करापोटी रक्कम रुपये १७०००/- चा धनादेश कमांक ८९१७९० दिनांक २७/३/२००१ (विजया बॅंक उल्हासनगर३ ब्रॅंच)व्दारे स्विकारल्याचे

--४--

उपरोक्त पावती वरील नोंदीवरुन तसेच सदरचा धनादेश न वटता दि. ३१/३/२००१ रोजी परत आल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले मात्र वरील मुळ पावतीवर ब्वचनजमतपेमक शिक्का मारुन सदरची रक्कम वरिल खातेदाराच्या खात्त्यावर जमा दाखविली आहे. सदरच्या पावतीची (कार्बन) दुय्यम प्रत पावती पुस्तकातच आहे.

उपरोक्त धनादेश न वटता बॅंकेकडून परत आल्याने त्याच्या बदल्यात मालमत्ता धारकाने रक्कम रुपये १७०००/- पावती कमांक ०६८६१० दिनांक १५/२/२००२ रोजी रोखीने भरले आहेत व सदरच्या मुळ पावतीवर ब्वचनजमतपेमक शिक्का मारुन सदरची रक्कम वरिल खातेदाराच्या खात्त्यावर जमा दाखविली आहे.

वरील धनादेश न वटता परत येऊनही त्याची खातेदाराच्या खात्त्यावर जमा नोंद का घेण्यांत आली याचा खुलासा करण्याबाबत तसेच उपरोक्त धनादेश न वटल्यामुळे त्याऐवजी रोखीने वसुल केलेली रक्कम तब्बल ११ महिन्यानंतर वसुल केली आहे. तरी सदरची रक्कम वसुल करण्यास इतका विलंब का झाला याचा खुलासा करण्याबाबत .व उपरोक्त ग्राहकाच्या खाती दोन्ही पावत्त्यांव्दारे वसुल केलेली रक्कम जमा दाखविल्याने रुपये १७०००/- चे महापालिकेचे अर्थिक नुकसान झाल्याने याबाबत संबंधीतांवर योग्य ती कारवाई करुन दि . २७/३/२००१ रोजी ग्राहकाच्या खाती जमा दर्शविलेली नोंद रदद करुन तसे केल्याचे लेखा परिक्षणास कळविण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन

पत्र कमांक उमपा / लेपवि / मालमत्ता कर विभाग / असज्ञा / ७३ / दिनांक २७/९/२००२ अन्वये उप-आयुकत (महसुल) यांना कळविले आहे. परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही .

आक्षेप कमांक :- ३

रक्कम रु . १५,९६६/- (रुपये पंधरा हजार नऊशे सहासष्ट फक्त) चा धनादेश न वटता सदरची रक्कम मालमत्ता धारकाच्या खात्त्यावर जमा दाखविल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत

मालमत्ता कर विभागाचे सन २००१-२००२ या आर्थीक वर्षांच्या कालावधीचे लेखा परिक्षण करतांना श्री . आनिल खतुराणी टॅक्स कलेक्टर यांनी पावती पुस्तक कमांक ५२१ मधिल पावती कमांक ५२०२६ दि १८/८/२००१ व्दारे मुरली पी . रुपानी यांचेकडून यु-४-शिट नंबर ३ near victor system येथील मालमत्ता वार्ड नंबर ३० खाता नंबर ५३७२ उल्हासनगर ३ या मालमत्तेच्या करापोटी रक्कम रुपये १५९६६/- चा धनादेश कमांक १०१५४० दिनांक १८/८/२००१ (ओवोरसिस बॅंक कमर्सीयल ३ ब्रॅच) व्दारे स्विकारल्याचे उपरोक्त पावती वरील नोंदीवरुन दिसुन आले. तसेच सदरचा धनादेश न वटता दि . २४/८/२००१ रोजी परत आल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले. मात्र वरील मुळ पावतीवर Coputerised शिक्का मारुन सदरची रक्कम वरिल खातेदाराच्या खात्त्यावर जमा दाखविली आहे.

वरील धनादेश न वटता परत येऊनही त्याची खातेदाराच्या खात्त्यावर जमा नोंद का घेण्यांत आली याचा खुलासा करण्याबाबत तसेच सदरचा धनादेश न वटल्याने त्याच्या बदल्यात खातेदाराकडून रोख रक्कम का वसुल केली नाही याचा खुलासा करण्याबाबत व उपरोक्त ग्राहकाच्या खाती पावतीव्दारे वसुल केलेली रक्कम जमा दाखविल्याने रु . १५९६६/- चे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असुन महापालिकेची फसवणूक केली असल्याने संबंधितावर योग्य ती कारवाई करण्याबाबत मा . आयुक्त यांना अहवाल सादर करण्यासाठी व सदरच्या खातेदाराने मालमत्ताकराची वरिलप्रमाणे रक्कम भरलेली नसल्याने ती त्यांच्या खात्त्यातून कमी करावी तसा अहवाल लेखा परिक्षणास देण्यासाठी लेखा परिक्षण विभागाने अर्ध समास ज्ञापन पत्र कमांक उमपा / लेपवि / मालमत्ताकर विभाग / असज्ञा / ७६ / दिनांक २७/११/२००२ अन्वये उप-आयुक्त (महसुल) यांना कळविले आहे . परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

आक्षेप कमांक :- ४

मालमत्तेचे खाते नसतांना मालमत्ता करापोटी रु . १५,२६०/- (रुपये पंधरा हजार दोनशे साठ फक्त) स्विकारल्याबाबत



सन २०००-२००१ सालचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण करतांना मालमत्ता कर वसुली लिपीक श्री . भगवान उदासी यांनी पावती कमांक ००२२४७ दिनांक १९/१०/२००० पावती बूक कमांक २३ व्दारे श्री . अर्जुनदास के . बालानी, नियर एस एन एच स्कूल प्लांट नंबर १, २, ३ वार्ड कमांक ३० खाते कमांक ८०६ उल्हासनगर यांचे कडून मालमत्ता करा पोटी रु . १५२६० (रुपये पंधरा हजार दोनशे साठ मात्र)कृ वसूल केल्याचे दिसून आल्याने व पावती वर “Chif From D.M.C.” असा उल्लेख केला असल्याने “Chif From D.M.C.” म्हणजे काय याचा खुलासा करण्याबाबत व वसुल केलेली रक्कम ही सन १९८१-८२ ते १९८५-८६ सालची थकबाकी असल्याचे पावतीवरील नोंदी वरुन दिसून आल्याने परंतु संगणकीय खाते पहाता खाते वहीत श्री अर्जूनदास बालानी यांच्या नांवाऐवजी खाते नंबर ८०६ मनिषा शिवाजी भागवत या नावाचे खाते असल्याचे दिसुन आल्याने व वसुल केलेली रक्कम वरील खात्त्यात जमा दाखविलेली नसल्याने सदरची रक्कम कोणत्या खात्त्यात जमा केली आहे . याचा खुलासा करण्याबाबत तसेच खालील अभिलेख लेखा परिक्षणास दोन दिवसात उपलब्ध करुन देण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र कमांक उमपा / लेपवि / मालमत्ता कर वि / असज्ञा / ७४ / दिनांक २९/१०/२००२ अन्वये मालमत्ता करविभागास कळविले आहे . परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

खातेदारास देण्यांत आलेली मागणी नोटीस

१ असेसमेंट रजिस्टर सन १९८१ -१९८२

२ फिल्डबूक

३ मागणी रजिस्टर

४ तत्सम अभिलेख

**आक्षेप क्रमांक :- ५ मालमत्तेचे खाते नसतांना मालमत्ता करापोटी रक्कम रु . १९०६५/- ( रुपये एकोणीस हजार पहासष्ट मात्र ) स्विकारल्याबाबत**

सन २०००-२००१ सालचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण करतांना मालमत्ता कर वसुली लिपीक श्री . भगवान उदासी यांनी पावती क्रमांक ००२२४८ दिनांक १९/१०/२००० (पावती बूक क्रमांक २३) व्दारे श्री . अर्जुनदास बालानी, नियर एस एन एच स्कूल प्लाट नंबर १७० ग्रिन एरिया वार्ड क्रमांक ३० खाते क्रमांक ८०२ उल्हासनगर ३ यांचे कडून मालमत्ता करा पोटी रु . १९०६५ वसूल केल्याचे दिसून आल्याने तसेच वरिल पावती वर "Chif From D.M.C." असा उल्लेख केला असल्याने "Chif From D.M.C." म्हणजे काय याचा खुलासा करण्याबाबत . तसेच सन १९८१-८६ सालची थकबाकी असल्याचे पावतीवरील नोंदी वरुन दिसून आल्याने व उपरोक्त संगणकीय खाते पहाता खाते वहीत श्री अर्जूनदास बालानी यांच्या नांवाऐवजी खाते नंबर ८०२ श्री . गुनहा यांचे खाते असल्याचे दिसुन आल्याने व वसुल केलेली रक्कम वरील खात्त्यात जमा दाखविलेली नसल्याने सदरची रक्कम कोणत्त्या खात्त्यात जमा केली आहे . याचा खुलासा करण्याबाबत . तसेच खालील प्रमाणे अभिलेख लेखा परिक्षणास दोन दिवसात उपलब्ध करुन देण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र क्रमांक उमपा / लेपवि / मालमत्ता करवि / असज्ञा / ७५/ दिनांक २९/१०/२००२ अन्वये मालमत्ता कर विभागस कळविले आहे . परंतु त्त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

१ खातेदारास (श्री . अर्जनदास बालानी ) यांना देण्यांत आलेली मागणी नोटीस
२ असेसमेंट रजिस्टर सन १९८१ -१९८२
३ फिल्डबुक
४ मागणी रजिस्टर
तत्त्सम अभिलेख



**स्थायी समिति ठराव क्र. ७१** **दिनांक:-१३ . १२. २००२**

सुचकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे
अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

हि स्थायी समिती वरील प्रमाणे मुख्य लेखा परिक्षकांचे माहे एप्रिल २००२ ते माहे ऑक्टोबर २००२ पर्यंतच्या जमाखर्चाच्या लेख्यांच्या छाननी अहवालाची नोंद करीत आहे व प्रशासनाला या सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुर्नसमायोजन करणे करीता योग्य पाऊले उचलणेस निर्देशित करीत आहे.

तसेच अहवालातील काही नियमबाहय प्रकारासंबंधी मुख्य लेखा परिक्षकांचे महानगरपालिका कर्मचा-यांच्या वर्तणुकीच्या आक्षेपाबाबत प्रशासनास शास्ती लादण्याची कार्यवाही किंवा इष्ट वाटेल तर पोलिसांकडे गुन्हा नोंदणीचे आदेश देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

**एकमताने**
सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महासभा ठराव क्र. ८९** **दिनांक:-२८ १ २००३ .**

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंदकुमार ठाकुर

ही महासभा माहे एप्रिल २००२ ते माहे ऑक्टोबर २००२ पर्यंतचे महापालिका लेख्यांचे व त्यातील नियम बाहय प्रकरणांबाबत मुख्यलेखा परिक्षकांचे अहवालावर स्थायी समितीने दि. १३.१२.२००२ रोजीचे ठराव क्र. ७१ व्दारे केलेले आदेश कायम करित आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>**उल्हासनगर महानगरपालिका**</u>

<u>विषय:-</u>शासन निर्णयास अनुसरून महापालिका अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी महापालिकेचे वाहन पुरविणे ऐवजी वाहन खर्च प्रतीपुर्तीस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध कार्यालयाकडे त्यांच्या कार्यालयीन वापरासाठी तसेच त्यांच्यावर सोपविलेल्या विविध कार्याच्या संदर्भात उपयोगात येणारी मालकीची वाहने आहेत या वाहनाचा सर्वसाधारण आढावा घेतल्यास त्यांच्या दुरूस्ती व देखभालीवर खर्च सतत वाढत आहे तसेच वाहनांचा पुरेपुर वापर होत नाही. सदर बाब लक्षात घेता उल्हासनगर महानगरपालिकेने काही अधिका-यांना प्रशासकीय /फिरती कामकाजासाठी भाडे तत्त्वावर वाहने उपलब्ध करून दिली आहेत. भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे ठेकेदारास पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीपोटी फरकाची रक्कम, जादा तासाचा मोबदला व निर्धारित केलेल्या कमाल किलोमीटर पेक्षा जास्त चालविण्यात येणारे किलोमीटर पोटी सुध्दा जादा रक्कम अदा करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे वाहनापोटी मोठया प्रमाणावर येत असलेल्या खर्चामध्ये काटकसर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वित्त विभागातील शासन निर्णय क्रमांक वाहन <u>-१०००/प्र.</u> क्र. <u>-६५/२००१</u> विनिमय दिनांक १०.९.२००१ अन्वये अधिका-यांना स्वत:चे चार चाकी वाहन वापरण्यास अनुमती देवून वाहन वापराच्या खर्चाची प्रतिपुर्ती करिता काही निर्देशांक सूत्र विहीत केले आहेत. त्याचे अनुसरण करून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने पण त्यांच्या अधिका-यांना महापालिका कामकाजासाठी स्वत:चे चार चाकी वाहने वापरण्याचे निश्चीत केलेले आहे.

यासंबंधी दिनांक १५.६.२००२ रोजी मा.आयुक्तांनी बोलविलेल्या बैठकीत चर्चा झाली व मा. आयुक्त यांनी शासनाचे कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी केलेले निश्चय लक्षात घेवून प्रस्ताव बनवून सादर करण्याचे आदेश दिले होते.

तसेच दिनांक २७.६.२००२ रोजी झालेल्या महासभेत बजेट विषयी बोलताना मा. सभागृह नेता यांनी असे मत प्रदर्शित केले की शासनाच्या सदर निर्णयानुसार महानगरपालिका अधिका-यांना ही स्वत:चे ही स्वत:चे चार चाकी वाहन वापरण्यास प्रोत्साहित करून वाहन वापराच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात यावी व याअनुषंगाने स्थायी समिती ने अंदाजपत्रकाच्या कार्यालयीन कामासाठी भाडे तत्त्वावर उपलब्ध करण्यात आलेले वाहने खर्च संबंधी शिर्षातुन २५ लाख वजा करून बजेटच्या महापालिका कर्मचा-यांकरिता इतर भत्ते व फायदे लेखा शिर्षात वाढविण्याचे सुचित केले व महासभेने ही सुना मान्य करून त्याप्रमाणे वर्ष २००२-२००३ चे अंदाजपत्रक पारित केले आहे.

वरील बाबी लक्षात घेता उल्हासनगर महानगरपालिकेतील वाहने अनुज्ञेय असणा-या अधिका-यांसाठी जे निर्देशांक सूत्र विहीत करण्यांत आलेल्या प्रस्तावाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

१. वाहने वापराच्या खर्चाची प्रतिपुर्ती ठरविण्यासाठी निर्देशांक सूत्र
वाहनांच्या बाजारातील किंमती, इंधनाचा दर, वाहन चालकाचा खर्च इत्त्यादी विचारात घेवून पुढील प्रमाणे निर्देशांक सूत्र विहित करण्यात येत आहे.



| सुत्र | |
|---|---|
| १. वाहनाची किंमत | क्ष |
| २. कर्ज (वाहनाच्या किंमतीच्या ८५ टक्के) | य |
| ३ व्याज (१२ टक्के) वार्षिक | र |
| ४ घसारा (१० टक्के) वार्षिक | ल |
| ५ वाहन चालकाचा पगार (रू. ३५०० स्थिर) | व |
| ६. देखभाल दुरूस्ती वार्षिक (२ टक्के) | ष |
| ७ एक वेळचा कर (भागीले १०) | स |
| ८ विमा | ळ |
| सुत्र =(र+ल+व+ष+स+ह) भागिले १२ | |

२. प्रति किलोमीटर दरासंबधी खालील प्रमाणे निर्देशांक सूत्र विहित करण्यात येत आहे.

| |
|---|
| १. एकूण कि. मी. ''अ'' |
| २ कि.मी. प्रति लिटर ''ब'' |
| ३. खर्च प्रति लिटर ''क'' |
| सुत्र - ''अ'' भागिले ''ब'' x ''क'' |

३. वर्गीकरणातील अधिका-यांना ते वापरणार असलेल्या स्वतःच्या चार चाकी वाहनासाठी वरील सूत्राप्रमाणे येणारी रक्कमेची त्या प्रमाणात प्रतिपुर्ती होईल. सदर सुत्रात शासनाने बदल केला तर त्यानुसार प्रतिपुर्ती होणार आहे तसेच मा. आयुक्त हे वेळोवेळी आढावा घेवून सदर सुत्रात काही बदल करू शकतात व त्यानुसार प्रतिपुर्ती अनुज्ञेय राहील. तथापि कमीत कमी १५ दिवसापेक्षा कमी फिरती करावी लागली तर कमीत कमी परिगणनेनुसार येणा-या मासिक रक्कमेच्या ५० टक्के रक्कम देय राहील.

४. एखादया महिन्यात संबंधित अधिकारी सलग १० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रजेवर राहिल्यास किंवा संपुर्ण महिन्यात एकुण १० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त सर्व प्रकारची रजा झाल्यास त्या प्रमाणात मासिक प्रतिपूर्तीच्या रक्कमेतून रक्कम कमी करण्यात येईल.

५. संबंधित अधिका-यांचे वाहन कोणत्त्याही कारणामुळे नादुरूस्त असल्यास व त्याने त्या कालावधीत महापालिकेचा वाहन वापरल्यास त्यांचेकडुन त्या प्रवासासाठी रू. ८/-प्रति कि.मी. प्रमाणे रक्कम वसूल करण्यात येईल.

६. वाहन अपघातग्रस्त झाल्यास या नादुरूस्त झाल्यास ते सुस्थितीत ठेवणे विमा, कर भरणे इत्त्यादी प्रकारची जबाबदारी संबंधित वाहनधारक अधिका-यांची राहील, महापालिकेची जबाबदारी निर्देशांक सूत्राप्रमाणे मासिक खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या पलिकडे असणार नाही.

७. संबंधित अधिकारी कार्यालयीन कामकाजासाठी प्रवास करीत असतांना टोल भरावा लागल्यास त्याची प्रतिपुर्ती करण्यात यावी. तसेच महानगरपालिका तर्फे

हुद्दा व "उल्हासनगर महानगरपालिका" असे बोर्ड वाहनावर लावण्यासाठी प्रस्तावीत आहे. त्याचा खर्च महापालिकेमार्फत अनुज्ञेय राहिल.

८. अधिका-यांना स्वतःचे वाहन खरेदीसाठी महानगरपालिकेकडून कोणत्त्याही प्रकारचे अग्रिम प्राप्त होणार नाही. मात्र स्वतःचे वाहन खरेदी करणा-या अधिका-यांनी बँक किंवा वित्तिय संस्थेकडुन कर्ज घेतल्यास त्यासाठी आवश्यक ते नाहरकत प्रमाणे पत्र तसेच निश्चित केलेल्या पैशाचा हप्ता संबंधित अधिका-यांच्या मासिक पगारातून कपात करून कर्ज देणा-या बँक अथवा वित्तिय संस्थेस देण्याची संम्मती देण्यात येईल.

--३--

९. शासनाने निश्चित केलेल्या मॉडेल शिवाय इतर महागडया गाडया अधिका-यांनी खरेदी केल्यास उपरोक्त शासन निर्णयात नमुद करण्यात आलेल्या कमाल मर्यादा म्हणजे रक्कम रूपये ३, ९७,३१२/- विचारात घेवून दरमहा वाहन खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम परिगणीत करण्यात येईल. अन्यथा वाहन खरेदी देयकानुसार खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम परिगणित करण्यात येईल.

तसेच शासनाने कमाल मर्यादा वाढवली किंवा मा. आयुक्त यांनी वेळो वेळी बाजाराचा आढावा घेवुन कमाल मर्यादा मध्ये वाढ करणे योग्य वाटले तर ते वाढ करू शकतील व त्या वाढीनुसार दरमहा वाहन खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम परिगणित करण्यात येईल.

१० प्रतिपुर्तीची रक्कम परिगणीत करतेवेळी डिझेलवर /पेट्रोलवर चालणा-या वाहनाचा इंधन वापर सरासरी १२ कि. मी. प्रति लिटर धरण्यात येईल.

११ अधिकारी कार्यालयीन कामा करिता स्वतःचे वाहन वापरणार असतिल त्यांनी शक्यतो नविन वाहन खरेदी करावे. जुने वाहन असल्यास शासनाच्या नियमानुसार त्याची घसारा किंमत विचारात घेवून महिना त्यांची प्रतिपुर्ती रक्कम ठरविण्यात येईल.

१२ वाहनाची खरेदी कुटूंबातील कोणत्त्याही सदस्याच्या नावाने करण्यात यावी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ मध्ये नमुद केलेल्या कुटुंबाची व्याख्या सदर प्रयोजनाकरिता तंतोतंत लागु करण्यात यावे.

१३ मा. आयुक्त व अतिरिक्त आयुक्त व्यतिरिक्त इतर सर्व अधिका-यांना सध्या प्रति महा १२५० कि. मी. ची कमाल मर्यादा निश्चित करण्यता येत आहे.

कमाल मर्यादा १२५० किलोमीटर निश्चीत करण्याचे कारण पुढीलप्रमाणे आहे.

महानगरपालिकेची हदद १३ वर्ग कीलोमीटर आहे.

कार्यालयीन कामकाजाचे २५ दिवस असतात. त्यातून जर अधिकारी ४ दिवस मुंबई ची ट्रीप केली तर पुढील प्रमाणे किलोमीटर येऊ शकतो.

महानगरपालिका क्षेत्रात फिरती २१ दिवस x ३० किलोमीटर दर दिवस एकूण ६३० किलोमीटर मुंबई ४ दिवस भेट x १५० किलोमीटर एकुण ६०० किलोमीटर.

एकूण १२३० कि.मी. दर महिना.      समजा रू. १२५० कि.मी. दर महिना

१४ अधिका-यांनी उपरोक्त नमुद असलेली कि.मी. मर्यादा पाळण्यात यावी कि.मी. मर्यादा वाढली तर त्याचे योग्य कारण दिल्यानंतर प्रतिपुर्ती करण्यात येईल. तसेच उपरोक्त नमूद असलेली कि.मी. कमला मर्यादित मा. आयुक्त फेरबदल करू शकतात.

१५ प्रतिपुर्ती घेताना संबंधित अधिका-यांनी वाहन वापरासंबंधी प्रमाणपत्र पुढील महिन्याच्या ५ तारखे पर्यंत देणे बंधनकारक राहिल. सदर बिलांची प्रतिपुर्तीची देयके वाहन विभागामार्फत सादर होतील व वाहन विभाग प्रमुखाने देयकासंबंधी नोंद वही ठेवणे आवश्यक राहिल.

१६ स्वतःचे वाहन वापरल्यामुळे प्रतिपुर्तीस अनुज्ञेय असणा-या अधिका-यांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे. आयुक्त अति. आयुक्त शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सर्व उपायुक्त, सचिव, मुख्य लेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (विद्युत/बांधकाम/पाणी पुरवठा) मुख्य लेखा अधिकारी, सहा संचालक नगररचना, सर्व प्रभाग क्षेत्र अधिकारी, कर निर्धारक व संकलक आणि नगर रचनाकार.

उक्त अधिका-यांपैकी मा. आयुक्तांचे साठी महापालिकेचे स्वतःचे वाहन बंधनकारक आहे. वरील पैकी जे अधिकारी स्वतःचे वाहन घेणार नसतील त्यांना महापालिकेचे किंवा भाडे तत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यात येईल.



१७.उर्वरीत वाहन अनुज्ञेय अधिकारी यांचे व्यतिरिक्त मा. आयुक्त यांना योग्य किंवा आवश्यक वाटेल तर सदर योजनेनुसार अन्य अधिकारी यांनाही निर्धारित स्वतःचे वाहन कार्यालयीन कामी वापरणे सुत्रानुसार त्याची प्रतिपुर्ती कि.मी. ची मर्यादा मा. आयुक्त निर्धारीत करतील. अन्यथा चालु प्रथेनुसार उर्वरित वाहन अनुज्ञेय अधिका-यांना महापालिकेचे किंवा भाडे तत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यात यावे.

१८.बाकी काही अत्त्यावश्यक व महत्त्वाच्या सेवेतील विभागांना प्रशासकीयांकिरती कामकाजासाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे /भाडे तत्त्वावर वाहन उपलब्ध करून देणेबाबत निर्णय मा. आयुक्त वेळोवेळी त्यांच्या स्तरावर घेतील.

सदर प्रस्तावात दिलेल्या अटीची आयुक्तांनी केलेला अर्थ निष्पत्ती अंतीम राहील तसेच वेळोवेळी कामाचा आढावा घेवून सदर प्रस्तावात काही फेर बदल करणे गरजेचे असल्यास ते करण्या करिता मा. आयुक्त यांची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील. अन्यथा सदर प्रस्तावात उल्लेखीत न केलेल्या बाबीसंबंधी संदर्भीय शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे ही बाब महापालिका आयुक्तांच्या अधिकारात राहील.

वरील सर्व बाबी लक्षात घेता चालू वित्तिय वर्षाच्या अंदाज पत्रकात सदर कामासाठी केलेली पुरेशी तरतुदी नुसार महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

<u>महासभा ठराव क्र.</u> १० <u>दिनांकः-२८.७.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शासन निर्णया अनुषंगाने महापालिका अधिका-यांना कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे चार चाकी वाहन खरेदी करण्यासाठी प्रोत्साहीत करून वाहन वापर खर्चाच्या प्रतीपुर्ती पस्तावास व अंतर्भुत खर्चास वरील अटी व शर्तिच्या अधिन राहून मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय:- महानगरपालिका विद्युत विभागातील कर्मचा-यांना निवड समितीच्या शिफारशीस अनुसरून पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

विद्युत विभागातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यासंबंधी दिनांक १८/१२/२००२ रोजी निवड समितीची बैठक होऊन त्या बैठकीमध्ये कर्मचा-यांची सेवा जेष्टता,(सेवा जेष्टता यादी अंतिम रित्त्या प्रसिध्द करण्याच्या अटीस अधिन राहून )पदोन्नतीची अर्हता व शासन निर्णय कमांक : बी सी सी १०९७ / प्र क ६३ / ९७/ १६ ब / दिनांक १८/१०/१९९७ मधील निर्देशानुसार १०० बिंदु नामावलीनुसार खालील कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत शिफारस केली असुन मा . आयुक्त यांनी त्यास मान्यता दिलेली आहे .

१) विजतंत्री या पदावर पदोन्नती

वेतनश्रेणी ४०००-१००-६०००- ,एकुण मंजुर पदे ११ , भरलेली पदे १ , रिक्त पदे १०

खालील तारतंत्री पदावरील कर्मचा-यांची विजतंत्री या पदावर पदोन्नतीसाठी निवड समितीची शिफारस आहे .

| अनु | कर्मचा-याचे नांव |
|---|---|
| १ | श्री अर्जुन मोरे |
| २ | श्री . सेवकराम ठाकुरानी |
| ३ | श्री . कमल शर्मा |
| ४ | श्री . दलसिंग ठाकुर |
| ५ | श्री . दिनदयाल श्रीवास्तव |

टिप:- उरलेल्या ५ पदांसाठी बिंदु नामावलीनुसार संबंधीत प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्याने

सदर प्रवर्गाचे बिंदु राखीव ठेऊन पुढे ढकलण्याची शिफारस आहे .

२) तारतंत्री या पदावर पदोन्नती व पदस्थापना

वेतनश्रेणी ३०५०-७५-३९५०-८०-४५९०

एकुण मंजुर पदे ४०

भरलेली पदे १९ (तारतंत्री -१३ , सहाय्यक तांरतत्री -६)

निवड समितीने सहाय्यक तारतंत्री या पदावरील भरलेली पदे ही ६ असल्याचे गृहीत धरले आहे . त्यापैकी सध्यास्थितीत ५ कर्मचारी हे सहाय्यक तारतंत्री या पदावर कार्यरत असुन १ कर्मचारी श्री . हरी लुंड हे मयत झालेले आहेत . सध्या कार्यरत कर्मचारी खालील प्रमाणे .

| "सहा . तारतंत्री" | | | |
|---|---|---|---|
| अक | कर्मचा-यांचे नांव | सेवेत दाखल दिनांक | सहा .वायरमन पदावर दाखल दिनांक |
| १ | श्री .साईनाथ मोहिले | १/४/१९८२ | १/१०/१९८८ |
| २ | श्री . कृष्णा पावशे | १/४/१९८२ | १/१०/१९८८ |
| ३ | श्री . आधार मोरे | १/१०/१९८८ | १/१०/१९८८ |
| ४ | श्री . महात्तमसिंग | १/१०/१९८८ | १/१०/१९८८ |
| ५ | श्री . किशोरी भुपानी | १/१०/१९८८ | १/१०/१९८८ |

उपरोल्लेखीत सहाय्यक तारतंत्री या पदावरील ५ कार्यरत कर्मचारी यांना शासनाच्या दि १३ जून २००२ च्या निर्णयापासून ७तांरतत्री८ या पदनामास समायोजन करणे आवश्यक आहे .

निवड समितीने तारतंत्री या पदावर सध्यास्थितीत एकूण १९ कर्मचारी भरलेले आहेत असे गृहीत धरले आहे . विजतंत्री या पदनामामध्ये उपरोल्लेखीत प्रस्तावानुसार तारतंत्री पदावरील ५ कर्मचारी पदोन्नत होत आहेत . म्हणजेच तारतंत्री पदामधील सदर ५ जागा रिक्त होणार आहेत . तारतंत्री पदनामाची एकूण ४० पदे मंजूर आहेत . म्हणजेच प्रत्यक्षात तारतंत्री या पदनामावर भरलेले कर्मचारी यांची संख्या १४ होते व रिक्त जागा २६ उरतात त्या जागा भरणेसाठी खालील विद्युत मदतनीस पदावरील तारतंत्री पदासाठी पात्र असणा-या कर्मचा-यांची ७तारतंत्री८ या पदावर पदोन्नतीसाठी निवड समितीची शिफारस आहे .

| अनु | कर्मचा-याचे नांव |
|---|---|
| १ | श्री .काशीराम पुंजाराम वाघमारे |
| २ | श्री एस .के .खंडागळे |
| ३ | श्री गणपत दोंदे |
| ४ | श्री . काशीनाथ गणपत आळशी |
| ५ | श्री कांतीलाल गणपत आळशी |
| ६ | श्री शशीकांत मोरे |
| ७ | श्री . विठ्ठल शेळके |
| ८ | श्री . दुंदा के . जाधाव |
| ९ | श्री . गोविंद पिंपरकर |
| १० | श्री . राकेश राय |
| ११ | श्री . चंद्रबली जैस्वार |
| १२ | श्री . आनंद मोरे |
| १३ | श्री . भिमा ससाणे |
| १४ | श्री . बंसीलाल जैस्वार |
| १५ | श्री . गजानंद आळशी |
| १६ | श्री . एकनाथ शेलार |
| १७ | श्री . मोहन वाधवानी |

टिपः- उरलेले ९ पदांसाठी बिंदु नामावलीनुसार संबंधीत प्रवर्गाच्या बिंदूचे उमेदवार उपलब्ध नसल्याने सदर बिंदु
राखीव ठेऊन पुढे ढकलण्याची शिफारस आहे .

विद्युत विभागातील "विद्युत लिपीक" हे पद महापालिकेच्या प्रस्तावित आस्थापनासुचीमध्ये लिपीक या पदामध्ये समायोजित केले आहे . तत्त्कालीन नगरपालिका असतांना खालील कर्मचारी हे विद्युत लिपीक या वर्ग -ड च्या पदावर कार्यरत होते .

| अक | कर्मचा-यांचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | श्री . किशोर तलरेजा | नववी |
| २ | श्री . रमेश मुलचंदानी | नववी |
| ३ | गौतम मुखोपाध्याय | बी . कॉम |
| ४ | हरेंद्र श्रीवास्तव | एस .एस .सी . |
| ५ | पंचम विश्वकर्मा | एस .एस .सी . |
| ६ | अमर थदानी | एस .एस .सी . |

प्रस्तावित आस्थापना सुचिमध्ये ''लिपीक'' संवर्गासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या अर्हतेमध्ये खालील प्रमाणे कर्मचारी हे भरती नियमातील अटीनुसार मराठी, इंग्रजी टंकलेखन व संगणक (MS-CIT किंवा तत्सम परिक्षा ) परिक्षा १ वर्षाच्या आत उत्त्तीर्ण होण्याच्या अटीस आधिन राहून लिपीकासाठी पात्र ठरतात

| अ क | कर्मचा-यांचे नांव |
|---|---|
| १ | गौतम मुखोपाध्याय |
| २ | हरेंद्र श्रीवास्तव |
| ३ | पंचम विश्वकर्मा |
| ४ | अमर थदानी |

त्यामुळे सदर कर्मचारी यांचे "लिपीक" संवर्गात (वर्ग-क ) समायोजन करण्याची शिफारस निवड समितीने केलेली आहे.

निवड समितीने सादर केलेल्या प्रस्तावास महासभेची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर

महासभा ठराव क्र. ९१ दिनांक:-२८ ७ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील वर उल्लेख केलेल्या कर्मचा-यांचे नावासमोर दर्शाविलेल्या पदावर निवड समितीच्या शिफारशीअनुसार पदोन्नती देणेस किंवा पदामध्ये समायोजनेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- सन २००२-२००३ची उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थीक स्थिती विचारात घेवून खर्चावर नियंत्रणासंबंधी निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार महापालिकेचे अंदाजपत्रक तीन टप्प्यात तयार करण्यात येते .या अधिनियमाचे कलम ९५ नुसार आयुक्तांनी दरवर्षी उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करुन ते स्थायी समितीपुढे ठेवणे तसेच सदर उत्पन्न व खर्चाच्या अंदाजासह पुढील वर्षात जे कर लादणे आवश्यक आहे अशा करासंबंधीचा प्रस्तावही त्यासोबत ठेवणे आवश्यक आहे . तदनंतर अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने आयुक्तांचे अंदाज व प्रस्ताव विचारात घेवून पुढील वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करावयाचे असतात . स्थायी समितीने तयार केलेले अंर्थसंकल्पीय अंदाज हे जसेच्या तसे किंवा इष्ट वाटेल असे फेरफार त्यात करुन स्वीकृत करणेचे अधिकार हे कलम १०० नुसार महासभेला आहेत .

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीच्या अधिन राहुन प्रशासनात्तर्फे एकूण रक्कम रुपये १०४ कोटीचे उत्पन्न व रुपये १५३ कोटी खर्च वर्ष २००२-२००३ करीता अपेक्षित करण्यात आले .सदर उत्पन्न व खर्चातील ४९ कोटीची तुट भरुन काढण्यासाठी प्रशासनाने महापालिकेतर्फे लावण्यात येणा-या विविध कराच्या दरात वाढ करुन सदरची तुट भरुन काढणेचा प्रस्ताव खालील प्रमाणे सादर केलेला होता .

अ) जकात :--

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ नुसार महानगरपालिका हददीत आयात होणा-या विविध वस्तुंवर उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमांमध्ये ठरविण्यात आलेल्या जकात दरानुसार जकात आकारणी केली जाते . जकात हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य साधन असून अंदाजे ५०% वसूली जकात आकारणीमुळे होत आहे . महानगरपालिकेने जकात दरात काही वर्षापासून कोणत्त्याही प्रकारची वाढ केलेली नाही व सद्याचे प्रचलित दर हे इतर आसपासच्या महानगरपालिकेच्या तुलनेने फारच कमी आहेत .

वरील सर्व गोष्टी गांभीर्यपुर्वक लक्षात घेता, उल्हासनगर शहरात आयात होणा-या जकात नियमाच्या ४० गटातील समावेश असलेल्या वस्तुंच्या आयातीवर जकात वाढीचा प्रस्ताव तयार करुन . शहरातील आयात होणा-या विविध वस्तूंवर जकात वाढीचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सादर करण्यांत आला होता .

| वस्तू गट क्रमांक | वस्तूचे नांव | प्रचलित दर (%) | प्रस्तावीत वाढीव दर (%) | अंदाजीत वाढीव उत्पन्न (लाखात) |
|---|---|---|---|---|
| ५ब | अन्य प्रकारची खादय तेले | १ .१० | २ | ४८ |
| ६ | साखर ,गुळ ,ऊस | १ | २ | २५ |
| ७ | मद्य व मद्यार्क, बीअर, | ३ .७५ | ४ | ११ |
| ११ | चहा ,कॉफी व कॉफीच्या बिया | १ .१० | २ | ६ |
| १३ | कॅन्फेक्शनेरी, जेली ,मासळी ,किराणा माल इ . | १ .६५ | ४ | २०० |
| १४ब | औषधे | १ .१० | २ | ३८ |
| ३२ | विजेचे बल्ब किंवा गॅसच्या प्रकाशासाठी असलेल्या वस्तू | २ .५० | ४ | ६ |
| ३३अ | सर्व प्रकारचे साबण(कमाल दर २: असल्यामुळे) | २ .२० | २ | -२ |
| ३४ | पोट्याश , रिठा, सोडा, इ . | १ .७५ | ४ | १४ |
| ३७ | काष्ट मद्यार्क | १ .७५ | ४ | ४ |
| ३८अ | सर्व प्रकारचे पेट्रोल, खनिजतेल व स्पिरीट इत्यादी | २ | ४ | १६३ |
| ३८क | एलपीजी | २ .३० | ४ | ३१ |
| ३८ड | केरोसिन | १ .२० | ४ | ३७ |
| ४०ब | केमिकल्स | ३ .०० | ४ | ५७ |
| ४५ | कोळशाचे डांबर (कोलटार )अस्फाल्ट, इ . | ३ | ४ | ५ |
| ४६ | संगमवरी दगड ,विटा ,फलोरिंग टाईल्स इत्यादी | ३ | ४ | १८ |
| ४८ | पेन्टस ,डिस्टेंपर व कलर वॉर्नीस इ . | २ .५० | ४ | १२ |
| ४९ | काच ,काचेच्या वस्तु | २ .५० | ४ | १८ |
| ५१ | सर्व प्रकारचे लाकूड | ३ | ४ | ५३ |
| ५२ | प्लायवूड ,सॉफ्टबोर्ड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू | ३ | ४ | २५ |
| ५३अ | केसाचे तेल ,सुगंधी तेल इ . | १ .७५ | ४ | ३७ |
| ५३ब | कात्र्या, वस्तरे ,सर्व प्रकारची कटलरी | १ .७५ | ४ | ७२ |
| ५३(क) | प्लास्टीक व बेकालाईट इ . | २ | ४ | ३१६ |
| ५३ड | लाकडी फर्निचर इ . | २ .६० | ४ | १४ |
| ५८अ | बिछोरा ,फाडी ,सुरमा, चुरामाल ,धंतल | १ .७५ | ४ | ११ |
| ५८ब | तंबाकू | रु १ .२० दहा किलोग्राम | २ | १० |
| ५९ | विडया व तपकिर | १ .२० | ४ | ८ |
| ६१ | सर्व प्रकारचे कापड | १ .६० | २ | २४१ |
| ६४ | कच्ची किंवा न कातलेली लोंकर, इ . | १ .७५ | ४ | १३ |
| ६५ | सुत व सर्व प्रकारचा दोरा | १ .५० | ४ | २६७ |
| ६८ | चप्पल ,स्लिपर ,सॅन्डल व पटटे धरुन कातडयाच्या सर्व वस्तू | २ .५० | ४ | ४१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९अ | सायकलीसाठी नसलेले रबरी टायर्स व टयूब्ज | ३ | ४ | ८ |
| ७० | रबर माल | २ ५० | ४ | १५ |
| ७१ | हार्डवेअर, लोखंड व पोलाद | २ ५० | ४ | १२० |
| ७२ | लोखंड व पोलाद भंगार | रु .२५ पीएमटी | २ | १० |
| ७४ | मशिनरी व त्याचे सुटटेभाग | ३ .१० | ४ | ७४ |
| ७६ | उपकरणे, उपकरणसंच,उपयंत्रे व त्याचे भाग | ३ .१० | ४ | २० |
| ७७ | पितळ,तांबे,टिन,ॲल्युमिनियम व इतर अलोह धातू | १ .२० | ४ | ३३३ |
| ७९ | पेपर पुठठा | ३ .१० | ४ | २८ |
| ८० | लाख व बूच कॉर्क व त्यापासून केलेल्या वस्तू | १ .७५ | ४ | ११ |
| ८२ | चिनीमाती भांडी, पोर्सेलेन भांडी व वीज कन्सुलेटर्स | १ .७५ | ४ | ९ |
| | | | | २४२७ |

उपरोक्त प्रमाणे सुचविण्यात आलेल्या जकात वाढीच्या प्रस्तावातून किमान रक्कम रुपये २४ .२७ कोटीचे उत्पन्न अपेक्षीत होते . .

ब) मालमत्ता कर :--

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात उल्लेख केल्याप्रमाणे महानगरपालिकेस आवश्यक ती कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी अधिनियमाचे कलम- १२७ प्रमाणे विविध प्रकारचे कर आकारण्याची तरतूद आहे . सदर तरतूदीप्रमाणे महानगरपालिका हददीतील सर्व मालमत्ता धारकावर मालमत्ता करांची आकारणी करण्यांत येते उल्हासनगर महानगरपालिका हददीतील आकारण्यांत आलेल्या मालमत्ता करामध्ये अंतर्भुत असलेल्या विविध करांचे दर खालील प्रमाणे आहेत .

| अ .क्र . | कराचे नांव | प्रचलितदर टक्के |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण कर | करयोग्य मुल्यांच्या २६% |
| २ | महापालिका शिक्षण कर | ,, ५% |
| ३ | मलप्रवाह कर | ,, ५% |
| ४ | पथकर | ,, ३% |
| ५ | मलप्रवाह सुविधा लाभकर | ,, १% |
| ६ | पाणीपुरवठा सुविधा लाभकर | ,, १% |
| ७ | वृक्षकर | ,, ०.५% |
| ८ | महाराष्ट्र शासनाचा शिक्षण कर | शासकीय नियमानुसार |
| ९ | महाराष्ट्र शासनाचा रोजगार हमीकर | ,, |
| १० | मोठ्या निवासी जागेवरील कर (महाराष्ट् शासनाचा ) | ,, |
| ११ | अग्निशमन कर | नाही |
| १२ | विशेष साफसफाई कर | नाही |

वरील सर्व करांचे दर हे वर्ष १९९७ मध्ये जेव्हा महानगरपालिकेची नव्याने स्थापना झाली होती . तेव्हा निश्चित करण्यात आले होते . महानगरपालिकेची दैनंदिन कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी होत असलेल्या खर्चामधील वाढ लक्षात घेता . विविध करांमध्ये वाढ प्रस्तावीत करून जे प्रस्तावा सादर करण्यात होता त्याच्या तपशिल पुढील प्रमाणे आहे .

१ <u>सर्वसाधारण कर :-</u>

सर्वसाधारण कर हा सक्तीचा असून शहरातील सर्व इमारतीवर व जमिनीवर आकारण्यात येत आहे . त्याचा दर घरगुती व बिगर घरगुती मालमत्ता धारकाकरिता सारखा असून करयोग्य मुल्यांच्या २६ % आहे . अधिनियमाचे कलम -१२९ प्रमाणे ज्यामध्ये कोणत्ताही विशिष्ट प्रकारचा व्यापार किंवा धंदा चालविण्यात येत असेल त्या इमारतींच्या व जमिनींच्या किंवा इमारती व जमिनींच्या भागांच्या बाबतीत बसविण्या योग्य कराचा दर हा, अन्य इमारतींच्या व जमिनींच्या किंवा इमारंतीच्या व जमिनींच्या भागांच्या बाबतीत निश्चित केलेल्या दरांपेक्षा या प्रमाणे निश्चित केलेल्या दराच्या निम्म्यापेक्षा जास्त नसलेल्या रक्कमेने अधिक असेल असे ठरविता येईल .

वरिल अनुषगांने शहरातील सर्व बिगर घरगुती मालमत्तांवर करयोग्य मुल्याच्या ३८ % एवढा सर्वसाधरण कर तसेच घरगुती मालमत्तावर प्रचलित दरात दोन टक्के वाढ करुन करयोग्य मुल्याच्या २८ % प्रस्तावित करण्यात आला होता . सदर वाढीपोटी कराच्या वार्षीक मागणीमध्ये रुपये १ .. ६० कोटी वाढ अपेक्षीत होती .

<u>२ पथकर :-</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ पोटकलम १८ नुसार सार्वजनिक रस्ते व पुल इत्त्यादी बांधुन सुस्थित्तीत ठेवणे आवश्यक आहे . त्याअनुषंगाने महानगरपालिकने एकात्त्मीक रस्ते विकास योजनेच्या टप्पा कमांक १ नुसार शहरातील ३३ मुख्य रस्त्त्यांचा विकास कार्यकम हाती घेण्यात आलेला असुन सदर कार्यकम सुरु आहे . सदर विकास कार्यकमा अंतर्गत अंदाजे ४२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून त्यासाठी रक्कम रुपये १८ कोटी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून कर्ज सुध्दा घेतलेले आहे . सदर कर्जाची व्याजासह परतफेड पुढील १५ आर्थिक वर्षात करावी लागणार आहे .

पथकर या कराची आकारणी अधिनियमाचे कलम १४८ (क)च्या तरतुदीनुसार केली जाते व त्यांचा सद्याचा प्रचलित दर ३% आहे . सदर कराची कमाल मर्यादा १०% असून त्यात ७ % वाढ प्रस्तावीत सुचविले होते . उल्हासनगर क्षेत्रात असलेल्या जमिनीचे व इमारतीचे वार्षीक करयोग्य मुल्यांत अंदाजे रुपये ३० कोटी असुन सदर करवाढीमुळे २ .१० कोटी अतिरिक्त उत्त्पन्न अपेक्षीत होते .रस्ते विकास कार्यकमावर होणारा खर्च व कर्ज परतफेड विचारात घेता प्रस्तावीत पथकर वाढ ही समर्थनीय होती .

<u>३ पाणी पुरवठा सुविधा लाभकर :-</u>

पाणी पुरवठा लाभकर अधिनियमाच्या कलम १३० नुसार आकारण्यात येतो व त्यास कोणतीही कमाल मर्यादा नाही . महानगरपालिकेने शहरातील पाणी पुरवठा वितरण सुरळीत करण्याच्या दृष्टीने मेसर्स किर्लोस्कर कन्सलटंस यांचेकडुन तयार करण्यात आलेल्या योजनेचा टप्पा कमांक १ ची अंमलबजावणी करिता एकुण १८ कोटी रुपयाची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत खुल्या बाजारातुन व एल . आय . सी कडुन कर्ज उभारणी केलेली आहे . तसेच पाणी वितरण व्यवस्थेचे अदयापही २-या

टप्प्याचे काम पुर्ण करण्यासाठी वरील प्रमाणे ३६ कोटी रुपयाची कर्ज उभारणी करावी लागणार आहे . अशा प्रकारच्या भांडवली कामावर करावयाच्या संपुर्ण खर्च भागविण्यासाठी महापालिकेस आवश्यक वाटेल त्या टक्केवारीने पाणी पुरवठा लाभकर आकारणीची तरतुद अधिनिमाचे कलम १२९ (अअ) मध्ये करण्यांत आलेली आहे . वरील योजनेवरील भांडवली खर्च विचारात घेता सदरहु करात करयोग्य मुल्याच्या सध्याच्या प्रचलित १ टक्के दरामध्ये ९ टक्के वाढ करुन एकुण १० टक्के वाढ प्रस्तावीत करुन सदर वाढीमुळे २ .७० कोटी अतिरिक्त उत्पन्न अपेक्षित करण्यांत आली होती .

४ <u>मलप्रवाह सुविधा लाभकर :-</u>

महानगरपालकेने वर्ष १९८०-८६ दरम्यान शहरातील भुयारी गटार योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत अंदाजे ११ कोटी रुपयांची कर्ज उभारणी केली होती . सदर कर्जातुन महानगरपलिकेने मुख्य मलप्रवाह वाहिन्या टाकण्याचे काम पुर्ण केले आहे . परंतु सदर योजना पुर्णपणे कार्यान्वीत करण्यासाठी शहरातील प्रत्येक घराच्या मलप्रवाह वाहिन्या मुख्य मल प्रवाह वाहिन्यास जोडणे आवश्यक आहे .सदर काम पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडुन वारंवार तगादे लावण्यांत येत आहेत .भुयारी गटार योजना पुर्ण करणे महापालिकेवर बंधनकारक आहे . सदर योजनेचे काही भाग कार्यान्वीत करण्यासाठी २ कोटी रुपयांची तरतुद सन २००२-२००३ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे . योजना पुर्ण करण्यासाठी अशा प्रकारची तरतुद भविष्यातील काही वर्षात करावी लागणार आहे . योजनेवर होणारा भांडवली खर्च व कर्ज परतफेड लक्षात घेता मलप्रवाह सुविधा लाभकरामध्ये प्रचलित १ टक्के करामध्ये ९ टक्के वाढ करुन एकूण १०% करण्यासाठी प्रस्ताव सादर करुन २ .७० कोटी अतिरिक्त उत्पन्न अपेक्षित होते .

५ <u>अग्निशमन कर :-</u>

शहरातील आग विझविण्यासाठी व आगीपासून जिवीत व मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य त्या उपयंत्रणा सुसज्ज असे अग्निशमन पथक तयार ठेवणे अशा बाबीसाठी तरतूद करणे महापालिकेस बंधन कारक आहे सदर कर्तव्ये पारपाडण्यासाठी कर योग्य मुल्याच्या कमीत कमी <u>१/८</u> % इतकी आणि जास्तीत जास्त २% इतकी मुल्य सामान्य करात समाविष्ट करण्याचे अनुज्ञेय आहे . वरील कार्य व कर्तव्य पारपाडण्यासाठी सर्व प्रकारच्या मालमत्तांवर अग्निशमन कर २% दराने आकारण्याचे प्रस्तावित करुन सदर कर आकारणीमुळे वार्षीक रक्कम रुपये ६० लाख अतिरिक्त उत्पन्न अपेक्षीत धरण्यांत आले होते .

६ <u>विशेष साफसफाई कर :-</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३७ नुसार महानगरपालिका हॉटेल, क्लब, तबेला, हॉस्पीटल्स, मॅटरनिटी होम्स, मंगल कार्यालय , इत्यादी अशा अन्य मोठया जागा यांच्या बाबतीत घ्यावयाचा साफसफाई कर विशेष दराने निश्चित करु शकते . सध्याच्या स्थितीत उल्हासनगर महानगरपालिका अशा कोणत्याही प्रकारच्या विशेष साफसफाई कराची आकारणी करीत नाही . परंतु आसपासच्या महानगरपालिका पाहता उदा . पिंपरी चिंचवड, पुणे महानगरपालिका सदर कराची आकारणी करते .

वरील अनुषंगाने महानगरपालिका हददीतील हॉटेल, रेस्टॉरंट , तबेला, मंगल कार्यालय, (खुली व बंद) हॉस्पीटल्स , मॅटरनिटी होम्स (ओपीडी सोडून) ,(धर्मदाय संस्था मार्फत चालविण्यात आलेल्या हॉस्पीटल्स ,मॅटरनिटी होम्स व मंगल कार्यालय या व्यतिरिक्त) व क्लब ज्यांचे करयोग्य मुल्य

रुपये १००००/- पेक्षा जास्त आहे त्यांच्याकडून करयोग्य मुल्याचे एकूण १०% दराने विशेष साफसफाई कर म्हणून आकारण्याच्या प्रस्ताव सादर करुन सदर कर आकारणीमुळे अंदाजे ५० लाख रुपये उत्पन्न अपेक्षित होते . सबब उपरोक्त प्रमाणे कर वाढ मान्य करुन विविध करांचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्याचा प्रस्ताव होता .

| अ. क | कराचे नांव | प्रचलितदर | प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|
| | | | घरगुती | बिगर घरगुती |
| १ | सर्वसाधारण कर | करयोग्य मुल्यांच्या २६ % | २८ % | ३८ % |
| २ | महापालिका शिक्षण कर | ,, ५% | ५% | ५% |
| ३ | मलप्रवाह कर | ,, ५% | ५% | ५% |
| ४ | पथकर | ,, ३ % | १०% | १०% |
| ५ | मलप्रवाह सुविधा लाभकर | ,, १ % | १०% | १०% |
| ६ | पाणीपुरवठा सुविधा लाभकर | ,, १ % | १० % | १० % |
| ७ | वृक्षकर | ,, ० ५% | ० . ५% | ० . ५% |
| ८ | महाराष्ट्र शासनाचा शिक्षण कर | शासकीय नियमानुसार | शासकीय नियमानुसार | शासकीय नियमानुसार |
| ९ | महाराष्ट्र शासनाचा रोजगार हमीकर | ,, | ,, | ,, |
| १० | मोठया निवासी जागेवरील कर (महाराष्ट्र शासनाचा ) | ,, | ,, | ,, |
| ११ | अग्निशमन कर | नाही | २: | २ % |
| १२ | विशेष साफसफाई कर | नाही | - | १०% |
| | एकूण | ४१ . ५% | ७० . ५% | ९० . ५% |

उपरोक्त प्रमाणे सुचविण्यात आलेल्या सर्व करामध्ये वाढ करण्याच्या प्रस्तावातून एकूण रक्कम रुपये १० .२० कोटीचे उत्पन्न अपेक्षित होते

क) मालमत्ता हस्तांतरण (नांव बदली) फी :--

उल्हासनगर शहरातील अस्तित्त्वात असलेल्या सर्व प्रकारच्या मालमत्तेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम १२७ नुसार मालमत्ता करांची आकारणी केली जाते अशा सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या मालकी हक्कांचे तपशिल कर विभागात उपलब्ध आहेत . मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरणे ८ चे कलम १ नुसार कोणत्त्याही जागेच्या संबंधात मालकी हक्काचे हस्तांतरण सन्लेख करुन देणेत आल्यानंतर किंवा त्याची

नोंदणी करणेत आली असेल तर तीन महिन्याच्या आत अशा हस्तांतरणा संबंधी आयुक्तास लेखी नोटीस देणे आवश्यक आहे . तसेच कर देणेस पात्र असलेली कोणतीही व्यक्ति मरण पावल्यास, मयत व्यक्तिच्या मालकी हक्काचे नाव वारस म्हणून किंवा ज्या व्यक्तिकडे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तिने मयत व्यक्तिच्या मृत्यूपासून १ वर्षाच्या आत अशा हस्तांतरणा संबंधी आयुक्तास नोटीस देणे आवश्यक आहे ..

उपरोक्त प्रमाणे हस्तांतरण (नांव बदल) नोटीस स्विकारणेसाठी स्थायी समिती वेळोवेळी फी आकारणी निश्चित करु शकते . आसपासच्या इतर सर्व महानगरपालिंकातर्फे मालमत्ता संबंधी मालकी हक्काचे हस्तांतरण (नांव बदल) करणेकरिता फी आकारणी केली जाते उल्हासनगर महानगरपालिकेतील सध्याची वित्तीय स्थिती लक्षात घेता मालमत्ता संबंधी मालकी हक्काचे हस्तांतरणकरिता फी आकारणी केल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीत भर पडेल . म्हणून सदर हस्तांतरणाकरिता अधिनियम १९४९ प्रकरण ८ चे कलम २ नुसार करयोग्य मुल्याच्या दोन टक्के फी आकारणी प्रस्तावित होते .

ड) पाणीपट्टी :--

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (२०) नुसार महापालिका हद्दीतील सर्व नळधारकांना पाणी पुरवठा करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे . त्या अनुषंगाने महानगरपालिका आक्टोंबर १९९६ पासून शहरातील नळधारकांना पाणी पुरवठा करीत आहे . सुरवातीपासून महानगरपालिका सदरची सेवा अर्थसहाय्य देवून (Subsidised Rates) सर्वांना पुरवित आहे . सदरच्या प्रथेमुळे महानगरपालिका महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जे दैनंदिन पाणी खरेदी करते त्या पाणी खरेदी पोटीची बीले महामंडळास देण्यास महापालिका असमर्थ आहे व ३१ मार्च २००२ रोजी अंदाजे ८५ कोटी रुपये महामंडळास देणी देय होते .

सचिव, महाराष्ट्र, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक कमांक D.O. No./PRE-1033/2277/PE-1 , दिनांक २६ जुलै २००१ अन्वये सर्व महानगरपालिकेस देण्यात आलेल्या सुचनेनुसार सर्व नगरपालिका / महानगरपालिकेने पाणी पुरवठा सेवा "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर पुरविणे आवश्यक आहे अन्यथा महापालिकेस अनुज्ञेय असलेली अनुदाने बंद करण्यांत येईल असे सूचित केले आहे .
सध्या महानगरपालिका एम आय डी सी .कडून ५७५०/- रुपये दराने प्रति एम एल ची खरेदी करीत आहे . सदर खरेदी व इतर प्रशासकीय व्यवस्थेपोटी महापालिका जो वार्षीक खर्च करीत आहे त्याचा तपशिल पुढील प्रमाणे .

| अ .क | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | पाणी खरेदी खर्च | २१,००,००,००० |
| २ | वेतन भत्ते व इतर प्रशासकीय खर्च | २,५०,००,००० |
| ३ | टॅंकर खर्च | १,२०,००,००० |
| ४ | पाणी वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती खर्च | ८०,००,००० |
| ५ | बोअरवेल/जेटपंप खर्च | ११,००,००० |
| ६ | इमारत देखभाल व दुरुस्ती | २५,००,००० |
| ७ | विदयुत व टेलिफोन खर्च | ८०,००,००० |
| ८ | उदनचन पंप देखभाल व दुरुस्ती खर्च (बुस्टर पंप) | ३०,००,००० |
| ९ | इतर खर्च | ५,००,००० |
| १० | एकूण खर्च | २७,०१,००,०० |

महानगरपालिका शहरातील ग्राहकांना इमारतीच्या बांधकामाच्या आधारावर पाणी दर आकारणी करीत असून सदरचे तपशील खालीलप्रमाणे करीत आहे .

| अ क्र | बांधकामाचा प्रकार | रक्कम |
|---|---|---|
| अ | आर . सी . सी व टिअर गर्डर बांधकाम इमारती | १०० प्रतिमहा |
| ब | पत्र्याचे छत व विट बांधकाम | ५० प्रतिमहा |
| क | व्यापारी घरपट्टी धारक (सर्व प्रकारचे बांधकाम) | ६० प्रतिमहा |
| ड | झोपडपट्टी घरपट्टी धारक<br>लफाटा किंवा पत्र्यांचे छत असलेले झोपडे<br>मातीचे झोपडे | ४० प्रतिमहा |

सदर दरांच्या अनुषंगाने पाणी पुरवठा सेवेतून महापालिकेस अपेक्षित उत्पन्नाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| अनुक्रमांक | तपशिल | रककम |
|---|---|---|
| १ | शहरातील ग्राहकांना पाणी विक्री | १० ,२५ ,१३ ,००० |
| २ | पणी पुरवठा लाभकर | १८ ,१३ ,००० |
| ३ | नळ जोडणी फी | ३६ ,००० |
| ४ | प्लंबर लायसन्स फी | १६००० |
| | एकूण उत्पन्न | १० ,४३ ,७८ ,००० |

"पाणी पुरवठा योजनेत होणारा तोटा दर्शविणारा तक्ता"
(प्रति व्यक्ति प्रतिदिन १४० लिटर्स व प्रति कुटुंब प्रति दिन ७०० लिटर्स पाण्याचा वापर गृहित धरून)

| अ क्र | इमारतीचा प्रकार | प्रति कुटुंब प्रति महिना पाणी बिलाची आकारणी | | मासिक तोटा (रु) | प्रतिदिन पाण्याची आकारणी | | प्रतिदिन होणारा तोटा (रु) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमआयीडीसी आकारणी (रु) | उल्हासनगर महानगर पालिका आकारणी (रु) | | एमआयडीसी आकारणी (रु) | उल्हासनगर महानगर पालिका आकारणी (रु) | |
| १ | आरसीसी बांधकाम | १२१ | १०० | २१ | ४ | ३.३३ | ०.६७ |
| २ | गर्डर इमारत | १२१ | १०० | २१ | ४ | ३.३३ | ०.६७ |
| ३ | पत्र्याने छत व विट बांधकाम | १२१ | ५० | ७१ | ४ | १.६६ | २.३४ |
| ४ | व्यापारी घरपट्टी धारक | १२१ | ६० | ६१ | ४ | २ | २ |
| ५ | झोपडी अ) लफाटा ब) मातीचे झोपडे | १२१ | ४० | ८१ | ४ | १.३३ | २.६७ |
| | | | | | | | |

उत्पन्न व खर्चाचा आढावा लक्षात घेता महानगरपालिकेस वार्षीक १६ ५८ कोटीचा तोटा सहन करावा लागत आहे . अशाच प्रकारचा तोटा पुढील कालावधीत कायम स्वरुपी चालू राहिल्यास महापालिकेची स्थिती मोडकळीस येईल व यापुढे महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ यांचेकडून होणारा पाणी पुरवठा बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

वरील बाबी लक्षात घेता पाणीपट्टी दरात वाढ करण्याचा जो प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| अ क | बांधकामचे स्वरुप | ग्राहकांची संख्या | सद्याचे दर | प्रस्तावित वाढीव दर | अपेक्षीत उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर सी सी व टीअर गर्डर बांधकाम. | ३५०३९ | रु . १०० प्रति महा रु . १२०० प्रतिवर्ष | रु . २०० प्रतिमहा रु . २४०० प्रतिवर्ष | ८ ,४० ,९३ ,६ ०० |
| २ | पत्र्याचे छत व विट बांधकाम | ६२४९३ | रु . ५० प्रतिमहा रु . ६०० प्रतिवर्ष | रु . १२५ प्रतिमहा रु . १५०० प्रतिवर्ष | ९ ,३७ ,३९ ,५ ०० |
| ३ | व्यापारी घरपट्टी धारक | २५६७४ | रु . ६० प्रतिमहा रु . ७२० प्रतिवर्ष | रु . १०० प्रतिमहा रु . १२०० प्रतिवर्ष | ३ ,०८ ,०८ ,८ ०० |
| ४ | झोपडपट्टीधारक (लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे झोपडे) | १३६७७ | रु . ४० प्रतिमहा रु . ४८० प्रतिवर्ष | रु . ७५ प्रतिमहा रु . ९०० प्रतिवर्ष | १ ,२३ ,०९ ,३ ०० |
| | | | | | २२ ,०९ ,५१ , २०० |

किंवा
स्थायी समितीने सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत कोणत्त्याही जागेला घरगुती / दुकाने प्रयोजनासाठी पाणी पुरवल्याबद्दल मोजणी करुन आकारावयाची दर .



| | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| घरगुती नळधारक | रु . ६-०० प्रति हजार लिटर्स | रु . १२-०० प्रति हजार लिटर्स |
| बिगर घरगुती | रु १८-०० प्रति हजार लिटर्स | रु २४-०० प्रति हजार लिटर्स |
| सार्वजनिक संस्था | रु . १२-०० प्रति हजार लिटर्स | रु . १८-०० प्रति हजार लिटर्स |

महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळास पाणी खरेदी पोटी देय असलेली रक्कम वसूल होईल व महानगरपालिका टप्या टप्याने पुढील काही कालावधित मोडकळीस आलेल्या आर्थिक परिस्थितीतून हळु हळु बाहेर पडता येईल यासाठी उपरोक्त प्रमाणे दर निश्चिती सुचविण्यात आली होती .

महानगरपालिकेची सद्याची हलाखीची वित्तीय स्थिती, नागरी सुविधा पुरविणेसाठी दैनंदिन खर्चात होत असलेली वाढ, एम .आय .डी .सी .पाणी खरेदीची शिल्लक देयके, विविध संस्थामार्फत घेतलेल्या कर्जाची परतफेड करणेत दिरंगाई, भारतीय संविधानामध्ये करण्यात आलेल्या ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे महानगरपालिकेस काही नविन कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यावर होणारा खर्च, ठेकेदार व पुरवठादारांची बीले अदा करणेस असमर्थता या सर्व बाबी लक्षात घेता महानगरपालिकेस विविध करांमध्ये वाढ करण्याशिवाय पर्याय नाही ही बाब लक्षता घेता वरील कर वाढीचा प्रस्ताव मान्य करण्यासाठी प्रस्तावीत करण्यांत आले होते .

प्रशासनातर्फे विविध करामधील वाढ संबंधीच्या प्रस्तावावर मा .महासभेने जे अंतिम निर्णय घेतले त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे .

अ) जकात :-

प्रशासनातर्फे जकात दरवाढ करून रुपये २४ .२७ कोटी लक्षाचा उत्पन्न वाढीच्या प्रस्तावास अंशत: रुपये ९ .०८ कोटी लक्षाचा दर वाढीस मान्यता दिली .

ब) मालमत्ता कर :-

मालमत्ता करातील प्रचलीत दरातील कोणतीही वाढ मंजूर न करता प्रचलित दर कायम करण्यांत आले .

क) मालमत्ता हस्तांतरण (नांव बदली) फी:-

प्रशासनातर्फे प्रस्तावित करण्यांत आलेल्या मालमत्ता संबंधी मालकी हक्काचे हस्तांतरण करीता फी आकारणी करण्याचा प्रस्ताव नामंजूर केले .

ड) पाणी पट्टी :-

पाणीपट्टीच्या प्रचलित दरात कोणतीही वाढ मंजूर न करता प्रचलित दर कायम करण्यांत आले .

चालु वित्तीय वर्ष २००२-२००३ चे ९ महिने पुर्ण झाले असुन या वर्षासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे . विविध विभागाकडून गोळा करण्यांत आलेल्या माहितीवरुन असे दिसते की एकुण



उत्पन्न जे मा .महासभेने १५७ .८९ कोटी अपेक्षीत केले होते . ते फक्त ११९ कोटी पर्यंत होईल .

महानगरपालिकेच्या बांधील खर्च उदा . कर्मचा-यांचे पगार, भत्ते, विद्युत दिवाबत्ती बील, एम आय डी सी पाणी पुरवठा बिले, कचरा वाहतुक, कर्ज परत फेड तसेच अधिनियमांतील तरतुदीनुसार विविध कार्य व कत्यव्ये पारपाडण्यासाठी विविध विभागीय स्तरावरील आवश्यक खर्च याचा आढावा घेतल्यास यावर्षासाठी १५१ कोटी रुपयांची आवश्यकता आहे .

उत्पन्न व खर्चाचे मा .महासभेने मंजुर केलेले तसेच सुधारीत अंदाज दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे .

(आकडे लाखात )

| उत्पन्न | | |
|---|---|---|
| लेखा शिर्ष | महासभा अंदाज | सुधारीत अंदाज |

| खर्च | | |
|---|---|---|
| लेखा शिर्ष | महासभा | सुधारीत |

| | | |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ४०९ | ४०९ |
| जकात | ५३७५ | ५१६५ |
| मालमत्ता कर | ४००० | ३००० |
| पाणी पुरवठा | ४३०० | १६०० |
| अनुदाने | ३७७ | ६०२ |
| कर्जे | ५०० | ३०० |
| इतर | ८२८ | ८४० |
| एकुण | १५७८९ | ११९१६ |

| | अंदाज | अंदाज |
|---|---|---|
| पगार भत्ते व इ प्रशासकीय खर्च | २८२३ | २५१९ |
| एम आय डी सी | २२०० | २६०० |
| एमजेपी पाणी देयके | १२० | १२० |
| भुयारी गटार कर्ज परतफेड | १००० | १०७७ |
| पाणी पुरवठा योजना कर्ज परतफेड | ९२९ | ९४६ |
| हुडको कर्ज परतफेड | ५४ | ५४ |
| एमएमआरडीए इस्को खाते | २६४ | २६४ |
| दिवा बत्ती बीले | २२५ | २०० |
| कचरा वाहतूक व जंतू नाशक इ खर्च | ३९९ | ४१६ |
| स्कुल बोर्ड | ४६३ | ३०० |
| शासकीय व इतर देणी | १२९६ | १०२३ |
| दिवा बत्ती खाते | ३३७ | १८९ |
| उद्याने | ३८ | ४८ |
| अग्निशमन | ७७ | ४७ |
| डिस्पेंसरी व आरोग्य विषयी कार्यक्रम | ५२ | ५५ |
| पाणी पुरवठा | ५४४ | ६६४ |
| भुयारी गटार | १३३ | १२६ |
| जल निःसारण खाते | २७५ | ८५ |
| एमएमआरडीए कर्जातून रस्ते विकास का | ५०० | ६०० |
| महापालिका फंडातून रस्ते विकास कार्यक्रम | १४०० | ११०० |
| बांधकाम खाते | २१४९ | २३१८ |
| प्रभाग समित्या | २७४ | २७४ |
| इतर | २३५ | १९४ |
| एकुण | १५७८७ | १५२१९ |



स्थायी समिती व महासभेने आयुक्त यांचे अंदाजावरुन अंदाजपत्रक तयार करतांना मागील पाच वर्षातील घरपट्टी व पाणी पट्टी यापोटी झालेली प्रत्यक्ष वसुली ची आकडेवारी लक्षात न घेता वर्ष २००२-२००३ च्या अंदाजपत्रकामध्ये या दोन्ही शीर्षाखाली अधिक वसुली होईल असे गृहीत धरुन, जो इष्टांक ठेवला होता, त्या इष्टांकानुसार वसुली न झाल्याने महापालिका प्रलंबीत देणी उदा .कर्ज परतपेड, ठेकेदार बीले, इतर आवश्यक वस्तुंची खरेदी बीले इ देण्यास असमर्थ ठरली आहे

महापालिकेची आर्थिक परिस्थिती असमाधानकारक असल्यामुळे प्रलंबीत देणी दिवसेदिवस वाढत आहे . आतापर्यंत जी देणी प्रलंबीत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे .

( आकडे लाखात )

| अनुक्रमांक | देणीचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | एम आय डी सी | ९९३८ |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (वर्ष १९९५ पुर्वीचे पाणी बीले) | १०५५ |

| | | |
|---|---|---|
| ३ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (भुयारी गटार कर्ज परतफेड) | १०७७ |
| ४ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (पाणी पुरवठा योजना) | ९४६ |
| ५ | ठेकेदार व पुरवठादारांची बीले | १२०० |
| ६ | ५व्या वेतन आयोगापोटी थकबाकी | ६०० |
| | एकुण | १४८१६ |

मा सचिव, महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील परिपत्रक डीओक्र: पीआरई / १०३३ / २७७ / पीई-१ / दिनांक २६ जुलै २००१ अन्वये सर्व महापालिकेस देण्यात आलेल्या सुचनेनुसार सर्व नगरपालिका / महानगरपालिकेने पाणी पुरवठा सेवा "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर पुरविणे आवश्यक आहे . अन्यथा महापालिकेस अनुज्ञेय असलेली अनुदाने बंद करण्यांत येईल असे सुचित केले आहे . उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्रमांक : ८ दिनांक १५/५/१९९७ व ठराव क्रमांक १५ दिनांक १९/७/२००२ अन्वये पाणी पुरवठा योजना टप्पा -१ आणि टप्पा -२ मंजुर करतांना सदर योजना स्वयंपूर्ण होणेच्या दृष्टीने आवश्यक ती पाणीपट्टी आकारण्यास व आवश्यक असल्यास पाणीपट्टी दरात वाढ करणेची हमी दिली होती . वरील बाब व महानगरपालिकेची हालाखीची वित्तीय परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने दिनांक २०/८/२००२ च्या महासभेत पाणी पुरवठा योजना "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर चालविण्याकरीता तसेच पाणी पुरवठा लाभकरात वाढ करण्यासाठी फेरविचारस्तव प्रस्ताव सादर केला होता . परंतु तो मंजुर करण्यांत आला नाही व महापालिकेचे उत्त्पन्न वाढविण्याचा तसेच शासनाचे आदेशांची अमलबजावणी करण्याचा प्रयत्न असफल ठरला .

उल्हासनगर शहर वगळता परिसरातील इतर नगरपालिका / महानगरपालिका टॅकरसाठी शुल्क आकारून सुविधा पुरवित आहे . टॅकरव्दारे करण्यांत येणा-या पाणी पुरवठयावर शुल्क आकारल्यास पाण्याचा दुरुपयोग होण्यावर नियंत्रण राहिल व त्यातुन महापालिकेस अल्पाशा प्रमाणात उत्त्पन्न मिळेल हि बाब लक्षात घेऊन प्रशानाने दिनांक ४/७/२००२ च्या स्थायी समितीच्या सभेत टॅकरने पाणी पुरवठा करणेकामी वाहतुक खर्च आकारण्याचा प्रस्ताव सादर केला होता . परंतु तोही ठराव क्रमांक २६ अन्वये अमान्य करण्यांत आला .

महानगरपालिका निव्वळ मोठया उत्त्पन्नाच्या बाबींवर लक्ष देत असुन इतर लहान बाबीवर कर आकारणी बाबत विचार करत नाही असे महाराष्ट्र शासना तर्फे गठीत केलेल्या वित्त आयोगाने राज्यातील महानगरपालिकांची वित्तीय स्थितीची पडताळणी करुन लहान बाबींव्दारे उत्त्पन्न मिळण्यासाठी निर्देशीत केले आहे ही बाब लक्षात घेता प्रशासनातर्फे उल्हासनगर शहरातील "विनिर्दिष्ठ केलेल्या प्रयोजनासाठी जागा वापरण्या करीता "उपविधी" तसेच ज्या वस्तु ठेवण्यासाठी आणि जे धंदे व



व्यवसाय करण्यासाठी लायसन्सची आवश्यकता आहे, अशा वस्तु, धंदे व व्यवसाय करणे संबंधी नियम" तयार करुन प्रारुप मसुदा सर्व साधारण सभेपुढे दिनांक १९/१०/२००२ रोजी मान्यतेसाठी सादर केला होता परंतु मा महासभेने सदर बाबीसाठी सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ४२ अन्वये एक समिती गठीत करुन संबंधीत समितीने सहा महिन्याच्या कालावधीच्या आत अहवाल सादर करण्याचा निर्णय घेतला आहे परंतु सदरचा अहवाल अदयाप अप्राप्त असल्यामुळे प्रस्तावाची अंमलबजावणी झालेली नाही .

सुधारीत उत्त्पन्नाचे अंदाज रुपये ११९ कोटी व सुधारीत खर्चाचे अंदाज रुपये १५१ कोटी विचारात घेतल्यास रुपये ३२ कोटीची तुट चालु आर्थिक वर्षात होणार आहे

अशाच प्रकारची तुट प्रत्येक वर्षी चालु राहिल्यास महापालिकेत अर्थसंकल्प राबविण्याचा उददेश साध्य होणार नाही .सदरची तुट भरुन काढण्यसाठी अत्त्यावश्यक बांधिल खर्च (Committed & Unavoidable Expenditure) (उदा . कर्मचारी वेतन, पाणी पुरवठा, विद्युत, कचरा वाहतुक, जंतु नाशके खरेदी, इत्त्यादी देयके) वगळता सर्व

विभागातील प्रलंबित तसेच इतर कोणत्तीही नवीन भांडवली किंवा महसुली स्वरुपाची कामे पुर्णत: स्थगीत करण्यास प्रस्तावीत करण्यांत येत आहे .

त्यास मान्यता मिळावी ..

<u>महासभा ठराव क्र.</u> १२ <u>दिनांक:-२८.१.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजु टेकचंदानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेवून या ठरावाव्दारे असे विनिर्दिष्ट करीत आहे की सरकारी वर्षे २००२-२००३ च्या खर्चासाठी चालु अर्थसंकल्पीय अनुदानात जीथपत खर्च करायचा असेल तीथपत खर्चाच्या अधिन राहून अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे. आणि जर आयुक्तांना इष्ट वाटेल तर त्यांनी सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचा पूर्न:समायोजन दर्शविणारा अर्थसंकल्पीय अंदाज प्रस्तावित करावा.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्यावेळचा विषय:-</u>

<u>विषय:-</u> महापालिका क्षेत्रातील घन कच-याचे व्यवस्थापन घनकचरा कृती आराखडयास मंजूरी देणे.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दररोज अंदाजे २५० मेट्रिक टन कचरा तयार होतो . शहरातील स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने दररोज सदरचा कचरा गोळा करुन वाहनाव्दारे डंपिंग ग्रांऊडवर टाकला जातो . वाढत्या लोकसंख्येमूळे कच-याचे प्रमाण वाढत असून डंपिंग ग्रांऊडवरील जागा अपुरी पडत आहे .

नागरी क्षेत्रातील घनकच-याच्या समस्ये संदर्भात दाखल करण्यांत आलेल्या याचिका कमांक <u>८८८/९६</u> श्रीमती अलमित्रा पटेल विरुध्द भारत सरकार व इतर या याचिकेच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार घन कच-यांची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने करणे बंधनकारक आहे .

त्या अनुषंगाने केंद्र शासनाने पर्यावरण व वन विभाग अधिसुचना दिनांक २५ सप्टेंबर २००० अन्वये नागरी घन कचरा विल्हेवाट नियम २००० प्रमाणे तयार केले असून त्यात घनकच-यांची शास्त्रीय दृष्टया विल्हेवाट करणेसंबंधी कार्यपध्दती विहित केली आहे .

उल्हासनगर महानगरपालिका ठराव कमांक ३५ दिनांक <u>२०/२/२००१</u> अन्वये कच-यापासून "ग्रीन कोल प्रकल्प" उभारणेसाठी मंजुरी दिली होती . परंतु मेसर्स रिसोर्स रिट यांनी योग्य तो प्रतिसाद न दिल्यामुळे सदर प्रकल्प उभारणे शक्य

झाले नाही ठराव कमांक २५ दिनांक २१ /१/२००२ अन्वये घनकच-याच्या विल्हेवाट लावण्यासाठी शासन स्तरावर अभिकर्ता निश्चित करण्यासाठी संमत्ती देण्यांत आली .तथापी अदयाप पर्यंत शासनाने अभिकर्ता निश्चित केलेला नाही .

नागरी घन कचरा विल्हेवाट नियम २००० अन्वये घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकांनी कृती आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी काल मर्यादा विहित करण्यांत आलेली आहे .

मा . सचिव नगर विकास यांचेकडील पत्र कमांक एमआयएस / २००२ / युडी-२४/ दिनांक ९ डिसेंबर २००२ अन्वये घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा तयार करुन तो महानगरपालिकेच्या मंजुरीने शासनास सादर करण्याबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे . त्याअनुसरुन कृती आराखडा तयार करण्यांत आला असुन त्यात विविध अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यांत आलेली आहे सोबत कृती आराखडयाची प्रत जोडली आहे . संदर्भीय पत्रातील सुचनेप्रमाणे मा . महापौरांच्या संम्मतीने सदर कृती आराखडा शासनास सादर करण्यांत आला आहे .



महापालिका क्षेत्रातील कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी शहरातील किंवा शहरा बाहेरील जागा भुसंपादन करून किंवा शासनाकडून मंजुर करून घेऊन त्या जमिनीभोवती कुंपण घालणे , पोहच रस्ते तयार करणे, विद्युत दिव्यांची सोय करणे, प्रदुषण नियंत्रणासाठी विविध उपाय योजना करणे आवश्यक आहे

सदर कृती आराखडयांत घनकच-याची विल्हेवाट लावण्यासाठी तंत्रज्ञान निर्धारीत करणे व निर्धारीत करण्यांत आलेल्या तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प उभारणे आवश्यक आहे .त्यासाठी अभिकर्ता नेमणुकीच्या प्रमुख अटी व शर्ती जोडपत्र -अ मध्ये नमुद केल्या आहेत .

सध्या महानगरपालिका क्षेत्रात गोळा होणारा कचरा खाजगी ठेकेदाराच्या वाहना मार्फत वाहतूक करुन कचरा डेपोवर नेऊन टाकला जातो त्यापोटी रु २५० लक्ष प्रति वर्ष खर्च होतो . नियुक्त करण्यांत आलेल्या ठेकेदाराची मुदत ३१/३/२००३ अखेर संपुष्टात येणार आहे . त्यामुळे १ एप्रिल २००३ पासुन नवीन वाहतूक अभिकर्त्याची नेमणूक करणे अथवा महानगरपालिकेच्या वाहनांनी कचरा उचलणे याबाबत धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे . कचरा वाहतुक महानगरपालिकेच्या वाहनामार्फत करावयाचे झाल्यास महानगरपालिकेला नवीन वाहने खरेदी करावी लागतील तसेच या वाहनावर चालक व सफाई कामगार या कर्मचा-यांच्या नियुक्त्या कराव्या लागतील . नवीन वाहने खरेदी व कर्मचा-यांच्या नियुक्त्या यासाठी करावा लागणारा खर्चाच्या तुलनेत खाजगी अभिकर्त्या मार्फत काम केल्यास येणारा खर्च कमी असल्यामुळे व काम अधिक परिणामकारक होणार असल्यामुळे दिर्घ मुदतीसाठी अभिकर्त्याची नेमणुक केल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे होईल असे वाटते .

<u>सबब :-</u>

महापालिकेने यापुर्वी ठराव कमांक ३५ दिनांक २०/२/२००१ व ठराव कमांक २५ दिनांक २१/१/२००२ अन्वये मंजुर करण्यांत आलेल्या प्रस्तावात बदल करुन

अ) उल्हासनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडयास मंजुरी देणे

ब) कृती आराखडयानुसार घनकचरा विल्हेवाट लावण्यासाठी शहरातील किंवा शहराबाहेरील जागा भुसंपादन करुन किंवा शासनाची जागा मंजुर करून घेऊन विकास करुन तेथे घनकच-यावर प्रकिया करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यांस मंजुरी देणे .

क) घनकच-यावर प्रकिया करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेने निश्चित केलेल्या अभिकर्त्याची अटीशर्ती ठरवून नियुक्ती करणे किंवा ते

शक्य न झाल्यास नवीन अभिकर्त्ता नियुक्तीसाठी निविदा मागविण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे .

ड) कृती आराखडयानुसार घनकच-याची वाहतुक करण्यासाठी अभिकर्त्ता नियुक्तीसाठी निविदा मागविण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे .

या प्रयोजनार्थ व उपरोक्त धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा .

--३--

<u>महासभा ठराव क्र.</u> १३ <u>दिनांक:-२८.१.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेने यापुर्वी ठराव क्र. ३५ दि. २०. २.२००१ व ठराव क्र. २५ दि. २१.१.२००२ अन्वये मंजुर करण्यात आलेल्या प्रस्तावात बदल करून वरील सूचनेनुसार आणि त्या सोबत जोडलेले जोडपत्रक अ व ब मधील अटी व शर्तींच्या अधिन राहुन घनकच-याचे व्यवस्थापनाकामी घनकचरा कृती आराखडयास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४--

जोडपत्र -अ
घन कच-यावर प्रकिया करणे
प्रस्तावित अटी व शर्ती

१ प्रकल्पासाठी आवश्यक जमिन महानगरपालिका नाममात्र शुल्क आकारुन दिर्घ मुदतीच्या भाडेपटटयाच्या कराराने अभिकर्त्यास उपलब्ध करुन देईल . उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय कमांक No. PSP-1097-CR-104-NRG-7-मंत्रालय मुंबई ३२, दिनांक १३ मे १९९८ नुसार एजन्सीने महानगरपालिकेस एक रुपये प्रति स्वेअर मिटर जागेसाठी देय राहील .

२ महानगरपालिका उल्हासनगर शहराच्या हददीतील प्रति दिन २०० ते २५० टन कचरा स्वत: गोळा करुन अभिकर्त्यास उपलब्ध करुन देईल . भविष्यात सदर कच-याच्या प्रमाणास वाढ अथवा घट झाल्यास तो संपुर्ण कचरा घेण्याची जबाबदारी एजन्सीवर राहील . तथापी भविष्यात सदर कच-याच्या प्रमाणास घट झाल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही ..

३ उपलब्ध करुन दिलेल्या कच-याचे विगतवारी (Segregation) अभिकर्ता स्वत: करेल व त्यावर प्रकिया महानगरपालिकेने स्विकृत केलेल्या तंत्रज्ञानाच्या साहयाने करेल .

४ प्रकल्पासाठी कचरा कमी पडल्यास इतर नगरपालिका अथवा महानगरपालिकांकडून कचरा घेण्यास अभिकर्त्यास महानगरपालिकेची कोणतीही हरकत असणार नाही परंतु इतर महानगरपालिकांच्या कच-यावर प्रकिया करण्याची जबाबदारी अभिकर्त्याने स्विकारल्यास प्रकियेपुर्वी शिल्लक राहणार

( Preprocesses Reject ) कचरा व प्रक्रियेनंतर शेष राहणारा कचरा ( Residue ) याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

५ प्रक्रिया करणेसाठी आवश्यक त्या प्लॅन्ट मशिनरी व इतर सर्व साहित्याची उभारणी, व्यवस्था तसेच देखभाल व दुरुस्ती अभिकर्ता स्वखर्चाने करेल

६ प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक भाडवंल विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज रुपाने उभारल्यास महापालिका कोणत्त्याही प्रकारची हमी देणार नाही अथवा मालमत्ता गहाण ठेवणार नाही .

७ प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार किंवा इतर संस्थांकडून आवश्यक ते परवाने अभिकर्ता स्वतः प्राप्त करील व आवश्यक असल्यास महापालिका फक्त ना हरकत प्रमाणपत्र देईल .

८ प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, केंद्र सरकार प्रदुषण मंडळ, मिनीस्ट्री ऑफ नॉन कन्वेशनल इनर्जी सोर्सेस व महाराष्ट्र इनर्जी डेव्हलेंपमेंट एजेन्सी असा कोणत्त्याही राज्य सरकार, केंद्र सरकार किंवा इतर संस्थांकडून आवश्यक ते परवाने अभिकर्ता स्वतः प्राप्त करील व आवश्यक असल्यास महापालिका फक्त ना हरकत प्रमाणपत्र देईल .

९ इन्कम टॅक्स, सेल टॅक्स, टर्न व्होअर टॅक्स, तसेच शासना तर्फे लावण्यांत येणा-या भविष्यात कोणतेही प्रकारचे टॅक्स भरण्याची संपुर्ण जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

१० विद्युत, टेलिफोन, कर्मचारी व त्यांचा पगार, देखभाल व दुरुस्ती इत्त्यादी प्रकारचा दैनंदिन खर्च करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

११ प्रकल्प उभारणीसाठी अथवा प्रकल्प उभारणीनंतर प्रक्रिया करण्यासाठी पाणी पुरवठयाची आवश्यकता असल्यास त्याची व्यवस्था अभिकर्ता स्वतः करेल

१२ प्रकल्पासाठी संपादीत करण्यांत आलेली जमिन अभिकर्त्याकडे हस्तांतरीत करण्यांत आल्यानंतर त्या जमिनीभौवती कुंपन घालणे, पोहोच रस्ते तयार करणे, विद्युत व्यवस्था करणे, हवा व पाणी प्रदुषणासाठी विविध उपाय



योजना करणे याची जबाबदारी अभिक्त्त्याची राहील व त्यासाठी येणारा संपुर्ण खर्च अभिकर्त्याला करावा लागेल हि सर्व कामे आयुक्त व शहर अभियंता, यांच्या निर्देशाप्रमाणे करण्यांत येतील .

१३ प्रकल्पाचा विमा उतरविण्यासाठी येणार खर्च अभिकर्ता करेल . .

१४ सदर परिसरात कोणत्त्याही प्रकारचा अपघात घडल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी अभिकर्तावर राहील . व अपघातग्रस्त व्यक्तीस दयावयाची नुकसान भरपाई व त्याअनुषंगाने होणारी न्यायालयीन कारवाईसाठी येणारा खर्च अभिकर्त्यास करावा लागेल .

१५ नागरी घनकचरा विल्हेवाट नियम २००० मधील अटी व शर्तीचे पालन करणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहील .

१६ सदर प्रकल्पास कोणत्त्याही प्रकारचा बदल महापालिकेच्या परवानगी शिवाय करता येणार नाही .

१७ महापालिका आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना सदर प्रकल्पाचे निरिक्षण करणे / निरीक्षणासाठी प्रकल्पास भेट देणे, याबाबत कोणतेही निर्बंध असणार नाहीत भेटी दरम्यान काही त्रुटी आढळल्यास आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी प्रकल्प व्यवस्थापकास निर्देश देवू शकतील व त्यांच्या निर्देशांचे पालन करणे सर्व संबधितांवर बंधनकारक राहील ..

१८ प्रदुषण नियत्रंण संबंधीच्या सर्व उपाययोजना करणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहतील . प्रकल्प परिसरात वृक्षारोपण करण्याची जबाबदारी अभिकर्त्यावर राहील .

१९ सध्या उल्हासनगर शहराचे क्षेत्रफळ सुमारे १३ स्केवर किलो मीटर असून भविष्यात काही गावे / अथवा ठिकाणे महापालिका हददीत समाविष्ठ झाल्यास अथवा क्षेत्रफळात वाढ झाल्यास तो कचरा सुदधा अभिकर्त्याला घेणे बंधनकारक राहील .

२० सदर प्रकल्प "बांधा", "वापरा" व "हस्तातरण" BOT पध्दतीने ३० वर्षाच्या कालावधीसाठी अभिकर्त्त्याच्या ताब्यात राहील .त्यानंतर प्रकल्प सुस्थितीत महानगरपालिकेस विनामुल्या हस्तांतरीत करावा लागेल .

२१ कच-यात समाविष्ट असलेल्या Hazardous Waste ची विल्हेवाट Hazardous Waste management and Handling Rules १९८९ प्रमाणे करणे अभिकर्त्त्यावर बंधनकारक राहील .

२२ कामगार व इतर नियमां संबंधी कायदयाचे पालन करणे अभिकर्त्त्यावर आवश्यक राहील.

२३ विहित मुदतीत प्रकल्प कार्यान्वीत करण्याची जबाबदारी अभिकर्त्त्याची राहिल

२४ अभिकर्त्त्यास प्रचलीत नियमानुसार निविदा अनामत व सुरक्षा अनामत महापालिकेत जमा करावी लागेल .सुरक्षा अनामत रक्कम प्रकल्प पुर्णत: कार्यान्वीत झाल्यानंतर एका वर्षाच्या कालावधीनंतर परत करण्यांत येईल . अभिकर्ता जर विहित कालावधीत प्रकल्प राबविणेस असमर्थ राहिल्यास सदरची अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल .

२५ अभिकर्त्त्यास महानगरपालिके समवेत लेखी करार करावा लागेल व त्यांच्या नोंदणी साठी आवश्यक मुंद्राक शुल्कचा खर्च अभिकर्त्त्याला करावा लागेल

२६ प्रकल्पासाठी महापालिका क्षेत्रात आयात केलेल्या यंत्रसामुग्री व इतर साहित्त्यावर प्रचलीत दरानुसार जकात भरण्याची जबाबदारी अभिकर्त्त्याची राहील .

२७ महापालिका व अभिकर्ता यांत निर्माण कोणताही कायदेशीर वाद ठाणे जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राधीन कोणत्त्याही प्रकारचा वादविवाद निर्माण झाल्यास तो अरबीस्ट्रेशन (Arbitration) अधिनियम अंतर्गत सोडविला जाईल .

--६--

जोडपत्र -ब

घन कचरा वाहतुक करणे

प्रस्तावीत अटी व शर्ती

१ कामाची मुदत दिनांक १ एप्रिल २००३ पासुन पुढे दहा वर्षासाठी राहील .

२ वर्षातील सर्व दिवस म्हणजेच ३६५ दिवस कचरा वाहतुकीचे काम अभिकर्त्त्यास करावे लागतील .

३ ज्या अभिकर्त्त्यास याप्रकारच्या कामाचा पुर्वानुभव असेल अशाच सक्षम व निविदेतील पात्रतेचे निकष पुर्ण करणारा निविदाधारक अभिकर्ता म्हणुन नेमणुकीस पात्र असेल . अभिकर्त्त्यास प्रचलीत नियमानुसार निविदा अनामत व सुरक्षा अनामत भरावी लागेल .

४ सदर कामासाठीचे दर सद्याच्या प्रचलीत पध्दतीनुसार प्रत्त्येक दिवसासाठी निर्धारीत करण्यांत येतील .व ज्या अभिकर्त्त्याचे दर तुलनात्त्मक दुष्टया कमी व वाजवी असतील तो अभिकर्ता म्हणुन नेमणुकीस पात्र असेल ..

५ शहरातील सार्वजनिक रस्ते, नाल्या व विविध जागांवर निर्माण होणारा कचरा साफ करण्याची व गोळा करण्याची जबाबदारी महापालिका सफाई कामगारांची राहील .

६ घराघरातून कचरा गोळा करण्यासाठी आवश्यक संख्येने हातगाडया ( Hand Carts with Bells) पुरविण्याची जबाबदारी अभिकर्त्त्याची राहील . तसेच हातगाडयांमार्फत जमा होणारा कचरा साठविण्यासाठी शहरात आयुक्त ठरवितील त्या ठिकाणी व आयुक्त ठरवतील अशा रंगाच्या व प्रकारच्या (Specifications) कचरा कुंडया (Community Dust Bins) पुरवाव्या लागतील .

७ कचरा वाहतुकीचे वेळापत्रक व कचरा उचलण्याची वारवारंता (Transport schedule and Frequency of lifting) आयुक्तांना विहित केल्याप्रमाणे असेल व त्याचे तंतोतंत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अभिकर्त्त्याची असेल

८ महानगरपालिकेने विहित केलेल्या कचराकुंडयापासून ( Community Dust Bin )पासुन डंम्पिग ग्राऊंड पर्यंत कचरा वाहून नेण्यासाठी अभिकर्त्यास निविदा सुचनेत नमुद केलेल्या संख्या व निकषांप्रमाणे (specification) अत्याधुनिक बनावटीचे नवीन वाहने पुरवावे लागतील . वाहनांचे देखभाल दुरुस्ती व इंधनाचा संपुर्ण खर्च अभिकर्त्यास करावा लागेल .

९ हातगाडी व वाहनांवर नमुद केल्याप्रमाणे कर्मचारी अभिकर्ता मार्फत नियुक्त करण्यांत येतील . सदर कर्मचा-यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन देणे, नियमानुसार गणवेश व साफसफाईसाठी आवश्यक साहित्य पुरविणे, वाहनास अथवा कर्मचा-यास अपघात झाल्यास संबंधिताना नुकसान भरपाई देणे, वाहन व कर्मचा-यांना विमा उतरविणे, न्यायालयीन आदेशांचे पालन करणे , इत्यादी बाबतची संपुर्ण जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

१० अभिकर्त्याने पुरविलेल्या हातगाडया , कचरा कुंडया व वाहने इतर साहित्य नादुरुस्त झाल्यास अथवा, निकामी झाल्यास, ते दुरुस्त करण्याची अथवा त्याऐवजी नवीन हातगाडया , कचरा कुंडया , वाहने व इतर साहित्य त्वरीत पुरविण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

११ अभिकर्त्याने पुरविलेल्या हातगाडया , कचरा कुंडया व वाहने इतर साहित्य चोरीस गेल्यास त्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

१२ अभिकर्त्यास महापालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रशासकीय प्रभाग क्षेत्र कार्यालयात ( वार्ड ऑफिस) कार्यालयात एक दुरध्वनी सुविधेसह



एक संपर्क कार्यालय सुरु करावे लागेल व या कार्यालयात संपर्क प्रमुख म्हणुन सक्षम व्यक्तीची नेमणुक करावी लागेल .

१३ निविदा कालावधीत अभिकर्त्याचे कामकाज समाधानकारक नसल्यास निविदासुचनेत नमुद केलेल्या कारणास्तव दंड आकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकास राहील .

१४ अभिकर्त्यास महानगरपालिके समवेत लेखी करार करावा लागेल व त्यांच्या नोंदणी साठी आवश्यक मुंद्राक शुल्कचा खर्च अभिकर्त्याला करावा लागेल .

१५ अभिकर्त्याने महापालिका क्षेत्रात आयात केलेल्या वाहने, यंत्रसामुग्री व इतर साहित्यावर प्रचलीत दरानुसार जकात भरण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील .

१६ महापालिका व अभिकर्ता यांत निर्माण कोणताही कायदेशीर वाद ठाणे जिल्हा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राधीन कोणत्याही प्रकारचा वादविवाद निर्माण झाल्यास तो अरबीस्ट्रेशन (Arbitration) अधिनियम अंतर्गत सोडविला जाईल

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्यावेळचा विषय:-

विषय:- उल्हासनगर -३ येथील नेहरू चौक ते प्रेम रामचंदानी रस्त्यामधील मातृभुमी सॉमिल समोरील चौकास व या चौकापासुन बगीच्या समोरून पप्पु सोसायटी कडे जाणा-या अंतर्गत रस्त्यास पुज्य बचलमल जी. एस. मार्ग असे नामकरण करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे उल्हासनगर-३ येथील नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी या रस्त्यामधील मातृभूमी सॉमिल समोरील चौकास व या चौकापासून बगीच्या

समोरून पप्पु सोसायटीकडे जाणा-या अंतर्गत रस्त्यास पप्पु बचलमल जी. एस. असे नाव देण्याकरिता प्रस्ताव आला आहे. महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरून उक्त रस्त्याला आतापर्यंत कोणतेही नांव दिल्याचे निर्देशनास आलेले नाही. अथवा सदर रस्त्यावर कोणत्याही नावाचे फलक लावल्याचे दिसुन येत नाही.

तरी सदर मातृभुमी सॉमिल समोरील चौकास व या चौकापासून पप्पु सोसायटी कडे जाणा-या अंतर्गत रस्त्यास ''पूज्य बचलमल जी. एस'' असे नामकरण करण्याच्या प्रस्तावास महासभेची मान्यता मिळणे करिता सभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ९४ दिनांक:-२८ ७ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर -३ येथील नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी रस्त्यावरील मातृभुमी सॉमिल समोरील चौकास व या चौकापासून बगीच्या समोरून पप्पु सोसायटीकडे जाणा-या अंतर्गत रस्त्यास पूज्य बचलमल जी. एस. असे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय:-

विषय:- उल्हासनगर स्टेशन जवळील उड्डाण पुलास संगीताचार्य मास्टर चंदर असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार नमुद करण्यात येत आहे की, उल्हासनगर स्टेशन जवळील उल्हासनगर ३ व ४ जोडणा-या उड्डाण पुलास संगित आचार्य मास्टर चंदर यांचे नाव देण्याकरिता प्रस्तावित केलेला आहे. सदर उल्हास उड्डाण पुलाचे काम प्रगतीपथावर असून मार्च अखेर पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. सदर उल्हासनगर-३ व ४ जोडणा-या उड्डाण पुलाला नांव देण्याचे प्रस्तावित आहे. सदर पुलाचे बांधकाम नव्याने केला असल्यामुळे या पर्वी सदर पुलाला दुसरे कोणतेही नाव अजुन पर्यंत प्रस्तावित केल्याचे दिसुन येत नाही.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे उल्हास स्टेशन जवळील उल्हासनगर ३ व ४ जोडणा-या उड्डाण पुलास ''संगीताचार्य मास्टर चंदर उड्डाण पूल'' असे नांव देण्यास महासभेकडुन मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

महासभा ठराव क्र. ९५ दिनांक:-२८ ७ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर स्टेशन जवळील उड्डाण पुलास संगीत आचार्य मास्टर चंदर असे नाव देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषय:-</u>

<u>विषय:- महानगरपालिका पाणी पुरवठा व मलनि:सारण क्षेत्रामध्ये कार्यक्षमता आणि गुंतवणुक वाढविण्यासाठी खाजगी संस्थाच्या सहभागाबाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

पाणी पुरवठा व मलनि:सारण यांना अत्त्यावश्यक सेवा म्हणून समजण्यात येते. महानगरपालिकांना सध्या वाढत्त्या लोकसंख्येमुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. वाढत्त्या लोकसंख्येमुळे पाण्याची मागणी देखील वाढत आहे . नागरिकांना शुध्द व पुरेसे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिका पाणी पुरवठा योजना हाती घेतात. त्यावर भरमसाठ खर्च करुन देखील समाधानकारक सेवा नागरिकांना स्थानीक स्वराज्य संस्था देवू शकत नाहीत. नागरी सेवांबाबत नागरिकांच्या अपेक्षा वाढत असल्यामुळे पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवामध्ये कार्यक्षमता आणणे, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करुन समान वाटप करणे, पाणी पुरवठा योजना **"ना नफा ना तोटा"** या तत्त्वावर चालविणे व पाणी ही मौल्यवान उपभोग्य वस्तु असुन तिचा विनियोग काटकसरीने करणे बाबत जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी आवश्यक कार्यक्षम व्यवस्थापन कार्यपध्दती स्थानिक स्वराज्य अवलंबन नसल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे पाणी पुरवठा योजनेमध्ये अनेक अनियमितता निर्माण होतात जसे पाण्याचा अपव्यय, पाणी गळती, अवैध नळजोडण्या, पाणी चोरी, उर्जेचे अव्यवस्थापन. परिणामी पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी येणारा खर्च व प्राप्त होणारा महसूल यामध्ये बरीच तफावत होते. साहजिकच योजना तुटीत चालल्यामुळे योजनेसाठी लागणारी देखभाल दुरुस्तीची कामे घेता येत नाहीत. अंतत: योजना मोडकळीस निघून शेवटी नवीन / वाढीव योजना प्रस्तावीत करण्यांत येते.

<u>२) सद्यास्थिती :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सन २००१ जनगणनेप्रमाणे लोकसंख्या ४.७२ लक्ष इतकी असुन प्रतिदिन प्रतिमानसी १४० लिटर्स याप्रमाणे पाणी पुरवठा होण्यासाठी ६६ द.ल.ली पाण्याची आवश्यकता आहे. शहरात व्यवसाय निमित्त येणा-या लोकसंख्येचे प्रमाणही जास्त असुन दररोज साधारणपणे १ लाखापेक्षा जास्त लोक व्यापारासाठी या शहरात येजा करीत असतात . या लोकसंख्येची पाण्याची गरज व योजनेतील गळती लक्षात घेतली तरी ८४ द.ल.ली पेक्षा जास्त पाण्याची आवश्यकता नाही.

उल्हासनगर शहरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या शहाड व बारावे येथील पाणी पुरवठा केंद्रामधून ९८ द.ल.ली. पाण्याचा साठा राखीव ठेवण्यांत आला आहे . प्रत्येक्षात यापेक्षा जास्त म्हणजेच प्रतिदिन सरासरी ११० द.ल.ली पाणी

पुरवठा केला जातो. याचा अर्थ शहराला दररोज २५ ते ३० द ल ली. अतिरिक्त पाणी पुरवठा होतो. असे असुन देखील असमान वितरण पध्दतीमुळे शहरातील काही वस्त्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई जाणवत आहे. शहराला अतिरिक्त पाणी पुरवठा होऊन देखील वितरण व्यवस्थेतील दोषामुळे पाणी पुरवठा सेवेबाबत नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. यावर वेळीच उपाय योजना न केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.



३) उद्देश:-

खाजगी क्षेत्रातील सेवांचा दर्जा लक्षात घेता पाणी पुरवठा क्षेत्रामध्ये देखील खाजगी संस्थांना सहभागी करुन कार्यक्षमता आणि गुंतवणुक वाढविण्याची गरज निर्माण झालेली आहे. पाणी पुरवठ्या सारख्या मुलभूत सेवा क्षेत्रात खाजगी संस्थाच्या सहभागाची प्रमुख उद्देश खालील प्रमाणे आहे.

१ स्थानिक स्वराज्य संस्थेची पाणी पुरवठ्याची भविष्यातील गरज लक्षात घेऊन पाणी पुरवठा योजना आखणे.
२ उपलब्ध पाणी पुरवठयांच्या साधनांचा (Sources) नियोजन बध्द पद्धतीने पर्याप्त वापर करणे.
३ उपलब्ध पाण्याचे समान वितरण करणे.
४ पाणी पुरवठा योजनावर महानगरपालिका देत असलेल्या अनुदानात कपात करुन योजना स्वयंपुर्ण होण्यासाठी प्रयत्न करणे.
५ पाणी पुरवठा योजनेवरील देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी करण्यासाठी, पाण्याची चोरी व गळती रोखण्यासाठी, व पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे.

४) खाजगी संस्थांच्या सहभागा बाबतचे विकल्प :-

राज्य सरकारच्या मार्गदर्शक धोरणानुसार खाजगी संस्थांच्या सहभागासाठी तीन विकल्प सुचविण्यांत आले आहेत. ते खालील प्रमाणे

अ) व्यवस्थापन करार :-

हा करार ३ ते ५ वर्षासाठी असावा . खाजगी ऑपरेटरकडे अस्तित्त्वातील पाणी पुरवठा व्यवस्था व कर्मचारी वर्ग यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी राहील, परंतु योजनेसाठी नवीन गुतवणूक व पुनर्वसनाची जबाबदारी ही स्थानिक संस्थेची असेल. व्यवस्थापन करारासाठी ऑपरेटरला देण्यात येणारे शुल्क हे कामगिरीवर अवलंबून असावे तसेच अपेक्षित कामगिरी होत नसल्यास दंडाची सुध्दा व्यवस्था त्यामध्ये असावी. खाजगी कंत्राटदाराबरोबर करार करताना त्याला ठरवून दिलेल्या मानकापेक्षा/लक्षापेक्षा अधिक चांगली कामगिरी केल्यास या करारामध्ये कंत्राटदाराला प्रोत्साहन म्हणून लाभांश देण्याबाबत सुध्दा तरतुद असावी जे की, बिलिंग आणि वसुलीमध्ये सुधारणा घडविणे, देखभाल व दुरुस्तीमध्ये कार्यक्षमता आणून खर्च कमी करणे आणि व्यवस्थेतील हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण कमी करणे याच्याशी संबधित असेल हा करार सफलतापुर्वक पुर्ण झाल्यास ३ ते ५ वर्षानंतर दिर्घ कालीन सवलत करारामध्ये सुध्दा वाढविता येईल. यासाठी खाजगी ऑपरेटरच्या कामगिरीची विविध मानके तयार करुन घेतल्यानंतर ती पूर्ण होत असल्यावर असा बदल करता येईल . व्यवस्थपान परंतु जास्त भांडवली गुतवणुकीच्या कामाचा यामध्ये समावेश नसावा.

ब) भाडेपटटा करार:-

हा करार ६ आणि १० वर्षाचा असून यासाठी ऑपरेटरला व्यवस्थापन शुल्क देण्यात येऊ नये. ऑपरेटर हा देखभाल व दुरूस्तीचा खर्च, पाणीपटटी गोळा करणे, किरकोळ व अल्पकालीन यंत्रसामुग्री आणि पाईप्स बदलविण्यास जबाबदार राहील. या करारासाठी आवश्यक आहे की, करार करतांना स्थानिक संस्थेने पाणीपटटीचे योग्य दर निश्चित करवयास पाहिजे, जेणेकरून देखभाल व दुरूस्तीचा खर्च भागविता येईल. तसेच पाणीपटटी वसुली आणि देखभाल दुरूस्तीचा खर्च कमी करणे यासाठी कंत्राटदाराला प्रोत्साहनपर लाभांश देण्यात यावे. पाणी पुरवठा व्यवस्थेचा वापर केल्याबाबत ऑपरेटरने स्थानिक संस्थेला भाडेपटटा शुल्क अदा करावे. भाडेपटटा शुल्क ठरवितांना सद्य:स्थितीत योजनेपासून प्राप्त होणारे उत्त्पन्न व खर्च याचा विचार करून ठरविण्यात यावा. पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी नवीन गुंतवणूकीची जबाबदारी ही स्थानिक संस्थेवरच असेल. भाडेपटटा करारामध्ये देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी कंत्राटदारावर असते तर व्यवस्थेमध्ये अधिक गुंतवणुकीची जबाबदारी स्थानिक

संस्थेवर असल्यामुळे या दोन्ही कार्यामध्ये समन्वय आवश्यक आहे. कामाच्या जबाबदारीबाबत काही



अडचणी उदभवल्यास स्थानिक संस्था व कंत्राटदार यांनी समन्वय साधून मार्ग काढावा अशा प्रकारची तरतूद करारामध्येच करण्यात यावी. यामधून सुध्दा कामाच्या जबाबदारीबाबत अडचण दूर न झाल्यास शासनाकडे ही बाब कळवावी व शासन जो निर्णय घेईल तो सर्वांना बंधनकारक राहील.

क) सवलत करार :-

हा करार सुध्दा भाडे पटटा करारासारखाच आहे. मात्र याचा कालावधी २० ते ३० वर्षाचा असून कराराच्या पूर्ण कालावधीमध्ये देखभाल दुरूस्ती व नवीन गुंतवणूकीची सर्व जबाबदारी ही खाजगी कंत्राटदारावर असेल. करार संपल्यानंतर कंत्राटदाराने देखभाल व दुरूस्तीसाठी दिलेली व्यवस्था स्थानिक संस्थांकडे हस्तांतरीत करावी. खाजगी ऑपरेटर हा आवश्यक नवीन गुंतवणूक करणार असल्यामुळे स्थानिक संस्थेला खाजगी ऑपरेटर कडून प्राप्त होणारे भाडेपटटा शुल्क हे कमी असेल.

५) महापालिका व अभिकर्त्याच्या जबाबदा-या :-

अ) महानगरपालिकेची जबाबदारी :-

१) खाजगी कंत्राटदाराशी करार झाल्यानंतर स्थानीक संस्थेने योजनेची, ग्राहकांची माहिती, पाणीपट्टीच्या दराची रचना, नकाशा कंत्राटदाराला उपलब्ध करुन द्यावेत
२) कराराच्या दरम्यान योजना चालविण्यासाठी आवश्यक परवानगी, मान्यता कंत्राटदाराला मिळवून द्यावी
३) देखभाल व दुरुस्तीच्या दरम्यान किरकोळ कामे कंत्राटदाराला करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे
४) दोघांना मान्य असेल त्या बँकेत खाते उघडावे
५) करारामध्ये ठरल्यानुसार कंत्राटदाराने कर्मचा-यांच्या सेवांची मागणी केल्यास कर्मचारी वेळेत उपलब्ध करुन द्यावे.
६) करारादरम्यान कंत्राटदाराला ग्राहकांच्या हददीत मिटर रिंडींग, योजनेनची तपासणी, निरीक्षण, दुरुस्त्त्या, मिटर बसविणे किंवा बंद करणे आणि पाणी पट्टी वसुल करणे यासाठी अधिकृत करावे.
७) पाणीपट्टीचे दर ठरविणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे याबाबतचे सर्वसाधारण अधिकार स्थानिक संस्थेला असेल.
८) करारामधील तरतुदीनुसार नागरी संस्थेला कंत्राटदाराला ठरलेल्या वेळी खालील शुल्क अदा करावे.
   अ) सेवा शुल्क करारामध्ये ठरल्याप्रमाणे शुल्क अदा करावे.
   ब) विकास शुल्क हे शुल्क १) स्थानीक संस्थेच्या कर्मचा-यांना प्रशिक्षण २)बिलींग आणि वसुलीची कार्यक्षम व्यवस्था निर्माण करणे ३) ग्राहक सेवा व तकार निवारण यंत्रणा स्थापन करणे.

ब) कंत्राटदाराची जबाबदारी :-

१) प्रस्तावीत देखभाल व दुरुस्तीची किरकोळ कामे त्यासाठी लागणारा कालावधी व खर्च याचा अहवाल तयार करुन स्थानीक संस्थेकडे मान्यतेसाठी पाठविणे
२) अवैध नळ जोडण्या नियमित करण्यासाठी, मिटरींग आणि गळती कमी करण्यासाठी कार्यकम प्रस्तावीत करणे
३) नागरी संस्थेकडून आवश्यक असणा-या कर्मचा-यांची मागणी करणे
४) खाजगी कंत्राटदाराने नागरी संस्थेला प्राप्त होणारे शुल्क आणि कामगिरीबाबत शेडयुल बँकेची हमी द्यावी.
५) ऑपरेटरने प्रत्येक अर्थिक वर्षात कार्यान्वयन कार्यकम (Operting Plan) नागरी संस्थेला मान्यतेसाठी सादर करावा.
६) कंत्राटदार हा गुणवत्ता व सुरक्षा व देखभाल व दुरुस्तीची आवश्यकता याकडे विशेष लक्ष देईन.

७) योजना चालविण्यास घेतल्यानंतर व्यवहारासंबंधीच्या सर्व लेखा विशेषक नोंदी अचुकतेने ठेवेल.

८) नागरी संस्था व खाजगी कंत्राटदार यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार स्थानीक संस्थेच्या कर्मचा-यांना खाजगी कंत्राटदाराने प्रशिक्षण द्यावे

९) कंत्राटदाराकडून देखभाल व दुरुस्तीच्या आवश्यकते बाबत कराराचा भंग झाल्यास त्याची दुरुस्ती कंत्राटदाराच्या खर्चाने करुन घेण्याचा नागरी संस्थेला अधिकार राहील तसेच कंत्राटदाराकडून बेजबाबदारपणे खालील बाबतीत कराराचा भंग नियमितरित्त्या होत असल्यास, नागरी संस्था करार संपुष्टात आणु शकेल

अ) देखभाल व दुरुस्तीच्या आवश्यकतेकडे सारखे दुर्लक्ष/विलंब होत असेल

ब) ग्राहकांना नेहमी दुषीत पाणी मिळत असेल किंवा ठरविल्याप्रमाणे पाणी पुरवठा होत नसल्यास

क) देखभाल व दुरुस्तीच्या ठरविलेल्या मानकांप्रमाणे काम न केल्यास सुरक्षा उपाय योजनेकडे दुर्लक्ष, पाणी पुरवठयामध्ये अनियमितता/ खंड पडल्यास

**६) शासन निर्णयाप्रमाणे अभिकर्ता नियुक्तीसाठी अवलंबवयाची कार्यपध्दती:-**

अभिकर्ता निवडीसाठी राष्ट्रीय तसेच स्थानीक वर्तमान पत्रामध्ये निविदा सुचना प्रसिध्द करुन स्पर्धात्मक निविदा प्राप्त करुन घ्याव्यात व अशा खाजगी संस्थाकडून प्राप्त होणा-या प्रस्तावांचे मुल्यमापन करतांना नागरी संस्थेला देखभाल दुरुस्ती, अद्यावतीकरण यासाठी येणारा खर्च व खाजगी संस्थेने प्रस्तावित केलेला खर्च याची तुलना करुन कंत्राटदाराची निवड करावी.

योजना खाजगी कंत्राटदाराला चालविण्यासाठी सोपविण्याची कार्यवाही सुरु होण्यापासून ते करारावर स्वाक्षरी होईपर्यंत या सर्व प्रकियेमध्ये पारदर्शकता आणण्याच्या उददेशाने लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, ग्राहक मंच व या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीशी विचार विनियम करावा.

**७) शासनाकडून प्रोत्साहन अनुदान :**

राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाव्दारे अनुदान तसेच कर्जासाठी हमी देण्यात येते. पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवामधील कार्यक्षमता सुधारण्यासाठी सर्व महानगरपालिकांना प्रोत्साहन देण्याचे राज्यशासनाचे धोरण असुन आणि खाजगी संस्थांच्या सहभागासाठी भांडवली अनुदान कार्यक्रम आणि शासनाची कर्जासाठी हमी यांची खालील प्रमाणे पुनर्रचना करण्यांत आली आहे . त्यानुसार

- भाग १ -- मूळ भांडवली कामासाठी ७०टक्के अनुदान व
- भाग २ -- पाणी लेखा परिक्षण, ऊर्जा लेखा परिक्षण, याकामासाठी ३०टक्के पुढाकार प्रोत्साहन (INITIATIVE GRANTS) देण्यात येते.

**८) धोरणात्त्मक निर्णयांची आवश्यकता:-**

उपलब्ध पाण्याचे समान वितरण करुन पाणी पुरवठा सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी खाजगी संस्थांचा सहभाग घेणे कमप्राप्त आहे. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(अ) अन्वये महानगरपालिका आपली कर्तव्य खाजगी अभिकरणामार्फत पार पाडू शकते. शासन स्तरावर याबाबत धोरणात्त्मक निर्णय घेण्यात आला असुन तसे मार्गदर्शक सुचना देण्यांत आलेल्या आहेत. शासनाच्या मार्गदर्शक धोरणाशी सुसंगत होईल अशा पदधतीने उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील पाणी वितरण व्यवस्था व पाणी बील वसुली या कामी खाजगी संस्थांचा सहभाग घेण्यासाठी धोरणात्त्मक निर्णय महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेने घेणे आवश्यक आहे.

--५--

**९) प्रशासनाचा प्रस्ताव :-**

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन कार्यक्षमतेने होण्यासाठी व नागरिकांना उच्च दर्जाची सेवा देण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक धोरणानुसार अ) व्यवस्थापन करार, ब)भाडेपटटा करार, क) सवलत करार यापैकी एका पर्यायाची निवड करणे प्रस्तावीत आहे.

सबब याबाबत धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारणसभे समोर ठेवण्यास अनुमती मिळावी

<u>महासभा ठराव क्र. ९६</u> <u>दिनांकः-२८.७.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सवलत करार पध्दती आणि त्यास अनुषंगिक उक्त अटी व शर्तींच्या अधिन राहुन उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना कामी कर्तव्य, अभिकरणाने पार पाडणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>
<u>विषयः- उल्हासनगर येथील श्रीराम सिनेमा जवळील उड्डाण पुलास ''श्री. परसराम जिया उड्उाण पूल'' असे नाव देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>
उपरोक्त विषयानुसार नमुद करण्यात येत आहे की, उल्हासनगर-३ श्रीराम सिनेमा जवळील उल्हासनगर ३ व ४ जोडणा-या उड्डाण पुलास श्री. परसराम जिया यांचे नाव देण्याकरीता प्रस्तावित केलेला आहे. पूर्वी सदर जागेवर जूना पूल अस्तित्त्वात होता त्याचवेळी महानगरपालिकेमध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरून जून्या पुलास नांव दिल्याचे निर्देशनास दिसून येत नाही. सध्या सदर ठिकाणी रेल्वे ऑथॉरिटीचे उड्डाण पुलाचे काम पूर्ण केले आहे. सदयास्थितीत उपरोक्त पुलास आजपर्यंत कोणतेही नांव प्रस्तावित केल्याचे दिसून येत नाही.

तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे श्रीराम सिनेमा जवळील उल्हासनगर ३ व ४ जोडणा-या उड्उाण पुलास ''श्री. परसराम जिया उड्डाण पूल'' असे नावं देण्यास महासभेपुढे मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ९८</u> <u>दिनांकः-२८.७.२००३.</u>
सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर येथील श्रीराम सिनेमा जवळील उड्डाण पुलास ''श्री. परसराम जिया उड्डाण पूल'' असे नाव देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

शोक प्रस्ताव :-

'मेरे शव के पिछे चलनेवालो, याद इसे रखना
राम नाम है सत्त्य, न कहना सच्ची मधुशाला'

अशा सहजसोप्या रचनांनी सर्वसामान्य जनतेच्या मनात आढळस्थान मिळवणारे हिंदी साहित्यातील युगपुरूष डॉ. हरीवंशराय बच्चन यांना त्यांच्या हजारो चाहत्त्यांनी साश्रूनयनांनी दि. १९.१.२००३ रोजी निरोप दिला. त्यांचे चिरंजीव महानायक अमिताभ बच्चन यांनी पित्त्याच्या पार्थिवास अग्नी दिला तेव्हा जुहूच्या हिंदू स्मशानभुमीवर मोठया संख्येने जमलेल्या आप्तस्वकीयांच्या अश्रुंचा बांध फुटला.

डॉ. हरीवंशराय बच्चन हे ख-या अर्थाने लोक कवी होते. सर्वसामान्य जनतेच्या मनाला भीडतील आणि त्यांच्या ओठावर खेळतील अशा सहजसोप्या रचना करीत त्यांनी हिंदी कवितेला नवे परिमाण प्राप्त करून दिले. कविता हाच त्यांचा श्वास होता. हा श्वास शनिवारी रात्री ११.३७ वाजता थांबला. जुहू येथील प्रतिक्षा बंगल्यातच त्यांचे निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ८३ अ दिनांक:-२०.१.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार डॉ. हरीवंशराय बच्चन यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

एकमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकांची नावे :- १. श्री. शांताराम निकम
२. श्री. मोहन बहरानी
३. डॉ. (श्रीमती) जया साधवानी
४. श्रीमती. ज्योती कालानी
५. श्री. किशोर वनवारी
६. श्री. हरदास माखीजा
७. श्री. नाना पवार

अनुमोदकांची नावे :- १. श्री. प्रमोद टाले
२. श्री. अशोक ठाकुर
३. श्री. विनोद तलरेजा
४. श्री. ठाकुरदास बहरानी
५. श्री. गौतम भालेराव
६. श्रीमती. बेबी तुलसी वसीटा

अभिनंदन प्रस्ताव :-

महाराष्ट्रात पहिला दलित मुख्यमंत्री होण्याचा मान माननिय श्री. सुशिलकुमार शिंदे यांना मिळाला असला तरी यापुर्वी सहा वेळा त्यांना नशिबाने हुलकावणी दिली होती. मुख्यमंत्री पदासाठी १९८३ साली पहिल्यांदा मा. श्री. शिंदे यांचे नाव चर्चेत आले. श्री. बाबासाहेब भोसले यांच्या उचलबांगडी नंतर मा. श्री. शिंदे मुख्यमंत्री होणार होते. असे मा. श्री. शिंदे यांचे नाव सातत्त्याने सहा वेळा मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणुन घेतले गेले होते. सातव्यांदा मात्र त्यांना नशिबाने साथ दिली. आणि मा. श्री. सुशिलकुमार शिंदे हे महाराष्ट्राचे पहिले दलित मुख्यमंत्री झाले.

प्रदिर्घ काळ राजकारणात असलेल्या मा. श्री. सुशिलकुमार यांनी सत्तेच्या सुरातील ''आरोह अवरोह'' अनेकदा ऐकले आणि अनुभवले. या फिरत्त्या राजकारणातही त्यांनी आपली वाचनाची आणि संगिताची आवड जपली आहे. पुस्तकातले 'शब्द' आणि 'कॅसेट' मधील 'सुर' पक्के असतात हे त्यामागचे कारण असावे.

१९८९पर्यंत मा. श्री. शिंदे यांनी महाराष्ट्र विधानसभेत ९ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम केला आहे. १९७४ ते १९९२ अशी २२ वर्ष मा. श्री. शिंदे यांनी विविध खात्त्यांचे मंत्रीपद सांभाळले. दोन वेळा ते कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्षपदी होते. १९९२ साली तत्त्कालिन पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांच्या निमंत्रणावरून मा. श्री. शिंदे यांची अखिल भारतीय कॉंगेस सरचिटणिस पदी नियुक्ती करण्यात आली. राज्यसभेवर त्यांची निवड झाली. राज्यसभेत सर्व सदस्यांमध्ये जास्त प्रश्न मांडणारा खासदार म्हणुन श्री. शिंदे यांना नॅशनल सिटीझन पारीतोषिक देण्यात आले आहे. १९९८ ला सोलापुर लोकसभा मतदार संघातुन खुल्या गटासाठी असणा-या जागेवर मा. श्री. शिंदे १ लाखाहुन अधिक मतांनी विजयी झाले. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मा. श्री. शिंदे हे कॉंग्रेसचे उमेदवार होते. दिलखुलास व्यक्तीमत्त्व म्हणुन मा. श्री. शिंदे ओळखले जात आहेत. अनेक पक्षांत त्यांचे मैत्रीचे संबंध आहेत. साहित्त्य, कला, नाटय, चित्रपटात त्यांना रूची आहे.

तसेच उपमुख्यमंत्री पदी मा. श्री. छगन भुजबळ यांची फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्याचे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ८३ ब                    दिनांकः-२० १ २००३.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मा. श्री. सुशिलकुमार शिंदे यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पदी तर मा. श्री. छगन भुजबळ यांची महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री पदी झालेल्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करीत आहे.

एकमताने

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

श्री. बच्चाराम रूपचंदानी

श्री. ठाकुर वेहरानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण

श्री. लाल पंजाबी

श्री. प्रमोद टाले

**प्रस्ताव**

उल्हासनगर विठ्ठलवाडी रेल्वे पॅसेंजर असोसिएशन व शहरातील बहुसंख्य नागरिकांनी उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे कॉम्प्युटराइजड् रिझर्व्हेशन व्यवस्था उपलब्ध होणेस वेळोवेळी जोरदार मागणी केलेली आहे. उल्हासनगर शहर हे औद्योगिक वसाहतीचे शहर असून धंदे व व्यवसायासाठी रेल्वे मार्गाने सतत ये जा होत असते. तसेच परगावाहून देखील व्यवसाय प्रयोजनार्थ प्रवाशांची ये जा या मार्गाने होत असून रेल्वे तिकीटांचा जास्तीत जास्त खप होत असलेले हे रेल्वे स्थान आहे. त्याअर्थी विषयांकीत प्रकरणी मुख्य व्यवस्थापक वाणिज्य, मध्य रेल्वे, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र. सीसीआरएस/बीबीडबलुपी/२००२-०३ दि. ९.१२.२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत एकूण क्षेत्र ११५६ चौफुट जागा विद्युत पुरवठासह विनामुल्य उपलब्ध करून देणेबाबत मागणी केलेली आहे, उल्हासनगर महानगरपालिकेकडे स्वतःची मालकीची जागा उपलब्ध नसून ती सुविधा रेल्वे विभागास पुरविणे शक्य नाही. म्हणुन या विषयी चर्चेअंती योग्य निर्णयासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.८४** **दि. २०.१.२००३**

हि महासभा वरील परिस्थिती विचारात घेता रेल्वे विभागास उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे त्यांच्या स्वजागेवर संगणीकृत तिकीट आरक्षण केंद्र उपलब्ध करून देणेसाठी जोरदार मागणी करीत आहे.

**एकमताने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

**प्रस्ताव**

सध्या आयुक्त सभेच्या बाहेर पडल्याने कार्यसुचीवरील विषय क्र. ३ बददल किंवा इतर कोणत्त्याही विषयाबाबत सभेमध्ये चर्चा चालु ठेवणेसाठी आयुक्तांस उपस्थित रहाणे आवश्यक आहे म्हणुन, या कारणावरून हि सभा २८.७.२००३ संध्याकाळी ४.०० वाजता किंवा इतर कोणत्त्याही दिवसापर्यंत सभा तहकुब करण्याबददलचा ठराव प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र.८४ अ** **दि. २०.७.२००३**

हि महासभा वरील कारणास्तव आजची दि. २०.७.२००३ ची सभा तहकुब करणेस, तसेच दि. २८.७.२००३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करणेस मान्यता देत आहे.

**बहुसंख्येने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**प्रस्तावना**

प्रशासनातर्फे आजच्या सभेच्या कार्यसुचीवर पुढील सहा विषय समाविष्ट करण्या करिता सूचना करण्यात आलेली आहे. आपल्या कार्यसूचीवरील विषय क्र. ११ नंतर खालील विषय आजच्या कामकाजात समावेश करणेस येणेप्रमाणे.

१. महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याचे व्यवस्थापन घनकचराकृती आराखडयास मंजुरी देणे बाबत.
२. उल्हासनगर ३ येथील नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी रस्त्त्यावरील मातृभुमी सॉ मिल समोरील चौकास व या चौकापासुन बगिच्या समोरील पप्पु सोसायटीकडे जाणा-या अंतर्गत रस्त्त्यास पूज्य श्री.बच्चनमल जी. एस. मार्ग असे नाव देणे बाबत.
३. उल्हासनगर स्टेशन जवळील उड्डाण पुलास संगिताचार्य मास्तर चंदन उड्डाण पुल असे नाव देणे बाबत.
४. महानगरपालिका पाणीपुरवठा व मलनि:स्सारण क्षेत्रामध्ये कार्यक्षमता आणि गुंतवणुक वाढविणेसाठी खाजगी संस्थेच्या सहभागाबाबत.
५. उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमावलीत फेरफार करणे बाबत.
६. उल्हासनगर येथील श्रीराम सिनेमा जवळील उड्डाण पुलास श्री. परसराम जिया उड्डाण पुल असे नाव देणे बाबत.

करिता वरील सहा विषय कार्यसूचीवर आयत्त्यावेळचे विषय म्हणुन सामावुन घेणेस प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ८३ क **दिनांक:-२०.७.२००३.**

ही महासभा वरील सहा विषय आयत्त्यावेळचे विषय म्हणुन कार्यसूचीवर सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

बहुसंख्येने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमावलीत फेरफार करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका हददीत उपभोग, उपयोग किंवा विक्रीकरिता आयात करण्यात येणा-या मालावर जकात आकारण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतंत्र उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ तयार केले असून सदर नियमास राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक नगर विकास क्र. उमपा/३०९७/५०४/सीआर-७४/९७/४ड-२३/दिनांक१२.४.१९९७ नुसार मंजुरी दिली आहे. उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधील नियम क्रमांक १७(२)नुसार त्वरीत निर्यात करावयाच्या जकात आकारणी योग्य माल महापालिका क्षेत्रातुन प्रवेश नाक्यावरून निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी -नि- पारगमन पास प्रदान करण्यांत येतो. सदर नियमावली मधिन नियम १७ (७)नुसार लेखी परवानगी नि-पारगमन पास प्रदान करण्यासाठी वसुल करण्यांत येणा-या फीचा कमाल दर प्रती वाहन रू. २० (रूपये विस फक्त)निश्चित करण्यात आलेला आहे. सदरचा दर अत्यंत कमी असल्याने त्यात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. आसपासच्या इतर महानगरपालिका अशा प्रकारच्या त्वरीत निर्यात करावयाच्या मालासाठी लेखी परवानगी नि पारगमन पास अदा करण्यासाठी प्रतिवाहन रू. १०० (रूपये शंभर मात्र) फी वसूल करित आहे. अशा प्रकारचा पास वाढीव दराने प्रदान केल्यास त्याचा शहरातील उद्योगधंदे व व्यापारी यांचेवर कोणताही परिणाम होणार नाही.

तसेच उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ च्या कलम ३ (२)नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात आयात होणा-या विविध वस्तुवर /मालांवर अनुसूचित १ च्या रकाना ३ मध्ये दर्शविलेल्या कमाल दर इतका ठरविलेला आहे. सदर अनुषंगाने अनुसूचिच्या अनुक्रमांक ८६ मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मालावर १.५० टक्के कमाल दर ठरविण्यात आला आहे. सदरची कमाल मर्यादा अत्यंत अल्प असल्यामुळे त्यात वाढ करणे गरजेचे आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातुन प्रवेश नाक्यावरून निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी नि पारगमन पास वाढीव दराने प्रदान करण्यासाठी व अनुसूचीच्या १ च्या अनुक्रमांक ८६ मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या वस्तुवर कमाल मर्यादा वाढविण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणे प्रस्तावित आहे.

१. नियमावलीतील नियम १७ (७) मधील तरतुदः-
(७)पोट नियम (२)मध्ये उल्लेख केलेली लेखी परवानगी नि पारगमन पास देण्याकरिता फी आणि पोट नियम (६) मध्ये उल्लेख केलेली संरक्षणाखाली माल वाहून नेण्याच्या लेखी परवानगीची फी कोणत्याही परिस्थितीत प्रत्येकी २० रूपयांहुन अधिक असता कामा नये.

२. नियमावलीतील अनुसूची १ च्या अ.क्र.८६ मधील तरतुद

| अ.क्र. | मालाचे वर्णन | कमाल दर |
|---|---|---|
| ८६ | वरिल पैकी कोणत्त्याही बाबीत समाविष्ट | १.५० टक्के |

| | | |
|---|---|---|
| | नसलेला आणि अनुसूची २ मधुन विनिर्दिष्ट रित्या सवलत न मिळालेला माल | |



प्रस्तावित दुरूस्ती:-

१. नियम १७ चा पोट नियम (७) संपूर्णपणे वगळण्यांत यावा

२.

| अ.क्र. | मालाचे वर्णन | कमाल दर |
|---|---|---|
| ८६ | वरिल पैकी कोणत्त्याही बाबीत समाविष्ट नसलेला आणि अनुसूची २ मधुन विनिर्दिष्ट रित्या सवलत न मिळालेला माल | ४.०० टक्के |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ नुसार सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ९७ दिनांक:-२८.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव:- श्री. विनोद ठाकुर

उल्हासनगर महानगरपालिकेची ही महासभा उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातुन प्रवेश नाक्यावरून निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी नि पारगमन पास प्रदान करण्यासाठी रूपये २० प्रतिवाहन फीचे हे दर अत्त्यंत कमी असल्याने त्यात वाढ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमातील नियम क्रमांक १७ चा पोट नियम (७) संपुर्णपणे वगळणेस तसेच अनुसूची १ च्या अनुक्रमांक ८६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तुवर जकात दराच्या कमाल मर्यादा ४.०० टक्के बाबी तरतुद करण्यासाठी उक्त नियमात फेरफार किंवा सुधारणांस पुर्व प्रसिध्दीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

तसेच सदर अधिनियमाचे कलम ४५५ (१) नुसार स्थानीक वृत्तपत्रामध्ये नोटीस देवून लेखी आक्षेप मागविण्यासंबंधी कार्यवाही पुर्ण करण्यासाठी आणि प्राप्त झालेल्या आक्षेपावर योग्य शिफारशीसह पुढील महासभेसमोर अंतिम मंजुरीसाठी प्रस्तावित करावे असे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :-श्री. नाना पवार.
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रशांत जाधव.

**प्रस्ताव**

विषय :-दिनांक २०.१.२००३ च्या महासभेत आणलेल्या आयत्त्या वेळच्या विषयात उल्हासनगर कॅम्प ३ व ४ ला जोडणा-या रेल्वे उड्डाण पुलास लोकराजा छत्रपती राजश्री शाहु महाराज उड्डाण पुल असे नामकरण होणे बाबत उपसूचना.

उपरोक्त विषयान्वये उपसूचना मांडत आहोत की हे वर्ष लोकाराजा छत्रपती शाहु महाराज यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने औचित्य साधून ३१ मार्च पर्यंत आरक्षण भरण्यास सांगितले आहे.

छत्रपती शाहू महाराजांचे नाव उपरोक्त विषयान्वये पुलास दिल्यास उल्हासनगरचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. तरी ही संधी महानगरपालिकेने न दवडता सदर पुलास लोकराजा छत्रपती शाहु महाराज उड्डाण पूल हे नाव देवून महाराष्ट्रातील तसेच उल्हासनगरच्या जनतेचा सन्मान करावा म्हणुन उपसूचना सादर.

**महासभा ठराव क्र. ९४ अ** **दि. २८.१.२००३**

हि महासभा उल्हासनगर स्टेशन जवळील उड्डाण पुलास संगीत आचार्य मास्तर चंदर असे नाव देणे ऐवजी '' लोकराजा छत्रपती राजश्री शाहु महाराज'' असे नाव देणा-या प्रतिकुल प्रस्तावास स्विकृती देत नाही.

**बहुसंख्येने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

**प्रस्ताव**

दि. २०.१.२००३ ची सभा स्थगित करून दि. २८.१.२००३ रोजी बोलविण्यात आलेली आहे. हि सभा जर अजुन पुढे ढकलली तर प्रशासनास अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणेस विलंब होईल. म्हणुन या सभेचे कामकाज संध्याकाळी ७.०० च्या पुढे जाऊन कार्यसूचीवरील कामकाज संपेपर्यंत सभा कायम सुरू ठेवणेसाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.८४ क** **दि. २८.१.२००३**

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार दि. २८.१.२००३ ची सभा कार्यसूचीवरील कामकाज संपेपर्यंत चालु ठेवणेस मान्यता देत आहे.

**बहुसंख्येने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

**शोक प्रस्ताव :-**

उल्हासनगर महानगरपालिकेचे कर विभागातील एक कर्मचारी श्री. विनायक एस. बांगर यांचे दि. २४.७.२००३ रोजी अकस्मित निधन झाले.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ६ ब मधुन निवडून आलेले सन्माननिय सदस्य श्री. लाल बिहारी यादव यांचे वडील श्री. बुझारत (तुझारत) यादव यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ८४ ब **दिनांकः-२८.७.२००३.**

सुचकाचे नाव :- श्री. विश्वनाथ पाटील.
अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. विनायक एस. बांगर आणि श्री. बुझारत (तुझारत) यादव यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**एकमताने**

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

विषयः-उल्हासनगर शहरातील जैविक घनकचरा व्यवस्थापन / विल्हेवाट लावणे कामी अभिकरणाने कर्तव्य पार पाडणेस **मान्यता देणे बाबत.**

**प्रस्तावना :-**

रूग्णालये, पॅथोलॉजिकल लॅबोरेटरी, डेंटल क्लिनीक्स, सरकारी व महापालिका रूग्णालये, नर्सिंग होम्स मॅटर्निटी होम्स येथिल जैविक कचरा नष्ट करणेबाबत एजन्सी/ठेकेदार कायम करणे आवश्यक आहे. याबाबत Bio-Medical Waste (Management & Handling) Rules 1998/2000 शासनाने निर्गमित केलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे देखिल ही प्रक्रिया त्वरीत पुर्ण करणे आवश्यक आहे. उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील एकुण जैविक घनकचरा निर्माण करणा-या संस्था विचारात घेता एजन्सी केल्यास ती आर्थिकदृष्टया फायदेशिर ठरणार नाही. भिवंडी महापालिकेने कायम केलेले ठेकेदार / एजन्सीने त्या महापालिकेसाठी कायम केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे जैविक घनकचरा उल्हासनगर महापालिका क्षेत्रात जमा करून भिवंडी येथे वाहून नेऊन नष्ट करण्याचे काम घेण्यास त्यांनी संमती दाखविलेली आहे.

त्या आधारे उल्हासनगर क्षेत्रातील जैविक वैद्यकीय व्यवसायातील घनकचरा Incineration, autoclaving, microwaving,disinfecting, shredding,destruction,mutilation इत्त्यादी प्रकारे नष्ट करण्याची एजन्सी Mc Clelland Engineers Pvt.Ltd, 705/706, Vidhya Complex, Sector-11,CBD Belapur, Navi Mumbai 400614 यांना पुढील दर आकारून देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. रूग्णालये प्रतिखाट प्रतिदिन रू.५
२. डेंटल क्लिनीक्स, पॅथोलॉजिकल लॅब, डे केअर सेंटर रू. ५०० प्रति महिना
३. वैद्यकीय सेवा देणा-या व जैविक घनकचरा निर्माण करणा-या इतर संस्था रू.२०० प्रति महिना
४. महापालिका व शासकीय रूग्णालये प्रति खाट प्रतिदिन रू.२

तथापि शासकीय व महापालिका रूग्णालयांच्या बाबत प्रति खाट रॅयल्टी महापालिकेस देय राहणार नाही, तसेच सदरची कंपनी ही प्रत्येक पाच वर्षानंतर त्यांच्या दरांमध्ये २० टक्के वाढ करेल.

सदरची एजन्सी महापालिकेकडुन कोणताही वाहतुक खर्च घेणार नाही. तसेच उल्हासनगर महापालिका क्षेत्रात सदरच्या एजन्सीला जागा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तथापि सदरचा जैविक घनकचरा नष्ट करण्यासाठी प्रतिखाट रू. ०. २० रॅयल्टी मॅकक्लॅण्ड कंपनी कडुन घेण्याचा हक्क महापालिकेस राहील व सदरची रॅयल्टी मॅकक्लॅण्ड कंपनी उल्हासनगर महापालिकेस अदा करेल. तसेच इतर संस्थांच्या बाबत सदर कंपनी महापालिकेस ०. २० टक्के रॅयल्टी उल्हासनगर महापालिकेस अदा करेल. सदरचा करार २० वर्षाच्या कालावधीसाठी अस्तित्त्वात राहील. उपरोक्त दर व अटी नुसार सदर कंपनीशी करारपत्र करण्यास महापालिका आयुक्तांना प्राधिकृत करण्यासाठी महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.



<u>महासभा ठराव क्र.१९</u> <u>दिनांक:-२०.२.२००३.</u>

सुचकाचे नाव :-डॉ. (श्रीमती) नीना नाथानी
अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता अभिकरणाने जैविक घनकचरा व्यवस्थापन / विल्हेवाट लावणे कामी सभेतील चर्चेत उपस्थित केलेल्या सर्व बाबी व प्रश्न समुचीतपणे तपाशिलासाठी आयुक्तांकडे पाठविण्यांत येत आहेत त्यांनी त्यावर आपल्या शिफारसीसह अहवाल पुढील सभेत सादर करावा असे निर्देश देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील लिपिक पदावर कार्यरत असलेले श्री. दिपक पांडुरंग निरगुडे, लिपिक यांचे निलंबन कायम करणे बाबत.

प्रस्तावना :-

श्री. दिपक पांडूरंग निरगुडे, लिपीक या पदावर दिनांक १९.१२.१९९४ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत आहेत. सदर कर्मचारी भांडार विभागात कार्यरत असताना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिका-यांनी दि. २८.८.२००२ रोजी लाच स्विकारताना रंगेहात पकडल्यामुळे त्यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस ठाणे, उल्हासनगर-३ येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७/१३ (१)(ड) सह १३ (२)प्रमाणे गुन्हा रजिस्टर क्र. II ११७/२००२ दि. २८.८.२००२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे श्री. दिपक पांडूरंग निरगुडे, कनिष्ठ लिपिक महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ४ च्या पोट नियम (१) अन्वये महापालिका सेवेतुन कार्यालयीन आदेश क्र. २१५४ दिनांक २३.९.२००२ नुसार निलंबित करण्यात आलेले आहे.

सबब श्री. दिपक पांडुरंग निरगुडे, कनिष्ठ लिपिक (निलंबित) भांडार विभाग यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१) (ब) नुसार निलंबन कायम करणेसाठी प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. १०० दिनांकः-२०.२.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील लिपिक पदावर कार्यरत असलेले श्री. दिपक पांडुरंग निरगुडे यांचे विरूध्द आयुक्तांनी काढलेले निलंबन आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय :-सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रकास मंजुरीसाठी महापालिकेस शिफारस करणे बाबत आणि सन २००३-२००४ करिता अर्थसंकल्पिय अंदाज तयार करणे बाबत.

प्रस्तावना

सन २००२-२००३ या वर्षा करिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्त्पन्न रू. १५७,८९,३५,०००/- अपेक्षीत होते आणि रू. १५७,८४,०७,०००/- खर्च अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अनुदानाप्रमाणे उत्त्पन्न होत नाही आणि खर्चात कपात करणे

आवश्यक असून त्याअर्थी सदर वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आयुक्तांनी सन २००२-२००३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात सुधारणा येणे प्रमाणे प्रस्तुत केलेली आहे.

<u>आकडे लाखात</u>

उत्पन्न रू. ११९ १६/-
खर्च रू. ११८ ९२/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदी प्रमाणे आयुक्तांनी सन २००३-२००४ करिता उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असून ते येणे प्रमाणे आहे.

<u>आकडे लाखात</u>

उत्पन्न रू. १४८ ,४६/-
खर्च रू. १७१ ,९८/-

सरकारी वर्षे २००३-२००४ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रू. २३ . ५२ कोटी जकात मालमत्ता कर तसेच पाणी पट्टी कर व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा प्रस्ताव आयुक्तांनी स्थायी समितीपुढे सादर केला आहे. तसेच आयुक्तांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना त्या सोबत एक अहवाल जोडला आहे. या अहवालामध्ये लगत मागील वर्षी पूढील सेवा अर्थसहाय्य देवून पुरविण्यांत आल्याचे दर्शविण्यांत आले. सदर सेवा म्हणजे पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट, कचरा साफ करणे त्याची वाहतुक करणे व विल्हेवाट लावणे व रस्त्यावरील दिवाबत्तीची व्यवस्था.

आयुक्तांनी २००३-२००४ पाणीपट्टी वसुलीपोटी रू. २० कोटी अंदाज केलेली रक्कम योग्य वाटत नाही त्यामुळे ती रक्कम रू. ४० कोटी पर्यंत सुधारणा करून व इतर अंदाजात काही फेरफार करून अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे इष्ट राहील.

आयुक्तांचे सन २००२-२००३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे जमा खर्चाचे अंदाजपत्रक विचारात घेवून प्रशासनाकडुन आवश्यक ती तपशिलवार माहिती घेवून कोणतीही कर वाढ न करता तसेच उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील वाणिज्य वापर होत असलेल्या कोणत्त्याही जागांना महापालिका जलव्यवस्था केंन्द्रातुन नळजोडणीव्दारे पाणी पुरवठा होत



नसेल त्यास पाणी पट्टी न बसविता रू. ९ . ९७ लाख शिल्लकीचा अर्थसंकल्पीय अदांज तयार करणेस प्रस्तावित आहे.

उत्पन्न - रू. १६८ ,२१ ,९८०००/-
खर्च - रू. १६८ ,१२ ,०१ ,०००/-
शिल्लक- रू. ९ ,९७ ,०००/-

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १०७ <u>दिनांक:- ७.२.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. कमला शर्मा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावित केल्या प्रमाणे कोणतेही कर वाढ नसलेल्या सन २००३-२००४ च्या रू. ९ . ९७ लाख शिल्लकीचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार करीत आहे. आणि सन २००२-२००३ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजाचे अंतिम

स्विकृतीसाठी महापालिकेस अभिवेदन करित आहे. तसेच मुख्य लेखा अधिकारी याबाबतची छापील प्रत महासभेपुढे ठेवतील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

-परंतु-

१. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील वाणीज्य वापर होत असलेल्या कोणत्त्याही जागांना महापालिका जलव्यवस्था केंन्द्रातुन नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा होत नसेल त्यास पाणीपट्टी बसविण्यात येणार नाही.

२. या सरकारी वर्षात सुध्दा महापालिका जकात वसुली कामीचे कर्तव्य अभिकरणाने पार पाडील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र. दिनांक:-१०.२.२००३.

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील दि. ७.२.२००३ रोजीचे ठराव क्र. १०७ व्दारे केलेले आदेश कायम करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :- श्रीमती. भावना रामचंदानी
श्री. किशोर वनवारी
श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. दिपा पंजाबी.
श्रीमती. कमला शर्मा
श्री. विनोद तलरेजा

**शोक प्रस्ताव :-**

नासाच्या कोलंबिया अवकाश यानाला नुकत्त्याच झालेल्या अपघाताने जगभरातील अवकाशतज्ञांना आणि अवकाश मोहीमांना मोठा धक्का बसला आहे. आतापर्यंत २८ यशस्वी मोहीमा पार पाडणारे हे यान लॅंडिंगच्या केवळ पंधरा मिनिटे आधी ठिक-या ठिक-या होवून कोसळणे हा अपघात आहे की तांत्रिक चुक? किंवा या घटनेला नेमके जबाबदार कोण हे या घडीला सांगणे कठीण आहे. या अपघातात भारतात,हरीयाणातील कर्नाल या गावी जन्मलेल्या कल्पना चावला या अंतराळ विराणीचे निधन झाले. कल्पना चावला हीचे जगणे आणि तिचा अंतच सारे काही सांगुन जातो. आम्हाला तिचा अभिमान वाटतो. देशाचा लौकीक वाढविताना तिने मृत्युची किंमत मोजली आहे. तसेच रीड हजबंड, मायकल ॲंडरसन, डेव्हीड ब्राऊन, लॉरेन क्लर्क आणि इले रेहमान यासर्वांचा अंत झाला आहे. ते अवकाशात विलीन झाले आहे. अशा प्रतिक्रीया देश बांधवांनी व्यक्त केल्या.

या दुर्घटनेबददल शोक व्यक्त करण्यासाठी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज डब्लु, बुश यांना दुरध्वनी केला. तेव्हा बुश यांनी कल्पनाचे वर्णन ''एका महान देशाची धाडसी आणि धडाडीची वीरांगना'' या शब्दांत केले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ९८ अ** **दिनांकः-१०.२.२००३.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कल्पना चावला तसेच रीड हजबंड, मायकल ॲंडरसन, डेव्हीड ब्राऊन, लॉरेन क्लर्क आणि इले रेहमान यासर्वांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**एकमताने**

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
श्रीमती. भावना रामचंदानी
श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा
श्री. नारायण पंजाबी.
श्री. मनोज साधवानी

__शोक प्रस्ताव :-__

उल्हासनगर महानगरपालिकेतील एक ठेकेदार श्री. राजु सुखदेव किशिनचंदानी यांचे दि. १६.२.२००३ रोजी रस्ता अपघातात निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

__महासभा ठराव क्र.__ ९८ ब __दिनांक:-२०.२.२००३.__

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. राजु सुखदेव किशिनचंदानी व यांचे निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

__एकमताने__

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

__उल्हासनगर महानगरपालिका__

विषय :-सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रकास मंजुरीसाठी महापालिकेस शिफारस करणे बाबत आणि सन २००३-२००४ करिता अर्थसंकल्पिय अंदाज तयार करणे बाबत.

__प्रस्तावना__

स्थायी समितीने दि. ७.२.२००३ च्या ठराव क्र. १०७ प्रमाणे कोणतीही कर वाढ नसलेला सन २००३-२००४ चा रूपये ९.९७ लाख शिल्लकीचा अर्थसंकल्पीय अदांज व सन २००२-२००३ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाचे अंतिम स्विकृती बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित केलेला आहे त्यासोबत मुख्य लेखा अधिकारी यांनी विविध उत्पन्न व खर्चाच्या शिर्षाखाली अंदाजित केलेल्या रक्कमेबाबतची छापील प्रत महासभेपुढे ठेवली आहे.

सन २००२-२००३चे सुधारित अर्थसंकल्पिय अंदाज पुढील प्रमाणे आहे.
(आकडे लाखात)

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | :- | रू. ११९१६२६ |
| खर्च | :- | रू. ११८९२३२ |
| अखेरची शिल्लक | :- | रू. २३९४ |

वरील आकडे जसेच्या तसे स्विकृत करणे योग्य राहील.

सन २००३-२००४चा स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्पिय अंदाज पुढील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | :- | रू. १६८२१९८ |
| खर्च | :- | रू. १६८१२०१ |
| अखेरची शिल्लक | :- | रू. ९.९७ |

वरील अंदाज विचारात घेता काही बाबीसाठी पुढील प्रमाणे फेरफार करून स्विकृती देणे योग्य राहिल. ,

## अर्थसंकल्पिय अंदाज खर्चाच्या बाजुने
## रूपयांचे आकडे हजारात

| खर्चाची बाब | अंदाजाची रक्कम | पान क्र |
|---|---|---|
| कचरा वाहतुक खर्च | - ५००० | १८ |
| नविन कारंजे (फाऊंटन) बनविणे | + १००० | २७ |
| महापालिका इमारती बनविणे<br>१ महापालिका इमारती १०००<br>२ महापौर निवास १०००<br>३ आयुक्त निवास १००० | + ३००० | २७ |
| कार्पोरेटर फंडातुन विकास कार्य (नामनिर्देशित पालिका सदस्य) | + १००० | २७ |

--२--

या व्यतिरिक्त दिनांक १.१.९९ पुर्वीच्या अनाधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्यासाठी पुर्वी निर्धारित केलेल्या शुल्क, अनामत रक्कम व इतर आकार याशिवाय खालील प्रमाणे दंड आकारून सदर नळजोडण्या नियमित करणेसाठी प्रस्तावित आहे.

| नळ जोडणी आकार मिमि | घरगुती | बिगर घरगुती |
|---|---|---|
| १५ | रू. १००० | रू. ३००० |
| २० | रू. १८०० | रू. ५४०० |
| २५ | रू. ३००० | रू. ९००० |
| ४० | रू. ६००० | रू. १८००० |
| ५० | रू. १०००० | रू. ३०००० |

सन २००३-२००४ करिता अर्थसंकल्पीय अंदाजात यापुर्वी प्रमाणे महापौर निधी, उपमहापौर निधी व स्थायी समिती सभापती निधीचा अर्थसंकल्पिय अंदाजात जसाच्या तसा अंर्तभाव राहील, महापालिका सभागृहात वातानुकूलित यंत्रणा बसविण्याचे काम यावर्षी घेता येणार नाही. तसेच स्थायी समितीचे सभापतींनी आपल्या अर्थसंकल्पिय भाषणात उल्लेख केलेल्या १६ रस्त्यांच्या विकासा व्यतिरिक्त आणखी चार रस्ते प्राधान्याने सामावुन घेणे आवश्यक आहे.

१. राधास्वामी पासुन ते साईबाबा मंदीर नाका क्र. ८ पर्यंत
२. न्यु इंग्लिश स्कुल पासुन ब्लॉक ९२६ कुर्ला कॅम्प उल्हासनगर-५
३. रेल्वे उड्डाण पुल ते अंबरनाथ कानसई नाल्याच्या साईटच्या पी.डब्लु.डी. ब्रीज पर्यंत
४. प्रेम टेकडी ते पाण्याची टाकी उल्हासनगर-५

म्हणुन स्थायी समितीच्या ठरावाच्या धर्तीवर खर्चाच्या बाजुला वर सुचविल्याप्रमाणे काही फेरफार करून अनाधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या दंड आकारास संमती देवून सन २००३-२००४ चा अर्थसंकल्पीय अंदाज आणि २००२-२००३ च्या सुधारित अर्थसंकल्पास जसे च्या तसे स्विकृती देणेस प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १०१** **दिनांकः-२०.२.२००३.**

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील स्थायी समितीने दि. ७.२.२००३च्या ठराव क्र. १०७ च्या धर्तीवर कोणतेही करवाढ न करता वरील प्रस्तावित केलेल्या फेरफारासह सन २००३-२००४चा रू. ९. ९७ लाख शिल्लकीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास आणि सन २००२-२००३च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देत आहे आणि

मुख्य लेखा अधिकारी याबाबतची छापील प्रत प्रसिध्द करील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

-परंतु ——

१. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील वाणीज्य वापर होत असलेल्या कोणत्त्याही जागांना महापालिका जलव्यवस्था केंन्द्रातुन नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा होत नसेल त्यास पाणीपट्टी बसविण्यात येणार नाही.



२. या सरकारी वर्षात सुध्दा महापालिका जकात वसुली कामीचे कर्तव्य अभिकरणाने पार पाडील.

३. सन २००३-२००४च्या सरकारी वर्षात दिनांक १.१.९९ पुर्वीच्या अनाधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी यापुर्वी निर्धारीत केलेल्या शुल्क अनामत रक्कम व इतर आकाराशिवाय खालील प्रमाणे दंड आकार लावता येईल.

| नळ जोडणी आकार मि.मि | घरगुती | बिगर घरगुती |
|---|---|---|
| १५ | रू. १००० | रू. ३००० |
| २० | रू. १८०० | रू. ५४०० |
| २५ | रू. ३००० | रू. ९००० |
| ४० | रू. ६००० | रू. १८००० |
| ५० | रू. १०००० | रू. ३०००० |

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर रेल्वेस्टेशन जवळील रेल्वे उड्डाण पुलास मास्तर चंदर यांचे बरोबरीने सदरहु उड्डाण पुलास '' छत्रपती राजश्री शाहु महाराज'' उड्डाण पुल असे नाव संयुक्तरीत्त्या देणे कामी पुर्वीच्या ठराव क्र. ९५ दि. २८.१.२००३ मध्ये फेरबदल करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर रेल्वेस्टेशन जवळील रेल्वे उड्डाण पुलास मास्तर चंदर यांचे बरोबरीने सदरहु उड्डाण पुलास '' छत्रपती राजश्री शाहु महाराज'' उड्डाण पुल असे नाव संयुक्तरीत्त्या देणे कामी पुर्वीच्या ठराव क्र. ९५ दि. २८.१.२००३ मध्ये फेरबदल करणेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १०१ (अ)    दिनांकः-१२.३.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रस्तावा संबंधीचा विषय आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यास संमती देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय :-</u> दि. १ एप्रिल २००३ पासून निवृत्त होणा-या स्थायी समितीचे ८ सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणुक करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००२ नंतर महापालिकेच्या दि. ५.४.२००२ रोजीच्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तींची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणुन नेमणुक केली होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समितीमध्ये निवडुन आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य निवृत्त होतील हे स्थायी समितीने दि. ७.३.२००३ च्या सभेत ठराव क्र. ११५ अन्वये ठरविले त्याअर्थी त्या ८ पदाच्या रिक्त जागा भरणेकामी दि. १९.३.२००३ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असुन निवडणुक कार्यक्रमांच्या तरतुदीप्रमाणे दि. ११.३. २००३ रोजी ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले आणि ज्यांची नामनिर्देशनपत्र दि. १२.३.२००३ रोजी वैद्यरित्त्या घोषीत करण्यांत आली त्याची नावे येणे प्रमाणे.

१. श्री. उमाप रामदास राघोजी
२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)
३. श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
४. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
५. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
७. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
८. श्रीमती. बामनकर नंदीनी गजानन
९. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
१० श्रीमती. भठिजा कोमल अमृत
११ श्री. रूपानी चिमन अमरूमल

वरील उमेदवरांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपली उमेदवारी माघे घेतली.

१. श्रीमती. भठीजा कोमल अमृत
२. श्री. प्रमोद टाले
३. श्री. चिमन रूपानी

वरील उमेदवारांनी आपली उमेदवारी माघे घेतल्या अंती भरावयाच्या जागांच्या संख्ये इतके उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले त्यामुळे नामनिर्देशित ८ उमेदवार येथोचितरित्त्या बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करावे असे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र.                                        दि. १९.३.२००३.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील ८ (आठ) उमेदवारांची स्थायी समिती सदस्य म्हणुन बिनविरोध नेमणुक करित आहे.

१. श्री. उमाप रामदास राघोजी
२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)
३. श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
४. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
६. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
७. श्रीमती. बामनकर नंदीनी गजानन
८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास

सर्वानुमते

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- श्री. रविंद्र वसंतराव गुरव, सहाय्यक आयुक्त यांच्या महापालिका सेवेतील प्रतिनियुक्ती वरील नेमणूकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक : उमपा/२२९८/२०३०/प्र.क्र.२५९/९८/नवि २३/दिनांक १३.६.२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर एकुण सहा. आयुक्त/प्रभाग क्षेत्र अधिकारी पदनामाची पदे मंजूर झालेली आहेत त्यापैकी एका पदावर महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई कार्यालयीन आदेश क्रमांक १२४८/प्रतिनि/१००२/प्र.क्र. ३७०/प्रशासन-२/दिनांक१२.१२.२००२ अन्वये श्री. रविंद्र वसंतराव गुरव यांची या महापालिकेत सहा. आयुक्त या पदावर शासनाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे.

त्यानुसार श्री. रविंद्र गुरव हे या महापालिकेत सहा. आयुक्त/ प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. २ या पदावर दिनांक १३.१२.२००२ रोजी मध्यान्होपुर्व रूजु झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार श्री. रविंद्र वसंतराव गुरव यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस महापालिकेची मान्यता मिळणेकामी सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र.   १                                        दिनांकः-२५.४.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. रविंद्र वसंतराव गुरव यांच्या महापालिका सेवेतील सहाय्यक आयुक्त पदी १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रस्तावित सेवा भरती नियमांमध्ये संगणक हाताळणी वापरा बाबतचे शासनाने विनिर्दिष्ट केलेले ज्ञान / अर्हता असणे कामीचे तरतुदी बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/१२ दिनांक २५.१.१९९९ आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र. ५/२००१/३९ दिनांक २० जुलै, २००२ अन्वये राज्य शासनाच्या विविध सेवामधील गट 'अ' 'ब' व ''क'' संवर्गातील पदावरील नियुक्तीसाठी एक अर्हता म्हणुन संगणक हाताळणी वापराबाबतचे ज्ञान अत्यावश्यक ठरविण्यात आले आहे. सेवाप्रवेश नियम विहीत करताना संगणक ज्ञानासंबंधीच्या अटीची तरतुद करण्यात यावी असे शासनाने आदेश दिले आहेत. सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने नियुक्तीसाठी संगणक, अर्हता संबंधीच्या किमान अर्हता खालीलप्रमाणे विहीत केलेल्या आहेत.

१. डी.ओ. ई.ए.सी सोसायटीज यांचे ''सी.सी.सी'' किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाच्या ''ओ'' लेव्हल किंवा ''ए'' लेव्हल किंवा ''ब'' लेव्हल किंवा ''सी'' लेव्हल किंवा एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.इ.सी. टी. प्रमाणपत्र कोर्स.

उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर विविध पदांसाठी नव्याने प्रस्तावित सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली आहे व ती शासनाकडे मंजुरीकरीता पाठवलेली आहे. त्यामध्ये '' सेवाप्रवेश नियमावलीतील गट ''अ'',''ब'' व ''क'' संवर्गातील (वाहन चालक हे पद वगळुन) विविध पदांच्या सेवाभरती नियमांमध्ये संगणक हाताळणी वापराबाबतचे ज्ञान/ अर्हता (डी.आ.ई.ए.सी सोसायटीज यांचे ''सी.सी.सी'' किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचा ''ओ'' लेव्हल किंवा ''ए'' लेव्हल किंवा ''बी'' लेव्हल किंवा ''सी'' लेव्हल किंवा एम.एस.सी.आय.टी किंवा जी.इ.सी.टी प्रमाणपत्र कोर्स) असणे आवश्यक राहील'' अशी अतिरिक्त अर्हता असणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित अर्हता महासभेच्या मान्यतेनंतर शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल. सबब सदर प्रस्तावित अर्हता मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

महासभा ठराव क्र. २ दिनांकः-२५.४.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचा-यासाठी सेवा भरती नियमांमध्ये संगणक हाताळणी वापराबाबतचे शासनाने विर्निर्दिष्ट केलेले प्रस्तावित विहित ज्ञान / अर्हतेचा अंतर्भाव करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका
<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची परीवहन सेवा सुरू करणे कामी "ना हरकत प्रमाणपत्र" देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

मा. आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण परिवहन उपक्रम यांनी त्यांचेकडील दिनांक १५.२.२००३ च्या पत्रान्वये कळविले आहे की, कल्याण डोंबिवली महानगरपालिका परीवहन सेवेस उल्हासनगर महानगरपालिका हददीत प्रवासी जनतेची मागणी विचारात घेवून बस सेवा सुरू करावयाची आहे. शहरी विभागातील वाहतुकीचा, पार्कीगचा व प्रदुषणाचा प्रश्न नियंत्रित करण्यासाठी सार्वजनिक वाहतुक व्यवस्था विकसीत करणे अत्यंत आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रालगत असल्यामुळे महानगरपालिकेस परिवहन सेवा उपलब्ध करणे शक्य आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरू करणेसाठी या महापालिकेचे " ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

वरील वस्तुस्थितीचा विचार करून धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सदरचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवून मान्यता घेणेकामी प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. ३</u> <u>दिनांकः-२५.४.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सीमा मोकल

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कल्याण -डोंबिवली महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरु करणे कामी 'ना हरकत प्रमाणपत्र' देणेस मान्यता देत आहे.

परंतु —

१. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील परीवहन सेवेमध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला जर काही नुकसान / तोटा झाला तर उल्हासनगर महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.
२. भविष्यात उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतःची परिवहन सेवा सुरू केली तर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील आपली परिवहन सेवा त्वरीत बंद करावी लागेल व ते त्यांच्यावर बंधनकारक राहील.
३. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील परिवहन सेवेमुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस जर फायदा झाला तर त्याबाबतचा काही भाग किंवा रॅयल्टी घेणे तसेच इतर अटी व शर्ती लादणेस आयुक्त सक्षम असतील.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयामध्ये संगणकीकरण करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासन गतीमान व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने व प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचे धोरण आग्रही आहे. शासनाने कल्याण- डोंबिवली व नवि मुंबई महानगरपालिका यांनी विकसीत केलेल्या अज्ञावलीची अंमलबजावणी अन्य महापालिके मध्ये कार्यान्वित करण्याचे योजले आहे. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार कल्याण - डोंबिवली व नवि मुंबई महानगरपालिकेने विकसित केलेले स्वतंत्र अज्ञावली तंत्रज्ञान व नागपुर व उल्हासनगर महानगरपालिका मध्ये प्रायोगिक तत्त्वावर लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे संदर्भीय शासन निर्णयाची उल्हासनगर महानगरपालिकेत अंमलबजावणी करणे साठी महापालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे सदर आज्ञावली कार्यान्वित करण्यासाठी संगणक कक्ष उभारणे, संगणक कक्षामध्ये मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, संगणक कक्षासाठी आवश्यक संरचनेची उपलब्धता करून घेणे, संगणकीकरणासाठी आवश्यक सामुग्री खरेदी करणे इत्त्यादी बाबी ची पुर्तता करणे आवश्यक आहे.

महापालिका कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी सन २००२-२००३ च्या सुधारीत अंदाजपत्रकात व सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकात संगणक खरेदी या लेखाशिर्षा खाली अनुक्रमे रूपये ०२ लाख व ११ लाख तरतुद करण्यात आलेली आहे. या लेखा शिर्षा खाली खर्च करण्यात येईल.

सबब सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी धोरणात्त्मक निर्णय घेणे व सदर आज्ञावली कार्यान्वित करणेसाठी आवश्यक असणा-या संरचनेची उपलब्धता करून घेणेसाठी मंजुरी मिळावी.

<u>महासभा ठराव क्र. ४</u> <u>दिनांकः-२५.४.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. मोहन बेहरानी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयामध्ये संगणकीकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- श्री. शंकर मालवणकर हया निलंबित कर्मचा-यास सेवेत परत घेणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. शंकर मालवणकर लिपिक (निलंबित) हे या महापालिकेच्या अ. बा. विभागात कॅम्प नंबर ३ साठी क्षेत्रीय निरिक्षक म्हणुन दिनांक २४ मे. २००० पासून कार्यरत होते. सदर विभागात कार्यरत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी दिनांक ३.७.२००१ रोजी सापळा रचून श्री. शंकर मालवणकर यांना लाच घेता रंगेहात पकडले होते. त्यानुसार लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने श्री. मालवणकर यांचे विरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला आहे. संबंधीत विभागाकडुन प्राप्त झालेल्या अहवालानुसार श्री. शंकर मालवणकर यांना या कार्यालयाच्या दिनांक ६ जुलै २००१ च्या आदेशान्वये निलंबीत केले आहे. महासभा ठराव क्रमांक १७ दिनांक १२.१२.२००१ नुसार सदरचे निलंबन कायम करण्यांत आले आहे. तत्पुर्वी निलंबन काळात श्री. शंकर मालवणकर यांना कार्यालयीन दिनांक ६ जुलै २००१ अन्वये निर्वाह वेतन मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम देय केलेली आहे.

म. ना. से (पदग्रहरण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निंलंबन बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे प्रकरण ५ मधील नियम ६८ चा (१)(अ)(१) अन्वये देय असलेल्या निर्वाह वेतनात ५० टक्के दिनांक ७.१.२००२ पासून वाढ करण्यात आलेली आहे. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांचेकडील दिनांक १९.१.२००२ च्या पत्रान्वये श्री. शंकर मालवणकर यांच्या विरूध्द अभियोग दाखल करणे कामी महासभेस मंजुरी मिळणेसाठी कळविले होते त्यानुसार महासभा ठराव क्रमांक ७ दिनांक २४.५.२००२ अन्वये श्री. शंकर मालवणकर यांचेविरूध्द अभियोग दाखल करणेस मंजुरी दिलेली आहे.

सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत श्री. शंकर मालवणकर यांनी या कार्यालयाकडे तसेच शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून विनंती केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणाबाबत श्री. मालवणकर यांना सेवेत पुर्नस्थापित करावे किंवा कसे याबाबत शासनास इकडील दिनांक २५ जून २००२ च्या पत्रान्वये कळवून मार्गदर्शन मिळणेकामी विनंती केली होती. त्यानुसार शासनाने त्यांचेकडील दि. १२ मार्च २००३ पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी श्री. शंकर मालवणकर यांना महापालिका सेवेत पुर्नस्थापित करणेबाबतच्या कार्यवाहीस महापालिका सक्षम असल्याने सामान्य प्रशासन विभागाने या संबंधातील निर्गमीत केलेले आदेश विचारात घेवून आपल्या स्तरावर नियमानुसार कार्यवाही करावी असे कळवले आहे.

शासनाने निर्गमीत केलेला आदेश सामान्य प्रशासन क्रमांक सीडीआर १३९६ /प्र. क्र. २२ /११-अ/ मंत्रालय मुंबई दिनांक १४ जुन १९९६ मधील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये निलंबनाचा कालावधी अतिशय दीर्घ असेल तर दि. १४ डिसेंबर, १९९५ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या शासनाचा धोरणाचा विचार करून अत्त्यंत अपवादात्त्मक परिस्थितीतच शिस्तभंग प्राधिका-याने निलंबनाचा आढावा घेवून त्याबददलची परिस्थिती नमुद करून प्रशासकीय विभागाच्या मान्यतेने उचित निर्णय घ्यावा असे नमुद केलेले आहे.

शासनाने दि. १४ डिसेंबर, १९९५ च्या निर्णयाव्दारे असे निर्देश दिले आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रचलेल्या सापळयामध्ये शासकीय सेवक जेव्हा मुददे मालासह प्रत्यक्ष लाच घेताना सापडतो व त्यामुळे त्याला निलंबित केले जाते.

अशा प्रकरणामध्ये न्यायालयातील फौजदारी प्रकरण पूर्ण होवून अंतिम निर्णय लागेपर्यंत त्यास सर्वसाधारणपणे निलंबित ठेवण्यात यावे. अशा निलंबनाधीन शासकीय सेवकास अंतिम निर्णयाआधिच शासन सेवेत पुर्नस्थापित केल्यास कार्यालयीन शिस्तीचा भंग होईल व शासनाच्या भ्रष्टाचाराची पाळेमुळे खणुन काढण्याच्या धोरणास धक्का पोहोचेल याची जाणीव प्रत्यक शिस्तभंग विषयक प्राधिका-यानं ठेवणे आवश्यक आहे. तसेच श्री. मालवणकर यांचा निलंबन कालावधी १ वर्ष ९ महिने इतका असल्याने सदर कालावधी अतिशय दिर्घ आहे असे म्हणता येत नाही त्याचप्रमाणे त्यांचे निलंबनाचा आढावा घेण्यासारखी अपवादात्मक परिस्थिती उपस्थित होत नाही त्यामुळे श्री. शंकर मालवणकर यांना मा. न्यायालयाच्या अंतिम निर्णयापुर्वी सेवेत परत घेणे हे शासनाच्या पारदर्शीपणाच्या धोरणाशी सुसंगत होणार नाही.

तथापि म. ना. से (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (५)(क)मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी या नात्त्याने महासभा समक्ष आहे. सबब प्रकरणात निर्णय घेणे कामी सदरचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५ दिनांकः-२५ ४ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. शांताराम ओंकार निकम.

अनुमोदकाचे नाव :-श्री. सुरेश मधुकर जाधव

ही महासभा श्री. शंकर मालवणकर, लिपिक, लाच-लुचपत प्रतिबंधक अधिनियमार्तंगत दोषरोपित, २१ महिन्यापासून निलंबनाधीन असून, सदरचा कालावधी दिर्घ असल्याने, महाराष्ट्र शासन आदेश क्र. सीडीआर १३९६/प्र.क्र. २२/११-अ, दि. १४ जून १९९६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (५) (क) तरतुदीच्या अनुषंगाने, श्री. शंकर मालवणकर यांना न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून सेवेत पुर्नस्थापित करणे करीता मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- शहाड येथील एम.आय.डी.सी पंपीग स्टेशन जवळ
उल्हासनदीस मिळणा-या नाल्याचा प्रवाह
वळविण्याचे कृती आराखडयास व योजनेस
स्विकृती देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरामधून वाहणारा नाला शहाड येथील एम.आय.डी.सी. पंपीग स्टेशन जवळ उल्हास नदीस मिळत असल्याने नदीच पाणी प्रदुषित होत आहे. नाल्याच्या पाण्याचा प्रवाह अडवून तो वळविण्याचे काम महापालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण ठेव तत्त्वावर दिलेले आहे. यास्तव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सदरहु कामाचे सर्वेक्षण करून अंदाजे रू. ४ कोटीचा प्रकल्प तयार केलेला आहे.

मा. सचिव (पा. पु) यांचे दालनात दिनांक १८.६.२००२ रोजी झालेल्या बैठकीत ही योजना महानगरपालिका संपुर्णतः स्वखर्चाने पालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता हाती घेवू शकत नाही असे सांगण्यात आले.

त्यामुळे बैठकित असे सुचविण्यात आले की, ज्या यंत्रणा वा जे कारखाने उल्हास नदीतुन शहाड येथुन उचलतात त्या संस्थानी प्रस्तावित रूपये. ४ कोटी खर्चाच्या योजनेची वाटणी उचलावी व या कामासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळाने पुढाकार घेवून सर्व संबंधितांची बैठक घेवून खर्चाची वाटणी करण्यासाठी, मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. ठाणे यांनी प्रदुषण मंडळास विनंती केली होती. तथापि प्रदुषण मंडळाने निधी उभा करणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे व ती त्यांनी पार पाडावी अशी भुमिका घेतली आहे.

सद्यस्थिती मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक अडचण लक्षात घेता रू. ४ कोटीचा संपुर्ण खर्च या प्रस्तावासाठी करणे शक्य दिसत नाही.

त्यामुळे केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी कृति आराखडा कार्यक्रमांतर्गत शासनाचे अनुदान प्राप्त करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, ठाणे यांनी त्यांचे पत्र. जा. क्र. म.जी.प्र.बां.वि/ ठाणे/ताशां-१/५७१/०३ दिनांक २०.२. २००३ च्या अनुषंगाने केंद्र शासनाकडुन राष्ट्रीय नदी कृति आराखडा अंतर्गत निधी मंजुर होण्याकरिता प्रस्ताव तयार केला असुन हा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याकरिता खालील बाबींची पुर्तता करण्यात सांगितले आहे.

१. योजना स्विकृत ठराव
२. सदरहू प्रकल्पास केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे ५० टक्के फक्त अनुदान मिळेल. उर्वरित ५०टक्के म्हणजे २ कोटी रूपये महानगरपालिकेने चालू आर्थिक वर्षाच्या कृति आराखडयात निधीची तरतुद करणे आवश्यक ठरते.
३. सदर प्रस्तावा सोबत महानगरपालिकेच्या मागील ५ वर्षाच्या जमाखर्चाचे विवरणपत्र देणे आवश्यक आहे.

सदरहु प्रकल्पास आवश्यक असणारी भुमिसंपादन करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेशी महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरू आहे.

यास्तव प्रकल्पास आवश्यक असणा-या २ कोटी रूपयांच्या निधी बाबत चालु आर्थिक वर्षाच्या कृति आराखड्यात समाविष्ट करणे व उक्त योजना स्विकृतीचा ठराव मंजुर होणेबाबत महासभेत पटलावर ठेवण्यात यावा ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र. ६</u> <u>दिनांक:-२५.४.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सीमा मोकल.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शहाड येथिल एम.आय.डी.सी. पंपींग स्टेशनजवळ उल्हास नदित मिळणा-या नाल्याचाप्रवाह वळविण्याचे वर नमुद केलेल्या कृती आराखड्यास व योजनेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषय:- श्री. गोपाल जेसवानी, भांडार अधिकारी यांचे महापालिका सेवेतुन स्वेच्छा निवृत्ती माहितीचे अवलोकना बाबत.

प्रस्तावना :-

श्री. गोपाल जेसवानी, भांडार अधिकारी यांनी दिनांक १५.२.२००३ रोजी स्वेच्छा निवृत्ती साठी नोटीस सादर केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम १९८२ चे नियम ६५ अन्वये अर्जदार यांची महापालिकेतील सेवा ३७ वर्ष ६ महिने १२ दिवस अशी निवृत्त वेतन पात्र सेवा झालेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६५ पोट नियम (१) अन्वये अर्जदार यांना तीन महिन्याची नोटीस देवून सेवानिवृत्ती होता येते.

अर्जदार हे तत्त्कालीन नगरपालिकेमध्ये दिनांक ३.९.१९६५ रोजी मुकादम पदावर होते व दिनांक १.१०.६९ पासुन नाका लिपिक व दिनांक १७.१२.१९७३ पासून लिपिक पदावर कार्यरत असतांना कार्यालयीन आदेश क्रमांक. यु. एमसी/जीईएन/इएसटी/१४६१ दिनांक २०.३.१९७४ अन्वये सेवेत कायम करणेत आलेले आहे. तसेच आदेश क्रमांक यु.एम.सी /इएसटी /१४१ दिनांक ९.१.१९८० अन्वये लिपिक पदावरून वरिष्ठ लिपिक जनगणना या पदावर पदोन्नती देणेत आलेली आहे तसेच कार्यालयीन आदेश क्र. उमपा /सापव/ <u>आस्था/१६२</u> दिनांक २३.९.१९८८ लिपिक पदावरून कर निरिक्षक या पदावर पदोन्नती देणे आलेली आहे. पुढे नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झालेवर कर निरिक्षक पदावरून कार्यालयीन

आदेश क्रमांक उमपा/सापृवि/ आस्था/ ९४ दिनांक १८.१२.१९९६ अन्वये भांडार अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेत आली आहे.

सबब अर्जदार यांची महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम १९८२ चे नियम ६५ अन्वये स्वेच्छा निवृत्ती पात्र सेवा झालेमुळे मा. प्रभारी आयुक्त यांनी स्वेच्छा निवृत्तीस मान्यता दिलेली आहे. माननीय महासभेच्या अवलोकनार्थ सादर.

महासभा ठराव क्र. ७ दिनांक:-२५.४.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. भारती छाब्रिया

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. गोपाल जेसवानी, भांडार अधिकारी यांची महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती बाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय :- स्थायी समितीचा दि. ३१.३.२००३ रोजीचा ठराव क्र. १२९ कायम करणे बाबत.

आयत्यावेळचा विषय:-

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २९(अ) मधील तरतुदी नुसार उल्हासनगर महानगरपालिका महासभेने, महासभा ठराव क्रमांक ३ दिनांक २१/४/२००१ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेकरीता एकुण ४ प्रभाग समित्यांची स्थापना करणेस मान्यता दिलेली होती.

तदनंतर प्रभाग समिती क्रमांक ३ ची दिनांक १३.८.२००१ रोजी सभा होवून त्यामध्ये प्रभाग समिती क्रमांक ३ ठराव क्रमांक १ दिनांक १३.८.२००१ अन्वये श्री. प्रमोद टाले यांची सभापती म्हणून निवड झालेली होती.

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४. १९९७ अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांचे कार्यकालावधी मध्ये चार चाक वाहन देण्याऐवजी प्रति माह रू. १५०००/- वाहन भत्ता देणे बाबत मान्यता दिलेली आहे.

महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १२.१२.२००१ अन्वये प्रभाग समिती सभापती यांना प्रतिमाह रू. १५०००/- वाहन भत्ता स्थायी समिती ठराव क्रमांक ६

दिनांक ३०.४.१९९७ मधील मंजूर अटी व शर्ती नुसार अदा करणेस मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ मधील अटी व शर्तीनुसार संबंधितांकडे स्वतःचे वाहन असेल तर वाहन भत्ता देय आहे. तसेच आजमितीस संबंधितांकडे वाहन नसेल तर असे वाहन ज्या दिवशी खरेदी केले जाईल त्या दिवसापासून वाहन भत्ता मिळणेस संबंधित पात्र राहतील.

उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. प्रमोद टाले यांचे वापरात असलेले वाहन क्रमांक एम एच १४ एच ६६४७ हे वाहन दिनांक ३ जानेवारी, २००१ रोजी त्यांचे नावांवर झाल्याची नोंद आहे.

श्री. प्रमोद टाले यांचे पत्रानुसार वाहन नावावर नसलेने वाहन भत्ता न मिळणे अन्यायकारक आहे व त्यामुळे सदर ठरावातील अटीतील तांत्रिक चुकीमुळे वाहन भत्ता अदा न करणे अन्यायकारक आहे. त्यामुळे स्थायी समिती ठरावा मधील चुकीची दुरूस्ती करून भत्ता अदा करणेत यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

श्री. टाले यांनी मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ मध्ये फेरबदल करून त्यांचे सभापती पदावरील कालावधीचा वाहन भत्ता मागणी केलेला आहे. सबब मा. स्थायी समितीच्या पटलावर श्री. प्रमोद टाले यांचे मागणीसंबधी उचित निर्णय घेण्यासाठी विषय प्रस्तावित आहे.

--२--

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२९ <u>दिनांकः- ३१.३.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०.४.१९९७ च्या धर्तीवर अटी व शर्ती मध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्री. प्रमोद टाले यांना विशेष बाब म्हणुन त्यांच्या कार्यकालात प्रभाग समिती सभापती पद धारण केलेल्या कालावधीचा वाहन भत्ता अदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन अंतिम असेल.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र. ८</u> <u>दिनांकः-२५.४.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. रामदास उमाप

ही महासभा स्थायी समितीच्या दिनांक ३१.३.२००३ रोजीच्या ठराव क्र. ११९ मधील अंतर्भुत निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषय:- उल्हासनगर मधील खेमाणी येथील यात्री निवास व बगिच्याचे ''प्रेमचंद पेसुमल यात्री निवास व उद्यान'' असे नामकरण करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-२ मधील खेमानी येथील यात्री निवास व त्यासमोरील बगीच्याला ''प्रेमचंद पेसूमल यात्री निवास व उद्यान'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त यात्री निवास व बगीच्याचे कोणतेही नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त बगीच्याला व उद्यानाला कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे खेमाणी येथील सदर यात्री निवास व त्यासमोरील बगीच्याला ''प्रेमचंद पेसूमल यात्री निवास व उद्यान'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र. ९</u> <u>दिनांक:-२५.४.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-२ मधील खेमानी येथिल यात्री निवास व बगीच्याचे 'प्रेमचंद पेसूमल यात्रीनिवास व उद्यान'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>**

विषयः- उल्हासनगर- ५ येथील मानीक गंगवानी यांचे फॅक्टरी ते बॅरेक १८५५ आणि १८५६ पर्यंतचे रस्त्याचे ''स्वर्गीय श्री. बन्सीलाल सचदेव मार्ग'' असे नामकरण करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-५ येथील मानिक गंगवानी यांचे फॅक्टरी ते बॅ. नं. १८५५ आणि १८५६ पर्यंत रस्त्याला ''स्वर्गीय श्री. बन्सीलाल सचदेव मार्ग'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला ''स्वर्गीय श्री. बन्सीलाल सचदेव मार्ग'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र. १०</u> <u>दिनांकः-२५.४.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :-श्री. जेसवानी सतरामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर- ५ येथील मानीक गंगवानी यांचे फॅक्टरी ते बॅरेक १८५५ आणि १८५६ पर्यंतचे रस्त्याचे ''स्वर्गीय श्री. बन्सीलाल सचदेव मार्ग'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर -५ येथील विनोद अपार्टमेंट ते रूपचंदानी यांचे घरा पर्यंतचे रस्त्याचे ''स्वर्गीय श्री. घनश्यामदास संतराम पमनानी मार्ग'' असे नामकरण करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील विनोद अपार्टमेंट ते रूपचंदानी यांचे घरापर्यंत रस्त्याला ''स्वर्गीय श्री. घनश्यामदास संतदास पमनानी मार्ग'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला ''स्वर्गीय श्री. घनश्यामदास संतदास पमनानी मार्ग'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ११ दिनांकः-२५.४.२००३.

सुचकाचे नाव :-श्रीमती. भावना खिलनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -५ येथील विनोद अपार्टमेंट ते रूपचंदानी यांचे घरा पर्यंतचे रस्त्याचे ''स्वर्गीय श्री. घनश्यामदास संतराम पमनानी मार्ग'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर -५ येथील ग्वालानंद दरबार ते स्वामी शांतीप्रकाश गार्डन (प्रभात गार्डन) पर्यंतच्या रस्त्याचे ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी मार्ग'' असे नामकरण करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील ग्वालानंद दरबार ते स्वामी शांतीप्रकाश गार्डन (प्रभात गार्डन) पर्यंतच्या रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी मार्ग''असे नामकरण करणे करिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी मार्ग'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. दिनांकः-

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -५ येथील ग्वालानंद दरबार ते स्वामी शांतीप्रकाश गार्डन (प्रभात गार्डन) पर्यंतच्या रस्त्याचे ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी मार्ग'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

*विषय:-* उल्हासनगर -५ येथील भाटीया रोड वरील स्वामी
नारायण पॅलेस जवळील चौकाचे ''स्वर्गीय श्रीमती.
कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी चौक'' असे नामकरण
करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-३ येथील भाटीया रोड वरील स्वामी नारायण पॅलेस जवळील चौकास ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी चौक'' असे नामकरण करणे करिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाच्या जागेवर कोणताही चौकाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकाचे ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी चौक'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र. १२</u> <u>दिनांक:-२५.४.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. मोहन साधवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. सतरामदास जेस्वानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -५ येथील भाटीया रोड वरील स्वामी नारायण पॅलेस जवळील चौकाचे ''स्वर्गीय श्रीमती. कर्मीबाई मंगोमल मिरचंदानी चौक'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय :- दिनांक २८.४.२००३ स्थायी समिती ठराव क्र. ३ कायम करणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयानव्ये सादर करण्यात येत आहे की महानगरपालिकेच्या महासभेने महापालिका ठराव कमांक - ९ दिनांक २०/६/९७ अनव्ये स्वामी शांतीप्रकाश महाराज यांचा पुतळा भाटीया हॉस्पीटल जवळ बसविण्याचे ठराव पारित केला.

प्रशासनाने स्वामी शांतीप्रकाश महाराज ट्स्ट कडून हमी पत्र घेवुन जिल्हाधिकारी ठाणे यांस ट्स्टद्वारे स्वामी शांतीप्रकाश यांच्या पुतळा बसविणेस ना हारकत दाखला दिला. ट्स्टनी दिलेल्या हमीपत्रातील काही ठळकबाबी खालील प्रमाणे आहेत.

1) That we shall install the aforesaid Statue ie. (i) "SWAMI SHANTI PRAKASH MAHARAJ" at Bhatia Road & (ii) "SWAMI TEORAM MAHARAJ" at Dudh Naka, Ulhasnagar-5, from the funds of our trust.
2) That forever we (Trustees of Swami Shanti Prakash Ashram Trust), shall supervise & maintain the same at our own risk and cost. The Corporation will not be responsible for the same.
3) That we (Trustees of Swami Shanti Prakash Ashram Trust), hereby declare that the proposed land (To be granted for the aforesaid Statue) is not falling in any Reservation or the same is not affected by the Road, etc. We hereby Declare and Undertake, that in future the aforesaid land (To be granted for the aforesaid Statue) will require by Ulhasnagar Municipal Corporation, then we shall remove the aforesaid Statue to another place as deemed fit by the Ulhasnagar Municipal Corporation & other concerned authority. We hereby further undertake, that we shall remove and install the aforesaid Statue at our own risk and cost, without making any argument or correspondence, if the land (To be granted for the aforesaid Statue) required by the Ulhasnagar Municipal Corporation.

शासनाने सदर पुतळा बसविण्याची मंजुरी ट्स्टला दिली. तदनंतर महानगरपालिकेने शासनाच्या मंजुरीनुसार पुतळा बसविण्याची मान्यता दिली.

काही समाजसेवक व ट्स्टने मा. सभापती स्थायी समिती यांच्याकडे सदर स्मारक व चौकाचे सुशोभिकरण करण्याचे विद्युत देयक महापालिके तर्फे भरणा करण्याची विनंती केलेली आहे. तसेच यासाठी ट्स्टच्या नावे असलेले विद्युत कनेक्शन महापालिकेच्या नावाने हस्तांतरण करणेस लेखी समंती दिली आहे. परंतु ट्स्टने दिलेल्या हमी पत्रानुसार विद्युत देयकाचा खर्च ट्स्टने वहन करावयाचे आहे.

सध्याच्या दरानुसार विद्युत देयक अंदाजित रुपये ८४,००० दर वर्षी येतो. यापुढे प्रति वर्षी त्यात वाढ होण्याची शक्यता आहे. ट्स्टची विनंती मान्य केल्यास प्रति वर्षी महापालिकेला अंदाजे रु. ८४०००/- इतका आर्थिक भार सहन करावा लागेल. मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ नुसार यासाठी महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता सदर ट्स्टची विनंती बाबत महासभेपुढे योग्य त्या शिफारीशी करण्याकरीता स्थायी समितीपुढे सादर.



स्थायी समिती ठराव क्र. ३ दिनांक:- २८.४.२००३

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. जेसवानी सतरामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-५ येथील कुर्ला कॅम्प रोड चौकावरील उभारलेल्या स्वामी शांतीप्रकाश महाराज स्मारक व चौकांचे सुशोभिकरणाचा विद्युत देयकाचा खर्च महानगरपालिकेतर्फे सोसणेस महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र. १३</u> <u>दिनांक:-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी.

ही महासभा दिनांक २८.४.२००३ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. ३ मध्ये अंर्तभाव असलेला निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- मुंबई महानगर मुलभूत सुविधा प्रकल्पांतर्गत उल्हासनगर शहर महापालिका हददीतील विशेष रस्ते व पार्कींग विकास योजनेकामी मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेशाच्या हददीतील रस्ते सुधारणा कार्यक्रम मुंबई महानगर मुलभुत सुविधा प्रकल्प (MUIP Project) हाती घेतला आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळा (M.M.R.D.A.) च्या अखत्यारित राबविण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या हददीत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र येते. या महानगरपालिकेच्या क्षेत्रात वाहतूकीच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिका हददीतुन कल्याण-मुरबाड रोड (राज्य महामाग क्रमांक २वसई, सातिवली, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, मार्गे, अहमदनगर) व राज्य मार्ग कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर मार्गे कर्जत पर्यंत आहे. अशा प्रकारे उपरोक्त शहरे एकमेकांना या महामार्गानी जोडली असल्याने व ही सर्व शहरे राज्यामधील प्रमुख शहरे असल्याने उपरोक्त दोनही मार्गावरून जड व हलक्या वाहनांची वर्दळ जास्त आहे. त्याचा परिणाम शहरामधील वाहतुकीवर होतो. विशेषतः कल्याण-कर्जत रस्ता शहराच्या मध्यभागातून जात असल्याने या रस्त्यावरील वाहतुकीचा परिणाम शहरामधील रस्त्यांवर होत असून त्यामुळे १७ सेक्शन "शास्त्री चौक, शिवाजी चौक, अशोक सिनेमा चौक, प्रेम रामचंदानी चौक या चौकांवर व त्या दरम्यान नेहमी वाहतूक कोंडी असते.

विकास आराखडयामध्ये शहराच्या सभोवताली १०० फुट रूंदीचा रिंग रोड प्रस्तावित आहे. शहरामधून जाणा-या मुंबई-पुणे रेल्वेमार्गाला समांतर विनस चौक ते प्रभाराम चौक, हिराघाट ते पवई चौक, वाको जंक्शन ते ओटी चौक असे प्रारूप विकास आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या रस्ता प्रस्तावित आहे. तसेच प्रारूप विकास आराखडयामध्ये उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळ पार्किंगची जागा राखीव आहे व या सर्वांचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. या सर्वांचा विकास केल्यास शहरामध्ये होणारी वाहतुकीची कोंडी व पार्कींगची समस्या टाळता येऊ शकते.

उपरोक्त नमुद केलेल्या रस्त्यांचे तसेच उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी स्टेशनजवळील पार्कींगचे काम करण्याकरिता प्रस्ताव तयार केला असून तो खालील प्रमाणे संक्षिप्तपणे नमुद केला आहे.



| अ. क्र. | रस्त्याचे नांव | लांबी | विकास योजना प्रमाणे रूंदी | अस्तित्त्वातील रूंदी | कामाची किंमममत (रू. लक्षमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कल्याण मुरबाड रोड पुर्वेकडील ते शिवमंदीर चौक पर्यंत रस्त्याचे (रिंग रोड) | ५.३० कि.मी | ३० मी. | नवीन रस्ता | ३१८० |
| | वरील रस्त्याचे काम त्यात आर.ओ.बी. आणि संरक्षण भिंत | - | - | - | १००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | एकुण | ४१८० |
| २ | पवई आर ओ बी उल्हास स्टेशन मार्गे सीएचएम. कॉलेज ते वडोल गांव रेल्वे ट्रकच्या बाजूने रस्त्याचे काम<br>नदीवरील पुल आणि संरक्षण भिंत | २.४० किमी<br>- | २४ मी.<br>- | नवीन रस्ता<br>- | १२००<br>५०० |
| | | | | एकुण | १७०० |
| ३ | विनस चौक ते प्रभात चौक मार्गे नेताजी शाळा ते गांधी रोड मार्गे निजधाम ते प्रभाराम चौक<br>अतिरिक्त जोडरस्ता | १.५० किमी<br>०.२० कि. मी. | ३० मी.<br>१८ मी. | १८ ते २० मी.<br>१३ मी. | ९००<br>७० |
| | | | | एकुण | ९७० |
| ४ | हिराघाट ते पवई चौक | ०.४२ किमी | ३० मी. | २० मी. | २५२ |
| ५ | वाको जंक्शन ते ओ. टी. चौक उल्हासनगर-४ | ०६० कि. | ३० मी. | १८ ते २० मी. | ३६० |
| ६. | उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन जवळ थी स्टोरीड पार्किंग | - | - | - | ८०० |
| | | | | एकुण | ८२६२ |

उपरोक्त प्रस्तावावरील एकंदर अंदाजित खर्च ८२६२ लक्ष इतका अपेक्षित आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळामार्फत राबविण्यात येणा-या मुंबई महानगर मुलभुत सुविधा प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेने उल्हासनगर शहराकरिता प्रस्तावित केलेल्या रू. ८२६२लक्ष खर्चाच्या उपरोक्त योजना शासन मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे निर्देशित करण्यात येत असलेल्या आकृतिबंधाप्रमाणे राबविण्याकरिता शासनाकडे व मा. सभापती / मा. आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळ (एम एम आर डी. ए)कडे पाठविण्याकरिता सदर प्रस्तावास महासभेकडुन प्रशासकीय मान्यता मिळण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.



<u>महासभा ठराव क्र. १४</u> <u>दिनांक:-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उपरोक्त नमूद केलेल्या रस्त्यांचे तसेच उल्हासनगर, शहाड आणि विठ्ठलवाडी स्टेशनाजवळील पार्किंग करीता एकंदर अंदाजित खर्च रू. ८२६२ लक्ष खर्चाच्या कामी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण मंडळामार्फत राबविण्यात येणा-या मुंबई महानगर मुलभुत सुविधा प्रकल्पांतर्गत सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

तसेच सदर प्रस्ताव शासनाकडे व मा. सभापती / मा. आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मंडळाकडे पाठविणेस निर्देश देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या वुडलॅंड रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास '' स्वर्गीय श्री. थारूमल वी रोहडा'' असे नामकरण करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास स्वर्गीय श्री. थारूमल डी. रोहडा'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही काणेत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला ''स्वर्गीय श्री. थारूमल डी. रोहडा'' असे नामकरण करणेबाबतचा महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र. १५</u> <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. अंकुश म्हस्के.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये विठ्ठलवाडी स्टेशनजवळ असलेल्या रेस्टॉरंट समोरील जागेवरील चौकास ''स्वर्गीय श्री. थारूमल डी. रोहडा'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे. तसेच पुज्य पंचायत विठ्ठलवाडी दुकानदार / कारखानदार यांना त्यांचे स्वखर्चाने चौक सुशोभिकरण फलक लावणे आणि त्याची देखभाल दुरूस्तीसाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर ५ येथील महात्त्माफुले नगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफीस समोरील चौकास ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील महात्त्मा फुलेनगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफिस समोर चौकास '' भारतत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकात चबुतरा बनविलेला असुन सदर चबुत-यावर ''भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर चौक'' असे नांव दर्शविलेले आढळले आहे. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकास ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. १६ दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. शांताराम निकम.
अनुमोदकाचे नाव :-श्री. नाना पवार.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील महात्त्मा फुलेनगर जवळील लाईट व टेलिफोन ऑफिस समोर चौकास '' भारतत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर -२ मधील स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन पी. शाह'' असे नांव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-२ मधील स्नेहा अपार्टमेंटते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) रस्त्याला '' स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त यात्री निवास व बगीच्याचे कोणतेही नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) पर्यंतच्या रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-२ मधील स्नेहा अपार्टमेंटते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) रस्त्याला '' स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>
महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः</u>- उल्हासनगर-२ येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक, ए-वन दुध, आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नाव देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक ए-१ दूध आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला ''स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त रस्त्याचे कोणतेही नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग '' असे नामकरण करणेकरिता महासभेची मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. १७</u> <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. होशियारसिंग लबाना.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर येथील कुमार डिपार्टमेंट ते सतनाम कॉलनी चौक ए-१ दूध आशाराम सोसायटी रोड पर्यंतच्या रस्त्याला '' स्वर्गीय श्री. नारायणदास रामरख्यानी मार्ग'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>
महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र. ४ मधील चंचलानी निवास ते विजय किराणा स्टोअर्स, उत्तम अपार्टमेंट मार्गच्या नामकरणाबाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार माता मजनीबाई सत्कार समिती यांनी त्यांचे दिनांक १९ एप्रिल, २००३ चे पत्रानुसार तक्रार केली आहे. सदर रस्त्याला "माता मजनीबाई बालमंदिर मार्ग" असे नांव असतांना दुसरे नांव का दिले? तरी सदर रस्त्यास "माता मजनीबाई बालमंदिर मार्ग" असे एकच नामकरण असावे अशी विनंती केली आहे.

उल्हासनगर-१ येथील प्रभाग क्र. ४ मधील चंचलानी निवास ते विजय किराणा स्टोर उत्तम अपार्टमेंट मार्गच्या रस्त्यास सर्वसाधारण सभेमध्ये "माता मजनीबाई बालमंदिर मार्ग" असे नामकरण ठराव क्र. ५४८ दिनांक २७.८.१९९० नुसार मंजुर झालेले आहे.

त्यानंतर उल्हासनगर-१ येथील गव्हर्नमेंट हॉस्पिटल ते तेजुमल चक्की पर्यंतच्या रस्त्यास "तेजुमल चिमणदास वासवानी मार्ग" असे नामकरण सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रमांक १३१ (९) दिनांक ३.६.१९९६ मध्ये मंजुर केलेले आहे.

उपरोक्त दोनही नावे एकाच रस्त्याचे आहे. तरी सदर रस्त्याला कोणते नांव ठेवायचे याबद्दल सर्वसाधारण सभेपुढे निर्णय होणेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १८</u> <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता "माता मजनीबाई बालमंदिर मार्ग" रस्त्याला दिलेले नाव कायम ठेवून "तेजुमल चिमनदास वासवानी मार्ग" ऐवजी तेजुमल चक्की समोरील दोन रस्त्यांचे संगमस्थानक भागास "तेजुमल चिमणदास वासवानी चौक" असे नाव देणेस मान्यता देत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. १३१ (९) दि. ३.६.१९९६ मध्ये अंशतः बदल मानण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर ५ येथील प्रभाग क्र. ११ मधील, बॅरेक नं. १९६८ व नेहरू नगर समोरील महापालिकेच्या उद्यानास '' जय झुलेलाल उद्यान'' असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मधील बॅ. नं. १९६८ व नेहरूनगर समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास ''जय झुलेलाल उद्यान'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त उद्यानास नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त उद्यानाला कोणताही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर उद्यानाचे ''जय झुलेलाल उद्यान'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. १९ दिनांक:-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. सुरेश गायकवाड.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मधील बॅ. नं. १९६८ व नेहरूनगर समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास ''जय झुलेलाल उद्यान'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने
महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. ८ मधील ओ.टी. सेक्शन या क्षेत्रास ''स्वामी धर्मदास नगर'' असे नाव देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-३ या क्षेत्रास स्वामी धर्मदासनगर नांव देण्याकरिता व स्वामी धर्मदास साहेब दरबार पुज्य धर्मवाडी पंचायत यांना त्यांचे खर्चाने अशा नावाचे फलक या क्षेत्राकडे जाणा-या ४ रस्त्यांमध्ये कमानी उभारून लावणेकरिता परवानगी देण्याकरिता प्रस्ताव आलेला आहे. सदर क्षेत्रपुर्वीपासुन उल्हासनगर-३ येथील ओ.टी. सेक्शन क्षेत्र तसेच धर्म दरबारचे आजूबाजूचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रास प्रस्तावित केलेले स्वामी धर्मदासनगर हे नांव त्यास सुसंगत असून या क्षेत्रास यापूर्वी अन्य दुसरे कोणतेही नामकरण या महानगरपालिकेने केल्याचे तसेच जागेवर फलकही आढळत नाही.

तरी प्रस्तावित केल्यानुसार उल्हासनगर-३ येथील ओ.टी. सेक्शन या क्षेत्रास स्वामी धर्मदासनगर असे नामकरण होणेस तसेच उक्त नामकरणाचे फलक प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वामी धर्मदास साहेब दरबार /पुज्य धर्मवाडी पंचायत यांना त्यांचे खर्चाचे या क्षेत्राकडे जाणा-या ४ रस्त्यावर कमानी उभारने त्यावर फलक लावणे व त्यांची देखभाल दुरूस्ती त्यांच्या स्वखर्चाने करणे करिता महासभेकडून निर्णय होणेकरिता महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. २०                                                     दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. चिमन रूपानी.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. नीता आहुजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील प्र. क्र. ८ मधील ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-३ या क्षेत्रास ''स्वामी धर्मदास नगर'' असे नाव देणेस मान्यता देत आहे. तसेच स्वामी धर्मदास साहेब दरबार / पूज्य धर्मवाडी पंचायत यांना त्यांचे स्वखर्चाने या क्षेत्राकडे जाणा-या ४ रस्त्यावर कमानी उभारणेस त्यावर फलक लावणे आणि त्याची देखभाल दुरूस्ती करणेसाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२)(इ)अन्वये शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविण्याची तरतुद असून सदर कर ऐच्छिक आहे, तो कर बसविणेचे अगर कसे यावर महानगरपालिकेचा धोरणात्मक निर्णय होणे जरूर आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियम १९४ चे कलम १२७ (२)(फ) मधील तरतुदीनुसार मोटार वाहनकर अधिनियम १९५८ कलम २० मधील तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त मोटार वाहनांचा कोणताही कर किंवा पथकर बसविला जाणार नाही असे नमूद आहे. तथापि याबाबतीत राज्य शासनाची पूर्व परवानगी घेवून हा कर आकारणे व वसूल करणे विधीसमत होईल.

उक्त कर आकारणी साठी महापालिकेला नियम तयार करावे लागतील व त्यास राज्य शासनाची पूर्व मंजूरी प्राप्त झाल्यावर त्याप्रमाणे आकरणी व वसुली करता येईल हा कर बसवण्याची पध्दती कलम १४९ मध्ये नमूद केला आहे.

महापालिकेचे मर्यादीत उत्पन्न विचारात घेता महसुली उत्पन्नात वाढ होण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. महासभेच्या मंजुरी नंतर कलम १४९अन्वये अपेक्षित वसुली व आकारणी पध्दती निश्चित करण्यासाठी प्रारूप नियम तयार करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

महानगरपालिकेची मंजूरी मिळण्यासाठी महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र.                                                     दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून उल्हासनगर शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविणेकामी वरील प्रस्तावास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

विषय:- उल्हासनगर शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविणेस मान्यता देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२)(इ)अन्वये शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविण्याची तरतुद असून सदर कर ऐच्छिक आहे, तो कर बसविणेचे अगर कसे यावर महानगरपालिकेचा धोरणात्मक निर्णय होणे जरूर आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियम १९४ चे कलम १२७ (२)(फ) मधील तरतुदीनुसार मोटार वाहनकर अधिनियम १९५८ कलम २० मधील तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त मोटार वाहनांचा कोणताही कर किंवा पथकर बसविला जाणार नाही असे नमूद आहे. तथापि याबाबतीत राज्य शासनाची पूर्व परवानगी घेवून हा कर आकारणे व वसूल करणे विधीसमव्रत होईल.

उक्त कर आकारणी साठी महापालिकेला नियम तयार करावे लागतील व त्यास राज्य शासनाची पूर्व मंजूरी प्राप्त झाल्यावर त्याप्रमाणे आकरणी व वसुली करता येईल हा कर बसवण्याची पध्दती कलम १४९ मध्ये नमूद केला आहे.

महापालिकेचे मर्यादीत उत्पन्न विचारात घेता महसुली उत्पन्नात वाढ होण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. महासभेच्या मंजुरी नंतर कलम १४९अन्वये अपेक्षित वसुली व आकारणी पध्दती निश्चित करण्यासाठी प्रारूप नियम तयार करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

महानगरपालिकेची मंजूरी मिळण्यासाठी महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र. २० अ** **दिनांक:-१९.५.२००३.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार शहरात प्रवेश करणारी जनावरे व वाहने यावर पथकर बसविण्यास मान्यता देत नाही.

**एकमताने**

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय:- महापालिकेचे बोटक्लब, उद्यान बांधा, वापरा व हस्तांतरण पध्दतीने देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उल्हासनर शहर हददीतील कॅम्प नंबर ३ मध्ये हिराघा मंदीराजवळ महानरपालिकेचे बोट क्लब नावाने एकूण ३.७ एकर क्षेत्रफळाचे उद्यान आहे. अंदाजे २० वर्षापुर्वी सदर उद्यान तयार करण्यात आलेल्या तलावामध्ये बोटींगची व्यवस्था केलेली होती. त्यावेळी सदर बोटींग व उद्यानाच्या सौदर्याचा जनतेस लाभ होत होता. गेल्या काही वर्षापासून सदरचे बोटींग तलाव बंद पडले आहे. तसेच उद्यानाची दैनंदीन देखभाल व्यवस्थित होत नसल्यामुळे उद्यानाच्या सौदर्यकरणाचा लाभ जनतेस होत नाही. उद्यानाचा जनतेस लाभ मिळवून देण्यासाठी बोटींग व्यवस्था हे प्रथमत दुरूस्त करून घ्यावी लागेल. सदर व्यवस्थेवर तसेच दैनंदिन देखभाल व दुरूस्तीवर

महानगरपालिकेस फार मोठया प्रमाणात निधी उभारावा लागणार आहे. महानगरपालिकेची सद्याची वित्तिय स्थिती लक्षात घेता प्रशासनातर्फे वरील योजना बांधा, वापरा व हस्तांतरण करा (बी.ओ.टी)तत्त्वावर देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. ठेकेदारास बोटींगचे व्यवस्था करणेसाठी सद्याची उपलब्ध असलेल्या तलावाची दुरूस्ती स्वखर्चाने करणे बंधनकारक राहिल.
२. ठेकेदारास बोटींगसाठी आवश्यक त्या बोटींची व्यवस्था स्वत:च्या खर्चाने करणे बंधनकारक राहिल.
३. ठेकेदारा सदर जागेत व्यायामशाळा व त्यात आवश्यक त्या साधनसामुग्रीची व्यवस्था स्वत:च्या खर्चाने करणे बंधनकारक राहिल.
४. ठेकेदारास उद्यानात आवश्यक त्या दिवा बत्तीची व्यवस्था स्वत:च्या खर्चाने करणे बंधनकारक राहिल.
५. ठेकेदारास संपूर्ण उद्यानाच्या परिसरातील सुरक्षा भिंत स्वत:च्या खर्चाने बांधणे बंधनकारक राहिल.
६. ठेकेदारास विद्युत, टेलिफोन, पाणी , कर्मचारी व त्यांचा पगार, विमा, सुशोभिकरण, देखभाल व दुरूस्ती इत्त्यादी प्रकारचा दैनंदिन खर्च स्वत: करावयाचा आहे.
७. ठेकेदारास सदर योजना सहा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित करणे बंधनकारक राहिल. आणि आयुक्तांचे विवेकाधिशअनुसार ठेकेदारास ३ महिन्यापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी मुदत वाढ देता येईल.
८. योजना, कार्यान्वित झाल्यानंतर बांधा, वापरा व हस्तांतरण पध्दतीने पुढील ३० वर्षासाठी ठेकेदाराचे ताब्यात राहिल.
९. ठेकेदारास प्रवेश, बोटींग व व्यायामशाळा करीता महानगरपालिकेने ठरविलेल्या दराप्रमाणे आकारणी करणे बंधनकारक राहील. (तक्ता सोबत जोडला आहे)
१०. बोटींग क्लब करीता प्रत्येक महिन्यासाठी परवाना फी म्हणून रू. १,२८,९०६/- (रूपये एक लाख अठ्ठावीस हजार नऊशे सहा मात्र) किमान देयक आकार निश्चित करण्यात आलेला आहे. जे ठेकेदार जास्तीत जास्त परवाना फी देण्यास तयार असतील त्यांची निविदा स्विकारण्यात येईल. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर प्रत्येक ५ वर्षाचे टप्यात निश्चित केलेल्या परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करून रक्कम महानगरपालिकेला अदा करणे बंधनकारक राहील.
११. ठेकेदार सदर जागेचा उपयोग जाहिरात, लग्न समारंभ इत्त्यादीसाठी करू शकतो. तसेच ठेकेदार कॅन्टीनमध्ये सर्व प्रकारचे शाकाहारी व मांसाहारी पदार्थ ठेवू शकेल पंरतु सदर जागेत कोणत्त्याही प्रकारचे मद्यपान करण्यास बंदी राहिल.
१२. ३० वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर सदर योजना मालमत्ता, मशिनरी व इतर साधन सामुग्रीसह सुस्थितीत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे ठेकेदारावर बंधनकारक राहिल.



१३. योजना राबविल्यानंतर जे ठेकेदार परवाना फी देण्यास दिरंगाई करीत असेल किंवा विहित केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असेल तर त्याचा करार रदद करण्यात येवून तयार करण्यात आलेल्या सर्व साधनसामुग्री महानगरपालिका ताब्यात घेईल.
१४. योजनेसाठी वरील प्रमाणे उल्लेख करण्यात आलेल्या मुख्य अटी व शर्ती व्यतिरिक्त योजनेचा उददेश लक्षात घेता अन्य काही अटी करारात समाविष्ट करण्यात येतील.
१५. मंजुर निविदाकारास "भाडे करार" नोंदणी खर्च व मुदांक शूल्क इत्त्यादीचा खर्च स्वत: करावा लागेल.

## <u>नौका-विहारासाठी व विविध प्रकारच्या फी दर्शविणारा तक्ता.</u>
### <u>भाग-१ : उद्यान प्रवेश शुल्क</u>

| अ. क्र | वयोगट | प्रवेश शुल्क |
|---|---|---|
| १. | ५ वर्षाखालील व्यक्ती : स - | विना मुल्य |
| २. | ५ वर्षावरील व्यक्ती : स- | रू. २.०० प्रतिदिन |

### भाग-२: नौका विहार शुल्क

| | | |
|---|---|---|
| १. | ३० मिनिटा पर्यंत | रू. ३०.०० |
| २. | ३० मिनिटापेक्षा जास्त परंतु | रू. ६०.०० |
| ३. | १ तासानंतर प्रत्येक ३० मिनिटास | रू. ४०.०० |

### भाग-३: व्यायाम शाळा शुल्क

| अ. क्र | विवरण | प्रवेश शुल्क | सभासद शुल्क |
|---|---|---|---|
| १. | तिमाही सभासदत्त्व किंवा त्यापेक्षा कमी | रू.२५.०० | रू. २५०.०० |
| २. | सहामाही सभासदत्त्वापेक्षा जास्त परंतु नऊ महिन्यापेक्षा कमी | रू.२५.०० | रू. ४००.०० |
| ३. | सहामाही सभासदत्त्वापेक्षा जास्त परंतु नऊ महिन्यापेक्षा कमी | रू.२५.०० | रू. ६००.०० |
| ४. | नऊमाही सभासदत्त्वापेक्षा जास्त परंतु १२ महिन्यापेक्षा कमी | रू.२५.०० | रू. ७५०.०० |
| ५. | नैमिन्तिक / दैनिक टिकीट फी | रू. निरंक | रू. १५.०० |

--३--

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार वरील उल्लेख करण्यात आलेल्या महानगरपालिकेचा बोटींग क्लब भाडयाने देण्याचा व परवाना फी निश्चित करण्यासंबधी प्रस्तावास मंजुरी मिळणेकरिता सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २१ <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार वर नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधावर व त्या व्यतिरिक्त आयुक्त ठरवतील अशा अतिरिक्त आवश्यक त्या अटी शर्तीवर महापालिकेचे उद्यान, बोट क्लब बांधा, वापरा व हस्तांतरण या पध्दतीने देणे कामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमातील आणखी सुधारणेस अंतिम स्विकृती देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ९७ दिनांक २८.१.२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधील नियम १७ (७)व अनुसूची I मधील बाब क्र. ८६ रकाना क्र. ३ मध्ये बदल करण्यास मान्यता दिलेली आहे.

सदर बदलामुळे / सुधारणेमुळे बाधीत होणा-या / परिणाम होणा-या लोकांच्या माहितीसाठी सदर बदल / सुधारणा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ४५५ अन्वये आवश्यक असलेप्रमाणे या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/जकात/३१४ दिनांक ५.३. २००३ व क्र. उमपा/ जकात/४७४/२००२ दिनांक २६.३.२००३ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करून सदर बदल / सुधारणेसंबंधि प्रस्ताव/ सुचना /हरकती दिनांक ७.४.२००३ पर्यंत मागविण्यात आलेल्या होत्त्या. त्यानुसार विहित मुदतीत एकूण ११ हरकती/ सुचना प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारीवर प्रशासनाचे अभिप्राय सोबतच्या जोडपत्रात दिलेले आहेत. सदर तक्रारीवर अंतीम निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. २२</u> <u>दिनांकः-१९.५.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधील नियम १७ ७)व अनुसूची-I मधील बाब क्र. ८६ रकाना क्र. ३ मध्ये बदल करण्याच्या नियमास अंतिमरित्त्या मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर शहरातील थॅलेसिमिया फाऊंडेशन या संस्थाना अनुदान देणे बाबत.

प्रस्तावना :-

थॅलेसेमिया फाऊडेशन, उल्हासनगर ही धर्मदार आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयात, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५९ खाली नोंदणीकृत संस्था आहे. सदर संस्थेचे मूळ उददेश खालील प्रमाणे आहे.

१. थॅलेसेमिया रोगा संबंधी प्रतिबंधनात्त्मक उपाययोजना.
२. लोकांमध्ये थॅलेसेमिया रोगा संबंधी जागृती निर्माण करणे.
३. रक्त चिकित्त्सा शिबीर आयोजीत करणे
४. जेनेटिक काऊन्सलिंग शिबीर आयोजित करणे

सदर संस्था वेळोवेळी वरील प्रकारचे शिबीर शहरामध्ये शहरातील लोकांसाठी आयोजित करीत असून सदर शिबीरात कमी दराने रक्त तपासणी करीत आहे तसेच गरीब व गरजु मुलांना थॅलेसेमिया रोगामुळे आवश्यक रक्त मिळणेसाठी आर्थिक सहाय्य करते. संस्थेने मागील तीन वर्षाचे आर्थिक ताळेबंद सादर केले असुन त्यांनी या तीन वर्षात विविध जागेत शिबीर लावुन खालील प्रमाणे लोकांची रक्त तपासणी केली आहे.

| अ. क्र. | वर्ष २०००-०१ | वर्ष २००१-०२ | वर्ष २००२-०३ |
|---|---|---|---|
| १ | ३२०६ | ३२७९ | ४२७१ |

थॅलेसेमिया फाउडेशन यांनी पुढील पाच वर्षात शहरातील दिड ते पावने दोन लाख नागरिकांची निशुल्क रक्त तपासणी करण्याची योजले आहे, याकामी संस्थेस ५० लाख रूपयांची आवश्यकता असुन त्यांनी महानगरपालिकेस रूपये १० लाख रक्कमेची आर्थिक मदत प्रतिवर्ष करणेची विनंती केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२५)व (४२)मधील तरतुदीनुसार महानगरपालिका शहरातील लोकांच्या दुःख निवारणासाठी किंवा सार्वजनिक कल्याणासाठी उभारलेल्या कोणत्त्याही सार्वजनिक निधीत अंशदान देवु शकते तसेच सार्वजनिक सुरक्षितता व आरोग्यासंबंधी कार्यक्रम राबवु शकते.

वरील अनुषंगाने थॅलेसेमिया फाउडेशन यांना उल्हासनगर थॅलेसेमिया रोगासंबंधी प्रतिबंधात्त्मक उपाययोजना व इतर कार्यक्रम राबविणेस मदत म्हणुन सध्या रूपये ५ लाख अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरित रक्कम रूपये ५ सुधारित अंदाज पत्रक केल्यानंतर अदा करण्यात यावे. तसेच पुढील दोन वर्षात सुध्दा रूपये १० लाख प्रत्त्येकी अदा करण्यात यावे. महानगरपालिकेने वित्तिय वर्ष २००३-०४ च्या अंदाजपत्रकातील लेखाशीर्ष खाली धर्मदास संस्था अनुदान म्हणुन रूपये ५ लाखाची तरतुद केली आहे.

तरी सदर प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी सादर.

--२--

महासभा ठराव क्र. २३ दिनांकः-१९.५.२००३.

सुचकाचे नाव :-श्रीमती. कमला शर्मा.
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००३-२००४च्या अंदाजपत्रकात पुर्नःसमायोजनाच्या अधीन राहुन थॅलेसिमिया फाऊंडेशन यांना उल्हासनगर थॅलेसिमिया रोगासंबंधी प्रतिबंधनात्त्मक उपाययोजना व इतर कार्यक्रम राबविणेस

*महानगरपालिकेतर्फे अर्थसहाय्य देणे कामी यावर्षी रू. १० लाख अनुदान देणेस मंजुरी देत आहे. तसेच पुढील दोन वर्षात सुध्दा प्रत्येकवर्षी रू. १० लाख अनुदान देणेस मान्य करीत आहे.*

*सुचकाची सही-*
*अनुमोदकाची सही-*

***एकमताने***

*पिठासिन अधिकारी*
*सर्वसाधारण महासभा*
*उल्हासनगर महानगरपालिका*

उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. ३:-** श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे, लिपीक यांनी श्री. महेंद्र पंजाबी यांना युनियन बॅक ऑफ इंडिया, शाखा उल्हासनगर या बॅकेंतून कर्ज या बॅकेतून कर्ज मिळवून देणेकामी श्री. महेंद्र पंजाबी यांचेकडून रु. २५०० एवढया रक्कमेची लाचेची मागणी केल्यावरुन दि २८.५.२००२ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी श्री. लक्ष्मण दोंदे यांना रु. २५००/- पारितोषन रक्कम स्विकारताना रंगेहात पकडले. अशाप्रकारे श्री. दोंदे यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचे नोकर या नात्याने पदाचा व अधिकाराचा गैरवापर करुन स्वत:चा आर्थिक फायदा केलेला यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथील अधिकारी यांनी श्री. दोंदे यांचेविरुध्द सेंट्रल पोलीस स्टेशन, उल्हासनगर- ३ यांचेकडे गुन्हा रजि.नं. II ५८/२००२.ला.प्र.का. सन१९८८ चे कलम ८, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २८/५/२००२ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.विशेष न्यायालयात संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९(१)(क) अन्वये न्यायलयात खटला दाखल करणेकामी नियुक्ति प्राधिका-याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त/ पोलीस अधिक्षक(२) ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सीआर./१९०/ठाणे/२००२/२५१३ दि. २८/३/२००३ अन्वये श्री. श्री.लक्ष्मण भिमराव दोंदे, कनिष्ठ लिपीक यांच्यावर अभियोग दाखल करणेकामी महापालिकेकडे विनंती केली आहे.

श्री. श्री.लक्ष्मण भिमराव दोंदे हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार संबंधीताविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ति प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीताविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार खटला दाखल करणेकामी मंजूरी प्रदान करण्यात यावी, अशी शिफारस आहे.

महासभा ठराव क्र. २५ | दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता
अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, ज्याअर्थी महापालिकेकडुन सादर करण्यात आलेली हकिकत व श्री. लक्ष्मण भिमराव दोंदे महानगरपालिका लिपिक यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन उल्हासनगर-३ यांचेकडे गुन्हा रजि. नं. II ५८/२००२ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ८,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. २८.५.२००२ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाची कागदपत्रे आणि गुन्हयाची सर्व हकीकत व निष्पन्न झालेली सर्व परिस्थिती याची पुर्ण तपासणी केल्यानंतर, सदरच्या आरोपीविरूध्द गुन्हा केला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा असल्याची महानगरपालिकेची खात्री झाल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने सदर आरोपी विरूध्द गुन्हा केल्याबाबत सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र.** ४:- श्री. दिपक निरगुडे, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत

प्रस्तावना :-

श्री. दिपक निरगुडे, लिपीक यांनी श्री. यु.के. रामसिंघानी यांचेविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी कामी त्यांचे बाजूने साक्ष नोंदविणसाठी श्री. रामसिघांनी यांचेकडून रु. २००० ची लाचेची मागणी केल्यावरुन त्यांना दि. २८.८. २००२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी रक्कम रु. १५००/- एवढे स्विकारताना रंगेहात पकडले अशाप्रकारे श्री. निरगुडे यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचे नोकर या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिका-याचा दुरुपयोग करुन स्वत:चा आर्थिक फायदा केलेला आहे. यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथील अधिकारी यांनी सेंट्रल पोलीस स्टेशन, उल्हासनगर - ३ यांचेकडे गुन्हा रजि.नं.II ११७/२००२.ला.प्र.का. सन१९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २८/८/२००२ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.विशेष न्यायालयात संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९(१)(क) अन्वये न्यायलयात खटला दाखल करणेकामी नियुक्ति प्राधिका-याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त/ पोलीस अधिक्षक(२) ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सीआर./३२६/ठाणे/२००२/२७४३ दि. ४/४/२००३ अन्वये श्री. दिपक निरगुडे, कनिष्ठ लिपीक यांच्यावर अभियोग दाखल करणेकामी महापालिकेकडे विनंती केली आहे.

श्री. दिपक निरगुडे हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार संबंधीताविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ति प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीताविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार खटला दाखल करणेकामी मंजूरी प्रदान करण्यात यावी, अशी शिफारस आहे.

महासभा ठराव क्र. २६ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता
अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, ज्याअर्थी महापालिकेकडुन सादर करण्यात आलेली हकिकत व श्री. दिपक निरगुडे, महानगरपालिका लिपिक यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन उल्हासनगर-३ यांचेकडे गुन्हा रजि. नं. II ११७/२००२.लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २८.८.२००२ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाची कागदपत्रे आणि गुन्हयाची सर्व हकीकत व निष्पन्न झालेली सर्व परिस्थिती याची पुर्ण तपासणी केल्यानंतर, सदरच्या आरोपीविरूध्द गुन्हा केला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा असल्याची महानगरपालिकेची खात्री झाल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने सदर आरोपी विरूध्द गुन्हा केल्याबाबत सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. ५:-** कुमारी राणी भाटीया, महानगरपालिका लिपिक या आरोपी विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली खटला भरणेस मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

श्रीम. राणी भाटीया, लिपीक यांनी श्री. अशोक नथ्थू बारी यांना त्यांचे भावाचे झोपडे वजा रुम खरेदी केल्यानंतर कराची आकारणी त्यांचे भावाचे नावे करण्यासाठी श्री. बारी यांचे कडून रुपये २०० एवढया रकमेची लाचेची मागणी केली होती. तसेच तक्रार दार यांनी श्री.बाबासाहेब साळुखे विरुध्द ही तक्रार केलेली होती. त्या अनुषंगाने दिनांक १५/३/२००२ रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी श्रीम. राणी भाटीया यांना रुपये २०० पारितोषण रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले अशा प्रकारे श्रीमती भाटीया यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचे नोकर या नात्याने पदाचा गैरवापर करुन स्वत:चा अर्थिक फायदा केलेला आहे. यास्तव लाच लुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे येथील अधिकारी यांनी श्रीम. राणी भाटीया व तक्रार दार यांनी केलेल्या तक्रारीवरुन श्री. बाबासाहेब साळुंखे यांचे विरुध्द सेंट्रल पोलीस स्टेशन उल्हासनगर ३ येथे गुन्हा रजि.नं.II २६/२००२. ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) व भादवि कलम १०९ अन्वये दि. १५/३/२००२ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

मा.विशेष न्यायालयात संबंधित कर्मचारी यांचेविरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९(१)(क) अन्वये न्यायलयात खटला दाखल करणेकामी नियुक्ति प्राधिका-याच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त/ पोलीस अधिक्षक(२) ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सीआर./१००/ठाणे/२००२/३३१९ दि. २४/४/२००३ अन्वये संबंधित कर्मचारी यांचेवर अभियोग दाखल करणेकामी महापालिकेकडे विनंती केली आहे.

श्रीम. राणी भाटीया व श्री. बाबासाहेब साळुंखे हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार संबंधीताविरुध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ति प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीताविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९(१) नुसार खटला दाखल करणेकामी मंजूरी प्रदान करण्यात यावी, अशी शिफारस आहे.

महासभा ठराव क्र. २७ — दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता
अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, ज्याअर्थी महापालिकेकडुन सादर करण्यात आलेली हकिकत कुमारी राणी भाटीया व श्री. बाबासाहेब साळुंखे महानगरपालिका लिपिक यांचे विरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन उल्हासनगर-३ यांचेकडे गुन्हा रजि. नं. II २६/२००२. लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १२, १३(१) (ड) सह १३(२) व भादवि कलम १०९ दि. १५/३/२००२ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचे तपासाची कागदपत्रे आणि गुन्हयाची सर्व हकीकत व निष्पन्न झालेली सर्व परिस्थिती याची पुर्ण तपासणी केल्यानंतर, सदरच्या आरोपीविरूध्द गुन्हा केला असल्याबाबत सकृतदर्शनी पुरावा असल्याची महानगरपालिकेची खात्री झाल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने सदर आरोपी विरूध्द गुन्हा केल्याबाबत सक्षम न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. ६:—** महानगरपालिका सेवा प्रवेश नियमात १)वरीष्ठ सुरक्षा रक्षक, २) लिडींग फायरमेन, ३)संगणक चालक या पद पात्रतेसंदर्भी नियमात सुधारणा करणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर विविध पदांसाठी नव्याने प्रस्तावित सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली आहे व ती शासनाकडे मंजुरीकरीता पाठवलेली आहे. त्यामध्ये १) वरीष्ठ सुरक्षा रक्षक, २) लिडींग फायरमन व ३) संगणक चालक या पदांच्या सेवाप्रवेश नियमात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

१) वरीष्ठ सुरक्षा रक्षक:-

सदर पदावर पदोन्नती द्यावयाची असल्यास महापालिकेतील सुरक्षा अधिकारी यांचेमधुन पदोन्नती द्यावी लागेल असे नमुद केले आहे परंतु वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नती झाल्यास महापालिकेतील सुरक्षारक्षकांमधुन देण्यात यावी अशी दुरूस्ती करण्यात यावी.

२) लिडींग फायरमन :-

सदर पदाच्या सेवाप्रवेशनियमात फक्त पदोन्नतीनेच नियुक्ती करणेसंबंधी नियम दिलेले आहेत सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमात सरळसेवेने नियुक्ती करावयाची असल्यास खालिल शैक्षणिक पात्रता व अर्हता आवश्यक करण्यात येत आहेत.

१) शैक्षणिक पात्रता :- कोणत्याही शाखेतुन बारावी उत्तीर्ण व अग्निशामक संबंधी प्राधिकृत संस्थेचा कोर्स पुर्ण.

२) वयोमर्यादा ३० वर्षापेक्षा जास्त नसावी.

उमेदवाराची उंची कमीतकमी १६५ से.मी. आणि छाती कमीतकमी ८१ से.मी.असावी व फुगवुन कमीतकमी ५ से.मी.ने जास्त, वजन ५० किलोपेक्षा कमी नसावे आणि दृष्टी साधारण असावी.

सरळसेवेने करावयाची नियुक्ती हि एकुण मंजुर पदाच्या २५ टक्क्यापेक्षा जास्त नसावी

३) संगणक चालक :-

संगणकचालक या पदावर सरळसेवेने नियुक्ती करावयाची झाल्यास उमेदवाराची शैक्षणिक पात्रता एच.एस.सी. (सायन्स) व मान्यताप्राप्त संस्थेतुन संगणक चालक पदाचा कोर्स पुर्ण केलेला असावा असे सेवानियमात नमुद केले आहे त्याऐवजी संगणकचालक या पदावर सरळसेवेने नियुक्ती द्यावयाची झाल्यास उमेदवाराची शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेतुन बारावी उत्तीर्ण व मान्यताप्राप्त संस्थेतुन (डी.ओ.ई.ए.सी. सोसायटीज यांचे ष्सी.सी.सी ” किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचा ष्ओ ”लेव्हल किंवा ष्ए ”लेव्हल किंवा ष्बी ” लेव्हल किंवा ष्सी ” लेव्हल किंवा एम.एस.सी.आय.टी किंवा जी.इ.सी.टी प्रमाणपत्र) कोर्स पुर्ण केलेला असावा.

तरी वरील पदांच्या सेवाप्रवेश नियमात केलेली दुरुस्ती प्रस्तावित करुन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

--२--

महासभा ठराव क्र. २८ दि. २०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सेवा प्रवेश नियमात १) वरीष्ठ सुरक्षा रक्षक, २) लिडींग फायरमन व ३) संगणक चालक या पदांच्या पात्रते संदर्भी वर सुचविलेल्या प्रमाणे सुधारणा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**विषय** क्र. ७:- महानगरपालिका आस्थापना सूचीवरील करनिरिक्षक पदाऐवजी अधिक्षक असे पदनामाचा अंर्तभाव करणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर नव्याने पदनिर्मिती करून प्रस्तावित आस्थापना सुची तयार करून ती शासनाकडे मंजूरीकरीता पाठविलेली आहे यात अधिक्षक या पदनामाची १७ पदे शासनाकडे मंजुरीकरीता पाठविली होती त्यांस अद्याप मंजुरी मिळालेली नाही. उल्हासनगर नगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर कर निरीक्षक या पदनामाची दहा पदे मंजुर आहेत सदर पदनामाची वेतनश्रेणी रू. ५५००-१७५-९००० अशी आहे. सद्यस्थितीत महापालिकेच्या आस्थापनेवर कर निरीक्षक या पदनामाची मंजुर सर्व पदे रिक्त आहेत. जकात निरीक्षक या पदनामाची एकुण २० पदे मंजुर आहेत त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत व ९ पदे रिक्त आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अधिक्षक या पदनामाची पदे भरणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात विभागाचे गेल्या चार-पाच वर्षांपासुन खाजगीकरण करण्यात आलेले असल्याने जकात निरीक्षक या पदावर कार्यरत कर्मचारी हे करनिरीक्षक म्हणुनच कर विभागात काम पहातात. परंतु जकात निरीक्षक व कर निरीक्षक या पदांसाठीची वेतनश्रेणी अनुक्रमे रू.४०००-१००-६००० व रू. ५५००-१७५-९००० अशी आहे तसेच अधिक्षक या पदनामाची वेतनश्रेणी रू ५५००-१७५-९००० अशी असेल. जकात विभागाचे खाजगीकरण झाल्यामुळे जकात निरीक्षक या पदनामाची आवश्यकता भासत नाही परंतु सदर पदावरील नियुक्त कर्मचारी हे कर निरीक्षक म्हणुन काम पहात असल्यामुळे त्यांच्या पदनामात कर निरीक्षक असा बदल करण्यात यावा परंतु त्यांची वेतनश्रेणी ही जकात निरीक्षक या पदाचीच राहिल व महापालिकेच्या सेवाप्रवेश नियमावलीत देखील जकात निरीक्षक व कर निरीक्षक या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम एकत्रित दाखविण्यात आलेले आहेत.

शासनाने कर निरीक्षक या पदनामासाठी मंजुर केलेली १० पदे यांच्या पदनामात बदल करून त्यांस अधिक्षक असे संबोधण्यात यावे परंतु वेतनश्रेणी रू ५५००-१७५-९००० अशीच राहिल. सदर प्रभावामुळे केवळ पदनामात बदल होत असुन कोणताही वाढीव आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही व अधिक्षक हे वरिष्ठ पद पदोन्नतीसाठी उपलब्ध होणार आहे

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९मधील कलम ५१ मधील तरतुदीनुसार वरीलप्रमाणे बदल प्रस्तावित करून सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर

महासभा ठराव क्र. २९ — दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका आस्थापना सूचीवरील ''कर निरीक्षक'' पदाऐवजी ''अधिक्षक'' असे पदनामाचा अंर्तभाव करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय** क्र. ८:- महानगरपालिका सेवा प्रवेश नियमात सफाई मुकादम पद पात्रतेसंदर्भी नियमात सुधारणा करणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील आस्थापनेवर सफाई मुकादमाची एकुण ७० पदे मंजुर आहेत. सद्या महापालिकेच्या आस्थापनेवर १२ मुकादम कार्यरत असुन ५८ पदे रिक्त आहेत.

सफाई कामगारांच्या सेवाज्येष्ठता यादीनुसार व महापालिका सेवाप्रवेश नियमावलीनुसार सफाई मुकादम या पदावर पदोन्नतीसाठी शैक्षणिक पात्रता ४ थी पास व १० वर्षे सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे त्यानुसार ३९ कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र होत आहेत व शासनाने निर्धारित केलेल्या नियमांनुसार सफाई मुकादम या पदाची शैक्षणिक पात्रता ७ वी पास व ५ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे त्यानुसार ३७ कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र आहेत.

महापालिकेच्या सफाई मुकादम या पदासाठी शासनाने निर्धारित केलेली शैक्षणिक अर्हता ७ वी पास ही किमान अर्हता असणे आवश्यक आहे परंतु महापालिका सेवाप्रवेश नियमावलीनुसार सद्याच्या अर्हतेमधील अनुभवाची अट ही १० वर्षावरून ५ वर्षे अशी शिथिल केल्यास ब-याच सफाई कामगार यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध होवु शकेल तसेच ते मुकादम या पदावर पदोन्नतीस पात्र होवु शकतील

तरी सफाई मुकादम या पदाच्या सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता ७ वी पास व ५ वर्षे सफाई कामगार या पदावरील सेवेचा अनुभव असणे आवश्यक याप्रमाणे दुरूस्ती करणेसाठीचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ३० दिनांकः-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका सेवाप्रवेश नियमात सफाई मुकादम पदी, पात्रते संदर्भी वर सुचविल्याप्रमाणे सुधारणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ९:- श्री. जी. व्ही. मोरे स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

महापालिकेच्या मंजुर आस्थापनेवर मुख्य बाजार निरीक्षक या पदनामाच्या एका पदाला नव्याने मंजुरी मिळालेली आहे व सदरचे पद रिक्त आहे सदर पदावर पदोन्नती देणेसाठी शैक्षणिक पात्रता एस.एस.सी पास आणि अ.भा.स्था.स्व.संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचा कोर्स पास असला पाहिजे तसेच स्वच्छता निरीक्षक या पदावरील सात वर्षाचा अनुभव आवश्यक असे सेवाप्रवेश नियम आहेत.

महापालिकेच्या आस्थापनेवर मुख्य बाजार निरीक्षक हे पद भरणे आवश्यक आहे. मुख्य बाजार निरीक्षक हे एकाकी पद असल्यामुळे सदर पद हे एकतर खुल्या प्रवर्गातुन किंवा अनु.जातीच्या उमेदवारातुन भरावयाचे आहे.

मुख्य बाजार निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना आरक्षण, सेवाज्येष्ठता व कामाचा अनुभव लक्षात घेतला असता स्वच्छता निरीक्षक या संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीत श्री. जी.व्ही.मोरे, स्व. निरीक्षक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी आढळुन आले व ते विमुक्त जाती प्रवर्गात मोडत आहेत

मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव निवड समितीपुढे ठेवला असता निवड समितीने मुख्य बाजार निरीक्षक या पदावर पदोन्नती देणेसाठी श्री. जी.व्ही.मोरे, स्व. निरीक्षक यांची निवड केलेली आहे

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ३१ — दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. जी. व्ही. मोरे, स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य बाजार निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय** क्र. १०:- श्री. के. एन. म्हात्रे स्वच्छता निरिक्षक यांना मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदनामाचे एकाकी पद मंजुर आहे. सदरचे पद हे दिनांक ३०.६.९९ रोजी पासुन यापुर्वीचे सदर पदावर कार्यरत असलेले श्री.व्ही.आर. भागवत ,मुख्य स्वच्छता निरीक्षक हे सेवानिवृत्त झाल्यामुळे रिक्त झाले होते. सदर पदावर पदोन्नती देणेसाठी शैक्षणिक पात्रता एस.एस.सी पास आणि अ.भा.स्था.स्व.संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचा कोर्स पास असला पाहिजे तसेच स्वच्छता निरीक्षक या पदावरील सात वर्षाचा अनुभव आवश्यक असे सेवाप्रवेश नियम आहेत.

मुख्य स्वच्छता निरीक्षक हे एकाकी पद असल्यामुळे सदर पद हे एकतर खुल्या प्रवर्गातुन किंवा आरक्षित उमेदवारातुन भरावयाचे आहे. मुख्य स्वच्छता निरीक्षक हे पद पुर्वी खुल्या प्रवर्गातुन भरले होते त्यामुळे आता हे पद आरक्षणानुसार भरावयाचे आहे.

मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना आरक्षण, सेवाज्येष्ठता व कामाचा अनुभव लक्षात घेतला असता स्वच्छता निरीक्षक या संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीत श्री. के.एन.म्हात्रे , स्व. निरीक्षक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी आढळुन आले व ते इ.मा.प्रवर्गात मोडत आहेत

मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव निवड समितीपुढे ठेवला असता निवड समितीने मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देणेसाठी श्री. के.एन.म्हात्रे , स्व. निरीक्षक यांची निवड केलेली आहे

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ३२ — दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. के. एन. म्हात्रे, स्वच्छता निरीक्षक यांना मुख्य स्वच्छता निरीक्षक या रिक्त पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. ११:-** श्री. एम. अे. खियाणी, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

अधिक्षक अभियंता, मजीप्रा/ठाणे जा. क्र. मजीप्रा/ठाणे/आस्था/१/१३८/२००१ दि. १०/१/२००१अन्वये श्री. अेम.अे. खियानी यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीवर एक वर्षाच्या कालावधीकरिता ते दि. २२/१/०१ रोजी महापालिका सेवेत हजर झालेले आहेत.

श्री. अे. अे. खियानी, शाखा अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २१/१/२००२ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्या कारणाने त्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही तरी त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी यापुढेही एक वर्षानी वाढवणेसाठी मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

**महासभा ठराव क्र. ३३** **दिनांक:-२०.६.२००३**

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अेम. अे. खियानी, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ११:- श्री. डी.बी. चौधरी , उपविभागीय अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता, कोकण विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे जा.क्र. मजीप्रा / मु.अ/को.वि/आस्था-२ के.क्र.३२६/२००२ दि. ४/५/२००२ अन्वये श्री. डी. बी. चौधरी उपविभागिय अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन एक वर्षाच्या कालावधीकरिता प्रति नियुक्तीवर नेमणुक केलेली आहे.

श्री. डी. बी. चौधरी, उपविभागीय अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि. १०.५.२००२ रोजी मध्यानपुर्व रूजु झालेले आहेत व त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. ९.५.२००३ रोजी संपुष्टात आला आहे.

श्री. डी. बी. चौधरी, उपविभागीय अभियंता यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने वाढविण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र. ३४ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. डी. बी. चौधरी, उपविभागीय अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. १३:-** श्री.व्ही. डी. कांबळे, उपविभागीय अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

मुख्य अभियंता, कोकण विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे, जा. क्र. मजीप्रा/मु.अ/को. वि/आस्था-२ के.क्र.३२६/३०१२ दि. १०.५.२००२ अन्वये श्री. व्हीडी. कांबळे उपविभागीय अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन एक वर्षाच्या कालावधीकरिता प्रति नियुक्तीवर नेमणुक केलेली आहे.

श्री. व्हीडी. कांबळे, उपविभागीय अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि. १६.५.२००२ रोजी मध्यानपुर्व रूजु झालेले आहेत व त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. १५.५.२००३ रोजी संपुष्टात आला आहे.

श्री. व्हीडी. कांबळे, उपविभागीय अभियंता यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाने वाढविण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

**महासभा ठराव क्र. ३५** **दिनांक:-२०.६.२००३**

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. व्ही. डी. कांबळे, उपविभागीय अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवादीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १४:- पुर्वीचा दिनांक २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८१ रद्द करून श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

अधिक्षक अभियंता, मजीप्रा ठाणे जा. क्र. मजीप्रा/ठाणे/आस्था/१/१६८/२००१ दि. १०/१/२००१ अन्वये श्री.अे. पी. कोतकर, शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीवर एक वर्षाच्या कालावधीकरिता ते दि. २१. ३.०१ रोजी महापालिका सेवेत हजर झालेले आहेत.

श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २०. ३.०२ रोजी संपुष्टात आला आहे. सदर प्रकरणी दि. २६.१२.०२ रोजीच्या महासभेत मुदत वाढीचा प्रस्ताव प्रस्तावीत केला होता. परंतु महासभा ठराव क्रमांक ८१ दिनांक २६.१२.२००२ अन्वये तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याकारणाने त्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही. तरी दिनांक २६.१२.२००२ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ८१ रद्द करून त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी यापुढेही एक वर्षानी वाढवणे बाबतचा प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र. ३६ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार पूर्वीचा दि. २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८१ रद्द करून वरील प्रस्तावनेनुसार श्री. अे. पी. कोतकर, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र१५:-** पुर्वीचा दिनांक २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८० रद्द करून श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता यांची महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी सह एक वर्षाची मुदत वाढ देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

अधिक्षक अभियंता, मजीप्रा ठाणे जा. क्र. मजीप्रा/ठाणे/आस्था/१/१६८/२००१ दि. १०/१/२००१अन्वये श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रतिनियुक्तीवर एक वर्षाच्या कालावधीकरिता ते दि. २५. १.०१ रोजी महापालिका सेवेत हजर झालेले आहेत.

श्री.पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २४.१.०२ रोजी संपुष्टात आला आहे. सदर प्रकरणी दि. २६.१२.०२ रोजीच्या महासभेत मुदत वाढीचा प्रस्ताव प्रस्तावीत केला होता. परंतु महासभा ठराव क्रमांक ८० दिनांक २६.१२.२००२ अन्वये मुदत वाढीच्या प्रस्तावास मान्यता मिळाली नाही. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याकारणाने त्यांना प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही. तरी दिनांक २६.१२.२००२ रोजी पारीत केलेला ठराव क्रमांक ८० रद्द करून त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी यापुढेही एक वर्षानी वाढवणे बाबतचा प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र. ३७** **दिनांक:-२०.६.२००३**

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पी. डी. डोईफोडे, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह १ वर्षाची मुदत वाढ देणेस मान्य करीत नाही आणि पूर्वीचा दि. २६.१२.२००२ महासभा ठराव क्र. ८० प्रमाणे त्यांना महानगरपालिका सेवेतुन तावडतोब कार्यमुक्त करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**बहुमताने**

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १६:- मागासवर्गीय अनुशेष भरणे कामी महापालिकेच्या सेवेत विविध पदासाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारास नियुक्ती देणे बाबत.

प्रस्तावना :-

***महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००२/१३०६/१६-ब दिनांक २६ मार्च,२००३ अन्वये मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दि.३० जुन, २००३ पर्यत मुदत दिलेली आहे. त्यानुसार मागासवर्गीयांचा सरळसेवाभरती मधील अनुशेष भरून काढणेसाठी शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर तसेच विद्यार्थी रोजगार मार्गदर्शन व माहिती संचालनालय, मुंबई यांचेकडुन उमेदवारांची मागणी केली होती मागणीनुसार प्राप्त झालेल्या उमेदवारांना दिनांक ३ ,४ व ५ जुन रोजी मुलाखतीस बोलाविण्यात आले होते.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत करणेत आलेल्या निवड समितीमार्फत सदर उमेदवरांच्या मुलाखती घेवून पात्र उमेदवारांची निवड करून नियुक्तीबाबत शिफारस केलेली आहे सोबत पदनिहाय निवड झालेल्या उमेदवारांचा व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नांव :- कनिष्ठ अभियंता (विद्युत) | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जाती | १ | हनुमंत आर. खरात | आरती अशोक लांमतुरे |
| अनु.जमाती | १ | दिनेश सोनाजी गावीत | महेंद्र व्ही धिडे |
| विमुक्त जाती - अ | १ | गणेश एम. माने | अविनाश वी. उमाळकर |

| पदाचे नांव :- कनिष्ठ अभियंता (सा.बां.विभाग ) | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जाती | १ | राजू एन. शेलार | प्रविन टी. काळे. |
| अनु.जमाती | २ | अशोक भास्कर भोये<br>योगेश विक्रम सोनवणे | अरुण बालू चौधरी<br>चौधरी अंबादास राघो |
| विमुक्त जाती - अ | १ | संदिप जाधव | विशाल जे राठोड |
| भ.ज.-क | १ | दिपक रामचंद्र ढोले | वैभव डी. माने |

| पदाचे नांव :- संगणकचालक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जाती | १ | प्रशांत बाबुराव तुपे | सतीश मुकुंद शिंदें |
| अनु.जमाती | १ | गणेश दि. पवार | अशोक के.लहांगे |

| | | | |
|---|---|---|---|
| विमुक्त जाती - अ | १ | अलका सतिश पवार | सतीश महादेव राठोड |
| इ.मा.व | १ | रुपाली ए म्हात्रे | नामदेव बाळू देसले |



| पदाचे नांव :- **वायरमन** | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जाती | २ | श्री.विनोद एस.जाधव<br>श्री.प्रमोद बी.गजभिये | नारायणकर देवराज जनार्दन<br>जयराज एस जॉन |
| अनु.जमाती | ४ | अनंत एस. काटकरे<br>सुनिल बी वावरे<br>चव्हाण धनराज अंकुशराव<br>तानाजी डी कोकणी | विजय अभि राऊत<br>सदुराम नारायण चौधरी<br>शंकर यशवंत कागडी<br>म्हादु सोम्पा गावीत |
| विमुक्त जाती - अ | १ | अविनाश भिमसिंग पुछवई | आव्हाड शशिकांत डी |
| भ.ज.-क | १ | आनंदराव ए. येले | जमदाडे उमेश शिवाजी |
| वि.मा.प्र | १ | जितेंद्र के. कोळी | केतन प्रकाश मेहर |
| इ.मा.व | २ | अविनाश एस.दुसाने<br>जितेंद्र प्रकाश राऊत | चित्तरांजन भंगाळे<br>आदिश के. पाटील |

| पदाचे नांव :- **आरोग्य निरीक्षक** | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जमाती | ३ | लहानू जन्या वाळवी<br>विजय लक्ष्मण गावीत<br>दिपक हरिशचंद्र भोये | युवराज एल वरणीक<br>महेश भास्कर गायकवाड<br>अर्जुन धाकल्या भोईर |
| विमुक्त जाती - अ | १ | एकनाथ यु पवार | राठोड दरबार सी |
| भ.ज.-ब | १ | राजेश डी. थिटे | दिनेश गिरजु गोसावी |

| पदाचे नांव :- **बाजार निरीक्षक** | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जाती | १ | मनिष जगन्नाथ हिवरे | प्रशांत काशिनाथ धिवरे |

| पदाचे नांव :- **विजतंत्री** | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जमाती | १ | विजयकुमार कृष्णाजी भांगरे | चंद्रकांत जी गावित |

| पदाचे नांव :- **फायरमन** | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |

| | | | |
|---|---|---|---|
| अनु.जमाती | १३ | चेतन जे चौलकर<br>अनिल सी गायकवाड<br>शैलेश बी देवरे | - |



| | | | |
|---|---|---|---|
| विमुक्त जाती - अ | २ | - | - |
| भ.ज.-ब | १ | - | - |
| भ.ज.-क | २ | - | - |
| भ.ज.-ड | १ | - | - |
| वि.मा.प्र | १ | - | - |
| | ४ | पंकज ए. पवार<br>सुरेश पी. बोंबें<br>राजेंद्र डी. राजम<br>आसेकर संदिप धरमराज | जयवंत जे. गायकर<br>चेतन दत्तात्रय झडे<br>गवंडे राजीव जनार्दन<br>दिपक किसन गाडेकर, |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५४(अ) आर/डब्ल्यु, ४५७(३) (ए) आणि (बी) अन्वये सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली आहे यातील शेडयुल ए मध्ये दर्शविल्याप्रमाणे कोणत्याही पदासाठीच्या शैक्षणिक अर्हता/ अनुभव याबाबतच्या अटी शिथील करण्याचे अधिकार आयुक्ताना आहेत त्यानुसार संगणकचालक या पदासाठीचे सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता बारावी सायन्स अशी होती परंतु संगणकचालक यापदासाठी सेवायोजन कार्यालयांकडुन प्राप्त झालेल्या उमेदवारांमध्ये काही इतर शाखेतुन बारावी उत्तीर्ण झालेले उमेदवार प्राप्त झाले होते व त्यांची निवड समितीने सदर पदासाठी निवड केलेली आहे तरी संगणकचालक यापदासाठीचे सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेत मान्यताप्राप्त संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन बारावी उत्तीर्ण अशा दुरूस्तीचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवलेला आहे यांस मंजुरी मिळणेच्या अटीस अधिन राहुन तसेच फायरमन यापदासाठी अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण अशी अर्हता सेवानियमात दिलेली आहे. परंतु निवड समितीने निवड केलेल्या एका उमेदवार सदरची अर्हता धारण करीत नाही. परंतु सदर कर्मचारी यांना नियुक्ती दिल्यानंतर महापालिकेतर्फे त्यांना सदरचे प्रशिक्षण पुर्ण करणेसाठी पाठविले जाईल.

तरी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात यावी.

महासभा ठराव क्र. ३८ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी
अनुमोदकाचे नाव :-श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार निवड समितीने शिफारस केलेल्या उक्त उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. १७:-** राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी सुधारणांकामी महापालिका निधीतुन अतिरिक्त फरकाचे रक्कमेस मान्यता देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ (म्हाडा)कडे उल्हासनगर महानगरपालिके तर्फे रू. २,३३,०९,५८४/- इतक्या रक्कमेची अंदाजपत्रके प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता सादर करण्यात आलेली होती. सादर केलेल्या कामांपैकी म्हाडाने शासनाच्या मानकानुसार रूपये १,४१,०५,०३७/- इतक्या रक्कमेच्या कामांना मंजुरी दिलेली आहे. तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणेत आलेली आहे. परंतु म्हाडा कडून निधी उपलब्ध होणे बाकी आहे.

| अ. क्र. | वस्तीचे नांव | लोकसंख्या | अंदाजित किंमत | मंजुर किंमत | फरक |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्ही.पी. नाईक कॉलनी, शहाड फाटक, उल्हासनगर-१ | ६,५७८ | ६,३२,७२० | ४,२०,९९२ | २,११,७२८ |
| २. | भिमनगर कॉलनी बॅ. नं. ३९, उल्हासनगर-१ | ५,८१० | ६,२३,८५० | ३,७१,८४० | २,५२,०१० |
| ३. | विठ्ठलवाडी गलिच्छवस्ती उल्हासनगर-३ | १,१५३ | ७,३४,२५३ | ७३,७९२ | ६,६०४६१ |
| ४. | सुभाषनगर उल्हासनगर-३ | ६,०९८ | ५,३३,११५ | ३,९०,२७२ | १,४२,८४३ |
| ५. | सहयाद्रीनगर, श्रीराम नगर, ज्योतिबाफुले नगर, पटेलनगर, उल्हासनगर-५ | २०,००० | २२,५६,८०० | १२,८०,००० | ९,७६,८०० |
| ६. | खुनी खडा व मुतूनगर | ३,८०० | ७,१७,०२५ | २,८३,२०० | ४,७३,८२५ |
| ७. | तानाजी नगर उल्हासनगर-१ | ३,६७० | ४,५२,८९५ | २,३४,८८० | २,१८,०१५ |
| ८. | हनुमाननगर, उल्हासनगर-१ | ४,००० | ४,१३,५८१ | २,५६,००० | १,५७,५८१ |
| ९. | महात्माफुले नगर कौशल्यनगर, बुध्दनगर, उल्हासनगर-३ | ९,५,७५ | ७,६८,४०० | ६,१२,८०० | १,५५,६०० |
| १०. | गुरूतेज बहादुरनगर उल्हासनगर-३ | १,५०५ | १,५४,७७६ | ९६,३२० | ५८,४५६ |



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | सतनाम कॉलनी उल्हासनगर-३ | १,८,५५ | १,८७,८४४ | १,१८,७२० | ६९,१२४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२. | गणेशनगर, शिवाजी नगर, अयोध्या नगर, उल्हासनगर-३ | ९,९५८ | ८,१९,९७२ | ६,३७,३१२ | १,८२,६६० |
| १३. | सरस्वतीनगर, पवई चौक उल्हासनगर-३ | २,६८८ | २,००,४४१ | १,७२,०३२ | २८,४०९ |
| १४. | शिवशक्ती कॉलनी भिमनगर, इंदिरानगर, उल्हासनगर-४ | ६,९८७ | ११,७७,९०० | ४,४७,१६८ | ७३,७३२ |
| १५. | महादेवनगर, उल्हासनगर-४ | ६,९८७ | ११,७७,९०० | ४,४७,१६८ | ७,३०,७३२ |
| १६. | सुभाषटेकडी, उल्हासनगर-४ | ४,५०० | ६,०२,७७६ | २,८८,००० | ३,१४,७७६ |
| १७. | लक्ष्मीनगर, उल्हासनगर-४ | ३,५०० | ४,७३,२०० | २२,४०,००० | २,४९,२०० |
| १८. | सितारामनगर उल्हासनगर-४ | ३,४१० | ४,५०,३०० | २,१८,२४० | २,३२,०६० |
| १९. | सिध्दार्थनगर उल्हासनगर-४ | ५,७०० | ३,८१,७७६ | ३,६४,८०० | १६,९७६ |
| २०. | कैलासनगर, उल्हासनगर-४ | २,२०० | ६,५४,५४० | १,४०,८०० | ५,१३,७४० |
| २१. | राहूल नगर, उल्हासनगर-४ | ३,९०० | ९,९०५०० | २,४९,६०० | ७,४०,९०० |
| २२. | कैलासनगर उल्हासनगर-५ | ६,००० | १७,३५,२४० | ३,८४,००० | १३,५१,२४० |
| २३. | गणेश नगर, उल्हासनगर-५ | २,७०० | ४,३८,६०० | १,७२,८०० | २,६५,८०० |
| २४. | जयजनता कॉलनी, उल्हासनगर-५ | ५,७२४ | ९,३०,१०० | ३,६६,३३६ | ५,६३,७६४ |
| २५. | वडारी कॉलनी उल्हासनगर-३ | ३,५०० | ३,५९,३०९ | २,२४,००० | १,३५,३०९ |
| | एकुण | १,३६,२३९ | १,७९,२३,८१३ | ८७,१९,२९६ | ९२,०४,५१७ |

उर्वरित रूपये ९२,०४,५१७ निधी मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तथापि म्हाडाने या प्रस्तावास मंजुरी न दिल्यास सदर खर्च कृपया महानगरपालिका निधीतून करावा लागेल. घोषित झोपडपट्‌टी मधील पाणी टंचाई दुर करण्या करिता उक्त कामे युध्दपातळीवर पुर्ण करण्यासाठी फरकाची रक्कम रूपये ९२,०४,५१७ करण्यास मंजुरी देण्याची शिफारस आहे.

सबब सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा.



महासभा ठराव क्र. ३९ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार  राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी सुधारणा कामी महानगरपालिका निधीतून अतिरिक्त फरकाचे खर्च रू. ९२,०४,५१७/- या रक्कमेस महानगरपालिका अंदाजपत्रकात पुर्नसमायोजनेच्या अधीन रहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

**एकमताने**
उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. १८:-** उल्हासनगर शहरातील महापालिका शाळेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिक्षण अधिका-यांमार्फत रेनकोट वाटप करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीमार्फत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उल्हासनगर महापालिकेच्या प्रत्येक प्रभागासाठी १०० रेनकोट याप्रमाणे ७५०० रेनकोट खरेदी करण्यात आले आहेत. सदर रेनकोट शाळेतील शिक्षण घेणा-या ६ ते ९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना वाटप करण्यात येणार आहेत. महासभा ठराव क्र.२ दिनांक २५.६.२००२ अन्वये लाभार्थींना निकष यादी तयार करण्यासाठी मा.आयुक्त यांना अधिकार देण्यात आले होते. सदर प्रस्तावास सर्वसाधारण महासभेने ठराव क्र. १७ दिनांक १९.७.२००२ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे (स्थायी समिती ठराव क्र.४५ दिनांक २३.८.२००२ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती.) त्यानुसार मे.नोव्हेल्टी फुटवेअर, मुंबई यांचेकडुन न्युनतम दराची निविदा प्राप्त झाल्यामूळे त्यांच्याकडुन ७६०० रेनकोट खरेदी करण्यात आले होते.

सर्व प्रभाग अधिका-यांना क्र.उमपा/भांडार/१२३ दिनांक ७/११/२००२ च्या आदेशान्वये मा.आयुक्त यांनी मान्य केलेल्या खाालिल निकषानुसार रेनकोट वाटप करण्यासाठी आदेश देण्यात आले होते.

१) दारिद्रय रेषेखालिल कूटुंबातील मुले
२) विधवा/विधुर पालकांची मुले
३) शारिरीक दृष्टया अपंग मुले
४) प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, पुरग्रस्त यांची मुले
५) मागासवर्गीयांची मुले
६) आर्थिकदृष्टया अपंग पालकांची मुले
७) शारिरीकदृष्टया अपंग पालकांची मुले

तत्कालीन सभापती,महिला व बालकल्याण समिती व मा.आयुक्त, यांच्या हस्ते शासकिय बालगृह आणि आनंदाश्रम बालगृह येथील गरीब आणि गरजु अशा पालकांच्या १२३ विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करण्यात आले व उर्वरित रेनकोट प्रभाग अधिकारी यांना मा. आयुक्त सो. यांनी विर्निदिष्ट केलेल्या निकषास अनुलक्षुन पात्र लाभार्थींची यादी संबंधित प्रभाग समिती , सभापती यांच्याशी विचारविनिमय करून निश्चित करणेबाबत व त्याव्दारे रेनकोट वाटप करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप रेनकोटचे वाटप पुर्ण होवु शकले नाही.

उपरोलिखीत वस्तुस्थिती लक्षात घेता महापालिका प्रशासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका शाळेतील पात्र लाभार्थींना सदर रेनकोटचे वाटप  करण्याची जबाबदारी शिक्षण अधिका-यांवर सोपविण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे ज्यामुळे रेनकोटचे वाटप जलद होईल व ते खराब होणार नाही. सदर बाब मंजुरीसाठी महासभेपुढें प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र. ४० दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील महानगरपालिका शाळेतील पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना मा. शिक्षण अधिका-यामार्फत रितसर रेनकोट वाटप करणेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १९:- महापालिका शिक्षण मंडळाचे दिनांक २१.२.२००३ चा ठराव क्र. ११ प्रमाणे प्रस्तावित केलेल्या ३३ पदास मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले शिक्षण मंडळाने खाजगी मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेचा कारभार सुरळीतपणे चालविणेसाठी सध्या शिक्षण मंडळात अस्तित्वात असलेल्या पदाव्यतिरिक्त खालील नमुद केलेली पदे नव्याने निर्माण करणेस शिक्षण मंडळाने त्यांचे कडील ठराव क्. ११ दिनांक- २१/२/२००३ ने मान्यता दिलेली आहे. (सोबत त्याची प्रत जोडली आहे).

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन अधिक्षक | ०१ | रु. ५५००-१७५-९००० |
| २ | मुख्य लिपिक | ०१ | रु. ५५००-१७५-९००० |
| ३ | पर्यविक्षक | ०६ | रु. ४०००-१००-६००० |
| ४ | शिपाई कम वाचमेन | ०६ | रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ५ | लिपिक | १९ | रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ चे कलम २० व मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम ३६(२) मधील तरतूदीनुसार मंडळाचे प्रशासकीय कामकाज चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी प्राधिकृत नगरपालिकेने द्यावयाचे आहेत व त्यासाठी शिक्षण मंडळाने आस्थापना सूची तयार करुन त्यात आवश्यक पदनामे व वेतनश्रेणी नमुद करावयाची आहे. त्यानुसार शिक्षण मंडळाने ठराव पारित करुन उक्त पदांची मागणी केली आहे. शिक्षण मंडळाने प्रस्तावित केलेल्या आस्थापना सूचिस मंजुरी देऊन शासनाकडे पद मंजुरीचा प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात यावी.

महासभा ठराव क्र. ४१ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :-श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका शिक्षण मंडळ दि. 21.2.2003 चा ठराव क्र. 11 अनुषंगाने प्रस्तावित केलेल्या 33 विविध पदास शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषय क्र. २०:- श्री. अभिजित जयवंत महामुलकर यांची प्रोग्रामर (संगणक) या पदावर नियुक्तीस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रोगामर(संगणक) या पदनामाच्या एका पदाला मंजुरी मिळालेली आहे. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अविसां-१०२००३/प्र.क्र.२७/०३/नवि-४, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २७/२/२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व विभागाचे संगणकीकरण करावयाचे असल्याने प्रोगामर (संगणक) हे पद भरणे आवश्यक होते त्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवुन उमेदवारांची चालती मुलाखत दि.२२/५/२००३ रोजी महापालिका निवड समितीपुढे घेण्यात आली होती यात एकुण १३ उमेदवार उपस्थित होते त्यापैकी श्री अभिजीत जयवंत महामुलकर याची प्रोगामर या पदासाठी निवड केलेली आहे. कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.३/२८१, दिनांक २९ मे,२००३ नुसार श्री. अभिजीत जयवंत महामुलकर यांची प्रोगामर (संगणक) या पदावर नियुक्ती केलेली आहे. तरी सदर नियुक्ती आदेशाला महासभेची मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव महासभेपुढे सादर करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ४२</u> <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अभिजित जयवंत महामुलकर यांची निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे वय पात्रतेसंदर्भी अट शिथिल करुन त्यांना प्रोग्रामर (संगणक) या पदावर नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-
<u>एकमताने</u>
उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. २१:-उल्हासनगर शहरात जैविक घनकच-याची विल्हेवाट लावणे कामी अभिकर्ता नेमणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयाबाबत १०.२.२००३ रोजी महासभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा होवून प्रस्ताव फेरविचारासाठी प्रशासनाकडे पाठविण्यात आलेला होता. तदनंतर प्रशासनाने भिवंडी-निजामपुर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्याचा प्रस्ताव व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यांच्या प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्याच बरोबर उल्हासनगर मेडिकल असोसिएशन व इंडियन मेडिकल असोसिएशन उल्हासनगर शाखेचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा केली. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्याचा प्रकल्प कार्यान्वित झालेला असून सदर अभिकर्त्यांचे दर वाजवी आहेत. त्यामुळे मुळ प्रस्ताव रद्द करून कल्याण महापालिकेने नियुक्त केलेला अभिकर्ता मे.पी.आर.एस. एंटरप्रायजेस, नासिक यांचा प्रस्ताव स्विकृत करण्याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेने मे. पी. आर.एस. एंटरप्रायजेस नासिक यांचेशी खालील प्रमुख अटी व शर्तीस अधिन राहुन संविदा केलेली आहे.

१. बायो मेडीकल वेस्ट प्रकल्पासाठी लागणारी जमीन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने रू. १ प्रति चौरस मीटर प्रति वर्ष दराने अभिकर्त्यास उपलब्ध करून दिली आहे.
२. सदरच्या प्रकल्पासाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री ठेकेदाराने उपलब्ध करून दिली आहे.
३. शहरातील रूग्णालये, पॅथोलॉजीकल लॅब, रक्तपेढी, दवाखाना व इतर जागेतील बायोमेडीकल वेस्ट गोळा करण्याची व वाहून नेण्याची जबाबदारी अभिकर्त्यांवर सोपविण्यात आली आहे.
४. प्रकल्पासाठी लागणारे आवश्यक कर्मचारी वर्ग अभिकर्त्याने उपलब्ध करावयाचा असुन त्यांचे वेतन ठेकेदारानेच दयावयाचे आहे.
५. जैविक कचरा वाहतुक करून प्रक्रिया करणेसाठी खालीलप्रमाणे शुल्क रूग्णालये, पॅथालॉजीकल लॅब, नर्सिंग होम, रक्तपेढी इत्त्यादीच्या चालकाकडुन आकरण्यात येईल.
   रू. १५/- प्रतिकिलो पहिल्या ३ वर्षाकरिता प्रतिवर्षी ५ टक्के वाढ उर्वरित ७ वर्षाकरिता
६. वसुल करण्यात येणा-या शुल्कातून अभिकर्त्यास देय रक्कम खालील प्रमाणे आहे. रू. १२ पहिल्या ३ वर्षाकरिता
   २टक्के वाढ पुढील ३ वर्षाकरीता (४ ,५ , व ६ वर्षाकरिता)
   ४ टक्के शेवटच्या ४ वर्षाकरीता (७ ,८ ,९ व १० वर्षाकरिता)
   उर्वरीत रक्कम महापालिकेस प्रशासकीय शुल्क म्हणुन दये असेल.
७. सदरचा करार १० वर्षासाठी करण्यात आलेला आहे.

8- उल्हासनगर महानगरपालिकेने बायोमेडीकल वेस्ट ट्रिटमेंट ॲण्ड डिस्पोजल करीता स्वतंत्र प्रकल्प उभारावयाचा झाल्यास प्रकल्पास लागणारी जमीन उपलब्ध करून दयावी लागेल तसेच प्रकल्प उभारणीसाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेशी संपर्क साधला असता त्यांनी मे. पी.आर.एस. इन्टरप्रायजेस नाशिक यांनी उभारलेल्या कल्याण येथील प्रकल्पामध्ये जैविक कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. मे. पी.आर.एस. एन्टरप्रायजेस यांच्या प्रस्तावानुसार.........

१. उल्हासननगर महानगरपालिका क्षेत्रातील जैविक कचरा गोळा करून वाहतुक करण्याची जबाबदारी मे. पी. आर.एस. इन्टरप्रायजेस यांची राहील.
२. उल्हासनगर शहरातील रूग्णालये, पॅथॉलॉजिकल, लॅब, नर्सिंग होम, रक्तपेढी इत्यादी यांचेकडुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेप्रमाणेच शुल्क आकरण्यात येईल.
३. वसुल केलेल्या शुल्कापैकी अभिकर्त्यास कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ठरावाप्रमाणे
   रू. १२ पहिल्या ३ वर्षाकरीता
   २ टक्के वाढ पुढील ३ वर्षाकरीता (४ ,५ , व ६ वर्षाकरिता)
   ४ टक्के शेवटच्या ४ वर्षाकरीता (७ ,८ ,९ व १० वर्षाकरिता) देय असेल.
४. उर्वरित रक्कमेपैकी उल्हासनगर महानगरपालिका ५० टक्के रक्कम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस प्रशासकीय खर्च / स्वामीत्त्व हक्क म्हणुन देईल.
५. उल्हासनगर महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिका व पी.आर. एस. एंटरप्रायजेस यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करण्यात येईल.
६. सदरच्या कराराची मुदत १० वर्षे असेल.

प्रशासनाने उल्हासनगर मेडिकल असोसिएशन व इंडियन मेडिकल असोसिएशन, उल्हासनगर शाखा यांचेशी सदर विषयावर दिनांक २६, मे व २८ मे २००३ रोजी बैठक घेवून त्यांना याबददल सविस्तर माहिती दिलेली आहे, त्यांनीही सदर प्रस्तावाशी सहमती दर्शविलेली आहे.

सबब, बायो मेडीकल वेस्ट (मॅनेजमेंट हॅण्डलींग) रूल्स १९९८ मधील तरतुदी ची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता उल्हासनगर शहरातील जैविक कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी मे. पी. आर. एस. इन्टरप्रायजेस, नाशिक यांच्याशी वरील अटी व शर्तीच्या अधिन राहून निविदा न मागविता संविदा करण्यासाठी मंजुरी प्रदान करण्यात यावी.

<u>महासभा ठराव क्र. ४३</u>    <u>दिनांक:-२० ६ २००३</u>

सुचकाचे नाव :-डॉ. नीना नाथानी
अनुमोदकाचे नाव :-श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्ताव व परिस्थिती विचारात घेता उल्हासनगर शहरातील जैविक घनकचरा / व्यवस्थापन विल्हेवाट लावणेचे काम मे. पी. आर.एस. एन्टरप्रायझेस नाशिक, या अभिकर्त्याकरवी पार पाडणेसाठी वर नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून आयुक्तांस त्याच्याशी संविदेस प्राधिकृत करीत आहे. आणि प्रस्तावित शुल्कास व कल्याण डोंबिवली महानगरपालिका या प्राधिकरणाबरोबर सुचविलेल्या व्यवहारास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषय क्र. ११:- उल्हासनगर -२ मधील स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती गोवरीबेन पी. शाह'' असे नांव देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-२ मधील स्नेहा अपार्टमेंटते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) रस्त्याला '' स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त यात्री निवास व बगीच्याचे कोणतेही नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे स्नेहा अपार्टमेंट ते दादी मोरबाई रोड (वुडलॅंड रेस्टॉरंट) पर्यंतच्या रस्त्याला ''स्वर्गीय श्रीमती. गोवरीबेन पी. शाह'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

<u>महासभा ठराव क्र. ४४</u> <u>दिनांक:-२० ६ २००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील विषय या सभेच्या कार्यसूचीवरून वगळीत आहे.

<u>कारण</u> ——

सदर व्यक्तीचा पुर्व इतिहास व समाजकार्यासाठी योगदानाचा गोषवा-यात उल्लेख नाही म्हणुन त्यांच्या कार्याबाबतीत सविस्तर उल्लेख करून हा विषय कार्यसूचीवर आणला पाहिजे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

उपमहापौर। पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

### विषय क्र. २३:- ३९ सफाई कामगारांना मुकादम पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. उमपा/ २२९८/२०३०/प्र. क्र. २५० /९८/नवि-२३ मंत्रालय मुंबई -३२ दिनांक २८ सप्टेंबर,१९९९ अन्वये ४४ मुकादम पदावर मंजूर झालेली होती. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्रमांक उमपा/आवि/आस्था/२४५ ते२८३ दिनांक २२.२.२००१ अन्वये खालील ३९ सफाई कामगारांना ६ महिन्याच्या परिक्षावधीन कालावधीकरीता त्यांचे परीक्षाविधीन कामाचा समाधानकारक अहवाल जोपर्यंत प्राप्त होत नाही. तोपर्यंत त्यांची केलेली नेमणुक तात्पुरत्या स्वरूपाची राहील. जर परिक्षाविधीन कालावधीमध्ये त्यांचे काम असमाधानकारक आढळल्यास त्याची सेवा कोणतीही पुर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल अशा अटीवर मुकादम पदावर पदोन्नती करण्यात आली होती.

| अ. क्र. | सफाई कामगारांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. भगवानजी मोहन चव्हाण |
| २. | श्री. राजू शंकर हरीजन |
| ३. | श्री. जेठा काना मकवाना |
| ४. | श्री. मदनलाल अंगना चटोले |
| ५. | श्री. सखाराम कचरू मगरे |
| ६. | श्री. मनीराम ननुराम वाल्मीकी |
| ७. | श्री. रजनिस रामनिवास वाल्मीकी |
| ८ | श्री. कालीदास बालू चव्हाण |
| ९. | श्री. कांजी पुजा वाघेला |
| १०. | श्री. मुलजी विश्राम वाघेला |
| ११. | श्री. समुन लक्ष्मण शेलार |
| १२. | श्री. एकनाथ महादेव देवकर |
| १३. | श्री. भगवान रामभाऊ कसारे |
| १४. | श्री. रमेश सुखराम चव्हाण |
| १५. | श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडेराव |
| १६. | श्री. शशी रामप्रसाद चव्हाण |
| १७. | श्री. रामकिशन ताराचंद वाल्मीकी |
| १८. | श्री. रमेश सुमेरा वाल्मीकी |
| १९. | श्री. रमेश मख्खन चव्हाण |
| २०. | श्री. नामदेव केरू पाखरे |
| २१. | श्री. शालीक बळीराम मडवी |
| २२. | श्री. अशोक एस. खंडागळे |
| २३. | श्री. रामजी नारायण हरीजन |
| २४. | श्री. टील्लु रामभाऊ सोनवणे |
| २५. | श्री. दादू विठ्ठल गायकवाड |
| २६. | श्री. रामधारी सोरणदास हरीजन |
| २७. | श्री. सुरेश रामलाल हरीजन |
| २८. | श्री. इकबाल अहमद शेख |
| २९. | श्री. दिलीप प्रभाकर ससाणे |
| ३०. | श्री. देविदास त्रंबक केदार |
| ३१. | श्री. गौतम भाऊराव घोडेराव |
| ३२. | श्री. मनोहर भिमा भालेराव |
| ३३. | श्री. विलास शिवराम कांबळे |

| | |
|---|---|
| ३४. | श्री. राजेंद्र मख्खन चव्हाण |
| ३५. | श्री. फत्तुमल थावरदास कारा |
| ३६. | श्री. वासू टिकमदास फेरवानी |
| ३७. | श्री. राजेश मनविर बाळगुजर |
| ३८. | श्री. छिद्दी कन्हैया वाल्मीकी |
| ३९. | श्री. किशोर हिरालाल चव्हाण |

वरील मुकादम पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचा-यांचा परिक्षाविधीन कालावधी कामाचा समाधानकारक अहवाल संबंधित आरोग्य निरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेला आहे.

तरी वरील कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेण्याबाबत महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ४५ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मुकादम पदोन्नती देण्यांत आलेल्या ३९ कर्मचा-यांना कायम मुकादम पदावर सामावून घेणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर /पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

**विषय** क्र. २४**:-** **महापालिकेचे पात्र कर्मचा-यांना निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे पदोन्नती देणे बाबत.**

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

सहा.आयुक्त/प्रभाग क्षेत्र अधिकारी

सहा.आयुक्त/प्रभाग क्षेत्र अधिकारी या पदनामाची एकुण ६ पदे मंजुर आहेत त्यापैकी ५ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सहा.आयुक्त व प्रभागक्षेत्र अधिकारी या पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता महापालिकेच्या सेवेत अधिक्षक किंवा त्यांस समकक्ष असलेल्या पदावरील सात वर्षे काम केल्याचा अनुभव अशी आहे. परंतु महापालिकेच्या आस्थापनेवर अधिक्षक या पदनामाचे पद मंजुर नाही परंतु त्यांस समकक्ष असलेल्या पदाची वेतनश्रेणी घेत असलेल्या कर्मचा-यांमधुन श्री.व्ही.आर.गर्जे हे पात्र कर्मचारी उपलब्ध झाल्यामुळे निवड समितीने सहा.आयुक्त व प्रभागक्षेत्र अधिकारी या पदावर श्री. व्ही.आर.गर्जे यांना पदोन्नतीने नेमणुक करणेबाबत शिफारस केलेली आहे.

वाहन व्यवस्थापक:-

वाहन व्यवस्थापक या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व कनिष्ठ अभियंता (वाहन/मेकॅनिक) या पदावरील ३ वर्षाचा अनुभव अशी आहे.

वाहन व्यवस्थापक या पदासाठी श्री.व्ही.एस.ठाणेकर ,प्लान्ट ऑपरेटर हे अनु. जातीचे उमेदवार आवश्यक पात्रता धारण करीत आहेत त्यामुळे श्री.व्ही.एस.ठाणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

९) वरिष्ठ लिपीक :-

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद<br>
अनु.जमाती -१ पद<br>
वि.जा.(अ) -१ पद<br>
खुले -९ पदे

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता

१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण<br>
२) महापालिका सेवेत लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव अशी आहे.

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देणेकरिता गोपनिय अभिलेखांची पडताळणी केली असता त्यांच्या गोपनिय अभिलेखात

कोणत्याही प्रकारचे नकारात्मक शेरे आढळुन आलेले नाही तसेच त्यांची योग्यता पाहिली असता श्री. अशोक चव्हाण हे वि.जा.(अ) या आरक्षित पदावर पदोन्नती देणेस पात्र आहेत अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री.मधुकर कनोजे ,लिपीक,कर विभाग हे होते परंतु ते सद्या निलंबीत आहेत तरी सद्यस्थितीत त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही त्यांचेनंतर सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री. बिनुकुमार बिहारीलाल हे आहेत त्यांना अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नाही तसेच खुल्या प्रवर्गातुन पदोन्नतीसाठी खालिल नऊ पात्र कर्मचा-यांची निवड समिती शिफारस करीत आहे.



१) श्रीम. कोशी खेमाणी, लिपीका, सामान्य प्रशासन विभाग<br>
२) श्रीम. सुशिला मेठवाणी, लिपीका, कर विभाग<br>
३) श्रीम. शोभा आर. अहुजा, लिपीका,लेखा विभाग<br>
४) श्री. उमाशंकर मिश्रा, लिपीक, कर विभाग<br>
५) श्री. मनवाणी मनोहर, लिपीक, जकात विभाग<br>
६) श्री. राजकुमार पंजाबी, लिपीक, जकात विभाग<br>
७) श्री. एस.जे. मिरचंदानी, लिपीक, जकात विभाग<br>
८) श्री. लखो जी. पंजाबी, लिपीक, जकात विभाग<br>
९) श्री. शिवकुमार मंगलानी, लिपीक, लेखा परिक्षण विभाग

लिपीक संवर्गातुन पदोन्नतीसाठी निवड केलेले उपरोक्त कर्मचारी हे पदोन्नतीची वेतनश्रेणी घेत आहेत आता त्यांची फक्त पदोन्नतीच्या पदावर पदस्थापना करावयाची आहे.

१०) उपलेखापाल

उपलेखापाल या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेतील वरिष्ठ लिपीक किंवा त्यांस समकक्ष अशा पदावरील सेवेचा अनुभव.

उपलेखापाल या पदासाठी जकात निरीक्षक तसेच वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचा-यांमधुन श्री. तुकाराम तारदाळकर , जकात निरीक्षक या पदावर दिनांक ७/४/१९८६ पासुन कार्यरत आहेत व ते सेवाज्येष्ठ पात्र कर्मचारी असल्याने श्री. तुकाराम तारदाळकर यांना उपलेखापाल या पदावर पदोन्नती देणेस निवड समिती शिफारस करीत आहे.

११) स्वच्छता निरीक्षकः-

स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेंकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचे प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे.
२) महापालिकेच्या सेवेतील स्वच्छता निरीक्षक या पदावर कमीत कमी दहा वर्ष काम केल्याचा अनुभव.

सेवाप्रवेश नियमावलीनुसार स्व. निरीक्षक या पदासाठीचे गुणोत्तर प्रमाणानुसार एकुण पदाच्या २५ टक्के म्हणजे एकुण १८ पदापैकी ४ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यापैकी २ पदे यापुर्वीच भरली होती व आता २ पदे भरावयाची होती पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु. जमाती- १ पद
खुले - १ पद

महापालिकेच्या मंजुर आस्थापनेवरील खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर श्री. एम.के.पाटील ,लिपीक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी असुन ते इ.मा.प्रवर्गात मोडतात तसेच त्यांनी सदर पदासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे तरी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर पदोन्नतीस पात्र आहेत.

१२) वरिष्ठ सुरक्षारक्षकः-

वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु.जाती - १ पद
खुले - १ पद

--३--

सदर पदावर सुरक्षारक्षक या पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती द्यावयाची असल्याने श्री. बी. आर. बुरूड ,सुरक्षारक्षक हे खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर
पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत व सद्या ते पाणीपुरवठा विभागात कार्यरत आहेत. तसेच श्री. बिल्लु शंकर हे अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत परंतु संबंधित दोन्ही कर्मचारी हे सतत गैरहजर असतात त्यामुळे त्यांची सदर पदावर पदोन्नती देणेसाठी पात्रता नाही असे उपायुक्त (मुख्यालय) यांनी सुचित केले त्यामुळे त्यांच्या नावांचा विचार न करता पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु.जातीसाठी श्री.पी.डी. गुरखा,सुरक्षारक्षक हे आहेत परंतु ते मे महिन्यात सेवानिवृत्त होत असल्याने त्या पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु. जातीसाठी श्री. राजन खरात हे आहेत तसेच खुल्या प्रवर्गासाठी श्री. पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक हे पात्र उमेदवार आहेत
तरी श्री.राजन खरात व श्री.पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक यांची वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीस पात्र उमेदवार म्हणुन निवडसमितीने निवड केली आहे.

लिडींग फायरमनः-

लिडींग फायरमन या पदनामाची पदे हि पदोन्नतीने भरावयाची आहेत त्यापैकी पाच पदे यापुर्वीच पदोन्नतीने भरलेली आहेत व आता नऊ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) महापालिकेच्या सेवेतील फायरमन या पदावरील पाच वर्षाचा अनुभव तसेच शारिरीक दृष्टया पात्र.

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु.जमाती - २ पदे
वि.जा(अ) - १ पद

भ.ज.(क)   - १ पद
खुले       -७ पदे

फायरमन या पदासाठी आवश्यक प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण केलेल्या ज्या कर्मचा-यांची फायरमन या पदावर पाच वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे व लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीसाठी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या सात पदांवर खालिल पात्र कर्मचारी यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्री. व्ही.टी.पगारे, फायरमन, अनु.जाती
२) श्री. यशवंत एस. वाघ, फायरमन, इ.मा.व
३) श्री. बी.एम.जोशी, फायरमन, खुला
४) श्री. भिमराव खैरे, फायरमन, अनु.जाती
५) श्री. भागवत ए. पाटील, फायरमन, इ.मा.व
६) श्री. भास्कर टी. मिरपगारे,फायरमन, अनु.जाती
७) श्री. बी.बी.नेटके, फायरमन, अनु.जाती

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नती देण्यासाठी अनु. जमातीसाठी तसेच वि.जा.(अ) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदासाठी उमेदवार उपलब्ध नाहीत भ.ज. (क) या पदावर पदोन्नतीसाठी सुरेश मराळे हे उमेदवार उपलब्ध होत आहेत व ते लिडींग फायरमन या पदासाठी आवश्यक असलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार पात्र असल्यामुळे त्यांना सदर पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास  मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

--४--

<u>महासभा ठराव क्र.    ४६</u>                                        <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार निवड समितीने सुचविल्याप्रमाणे विविध पदावर वर उल्लेखिलेल्या पात्र कर्मचा-यांना पदोन्नती बाबत विषय या सभेच्या कार्यसूचीवरून वगळीत आहे.

**<u>कारण</u> ——**

१. विविध पदांच्या एकत्रित गोषवा-यामधून समजून येत नाही की कुठल्या पदासाठी निवड समितीचा काय सविस्तर अहवाल आहे.
२. प्रत्येक पदासाठी निवड समितीच्या सविस्तर अहवालासह स्वतंत्रपणे विषय कार्यसूचीवर आणले पाहिजे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.२५:- खाडाबदली पध्दतीने १८७ सफाई कामगार नेमणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण १५५० सफाई कामगारांची पदे मंजूर आहेत. सदर पदांना खालील प्रमाणे मंजूरी प्राप्त झालेली आहे.

विभागीय आयुक्त, मुंबई यांचेकडील दिनांक २९/९/१९६०, २९/१२/१९६२, ५/१/१९६३ अन्वये अनुक्रमे ४११, २४, ३९, १० या पदांना तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक ३०/७/१९७६ अन्वये ११०, ९० पदांना, प्रादेशिक संचालक, न.पा.प्रशासन, कोकण भवन यांचेकडील १३/४/१९८३ अन्वये ५५ पदांना, संचालक, न.पा. मुंबई २९/७/१९८९ अन्वये ३०५ पदे, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील ११/६/१९९९ व २८/९/१९९९ अन्वये अनुक्रमे २०० व ३०६ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे उल्हासनगर महानगरपालिकेतील सफाई कामगार या पदनामाची एकूण १५५० पदे मंजूर आहे.

सद्यस्थितीत १५५० मंजूर पदापैकी १२८३ पदे यापूर्वी स्थायी आस्थापनेवर भरलेली आहेत व २६७ पदे रिक्त आहेत.

बर्मन समितीच्या शिफारशीप्रमाणे खालीलप्रमाणे प्रत्यक्ष कामगारांची आवश्यकता आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्‌दीमध्ये एकूण प्रमुख रस्त्यांची लांबी १२५.१०किमी म्हणजेच १,२५,१०० मी. इतकी आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्‌दीमधील २५० लांबीचा रस्ता प्रति सफाई कामगारास स्वच्छतेसाठी दिल्यास एकूण ५०० सफाई कामगारांची आवश्यकता भासते व ३५० मी. रस्ता साफसाफईसाठी १ सफाई कामगारास दिल्यास एकूण ४१७ सफाई कामगार यांची आवश्यकता भासते. म्हणजेच सदरचे कर्मचारी वगळता अन्य सफाई कामगार यांच्या सेवा गटारे, शौचालये, गल्लीबोळे साफसफाई करण्यासाठी प्रभावीपणे वापरण्यात येतात. तथापी सद्यस्थितीत भरती करणेत आलेल्या सफाई कामगारांची संख्या ही उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ, रस्त्यांची लांबी, गटारे, शौचालये, गल्ली बोळे लक्षात घेता पुरेशी आहे. परंतु ऑक्टोंबर/नोव्हेंबर महिन्यामध्ये शालांत सुट्‌टीच्या कालावधीत व दिपावलीच्या सुट्‌टीच्या कालावधीत तसेच मार्च, एप्रिल व मे महिन्याच्या शालेय सुट्‌टयांच्या कालावधीत सफाई कामगारांची उपस्थिती कमी असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे. व त्यामुळे सफाई कामावर विपरीत परिणाम होवुन नागरी आरोग्य धोक्यात येण्याची संभावनाही लक्षात आलेली आहे. त्या अनुशंगाने महासभेमध्ये गैरहजर कर्मचा-यांच्या बदल्यात खाडाबदली किंवा बदली कामगार घेणेबाबत वेळोवेळी चर्चा झाली आहे.

मुंबई महानगरपालिकेत सदर बदली कामगारांना भरती करणे संबंधी निकष ठरविले गेलेले आहे. त्यामुध्ये एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के कर्मचारी खाडाबदली किंवा रजेच्या कालावधीसाठी बदली कामगार म्हणून भरणेबाबत निकष कायम करण्यात आलेले आहेत. वास्तविक पाहता एकूण मंजूर पदाच्या ३० टक्के बदली कामगार भरणे ही बाब लक्षात घेतली असता एकूण भरती केलेल्या कर्मचा-यांपैकी ३० टक्के कर्मचारी हे वेगवेगळया कारणामुळे गैरहजर राहतील व त्यांच्या बदल्यात ३० टक्के कर्मचारी हे खाडाबदली किंवा बदली कर्मचारी म्हणून नियुक्त करुन गैरहजर कर्मचा-यांच्या बदल्यात सफाईचे काम पुर्ण करुन घेता येईल अशी धारणा ठेवल्यास एकूण मंजूर पदापैकी ३० टक्के पदे म्हणजेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एकूण १५५० मंजूर पदांपैकी ३० टक्के पदे म्हणजेच ४६५ पदे ही बदली कामगारांने भरने आवश्यकता आहे. असे गृहीत धरले तरी प्रत्यक्ष १०८५ कर्मचारी (१५५०-४६५) हे स्थायी पदावर भरती करणे आवश्यक होते. मात्र सद्यस्थितीत १२८३ कर्मचारी हे स्थायी आस्थापनेवर भरती करणेत आलेले आहे. म्हणजेच सद्यस्थितीत भरलेले १९८ कर्मचारी हे जास्तीचे भरती केलेले आहे असे दिसते.

मा. सर्वोच्य न्यायालयाने याचिका क्र. ५४१/१९९९ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार मा.श्री. बर्मन यांचे अध्यक्षतेखाली समितीस सफाईकामाचे बाबत अहवाल सादर करणेबाबत सुचित केल्यानुसार बर्मन समितीने सादर केलेल्या अहवालाचे निकष लक्षात घेता सद्यस्थितीत भरती केलेले कर्मचारी १२८३ यांची संख्या लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे एकूण १३ चौ.किमी क्षेत्रफळ व रस्त्यांची लांबी (१२५

Running Meter) लक्षात घेता भरती केलेल्या कर्मचा-यांची संख्या जास्तीची दिसते. एकूण मंजूर पदांच्या ३० टक्के पदे मुंबई महानगरपालिकेच्या निकषांच्या आधारे खाडाबदलीसाठी भरती करणे ठरविल्यास एकूण ४६५ पदे खाडाबदलीसाठी भरणे अभिप्रेत आहे. म्हणजेच १५५० पैकी ७० टक्के पदे म्हणजेच १०८५ पदे स्थायी आस्थापनेवर व ४६५ पदे खाडाबदलीने अस्थायी आस्थापनेवर ठेवले असते तर ते महानगरपालिकेच्या हिताचे ठरले असते. मात्र सध्या स्थायी पदावर १२८३ पदे भरलेली असल्याने १९८ पदे स्थायी आस्थापनेवर जास्तीची भरलेली आहेत. तथापि बर्मन समितीच्या अहवालाचा विचार करता भरलेले १२८३ कर्मचारी हे ही जास्तीचे असून त्यापैकी गैरहजर राहणा-या कर्मचा-यामुळेच स्वच्छतेच्या कामावरती परिणाम होत आहे असे निदर्शनास आले आहे. व सर्व १२८३ कर्मचारी हे हजर असल्यास सफाई कामामध्ये सुधारणा होईल अशी धारणा आहे. त्यामुळे स्थायी आस्थापनेवर भरती केलेल्या १२८३ पदांच्या ३० टक्के पदे म्हणजेच ३८५ पदे खाडाबदलीने भरती केल्यास स्वच्छतेत सुधारणा होवू शकते व पैकी १९८ पदे ही आगोदरचं जास्तीची भरलेली आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेवर स्थायी आस्थापनेवर भरलेल्या कर्मचा-यांच्या ३० टक्के कर्मचारी म्हणजे ३८५ कर्मचारी व त्यामधून पूर्वी जास्तीचे भरलेले १९८ कर्मचारी वगळले असता १८७ कर्मचारी यांची खाडाबदलीने भरती केल्यास साईस्कर होईल. अशी प्रशासनाची धारणा आहे.

महाराष्ट्र शासन राज्य पत्र दि. २७ डिसेंबर,२००१ अन्वये महाराष्ट्र राज्य उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२, दि. २७.१२.२००१ ची अधिसूचना प्रसिध्द झालेली असून सदर अधिसूचनेमध्ये किमान वेतन अधिनियम -१९४८मधील तरतूदीनुसार परिमंडळ ३ साठी प्रतिमहा रक्कम रु. ३०००/- एवढे वेतन निश्चित करण्यात करण्यात आलेले आहे. उल्हासनगर महानगरपालिका ही परिमंडळ - ३ मध्ये समाविष्ठ होते. खाडाबदली कर्मचारी यांना त्यामुळे प्रत्येकी किमान १००/- रु. प्रतिदिन वेतन दयावे लागेल म्हणजेच १८७ खाडाबदली कर्मचारी यांना रक्कम रु. १८,७००/- प्रतिदिन व रक्कम रु. ५,७९,७००/- प्रतिमहा व रक्कम रु. ६९,५६,४००/- प्रति वर्ष वेतनावर खर्च होण्याची शक्यता आहे. याशिवाय प्रवास भत्यावर अंदाजे १ लाख रुपये खर्च होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे अंदाजपत्रकात सदर रकमांची तरतूद करणे आवश्यक आहे.

सबब खाडाबदलीने १८७ कर्मचारी भरती करणे, अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाची तरतूद करणे व खाडाबदलीची योजना अंमलबजावणी करणेसाठी प्रशासकीय कामकाज पूर्ण करणेसाठी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना प्रधिकृत करणेस्तव प्रस्ताव मा. महासभेपूढे सादर.

<u>महासभा ठराव क्र. ४७</u> <u>दिनांक:-२०.६.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाचे समायोजनाच्या अधीन राहून उपलब्ध अधिकृत सेवाजेष्ठता यादी प्रमाणे रितसर खाडाबदलीने १८७ सफाई कर्मचारी नेमणूक करणेस आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका
***<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>***

आयत्त्यावेळचा विषय क्र. २६:- मंजुर विकास योजनेतील आ. क्र. ६ खेळाचे मैदानाऐवजी सुधारित विकास योजनेतील आ. क्र ४४ व ४६ सामाजिक, सांस्कृतिक आणि कल्याणकारी सुखसोई आणि आ.क्र ४५, दुकान केंद्र आणि आ. क्र. ४७ भाग मनोरंजनासाठी खुली जागा विकसित करणेबाबत...

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना शासनाचे आदेश क्रमांक टीपीएस/६०/८५/आरपीसी. दिनांक १.७.१९७४ अन्वये मंजुर झालेले आहे. मंजुर विकास योजनेत आ. क्र. ६ खेळाचे मैदान यासाठी जागा आरक्षित केलेली आहे. सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र १९५४.०० चौ.मी. आहे. मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयाचे आदेश क्र. प्रशा/कॅम्प नं. १ व २ प्रभुमापक २/राखीव जागा दिनांक २६.३.१९८७ रोजी आरक्षित जमिनीचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेस दिलेला आहे. परंतु सध्या जागेवर मुख्य रस्त्यालगत काही अनाधिकृत बांधकामे झालेली असल्यामुळे ती पुर्णत: निष्कासित करून सदर आरक्षित भुखंडाचा विकास करणे प्रस्तावित आहे. मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. ६ खेळाचे मैदान या आरक्षणाऐवजी खालील प्रमाणे सुधारित प्रारूप विकास योजनेत बदल दर्शविलेला आहे.

| अ. क्र. | आ. क्र. | जागेचा वापर प्रारूप योजनेनुसार | एकुण क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | ४४ | सामाजिक, सांस्कृतिक आणि कल्याणकारी सुखसोई | २०००.०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत, उल्हासनगर-३ |
| २. | ४५ | दुकान केंद्र | २५००.०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत, उल्हासनगर-३ |
| ३. | ४६ | सामाजिक, सांस्कृतिक आणि कल्याणकारी सुखसोई | ३०००. ०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत, उल्हासनगर-३ |
| ४. | ४७ (भाग) | मनोरंजनासाठी खुली जागा (५७०० पैकी ३००० ताब्यात आहे) | ३०००.०० | न्यु टेलिफोन एक्सचेंज लगत, उल्हासनगर-३ |
| | | एकुण | १०५००.०० | चौ.मी. |

वरीष्ठ नियोजक उपप्रादेशिक कार्यालय, कल्याण संकुल, कल्याण यांनी दि. १०.५.२००१ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित विकास योजनेतील आरक्षणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे कारण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४६ चा विचार करता सुधारित विकास योजनेतील आरक्षणाचा विकास करणे अनुज्ञेय ठरते.

आरक्षित भुखंडाचा विकास करणेसाठी आरक्षित जागेचे नकाशे आणि अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असल्याने परवानाधारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत जाहिर प्रसिध्दीस स्पर्धात्मक नकाशे मागवून घेणे आवश्यक आहे.

याबाबत धोरणात्त्मक निर्णयासाठी महासभेसमोर अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सबब उक्त प्रस्ताव मंजूरी मिळणेसाठी महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ______ दिनांक:-२०.६.२००३

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहराकरीता सुधारीत प्रारूप विकास योजनेतील आरक्षण क्र. ४४ ते ४७ या आरक्षित जागांवरील प्रस्तावित विकासासाठी नकाशे व प्राकलने तयार करणेकामी, परवानाधारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत जाहिर प्रसिध्दीव्दारे नकाशे मागवून घेणेस आणि योजलेल्या विकासास महापालिका अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात आवश्यक अनुदानाच्या समायोजनेच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय क्र. २७:- विकास योजनेतील आरक्षणाच्या हददीस कुंपण भिंत बांधणे आणि आरक्षणाचा विकास करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना शासनाचे आदेश क्र. टीपीएस/६०/८५/आरपीएस. दिनांक १.७.१९७४ अन्वये मंजुर झालेली आहे. मंजुर विकास योजनेत खालीलप्रमाणे जागा आरक्षित केलेली आहे. सदर आरक्षित जागेचे मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यायाचे आदेश क्र. प्रशा/कॅम्प नं.१ व २ प्रभुमापक/राखीव जागा, दिनांक २६.३.१९८७ रोजी ताबा उल्हासनगर महानगरपालिकेस दिलेला आहे. उपरोक्त आरक्षणाखालील जागा पुर्णत: मोकळी असल्याने उल्हासनगर शहराच्या सुधारित विकास योजनेत खालीलप्रमाणे आरक्षणाचा समावेश केलेला आहे.

| अ. क्र. | आ.क्र. | उल्हासनगर मंजुर विकास आराखडानुसार जागेचा वापर | एकुण क्षेत्र (हेक्टर) | आ.क्र. | प्रारूप विकास आराखडानुसार जागेचा वापर | एकुण क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ५ | खेळाचे मैदान | ४.७५ | ३९ | मनोरंजनासाठी खुल्या जागा | २.२० | डी. डी. कालानी कॉलेज समोर उल्हासनगर-३ |
| २ | ९ | खेळाचे मैदान (पाण्याची टाकीचे बांधकाम सुरू आहे) | ०.८९ | ११८ | मनोरंजनासाठी खुल्या जागा | ०.८९ | इंदिरा गांधी मार्केट जवळील दसहेरा मैदान उल्हासनगर-३ |
| ३ | ५१ | प्राथमिक शाळा | ०.७२ | १ | शैक्षणिक सुविधा | ० .७२ | मुरबाड रोड नाक्या जवळील जागा, उल्हासनगर-१ |
| ४ | १ | खेळाचे मैदान (शेतीचा वापर सुरू आहे) | २.६९ | ३ | खुली जागा | २.४४ | मुरबाड रोड नाक्या जवळील जागा उल्हासनगर-१ |
| ५ | १४१ | मार्केट | ०.२५ | २<br>४ | वाणिज्य सामाजिक व सांस्कृतिक व कल्याणकारी | ०.२५<br>०.२५ | मुरबाड रोड नाक्या जवळील जागा उल्हासनगर-१ |

वरिष्ठ नियोजक उपप्रादेशिक कार्यालय, कल्याण संकुल, कल्याण यांनी दि. १०.५.२००१ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित विकास योजनेतील आरक्षणाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे कारण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४६ चा विचार करता सुधारित विकास योजनेतील आरक्षणाचा विकास करणे अनुज्ञेय ठरते.

आरक्षित भुखंडाचा विकास करणेसाठी आरक्षित जागेचे नकाशे आणि अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असल्याने परवानाधारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत जाहिर प्रसिध्दीव्दारे नकाशे मागवून घेणे आवश्यक आहे.

याबाबत धोरणात्त्मक निर्णयासाठी महासभेसमोर अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सबब उक्त प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र.          </u>                                   <u>दिनांक:-२० ६ २००३</u>

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहराकरीता सुधारीत प्रारूप विकास योजनेतील वर उल्लेखिलेल्या आरक्षित जागांवरील प्रस्तावित विकासासाठी नकाशे व प्राकलने तयार करणेकामी, परवानाधारक वास्तुविशारद / सल्लागार अभियंता यांचेमार्फत जाहिर प्रसिध्दीव्दारे नकाशे मागवून घेणेस आणि योजलेल्या विकासास महापालिका अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात आवश्यक अनुदानाच्या समायोजनेच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

उपमहापौर /       पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

**आयत्यावेळचा विषय क्र. २८ :-**प्रकाश ऑटो समोरील चौकाचे नांव ''लोकमान्य बाळ गंगाधर टिळक'' व दादा गोविंदराम आहुजा चौक, प्रकाश ऑटो ते युएमर्स समोरील चौकापर्यंत ''दादा गोविंदराम आहुजा मार्ग'' असे नामकरण करणेबाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

प्रकाश ऑटो समोरील चौकास ''लोकमान्य बाळ गंगाधर टिळक'' असे नांव देण्याकरिता नगरसेविका सौ. लक्ष्मीबाई रोहीदास ससाणे यांचा प्रस्ताव आलेला आहे.

तसेच संदर्भाधिन विषयानुसार प्रकाश ऑटो समोरील दादा गोविंदराम आहुजा चौक आणि प्रकाश ऑटो ते युएमसी समोरील चौकापर्यंत ''दादा गोविंदराम आहुजा मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत मा. नगसेवक श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के व श्री. राजेंद्र शांताराम चौधरी व श्रीमती. निता आहुजा यांचे दि. १५ ५ २००३ चे पत्रानुसार प्रस्त्ताव आलेला आहे.

तरी सदर चौकास व मार्गाचे नाव देण्याकरिता महासभेने निर्णय दयावा.

<u>महासभा ठराव क्र.          </u>                                   <u>दिनांक:-२० ६ २००३ .</u>

*सुचकाचे नाव :-*
*अनुमोदकाचे नाव :-*

*ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रकाश ऑटो समोरील चौकाचे नांव "लोकमान्य बाळ गंगाधर टिळक" व दादा गोविंदराम आहुजा चौक, प्रकाश ऑटो ते युएमर्स समोरील चौकापर्यंत "दादा गोविंदराम आहुजा मार्ग" असे नामकरण असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.*

*सुचकाची सही-*
*अनुमोदकाची सही-*

*एकमताने*

*उपमहापौर /पिठासिन अधिकारी*
*सर्वसाधारण महासभा*
*उल्हासनगर महानगरपालिका*

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ४:- श्री.उत्तम लोणारे यांची महापालिका सेवेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक उमपा/२२९८/२०३०/प्र.क्र.२५९/९८/नवि-२३/ दिनांक १३/ /२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर एकूण चार उपायुक्त पदनामाची पदे मंजुर आहेत पैकी सद्यस्थितीत एकूण दोन अधिकारी उपायुक्त पदावर कार्यरत आहेत.

महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक एमडीई ०१०३/८०५/आस्थापना-२ दिनांक ३१ मे, २००३ अन्वये श्री. उत्तम लोणारे याची या महापालिकेत उपायुक्त पदावर शासनाने नमूद केलेल्या अटी व शक्तीच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीवर नेमणुक केली आहे. त्यानुसार श्री. उत्तम शि. लोणारे हे या महापालिकेत दिनांक २.६.२००३ रोजी मध्यान्हपूर्व रूजु झालेले आहेत.

शासनाच्या धोरणाप्रमाणे प्रतिनियुक्तीचा कालावधी कमीत कमी ३ वर्षाचा असता त्या पुढील कालावधीसाठी शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यामुळे श्री. लोणारे यांना ३ वर्षासाठी उप आयुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्याचा प्रस्ताव मुंबईत प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार मान्यतेसाठी महासभेपुढे प्रस्तावीत करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र. ४९ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. कोमल भठिजा

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. उत्तम लोणारे यांची महापालिका सेवेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीवरील एका वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

**बहुमताने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ५:- श्री. व्ही. एस. ठाणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

वाहन व्यवस्थापक:-

वाहन व्यवस्थापक या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व कनिष्ठ अभियंता (वाहन/मेकॅनिक) या पदावरील ३ वर्षाचा अनुभव अशी आहे. वाहन व्यवस्थापक या पदासाठी श्री.व्ही.एस.ठाणेकर ,प्लान्ट ऑपरेटर हे अनु. जातीचे उमेदवार आवश्यक पात्रता धारण करीत आहेत त्यामुळे श्री.व्ही. एस.ठाणेकर यांची वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५० दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे श्री. व्ही.एस. ठाणेकर यांना वाहन व्यवस्थापक या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय क्र. ६:-</u> महानगरपालिका लिपिक संवर्गातुन सात कर्मचा-यांना वरीष्ठ लिपिक पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महपालिकेतील खुल्या प्रवर्गातील पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे आवश्यक आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

<u>वरिष्ठ लिपीक :-</u>

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु.जाती - १ पद
अनु.जमाती -१ पद
वि.जा.(अ) -१ पद
खुले -९ पदे

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता
१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेत लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव अशी आहे.

वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देणेकरिता गोपनिय अभिलेखांची पडताळणी केली असता त्यांच्या गोपनिय अभिलेखात
कोणत्याही प्रकारचे नकारात्मक शेरे आढळुन आलेले नाही तसेच त्यांची योग्यता पाहिली असता श्री. अशोक चव्हाण हे वि.जा.(अ) या आरक्षित पदावर पदोन्नती देणेस पात्र आहेत अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री.मधुकर कनोजे ,लिपीक,कर विभाग हे होते परंतु ते सद्या निलंबीत आहेत तरी सद्यस्थितीत त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही त्यांचेनंतर सेवाज्येष्ठ कर्मचारी श्री. बिनुकुमार बिहारीलाल हे आहेत त्यांना अनु.जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नाही तसेच खुल्या प्रवर्गातुन पदोन्नतीसाठी खालिल नऊ पात्र कर्मचा-यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्रीम. कोशी खेमाणी, लिपीका, सामान्य प्रशासन विभाग

२) श्रीम. सुशिला मेठवाणी, लिपीका, कर विभाग
३) श्रीम. शोभा आर. अहुजा, लिपीका,लेखा विभाग
४) श्री. उमाशंकर मिश्रा, लिपीक, कर विभाग
५) श्री. मनवाणी मनोहर, लिपीक, जकात विभाग
६) श्री. राजकुमार पंजाबी, लिपीक, जकात विभाग
७) श्री. एस.जे. मिरचंदानी, लिपीक, जकात विभाग



८) श्री. लखो जी. पंजाबी, लिपीक, जकात विभाग
९) श्री. शिवकुमार मंगलानी, लिपीक, लेखा परिक्षण विभाग

लिपीक संवर्गातुन पदोन्नतीसाठी निवड केलेले उपरोक्त कर्मचारी हे पदोन्नतीची वेतनश्रेणी घेत आहेत आता त्यांची फक्त पदोन्नतीच्या पदावर पदस्थापना करावयाची आहे.
तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५१ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे महापालिका लिपिक संवर्गातुन उपरोक्त ११ कर्मचा-यांना वरिष्ठ लिपिक पदोन्नतीच्या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ७:- श्री. राजन खरात व श्री. पी. बी. शिंदे यांना वरीष्ठ सुरक्षा रक्षक या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

वरिष्ठ सुरक्षारक्षक:-

वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद

खुले - १ पद

*सदर पदावर सुरक्षारक्षक या पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती द्यावयाची असल्याने श्री. बी. आर. बुरूड ,सुरक्षारक्षक हे खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर* पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत व सद्या ते पाणीपुरवठा विभागात कार्यरत आहेत. तसेच

*श्री. बिल्लु शंकर हे अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठ कर्मचारी आहेत परंतू संबंधित दोन्ही कर्मचारी हे सतत गैरहजर असतात त्यामुळे त्यांची सदर पदावर पदोन्नती देणेसाठी पात्रता नाही असे उपायुक्त (मुख्यालय) यांनी सुचित केले त्यामुळे त्यांच्या नावांचा विचार न करता पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु.जातीसाठी श्री. पी.डी.गुरखा ,सुरक्षारक्षक हे आहेत परंतु ते मे महिन्यात सेवानिवृत्त होत असल्याने त्या पुढील सेवाज्येष्ठ कर्मचारी अनु.जातीसाठी श्री. राजन खरात हे आहेत तसेच खुल्या प्रवर्गासाठी श्री. पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक हे पात्र उमेदवार आहेत*

*तरी श्री.राजन खरात व श्री.पी.बी.शिंदे ,सुरक्षारक्षक यांची वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदावर पदोन्नतीस पात्र उमेदवार म्हणुन निवडसमितीने निवड केली आहे.*

महासभा ठराव क्र. ५२ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे श्री. राजन खरात व श्री. पी. व्ही. शिंदे महापालिका सुरक्षा रक्षक यांना वरिष्ठ सुरक्षा रक्षक या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. ८:-** श्री. एम.के. पाटील लिपिक यांना स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

**स्वच्छता निरीक्षक:-**

स्वच्छता निरीक्षक यापदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेंकडील स्वच्छता निरीक्षक या पदाचे प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे.

२) महापालिकेच्या सेवेतील स्वच्छता निरीक्षक या पदावर कमीत कमी दहा वर्ष काम केल्याचा अनुभव.

सेवाप्रवेश नियमावलीनुसार स्व. निरीक्षक या पदासाठीचे गुणोत्तर प्रमाणानुसार एकुण पदाच्या २५ टक्के म्हणजे एकुण १८ पदापैकी ४ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यापैकी २ पदे यापुर्वीच भरली होती व आता २ पदे भरावयाची होती पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु. जमाती- १ पद<br>
खुले - १ पद

महापालिकेच्या मंजुर आस्थापनेवरील खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर श्री. एम.के.पाटील ,लिपीक हे सेवाज्येष्ठ कर्मचारी असुन ते इ.मा.प्रवर्गात मोडतात तसेच त्यांनी सदर पदासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे तरी खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर पदोन्नतीस पात्र आहेत.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५३ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी
अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण

gh egklHkk ojhy izLrkousvuqlkj deZpkjh fuoM lferhP;k f'kQkj'khizek.ks Jh- ,e-ds- ikVhy fyfid ;kauk LoPNrk fujh{kd ;k inkoj inksUurh ns.ksl ekU;rk nsr vkgs-

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ९:- श्री. तुकाराम तारदाळकर जकात निरिक्षक यांना उप लेखापाल या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

उपलेखापाल

उपलेखापाल या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती - १ पद

सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी.परिक्षा उत्तीर्ण

२) महापालिका सेवेतील वरिष्ठ लिपीक किंवा त्यांस समकक्ष अशा पदावरील सेवेचा अनुभव.

उपलेखापाल या पदासाठी जकात निरीक्षक तसेच वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचा-यांमधुन श्री. तुकाराम तारदाळकर , जकात निरीक्षक या पदावर दिनांक ७/४/१९८६ पासुन कार्यरत आहेत व ते सेवाज्येष्ठ पात्र कर्मचारी असल्याने श्री. तुकाराम तारदाळकर यांना उपलेखापाल या पदावर पदोन्नती देणेस निवड समिती शिफारस करीत आहे.

महासभा ठराव क्र. ५४ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

gh egklHkk ojhy izLrkousvuqlkj deZpkjh fuoM lferhP;k f'kQkj'khizek.ks Jh- rqdkjke rkjnkGdj tdkr fufj{kd ;kauk mi ys[kkiky ;k inkoj inksUurh ns.ksl ekU;rk nsr vkgs-

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १० :- आठ पात्र कर्मचा-यांना लिडिंग फायरमन या पदावर पदोन्नती देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय दिनांक १३ जुन,२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालिल काही पदांना नव्याने मंजुरी मिळालेली आहे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दिनांक ३० मार्च,२००३ पर्यत मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरणेबाबत दिनांक ३० जुन,२००३ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच महपालिकेतील खुल्या प्रवर्गातील पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे आवश्यक आहे. त्यानुसार खालिलप्रमाणे विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसंबंधी निवड समितीने शिफारस केलेली आहे

लिडींग फायरमन:-

लिडींग फायरमन या पदनामाची पदे हि पदोन्नतीने भरावयाची आहेत त्यापैकी पाच पदे यापुंर्वीच पदोन्नतीने भरलेली आहेत व आता नऊ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) महापालिकेच्या सेवेतील फायरमन या पदावरील पाच वर्षाचा अनुभव तसेच शारिरीक दृष्टया पात्र.

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जमाती - २ पदे
वि.जा(अ) - १ पद
भ.ज.(क) - १ पद
खुले -७ पदे

फायरमन या पदासाठी आवश्यक प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण केलेल्या ज्या कर्मचा-यांची फायरमन या पदावर पाच वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे व लिडींग फायरमन या पदावर पदोन्नतीसाठी

खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या सात पदांवर खालिल पात्र कर्मचारी यांची निवड समिती शिफारस करीत आहे.

१) श्री. व्ही.टी.पगारे, फायरमन, अनु.जाती
२) श्री. यशवंत एस. वाघ, फायरमन, इ.मा.व
३) श्री. बी.एम.जोशी, फायरमन, खुला
४) श्री. भिमराव खैरे, फायरमन, अनु.जाती
५) श्री. भागवत ए. पाटील, फायरमन, इ.मा.व
६) श्री. भास्कर टी. मिरपगारे,फायरमन, अनु.जाती
७) श्री. बी.बी.नेटके, फायरमन, अनु.जाती

लिडींग फायरमन या पदावर पदोन्नती देण्यासाठी अनु. जमातीसाठी तसेच वि.जा.(अ) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदासाठी उमेदवार उपलब्ध नाहीत भ.ज. (क) या पदावर



पदोन्नतीसाठी सुरेश मराळे हे उमेदवार उपलब्ध होत आहेत व ते लिडींग फायरमन या पदासाठी आवश्यक असलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार पात्र असल्यामुळे त्यांना सदर पदावर पदोन्नती देणेस निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी महासभेपुढे प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ५५ दिनांक:-१८.७.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

gh egklHkk ojhy izLrkousvuqlkj deZpkjh fuoM lferhP;k f'kQkj'khizek.ks mijksDr 8 ik= deZpk&;kauk fyMhax Qk;jeu ;k inkoj inksUurh ns.ksl ekU;rk nsr vkgs-

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ११:- उल्हासनगर शहर सुधारित प्रारूप विकास योजना आराखडयातील आरक्षण क्रमांक ४४ ते ४७ वरील जागा आरक्षित प्रयोजनासाठी विकसित करणे बाबत.

प्रस्तावना :-

fu/kkZjd vkf.k ladyd o mi vk;qDr ¼Ógj½ ;kauk ;k foHkkxkps v/kZlekl Kkiu i= dzekad meik@ysifo@dj foHkkx @82 fnukad 21@2@2003 o Ik= dzekad meik @ ysifo @ 83 fnukad 3@3@03 vUo;s dGfoys vlwu ;kckcrpk IfoLrj vgoky ek- vk;qDr ;kauk i= dz- meik@ysifo@16 fnukad 10@3@03 vUo;s Iknj dsyk vkgs- Jh- ts- ds- bljkuh ;kauk vknsÓ dzekad meik@lkizfo@vkLFkk@Vs- 4@93 fnukad %& 25@3@2003 vUo;s fuyafcr dsys vkgs-

## vk{ksi dzekad %& 2 <u>Jh- Hkxoku mnklh]olqyh fyihd]dj foHkkx ;kauh vigkjhr dsysY;k jDde # - 27538@&</u> P<u>;k vigkjkckcr-</u>

ekyeRrk dj foHkkxkrhy olqyh fyihd Jh- Hkxoku mnklh] ;kauh ekyeRrk djksikVh olqy dsysyh jDde #-27538@&¼ # -lRrkohl gtkj ikpÓs vMrhl ek=½ pk Hkj.kk egkikfydk dksÔkxkjkr dsysyk ukgh R;keqGs Inj jdespk R;kauh dk;e Lo#ih vigkj dsY;kps fnlwu vkY;kus Injph vigkjhr jDde laca/khrkdMwu rkRdkG olqy d#u egkikfydsP;k dksÔkxkjkr Hkj.kk dj.;kckcr o InjP;k jdesP;k vigkjkckcr laca/khrkoj ;ksX; rh dkjokbZ dj.;kckcr mivk;qDr ¼Ógj½ ;kauk ;k foHkkxkps v/kZlekl Kkiu i=-dz- 20 fnukad %& 19@3@03 vUo;s dGfoys vkgs- ofjy vigkfjr jDde Jh- Hkxoku mnklh ;kapsdMwu olwy d#u egkikfydk dksÔkxkjkr Hkj.kk dsY;kp mi&vk;qDr ¼Ógj½ ;kauh R;kaps i-dz- meik@dj@403 fnukad 18@8@03 vUo;s dGfoys vkgs- Jh-Hkxoku mnklh ;kauk izÓklukus fuyafcr dsys vkgs-

## vk{ksi dzekad %& 3 <u>Jherh- feuk flrykuh jks[kiky ;kauh dsysY;k jDde #- 3010@& P;k vigkjk ckcr</u>

ekyeRrk foHkkxkrhy Jh- vkseizdk'k xqjukuh ;kauh fnukad 31<u>@3@2002</u> jksth ikorh iqLrd dzekad 980 ef/ky ikorh dzekd 97907 vUo;s #- 3010@& ¼#Ik;s rhu gtkj ngk QDr½ olwy dsysyh jDde R;kauh R;kp fno'kh dj foHkkxkrhy jks[kiky Jhe -feuk flrykuh ;kapsdMs tek dsyh iajrq Jhe feuk flrykuh ;kauh Injph jDde #Ik;s 3010 ¼#Ik;s rhu gtkj ngk½ ek= gh egkikfydk dks"kkxkjkr Hkj.kk dsysyh ulY;kus Inj jDdespk Iqd`r n'kZuh vigkj >kY;kps fnIqu vkY;kus ;kckcr ;ksX; rks [kqykIk Rojhr dj.;kdfjrk o Injph jDde laca/khrkadMwu rkRdkG olwy d#u egkuxjikfydsP;k dks"kkxkjkr tek d#u rlk vgoky ns.;kdfjrk ;k foHkkxkps v/kZlekl Kkiu i- dz- tk- dz meik@ysifo@ djfoHkkx @vlKk@ 81 fnukad %&23@1@03 vUo;s ekyeRrk dj foHkkxkl dGfoys vkgs ijrq R;kauh vk{ksikps fujkdj.k dsysys ukgh-

gh LFkk;h lferh eq[; ys[kk ifj{kdkus ekgs ekpZ] 2003 i;Zar tek [kpkZpk lknj dsysyk vgoky ikgqu Nkuuh varh iz'kklukl ys[;kaP;k ckcrhr ojhy fofuZnh"V dsysys v;ksX; o fo/kh vxzkg; izdkjkeqGs lacaf/kr dekZpk&;kfo#/n [kkrsfugk; pkSd'kh clfo.ks fdaok xqUgk nk[ky dj.ksl vkns'k djhr vkgs vkf.k gk vgoky egklHksiq<s izLr`r dj.ksl funsZf'kr djhr vkgs-

lqpdkph lgh@&

vuqeksndkph lgh@&

**,derkus**

lHkkirh @ fiBklhu vf/kdkjh
LFkk;h lferh lHkk
mYgkluxj egkuxjikfydk

---

*महासभा ठराव क्र.* ६९ *दिनांकः-१९.९.२००३.*

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी

ही महासभा मुख्य लेखा परीक्षकांचे माहे मार्च, २००३ पर्यंतचा जमाखर्चाच्या अहवाला बाबी वरील स्थायी समिती ठराव क्र. ७१, दि. २८.८.२००३ व्दारे केलेला आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

*विषय क्र. ४:-* विद्युत विभागाचे दोन तारतंत्री पदांचे पदनाम बदलणे बाबी स्थायी समितीचा ठराव क्र. ६५, दिनांक २८.८.२००३ कायम करणे.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर महानगरपालिका शहरात दिवाबत्ती दुरूस्तीचे कार्य विभागीय कर्मचा-यांमार्फत करतात यासाठी विद्युत विभागाकडे ७ सेवावाहन आहेत आणि त्यासाठी ७ वाहनचालकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

परंतु वाहनचालक अनुपस्थित राहिला तर वाहने बंद राहतात. त्याच्या परिणामस्वरूपात शहराच्या दिवाबत्ती दुरूस्तीचे कार्य होत नाही आणि दुस-या दिवशी तक्रारीची संख्या वाढते.

याकारणे विद्युत विभागाने अशी विनंती केलेली आहे की, त्यांच्या विभागात दोन तारतंत्री १. श्री. कृष्णा पावशे २. श्री. बन्सीलाल जैस्वार यांच्याकडे वाहन चालकाचा परवाना आहे. त्यांना अनुपस्थितीत सेवावाहन चालविण्याची परवानगी मिळावी.

वरील संदर्भात प्रशासन अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१. तारतंत्री व वाहनचालक या दोन्हीही पदांची वेतनश्रेणी एकच आहे. व ती वेतन श्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० आहे. त्यामुळे कोणत्याही आर्थिक लाभ या कर्मचा-यांना मिळणार नाही.
२. दोन्ही ही वर्ग ३ चे कर्मचारी आहेत. परंतु त्यांच्या कार्यात फरक आहेत.
३. विद्युत विभागाने केलेली मागणी तक्रारीचे शिघ्रगतीने निराकरण होणारे दृष्टीने योग्य आहे.
४. विद्युत विभागाची गरज लक्षात घेता जर हया दोन तारतंत्रीचे पदनाम बदलून तारतंत्री/ वाहनचालक पदनाम करण्यात आले तर त्यांना वाहनचालविण्याची परवानगी देण्यास हरकत राहणार नाही.

वरील बाबी लक्षात घेता श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन त्यांच्या सध्याची वेतन श्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० यात तारतंत्री / वाहनचालक पदनाम मंजुरीसाठी हा प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्यात आला होता व स्थायी समितीने ठराव क्र. ६५ दिनांक २८.८.२००३ अन्वये विद्युत विभागातील कर्मचारी श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन त्यांची सध्याची वेतनश्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० यात तारतंत्री / वाहनचालक पदनाम देणेस मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महासभे पुढे कायम करण्यासाठी सादर.



<u>महासभा ठराव क्र.</u> ७० <u>दिनांकः-१९.९.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलेरजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे

ही महासभा वरील स्थायी समिती ठराव क्र. ६५ दि. २८.८.२००३ प्रमाणे विद्युत विभागातील उल्लेखिलेल्या २ कर्मचा-यांकरिता त्यांचे तारतंत्री पदाऐवजी तारतंत्री / वाहनचालक असे पदनाम देणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>
अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र ५ :-** महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदाची वेतनश्रेणी फेरनिश्चित करणे बाबी स्थायी समितीचे ठराव क्र. ६० दि. २८.८.२००३ कायम करणे.

**प्रस्तावना :-**

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. उमपा ११९८/२०३०/प्र. क्र. २५९/९८/नवि-२३, दिनांक १३.६.२००३ अन्वये सहाय्यक संचालक, नगररचना हे एक पद रू. ८०००-१२५-१३५०० या वेतनश्रेणीत निर्माण केले आहे. सदर रिक्त पदावर नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळवुन सक्षम अधिका-याची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करणेबाबत विनंती केली होती. नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले आहे की, सहा संचालक, नगररचना या पदाची वेतनश्रेणी रू. १००००-३७५-१५२०० अशी आहे.

या महानरपालिकेने सहा, संचालक, नगररचना हे पद रू. ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत निर्माण केलेले आहे. त्यास शासनाने दि. १३.६.२००२ च्या आदेशान्वये मंजुरी दिलेली आहे. सबब, सदर पदाची या महापालिकेला आवश्यकता असल्याने सदर पदाची वेतनश्रेणी रू. ८०००-२७५-१३५०० वरून रू. १००००-३२५-१५२०० या वेतनश्रेणीत आणणेकामी मंजुरी मिळणेस स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६०** **दिनांक:-२८.८.२००३**

सुचकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंदकुमार

वरील प्रस्ताव विचारात घेता ही स्थायी समिती महापालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदाची वेतनश्रेणी रू. ८०००-२७५-१३५०० वरून रू. १०,०००-३२५-१५२०० या वेतनश्रेणीत आणणे कामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**एकमताने**

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

........................................................................................................

महासभा ठराव क्र. ७१ दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. होशियारसिंग लबाना
अनुमोदकाचे नाव :-श्री. भालेराव गौतम

ही महासभा महापालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदी रू. १०,०००-३२५-१५२०० वेतनश्रेणी बसविणेस मंजुरी देवून वरील स्थायी समिती ठराव क्र. ६० दि. २८.८.२००३ कायम करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.६ :- महापालिकेतील २ कनिष्ठ अभियंता श्री. यु. के. नारवाणी व श्री. बी. जे. भटीजा यांना, उपअभियंता या पदावर पदोन्नती देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवर उप-अभियंता (सा.बा.वि) या संवर्गामध्ये एकूण १० पदे मंजुर आहेत. त्यातील २ पदे सरळ सेवेने व ८ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सरळ सेवेची दोन्ही पदे रिक्त आहेत. पदोन्नतीने भरावयाची ५ पदे रिक्त आहेत. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९७ प्रकरण क्रमांक ६३/९७/१६-ब दिनांक १८.१०९७ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पदोन्नतीतील बिंदु नामावलीनुसार पदोन्नतीची पदे भरणे आवश्यक आहे.

उप अभियंता (स्थापत्य) या पदाच्या सेवा भरती नियमानुसार सरळ सेवा व पदोन्नती याचे प्रमाण ३ : १ असे आहे. त्यानुसार एकूण मंजुर १० पदांपैकी ८ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. शासनाच्या दिनांक १८.१०.९७ तील आदेशानुसार खुल्या प्रवर्गासाठी ६७ टक्के व राखीव प्रवर्गातील ३३ टक्के असे प्रमाण आहे. त्यानुसार ८ पदोन्नतीच्या पदांपैकी ३ पदे राखीव व ५ पदे खुल्या प्रवर्गातील आहेत

राखीव प्रवर्गातील अ.जा. या प्रवर्गातील १ पद भरलेले आहे. अनु. जमाती साठी व भटक्या जमातीसाठी उमेदवार नसल्याने सदर पदे भरता येणार नाही. दिनांक ११.७.२००३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका कार्यालयातील पदोन्नतीने भरावयाची रिक्त पदे भरण्यासाठी निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यात खुल्या प्रवर्गातील ५ जागांपैकी ३ जागा यापूर्वीच पदोन्नतीने भरलेल्या आहेत. आता दोन जागा रिक्त असून जेष्ठतेनुसार श्री. यु. के. नारवाणी व श्री. बी. जे. भटीजा, कनिष्ठ अभियंता हे महापालिकेच्या सेवाप्रवेश नियमावलीनुसार उप-अभियंता या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असल्याने त्यांना उप अभियंता या पदावर पदोन्नती देण्याची निवड समितीने शिफारस केलेली आहे.

तरी निवड समितीने केलेल्या निवडीचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ७२ दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे निवड समिती शिफारशीला अनुसरून श्री. यु. के. नारवानी व श्री. बी. जे. भाटिजा कनिष्ठ अभियंता यांना उप अभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.७ :- श्री. नितेश प्रकाश रंगारी, यांची कर निरीक्षक या पदासाठी नियुक्ती रदद करणे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. बी.सी. सी. २००२/१३०६/१६/ब दिनांक २६ मार्च, २००३ मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दिनांक ३० जुन, २००३ पर्यंत मुदत दिलेली होती. त्यानुसार महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवा योजन कार्यालय ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर तसेच विदयार्थी रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई यांच्याकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या महापालिकेने गठित केलेल्या निवड समितीने माहे जुन, २००३ मध्ये मुलाखती घेवून गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करून त्याची यादी व प्रतिक्षा यादीस महापालिका महासभा ठराव क्र. ५९ दिनांक १८.७.२००३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत सदर उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्त्या. करनिरिक्षक (अनु. जमाती) १ पद भरावयाचे होते व त्यासाठी गुणवत्तेनुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची निवड केली होती. सदर उमेदवाराच्या निवडीस दिनांक २० जुन, २००३ रोजी झालेल्या महासभेच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली. त्यानंतर सदर उमेदवारास दिनांक ३० जुलै, २००३ रोजी आदेश पाठविले होते. त्यानुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी हे दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी कर निरिक्षक या पदावर रूजु झाले.

सेवाप्रवेश नियमावलीमध्ये कर निरिक्षक या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जकात / कर विभागात ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असावा असे नमुद केले आहे.

सदरच्या नियमावलीनुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची शैक्षणिक पात्रतेविषयी कागदपत्रांची पडताळणी केली असता, सेवा भरती नियमाप्रमाणे कर निरिक्षक या पदाची अर्हता धारण करीत नसल्यामुळे जा. क्र. उमपा/सा.प्र.वि/आस्था/मुली/१२० दिनांक १८ ऑगस्ट, २००३ च्या आदेशान्वये त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

सदर आदेशाविरूध्द श्री. नितेश प्रकाश रंगारी यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ३०३०७५/०३ दाखल केली आहे.

सदर प्रस्ताव महासभेच्या माहितीकरीता सादर.

--२--

महासभा ठराव क्र. ७३ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाधीन राहुन श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची कर निरीक्षक या पदावरील नियुक्ती रद्द करणे संबंधी आयुक्तांनी केलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ८:- श्री. दिनेश सोनाजी गावित यांची कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदासाठी नियुक्ती रद्द करणे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. बी.सी. सी. २००२/१३०६/१६/ब दिनांक २६ मार्च, २००३ मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी दिनांक ३० जुन, २००३ पर्यंत मुदत दिलेली होती. त्यानुसार महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवा योजन कार्यालय ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर तसेच विदयार्थी रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई यांच्याकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या महापालिकेने गठित केलेल्या निवड समितीने माहे जुन, २००३ मध्ये मुलाखती घेवून गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करून त्याची यादी व प्रतिक्षा यादीस महापालिका महासभा ठराव क्र. ३८ दिनांक २०.६.२००३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर निवड यादीमधील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या संवर्गातील पदाचा समावेश होता. त्यानुसार अनुसूचित जाती या प्रवर्गातील श्री. दिनेश सोनाजी गावीत यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/सा.प्र.वि/आस्था/मुली/७६, दिनांक २५.७.२००३ अन्वये

नियुक्ती आदेश दिले. त्या आदेशानुसार श्री. दिनेश सोनेजी गावीत हे दिनांक १८. २००३ रोजी मुळ कागदपत्रासह रूजु होण्यासाठी कार्यालयात आले असता, कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी त्यांच्या कागदपत्राची पहाणी केली. सदर उमेदवाराकडे महापालिका सेवाभरती नियमावलीमध्ये नमुद केलेली विद्युत अभियांत्रिकी पदविका (Diploma in electrical Engineering) ही शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे श्री. दिनेश सोनाजी गावीत यांना रूजु करून घेतले नाही आणि कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/९८ दिनांक ५.८.२००३ च्या आदेशान्व्ये त्यांची नियुक्त रदद करण्यात आली.

सदर बाब महासभेच्या माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ७४ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. दिनेश सोनाजी गावीत यांची कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावरील नियुक्ती रदद करणे संबंधी आयुक्तांनी केलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.९ :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर पर्यंत लिंक रस्त्याचे काम वगळणे.

प्रस्तावना :-

राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर जवळील कल्याण अंबरनाथ रस्त्यापर्यतचा लिंग रस्त्याचे कामाचे प्रस्ताव मा. महासभेची दिनांक १६.११.२००२ च्या बैठकीपुढे सादर केला होता. परंतु बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली. परंतु निर्णय झाला नाही. सदर कामासाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण कडून कर्ज घेतले असुन सदर कर्जाचे व्याज व हप्ते महापालिका भरत असल्याने सदर काम लवकरात-लवकर पुर्ण होण आवश्यक आहे.

मा. विरोधी पक्ष नेते श्री. राजेंद्र शां. चौधरी यांनी त्यांच्या दिनांक १३.६.२००३ च्या पत्रान्वये सदर विषय पुन्हा महासभेपुढे ठेवणेकरिता विनंती केली आहे.

कृपया उक्त प्रस्तावावर निर्णय होण्यासाठी महासभेच्या पटलावर पुनश्च ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ७५ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. अंकुश म्हस्के

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ मधील शांतीनगर ते पवई या रस्त्याचे पुढील काम राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील फर्निचर पर्यंत लिंक रस्त्याचे काम वगळीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.१० :- उल्हासनगर येथील पॅनल क्र. ११ मधील बॅरेक नं. १९३५ ते ३६ च्या बाजुला असलेल्या चौकास'' ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नाव देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर येथील पॅनल नं. ११ मधील बॅरेक नं. १९३५-३६ च्या बाजूला असलेल्या चौकाचे नाव ''ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकास कोणताही कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकास '' ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ७६ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. मोना वनवारी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर येथील पॅनल क्र. ११ मधील बॅरेक नं. १९३५ ते ३६ च्या बाजुला असलेल्या चौकास'' ओ.टी. सेक्शन पंचायत चौक'' असे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ११:- उल्हासनगर येथिल पॅनल क्र. ११ मधील बॅ. क्र. २०९९ च्या रूम क्र. १२ जवळील चौकास "कैलासवासी श्री. दयाल चंदनमल वाधवा" असे नाव देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-५ येथील बॅ. नं. २०९९ च्या रू. नं. १२, जवळील चौकास स्थानिक पत्रकार व प्रभाराम मंदीराचे पुजारी "के. श्री. दयाल चंदनमल वाधवा चौक" असे नामकरण करणेकरिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त रस्त्याला कोणताही कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकाला "के. श्री. दयाल चंदनमल वाधवा चौक" असे नामकरण करणेबाबत महासभेने निर्णय घ्यावा.

महासभा ठराव क्र. ७७ दिनांक:-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. मोना वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर येथिल पॅनल क्र. ११ मधील बॅ. क्र. २०९९ च्या रूम क्र. १२ जवळील चौकास "कैलासवासी श्री. दयाल चंदनमल वाधवा चौक" असे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.१२ :- श्री. पुरूषोत्तम डिंगरेजा यांना उप अभियंता व श्री. गिरधारी ठाकुर यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नती देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेतील "उप-अभियंता" या पदाच्या सेवा भरती नियमाप्रमाणे सरळ सेवेने भरावयाची पदे २५ टक्के पेक्षा अधीक असू नयेत. म्हणजेच जास्तीत-जास्त २५ टक्के पदे सरळ सेवेने भरता येतात. परंतु कमीत कमी प्रमाण निश्चित केलेले नाही.

उप-अभियंता भरावयाची आहेत. पदोन्नतीसाठी राखीव पदे ३३ टक्के व अराखीव ६७ टक्के असे प्रमाण आहे. त्यानुसार ३ राखीव व ५ पदे अराखीव

प्रवर्गासाठी राहतील ०१ राखीव पद (अ. जाती) भरलेले असुन ०२ पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध नाही. अराखीव ०३ पदे भरलेली आहेत. आणि दिनांक ११.७.२००३ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. नारवाणी व श्री. भठिजा, कनिष्ठ अभियंता यांना पदोन्नती देण्याची शिफारस केलेली आहे. अशा प्रकारे अराखीव पदे भरली जाणार आहेत.

सरळ सेवेने भरावयाची पदे २५ टक्के पेक्षा अधिक असु येत. अशी तरतुद सेवा भरती नियमात आहे. परंतू कमीत-कमी कितीची तरतुद नाही. अशा परिस्थितीत महानगरपालिकेतील अनुभवी व जेष्ठ कनिष्ठ अभियंत्यांना संधी देणे योग्य असल्याने खुल्या प्रवर्गातील ०१ पद पदोन्नतीने भरण्यात यावे. जेष्ठतेनुसार श्री. पी. आर. डिंग्रेजा हे पदोन्नतीसाठी पात्र आहेत. सेवा भरती नियमाप्रमाणे ते पदोन्नतीच्या अटी पुर्ण करित असल्याने त्यांना उप-अभियंता या पदावर पदोन्नती देण्याची शिफारस निवड समितीने केलेली आहे.

२. कनिष्ठ लेखा परिक्षक

''कनिष्ठ लेखा परिक्षक'' या पदासाठी सेवा भरती नियमानुसार सरळ सेवेने भरावयाची पदे २५ टक्के पेक्षा अधिक असू नयेत अशी तरतुद आहे. कनिष्ठ लेखा परिक्षक या संवर्गात ६ पदे मंजुर आहेत. त्यातील ०१ पद सरळ सेवेने व ५ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. पदोन्तीसाठी राखीव पदे ३३ टक्के व अराखीव ६७ टक्के पदे असे प्रमाण आहे. त्यानुसार ०२ पदे राखीव व ०३ पदे अराखीव प्रवर्गासाठी आहेत. कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नतीसाठी सेवाभरती नियमानुसार मुख्य लेखा परिक्षक यांच्या अधिपत्त्याखालील विभागात लिपिक म्हणुन ०५ वर्षे काम केल्याचा अनुभव अशी अर्हता विहित केली आहे. सेवाजेष्ठता यादीनुसार वरिल अर्हता धारण करणारे फक्त श्री. जी. एम. ठाकुर, लिपिक हे असून ते खुल्या प्रवर्गातील आहेत. त्यांचे व्यतिरिक्त खुल्या प्रवर्गात अथवा राखीव प्रवर्गात कोणताही कर्मचारी पदोन्तीसाठी पात्र नाही. त्यामुळे श्री. जी. एम. ठाकुर, लिपिक आवश्यक पात्रता धारण करित असल्याने त्यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी निवड समितीने शिफारस केलेली आहे.

सबब, निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे श्री. डिंग्रेजा यांना उप-अभियंता या पदावर पदस्थापना देण्यास व श्री. ठाकुर यांना कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर पदस्थापना देण्याची शिफारस आहे.

मान्यतेसाठी सादर.

--२--

<u>महासभा ठराव क्र.</u> ७८ <u>दिनांक:-१९.९.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. पृथ्वी वलेचा
अनुमोदकाचे नाव :- श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे निवड समितीच्या शिफारशीस अनुसरून श्री. पी. आर. डिंग्रेजा, कनिष्ठ अभियंता यांची उपअभियंता या पदावर पदस्थापना आणि श्री. गिरधारी ठाकुर ,लिपिक यांची कनिष्ठ लेखा परीक्षक या पदासाठी पदस्थापना करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १३:- शांतीसेवा संस्थेस सहा शौचालय '' पैसे द्या व वापरा'' या तत्वावर देणे.

प्रस्तावना :-

१) प्रास्ताविक :-

शांती सेवा संस्था, मुंबई यांनी त्यांच्या कडील दिनांक ११.८.२००३ च्या पत्रान्वये उल्हासनगर शहरातील खालील प्रमाणे ८ शौचालय/मुतारी यांची दुरुस्ती व पुर्न:बांधनी स्वखर्चाने करुन पैसे दयावे आणि वापर करा या तत्वावर संबंधित शौचालय/मुतारी ची निगा राखणे व सुव्यवस्थित चालवणे संबंधी प्रस्ताव दिला आहे.

१) शिरु चौकाच्या परिसरात उल्हासनगर - २ (जूनी मुतारी)
२) चेलाराम मार्केट जवळ, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
३) राणी मॉ कॉम्पलेक्स, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
४) रामचंद्र मार्केट समोर, टोकियो मार्केट समोर, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
५) उल्हासनगर - १, बस स्टॉप जवळ, (जूने शौचालय)
६) गजानन मार्केट, उल्हासनगर - २ (जूने शौचालय)
७) स्मशान भूमी जवळ, उल्हासनगर - ३ (जूने शौचालय)
८) शहाड रेल्वे स्टेशन समोर, शहाड फाटक, नयना कन्फेक्शनरी मागे, उल्हासनगर- १ (जूने शौचालय)

२) शौचालयाची सद्यस्थिती :-

वरील ठिकाणांचे जागेवर जाऊन तपासणी केली असता सदर शौचालयांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | शौचालयाचे /मुतारीचे ठिकाण | पुरुष शिटची संख्या | | | स्त्री शिटची संख्या | | | वापर | बांधकाम स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संडास | मुतारी | एकूण | संडास | मुतारी | एकूण | | |
| १ | चेलाराम मार्केट जवळ,उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ४ | ६ | १० | - | - | - | सुरु आहे. | नादुरुस्त |
| २ | राणी मॉ कॉम्पलेक्स, उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ७ | ७ | १४ | - | - | - | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ३ | रामचंद्र मार्केट समोर, टोकियो मार्केट समोर, उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ६ | १० | १६ | - | - | - | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ४ | उल्हासनगर - १, बस स्टॉप जवळ, (जूने शौचालय) | - | ४ | ४ | - | १ | १ | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ५ | गजानन मार्केट, उल्हासनगर - २ (जूने शौचालय) | ६ | ५ | ११ | १ | - | १ | सुरु आहे. | नादुरुस्त |
| ६ | स्मशान भूमी जवळ, उल्हासनगर - ३ (जूने शौचालय) | ३ | - | ३ | ३ | - | ३ | सुरु आहे. | नादुरुस्त |

३) शासनाचे धोरण :-

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वाच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मुंसाशी-१०००/ स.क्र.२४१/प्र.क्र.१३/पापु २१, मंत्रालय, मुंबई- ३२, दिनांक ३० ऑगस्ट, २००१ नुसार शासनाचे धोरण खालील प्रमाणे आहे.

"सुलभ वा तत्सम् सेवाभावी संस्था तर्फे "पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घ्यावा. सेवाभावी संस्थांची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती /सर्व साधारण सभा ठरवतील, त्या निकश अटी व शर्ती प्रमाणे करावे. यासाठी सर्व सुविधा (वीज, पाणी, मल:निस्सारण व्यवस्था इ.) महानगरपालिकेने उपलब्ध करुन दयाव्यात. या शौचालयाच्या बांधकाम आणि किंवा देखभाल दुरुस्तीसाठी व चालविण्यासाठी दिर्घ मुदती करारावर ते अशा संस्थाना देण्यात यावेत. यासाठी शौचालय वापरणा-या प्रत्येक कुंटुबांकडून संबंधित सेवाभावी संस्थेने मासीक किमान रु. २० वर्गणी घ्यावी व त्यातून वीज, पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्ती इत्यादीचा खर्च भागवावा.''

४) प्रशासनाचा प्रस्ताव :-

वरील पैकी स्मशान भूमी जवळ उल्हासनगर - ३ येथील शौचालयाचा वापर झोपडपट्टीवासिय लोक करत असल्याने त्यांना रक्कम रु. २५ प्रति महा प्रति कुटुंब आकारणी करुन अन्य वापर करणा-यांना इतर शौचालयाच्या अटी व शर्ती नुसार पैसे आकारणी केल्यास उपरोलेख्खीत सहा शौचालये / मुतारी खालील अटी व शर्ती नुसार देता येऊ शकतील, मात्र मुतारी साठी शुल्क आकारणी करु नये . तसेच सदरच्या सहा शौचालयासोबत संस्थेने एकास दोन या प्रमाणात अन्य आयुक्त ठरवतील अशा बारा शौचालयाची निगा राखणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

सद्यस्थितीत महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर प्रस्तावामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत परस्पर संबंधित शौचालयाची देखभाल व दुरुस्ती होणार असल्याने नागरीकांना चांगल्या प्रतीच्या सेवेची संधी प्राप्त होणार आहे.

तरी वरील परिस्थितीत शांतीसेवा संस्था, मुंबई यांना उपरोल्लीखीत ६ शौचालये/मुतारी पुढील अटी व शर्ती नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार मा. महासभेच्या मंजूरी नंतर हस्तांतरण करणेस हरकत नाही. तरी मा. महासभेसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

## अटी व शर्ती

१) जागेची मालकी :-

जागेची व वास्तूची संपूर्ण मालकी उल्हासनगर महानगरपालिकेची राहिल. जागेचे प्रति शिट रु. ५ (मुतारी वगळून) प्रति महीना भाडे महानगरपालिकेकडे जमा करावे लागेल.

२) जागेचा वापर :-

जागेमध्ये कोणताही पोट भाडेकरु ठेवता येणार नाही. अथवा हस्तांतरण केले जाणार नाही. तसेच सदर जागेचा वापर केवळ शौचालय/ मुतारी/स्नानगृह यासाठीच करावा लागेल.

३) वापराचा कालावधी :-

सार्वजनिक स्वच्छता गृह हे महानगरपालिकेच्या मालकीचे राहील व सदरचे स्वच्छता गृह २० वर्षे कालावधीसाठी " पे ॲण्ड युज '' या धर्तीवर संस्थेमार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येईल व नंतर विनामुल्य महानगरपालिकेकडे हस्तांतर केले जाईल.

४) वापराचे दर :-

अ) पहिल्या तीन वर्षासाठी सेवाशुल्क दर पुढील प्रमाणे राहतील.



| स्वरुप | बाहेर गावावरुन येणा-या नागरीकांकरीता | कायम स्वरुपी नागरीकांकरीता |
|---|---|---|
| मुतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रु. १/- | दरमहा २५/प्रति कुटुंब/ प्रतिमाह (पाच व्यक्ती पर्यंत) |

| | | |
|---|---|---|
| स्नानासाठी | रु. ५ /- | दरमहा ७५/प्रति कुटुंब/ प्रति माह (पाच व्यक्ती पुढे) |

ब) तीन वर्षानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे मंजूरीनुसार वेळोवेळी सेवाशुल्कात वाढ करण्यात येईल.

क) मंजूर सेवाशुल्क दर्शविणारा दरतक्ता दर्शनीभागावर संस्थेमार्फत बसविण्यात येईल.

५) कर्मचारी वर्ग :-

अ) नियोजित शौचालयाच्या ठिकाणी आवश्यक असणारा कर्मचारी वर्गाची नियुक्ती संबंधित संस्था स्वखर्चाने करेल

ब) संबंधित कर्मचारी कामावर असताना अपघात झाल्यास किंवा संबंधितांनी गैरवर्तन केल्यास होणा-या परिणामास महापालिका जबाबदार राहणार नाही.

क) अस्तित्वात असणारे विविध कामगार कायदे तसेच किमान वेतन कायदा यामधील तरतूदी संबंधित कर्मचा-यांनाही लागू करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

६) इतर सर्वसाधारण अटी व शर्ती :-

अ) सार्वजनिक स्वच्छता गृहाचे बांधकाम संस्था स्वखर्चाने करण्यास तयार असून त्याबाबत कोणताही मोबदला उल्हासनगर महानगरपालिकेकडून घेण्यात येणार नाही.

ब) स्वच्छता गृहाचे बांधकाम हे महानगरपालिकेने मंजूर केलेल्या संकल्प चित्रानुसार व आर.सी.सी. डिझाईन नुसार करण्यात येईल.

क) पाणी व विद्युत जोडणी संस्था स्वखर्चाने करेल तसेच पाणी व विद्युत मिटर प्रभाग क्षेत्र अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांचे नावे राहिल.

ड) पाणी वा विद्युत यांचे मासिक देयक संस्थेमार्फत अदा करण्यात येईल.

इ) जेथे आवश्यकता असेल तेथे जूने बांधकाम स्वखर्चाने व संस्थेच्या जबाबदारीवर मा. आयुक्त यांच्या मान्यतेनुसार तोडण्यात येईल.

फ) स्वच्छता गृहाचे बांधकाम करताना संबंधित शासकीय कार्यालय व शहर वाहतूक निरीक्षक यांच्या आवश्यकतेनुसार ना हरकत दाखला घेणेची जबाबदारी संस्थेची राहिल.

ग) पाणी व विद्युत व्यवस्था मान्यता प्राप्त प्लंबर व वायरमन यांचे मार्फत करण्यात येईल.

ह) स्थापत्य व विद्युत देखभाल व दुरुस्ती व सार्वजनिक दैनंदिन स्वच्छता संस्थेस स्वखर्चाने करावा लागेल.

ज) भविष्यकालीन तरतूदीसाठी अथवा रस्ता रुंदीकरणासाठी महापालिकेस जागा आवश्यक भासल्यास स्वच्छता गृह त्वरीत स्वखर्चाने तोडून दयावे लागेल.

ल) सुरक्षा अनामत रक्कम रु. २५,०००/- मात्र परताना स्वच्छता गृहाचे वापर सुरु झाल्यावर तीन महिन्यांनी मागण्यात येईल व सदर सुरक्षा अनामत रक्कम प्रति शौचालयास रु. २५,०००/- राहिल.

म) स्वच्छता गृहाचे बांधकाम कार्यादेश दिल्यापासून तीन महिन्यात सुरु करणेत येईल अन्यथा सुरक्षा अनामत जप्त करणेत येईल मात्र बांधकाम होईपर्यंतच्या काळात संस्थेने संबंधित वापर करण्यासाठी चलत शौचालयाची (मोबाईल टॉईलेट ) व्यवस्था करावी लागेल.

७) दंडात्मक कारवाई:-

शौचालय देखभाल दुरुस्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेने तीन महिन्यांच्या आत काम पूर्ण करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. विहित मुदतीत काम पुर्ण न झाल्यास प्रति दिन रक्कम रु. २५ /- दंड आकारला जाईल.



८) अटी व शर्तीचा भंग :-

संस्थेने त्यांना घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास संबंधितासोबत केलेला करारनामा रद्द ठरविण्यात येईल व जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संस्था संबंधित शौचालयाचे विनामुल्य महापालिकेस हस्तांतरण करेल.

अटी व शर्तीच्या भंग या सदराखाली खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

अ) जागेच्या वापरात बदल करणे

ब) विहित केलेल्या दरा व्यतिरिक्त जास्तीच्या दराची आकारणी करणे.

क) आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचा भंग करणे.

ड)   *अन्य अटी व शर्तींचे पालन न करणे.*

९)   विधीविषयक कार्यक्षेत्र :-

सदर स्वच्छता गृहाबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत महानगरपालिके मार्फत सुनावणी घेण्यात येईल व त्याबदल्यात आयुक्त यांचा निर्णय संस्थेला बंधनकारक राहिल.

महासभा ठराव क्र. ७९    दिनांकः-१९.९.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. शांताराम निकम
अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वर उल्लेखलेल्या अटी व शर्तीवर व त्या व्यतिरिक्त आयुक्तांस इष्ट वाटल्यास अशा अटी , शर्ती व निर्बंधावर शांतीसेवा संस्था, मुंबई यांना स्वखर्चाने उपरोलिखित ६ शौचालयाचे/ मुतारीचे बांधकाम/ देखभाल दुरुस्ती व चालविणेकामी २० वर्षाच्या कालावधीसाठी हस्तांतरण करणेस मान्यता व ''पैसे द्या वापरा'' या तत्वावर उपयोगास मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## *उल्हासनगर महानगरपालिका*

### *विषय क्र. १४:- विशेष समित्यांची नेमणूक करणे बाबत.*

*प्रस्तावना*

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्याचप्रमाणे ठराव करून आपल्या पालिका सदस्यामधून विशेष समित्या नियुक्त करता येतील. महापालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयक नियमातील नियम ४ (अ) अनुसार निम्नलिखित एक वा अधिक विशेष समित्या नियुक्त करता येतील.*

१. *सार्वजनिक बांधकाम समिती.*
२. *नियोजन व विकास समिती*
३. *पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.*
४. *आरोग्य व परिरक्षण समिती*
५. *महिला व बालकल्याण समिती*
६. *गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती*
७. *क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती*
८. *माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती*

*दि.१५.५.९७ च्या महासभा ठराव क्र. ६ व्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले आहे. आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समावेश केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमच समुचित समितीपुढे ठेवले जातील व ते अशा समितीच्या*

शिफारशीसह महासभेत येतील म्हणुन विशेष समित्त्यांची नेमणुक करणेस प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. ८०</u> <u>दि. २९/९/२००३</u>

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

हि महासभा प्रत्येक विशेष समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या पुढील आठ विशेष समित्त्यांची नेमणूक करित आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिति

सदस्य

१. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
२. श्री. यादव लालबिहारी
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
५. श्री. साधवानी मनोज
६. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
७. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
८. श्रीमती. पंजाबी दिपा
९. श्री. लिंगे बबन



२. नियोजन व विकास समिति

सदस्य

१. श्री. रामरख्यानी मोहनदास
२. श्रीमती. दासानी मिनु
३. श्री. ठाकुर विनोद
४. श्री. पमनानी ईश्वर
५. श्रीमती. पंजाबी दिपा
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्रीमती. रामचंदानी भावना
८. श्रीमती. नाथानी नीना
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.

सदस्य

१. श्री. म्हस्के अंकुश
२. श्री. ऐडके गणपत
३. श्री. पंजाबी नारायण
४. श्री. वनवारी किशोर
५. श्री. लबाना होशियारसिंग
६. श्रीमती. आहुजा नीता
७. श्री. साधवानी मनोज
८. श्री. बेहरानी ठाकुरदास
९. श्री. गायकवाड सुरेश

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सदस्य

१. श्री. लुंड गोविंदराम
२. श्री. गायकवाड सुरेश
३. श्री. ठाकुर विनोद
४. श्री. जेसवानी सतरामदास
५. श्री. टेकचंदानी राजु
६. श्रीमती. सोंडे मीना
७. श्रीमती. वसिटा बेबी
८. श्री. ठाकुर अशोक
९. श्री. जाधव सुरेश

५. महिला व बालकल्याण समिती सदस्य

१. श्रीमती. भठिजा कोमल
२. श्रीमती. कारीरा रेखा
३. श्रीमती. रिझवानी सुजाता
४. श्रीमती. सोंडे मीना
५. श्रीमती. शर्मा कमला
६. श्रीमती. मसंद माया
७. श्रीमती. रामचंदानी भावना
८. श्रीमती. वनवारी मोना
९. श्रीमती. खिलनानी भावना



६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सदस्य

१. श्री. साधवानी मोहन
२. श्री. भालेराव गौतम
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. यादव लालबिहारी
५. श्री. वाघे शामु
६. श्री. शांताराम निकम
७. श्री. पवार नाना
८. श्री. जाधव सुरेश
९. श्रीमती. गुप्ता अनिता

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती सदस्य

१. श्रीमती. माखिजा किरण
२. श्रीमती. शर्मा कमला
३. श्री. पवार नाना
४. श्री. रूपाणी चिमनदास
५. श्री. लबाना होशियारसिंग
६. श्री. मुलचंदानी महेंद्र
७. श्री. लुंड गोविंदराम
८. श्रीमती. छाब्रिया भारती
९. श्री. वनवारी किशोर

८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य

१. श्रीमती. रिझवानी सुजाता
२. श्री. निकम शांताराम ओंकार
३. श्रीमती. खिलनानी भावना
४. श्री. ऐडके गणपत
५. श्री. ठाकुर अशोक
६. श्री. तलरेजा विनोद
७. श्री. टाले प्रमोद
८. श्रीमती. भठिजा कोमल
९. श्रीमती. कारीरा रेखा

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहराच्या पर्यावरणाच्या स्थितीबाबत अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७-अ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (२००२-२००३) तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल महासभेपुढे ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ८१ दिनांक:-२९.९.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा आयुक्तांकडुन प्रस्तुत केलेला उल्हासनगर शहरातील पर्यावरण स्थितीचा अहवाल व प्रस्तावित उपाय योजना स्विकृत करीत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ प्रशासनास आवश्यक पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषयः-

विषय क्र. १६:- अघोषित झोपडपट्ट्या घोषित करण्याकरिता उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे व सदर कामाचा सर्वेक्षण अभिकर्त्यामार्फत करून घेणे करीता व या कामावरील खर्चाकरीता मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ३६ झोपडपट्ट्या घोषित केलेल्या आहेत. तसेच या महानगरपालिकेत असलेल्या दस्तऐवजा वरून एकुण ६४ अघोषित झोपडपट्ट्या आहेत. या ६४ झोपडपट्ट्यांशिवाय आणखी काही झोपडपट्ट्या असण्याची शक्यता आहे. त्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुर्नविकास)अधिनियम १९७१ (सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम २८) यातील कलम ३ (२)(अ) मधील तरतुदीनुसार या कामी उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे. तसेच या कामी सर्वेक्षण होणे करीता अभिकर्ता नेमणे आवश्यक आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ४ अन्वये झोपडपट्ट्या घोषित करण्या बाबत ची कार्यपध्दती विहीत केली आहे. तसेच खाजगी जमीनीवरील २५० चौ. मीटर पेक्षा जास्त नसलेल्या किंवा २५ पेक्षा जास्त झोपडया असलेल्या झोपडपट्ट्या शासनाच्या मान्यतेने घोषित करण्यात याव्यात अशी सूचना मा. अफजलपुरकर समितीने केली असून ती शासनाने स्विकारली आहे. याबाबत शासनाच्या गृहनिर्माण विभागाने शासन निर्णय क्र. गवसु/१०९९ /प्रक्र१६६ /झोपसु-१ दिनांक २८ मे, २००१ पारित केला आहे. तसेच यापूर्वी गृहनिर्माण व विशेष सहाय्यक विभागाने महाराष्ट्र शासन निर्णय क्र. युएमसी/१०७९/६१३०/सीआर-१११/७ दिनांक ९ जानेवारी, १९८७ ने सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्यानुसार १)प्लेन टेबल सर्वे करणे २)झोपडयांना क्रमांक देणे ३)संगणकीय प्लान करणे ४) स्थलदर्शक नकाशा करणे ५) की प्लान (key plan) तयार करणे ६ )सोशीओ इकॉनॉमिक सर्वे करणे ७ )सर्व झोपडपट्ट्यांचा एकत्रित गोषवारा करणे ८) उपलब्ध मुलभुत सुविधांचा तपशिल तयार करणे आवश्यक आहे. शहरातील अघोषित उपरोक्त ६४ झोपडपट्ट्यांमधील तसेच सर्वेक्षणादरम्यान आढळणा-या आणखी काही झोपडपट्ट्यांमधील झोपडयांची संख्या अंदाजे ३५००० इतकी गृहित धरल्यास एकंदर रूपये ५० ते ६० लक्ष खर्च अपेक्षित आहे. या खर्चाकरीता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतुद नाही त्यामुळे सुधारित अंदाजपत्रकात तरतुद करणे आवश्यक आहे.

सबब

अ) झोपडपट्ट्या घोषित करणे करीता उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करणे.

ब) सर्वेक्षण करणे करीता सुधारित अंदाज पत्रकात रूपये ५० ते ६० लक्ष तरतुद करणे.
क)सदर सर्वेक्षण निविदा कार्यवाही करून अभिकर्ता नेमुन करून घेणे
या बाबीस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव महासभेच्या पटलावर ठेवणेत यावा.

--२--

महासभा ठराव क्र. ८२ दिनांकः-२९.९.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाच्या समायोजनाधीन राहुन उल्हासनगर शहरातील अघोषित झोपडपट्टयाच्या घोषित करण्यापुरते उपायुक्त (शहर) यांना प्राधिकृत करीत आहे तसेच सदर कामाच्या सर्व्हेक्षणाकामी अभिकर्ता नेमणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ३:- शहरातील विविध विकास कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी तयार केलेली २००३ व २००४ ची दरसुची लागु करणे.

प्रस्तावना :-
उल्हासनगर महानगरपालिकेत तसेच सार्वजनिक बांधकाम खात्त्यात विविध विकासाची तसेच दुरूस्तीची व देखभालीची कामे प्राकलने बनवून सदर प्राकलनीय किंमतीला मजुर सहकारी संस्था अथवा निविदा मागवून करून घेतली जातात. प्रस्तावित कामाची उपरोक्तपणे बनविलेली प्राकलने हि महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खाते सदरची दरसुची दरवर्षी नव्याने तयार करून प्रकाशित करीत असते. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र ठाणे जिल्हातर्गत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या ठाणे विभागाने तयार केलेली दरसुची प्रकाशनानंतर उल्हासनगर महानगरपालिकेत तसेच जिल्हयातील इतर नगरपालिकेत व महानगरपालिकेत लागु केली जाते. सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या ठाणे विभागाने २००३-२००४ वर्षाकरिता दरसुची तयार केलेली असून दिनांक १.७.२००३ पासून लागू करण्यात आली आहे. सदर दरसुची उल्हासनगर महानगरपालिकेसह उपलब्ध झाली असून या दरसूचीतील दर पान क्र. (I) (vI) या वरील टिप्पणीसह उल्हासनगर महानगरपालिकेस लागु करून त्याप्रमाणे होणा-या दरांची प्राकलने, निविदा, देयके तयार करून कंत्राटदारांना केलेल्या कामांचे पेमेंट करण्यासाठी मंजुरी मिळणेकामी सर्वसाधारण महासभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ८३ दिनांकः-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. दर्शनसिंह खेमाणी
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात विविध विकास कामासाठी ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेली २००३-२००४ ची दरसूची दि. १/७/२००३ पासून उल्हासनगर महानगरपालिकेत लागू करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजूर
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ४:- श्री. विजय गोसावी (कनिष्ठ अभियंता) यांचे निलंबनाधिन आदेश कायम करणे.

प्रस्तावना :-

श्री. महेश जयसिंग साधवानी, उल्हासनगर गगनमहल, प्लॉट नं. ५९, उल्हासनगर-२ यांनी फर्निचर बाजार, उल्हासनगर-३ येथे असलेल्या त्यांच्या दुकानाची सुमारे एक महिन्यापुर्वी दुरूस्ती करून घेतली होती. सदर दुकानातील दुरूस्तीच्या कामासाठी त्यांनी परवानगी घेतली नव्हती तसेच त्यांनी कोणताही पत्रव्यवहार महानगरपालिकेशी केलेला नाही.

सदर दुरूस्तीच्या कामाची श्री. विजय दामोदर गोसावी, कनिष्ठ अभियंता, (मालमत्ता विभाग) यांनी पहाणी करून सदर बांधकाम गैरफायदेशिर व अनाधिकृत असून सदरचे बांधकाम कायदेशिर कारवाई करून तोडावे लागेल. अशी भिती त्यांनी सदर दुकानदारास घातली आणि त्यानंतर सदर बांधकाम न तोडण्यासाठी दुकानदाराकडे लाचेची मागणी कली. त्यानंतर सदर दुकानदार श्री. महेश जयसिंग साधवानी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेकडे तक्रार केली. त्यानुसार दि. ११.९.२००३ रोजी लाचेचा सापळा आयोजित करून १६.०० वा माया फर्निचर, उल्हासनगर येथे रू. ५०००/- लाचेची रक्कम स्विकारताना श्री. गोसावी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. अशा प्रकारे श्री. विजय दामोदर गोसावी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेचा नोकर या नात्याने पदाचा गैरवापर करून स्वतःचा आर्थिक फायदा केला आहे. यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथील अधिकारी यांनी श्री. गोसावी व तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवरून त्यांचेविरूध्द सेंट्रल पोलिस स्टेशन गुन्हा रजि. नं. I १०६/२००३ ला.प्र. का. सन १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे ११.९.२००३ रोजी २०.३० वा.गुन्हा दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२०३ दि. २२.९.२००३ अन्वये श्री. विजय दामोदर गोसावी, कनिष्ठ अभियंता यांना महापालिकेच्या सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे.

सबब, श्री. विजय दामोदर गोसावी (निलंबित) कनिष्ठ अभियंता, मालमत्ता विभाग यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१)(ब)नुसार महासभेपुढे ठवुन निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

--२--

महासभा ठराव क्र. ८४ दिनांक:-२० १० २००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. दर्शनसिंह खेमाणी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. विजय गोसावी महापालिका सेवेतील, कनिष्ठ अभियंता यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे महापालिका सेवेतून निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजूर

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ५:-श्री. अनिल खतुरानी (लिपिक) यांचे निलंबनाधिन आदेश कायम करणे.

प्रस्तावना :-

श्री. अनिल अमरलाल खातुरानी, लिपिक, कर विभागात कार्यरत असताना त्यांनी मालमत्ता करापोटी पावती पुस्तक क्र. ७८२ मधील पावती क्र. ७८२०० अन्वये दि. २२ २ २००२ रोजी वसुल केलेली रक्कम रू. १,६,१४/- महापालिका कोषागारात भरणा केली नाही. सदर रक्कमेच्या महापालिका कोषागारात भरणा न केल्यामुळे दि. २२ २ २००० ते २२ ७ २००३ पर्यंत कायम अपहार केल्याचे सिध्द झाले आहे. यापुर्वीही मालमत्ता धारकांकडुन मालमत्ता करापोटी आणलेले धनादेश न वटल्यामुळे मालमत्ता धारकांकडुन धनादेशातील उल्लेखीत रोख रक्कम ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत भरणा केलेली नाही. लेखा परिक्षण विभागाकडुन वेळोवेळी ज्ञापन पत्राव्दारे आदेशित केल्यानंतर महापालिका कोषागारात भरणा केलेली आहे. अशाप्रकारे वारंवार अपहार केल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली.

त्याचप्रमाणे त्यांची एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात येणे अशा प्रकारच्या शिक्षा बजावूनही त्यांचे अपहार करणेचे वर्तनामध्य सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१०२ दि. ८. ऑगस्ट, २००३ अन्वये निलंबित करणेत आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे निम १० अन्वये त्यांच्याविरूध्द दोषारोप बजावुन विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी उमपा/साप्रवि/आस्था/टे-५/५८१ दि. १९ ९ २००३ अन्वये ज्ञापनपत्र देण्यात आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम (१)(ब) अन्वये श्री. अनिल खतुरानी, लिपिक (निलंबित) यांचे निलंबन कायम करणेसाठी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र.                                दिनांकः-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील परिस्थिती विचारात घेता श्री. अनिल खतुरानी, लिपिक यांचे महापालिका सेवेतून आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधीन आदेश कायम न करता त्यांना खातेनिहाय चौकशी निकालाधीन राहून पदावर पुर्नस्थापीत करणेस मान्यता देत आहे.

--२--

कारण----

१) अपहार केलेली रक्कम नाममात्र आहे.
२) त्या रक्कमेची भरणा महापालिकेत कोषागारात केलेली आहे.
३) नाममात्र रककमेकरीता दिर्घ कालासाठी निलंबनाधीन ठेवणे योग्य राहणार नाही.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ७:-श्री. अनिल खतुरानी (लिपिक) यांचे निलंबनाधिन आदेश कायम करणे.

प्रस्तावना :-

श्री. अनिल अमरलाल खातुरानी, लिपिक, कर विभागात कार्यरत असताना त्यांनी मालमत्ता करापोटी पावती पुस्तक क्र. ७८२ मधील पावती क्र. ७८२०० अन्वये दि. २२.२.२००२ रोजी वसुल केलेली रक्कम रू. १,६,१४/- महापालिका कोषागारात भरणा केली नाही. सदर रक्कमेच्या महापालिका कोषागारात भरणा न केल्यामुळे दि. २२.२.२००० ते २२.७.२००३ पर्यंत कायम अपहार केल्याचे सिध्द झाले आहे. यापुर्वीही मालमत्ता धारकांकडुन मालमत्ता करापोटी आणलेले धनादेश न वटल्यामुळे मालमत्ता धारकांकडुन धनादेशातील उल्लेखीत रोख रक्कम ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत भरणा केलेली नाही. लेखा परिक्षण विभागाकडुन वेळोवेळी ज्ञापन पत्राव्दारे आदेशित केल्यानंतर महापालिका कोषागारात भरणा केलेली आहे. अशाप्रकारे वारंवार अपहार केल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली.

त्याचप्रमाणे त्यांची एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात येणे अशा प्रकारच्या शिक्षा बजावूनही त्यांचे अपहार करणेचे वर्तनामध्य सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१०२ दि. ८. ऑगस्ट, २००३ अन्वये निलंबित करणेत आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे निम १० अन्वये त्यांच्याविरूध्द दोषारोप बजावुन विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी उमपा/साप्रवि/आस्था/टे-५/५८१ दि. १९.९.२००३ अन्वये ज्ञापनपत्र देण्यात आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम (१)(ब) अन्वये श्री. अनिल खतुरानी, लिपिक (निलंबित) यांचे निलंबन कायम करणेसाठी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

--२--

महासभा ठराव क्र. दिनांकः-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अनिल खतुरानी महापालिका सेवेतील, लिपिक यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे महापालिका सेवेतून निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ६:- श्री. रमेश कुडीया, लिपिक यांचे निलंबन आदेश रद्द करून कामावर पुर्नस्थापन करणे.

प्रस्तावना :-

श्री. रमेश कुडीया, लिपिक हे आरोग्य विभागात कार्यरत असताना वर्ष २०००-२००१ व २००१-२००२ या कालावधीमध्ये कॅम्प नं. १ ते ५ मधील आरोग्य निरिक्षक यांनी जमा केलेली जन्म-मृत्यु फी, कत्तलखाना फी, अशी वसुल केलेली एकुण रक्कम रू. ९४,९२३/- (रू. चौ-याण्णव हजार नऊशे तेवीस मात्र) महापालिका कोषागारात भरणा न केल्यामुळे त्यांना दिनांक २५.११.२००२ च्या आदेशान्वये निलंबित करणेत आले आहे. त्याचप्रमाणे दिनांक १८.२.२००२ च्या ज्ञापनान्वये दोषारोप ठेवून त्यांची विभागीय चौकशी सुरू करणेत आली होती. चौकशी अधिकारी यांनी विभागीय चौकशी पुर्ण केले असुन चौकशी अंती श्री. कुडीया यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झालेले आहेत.

श्री. कुडिया यांनी अपहारीत एकूण रक्कम व कालावधी पहाता तसेच त्यांनी अपहारीत रक्कमेचा भरणा लेखा परिक्षण विभागाने उघडकीस करून दिल्यानंतर व अर्धसमास ज्ञापनपत्राव्दारे आदेशीत केल्यानंतर केलेला आहे. त्यांच्यावरील सदर आरोप गंभीर असल्याने व भविष्यात महापालिकेमध्ये महापालिका रक्कमेचा अपहाराची प्रकरणांना प्रतिबंध राहण्याच्या दृष्टीचे व प्रकरणांचे गांभीर्य विचारात घेवून श्री. कुडीया यांना ०३ वर्षानंतर पदस्थाना देण्यात यावी. परंतु, पदावनत पदाच्या कालावधीतील कोणतेही फायदे त्यांना ३ वर्षानंतर देय होणार नाहीत. त्याचप्रमाणे त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्यामुळे त्यांचे निलंबन समर्थनिय होते. त्यामुळे त्यांचा निलंबन कालावधी निवृत्ती वेतनाशिवाय इतर कोणत्त्याही प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यात येत नाही. अशी शिक्षा बजावुन त्यांचे निलंबन रद्द करून पदावनत पदावर पुर्नस्थापित करणेसाठी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. दिनांकः-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. रमेश कुडिया, लिपिक यांची खातेनिहाय चौकशीअंती गैरवर्तणूकीबददल दोषी आढळल्याने त्यावर पुढील शास्ती लादण्यात येत आहे.

--२--

☞ त्यांचे निलंबन रद्द करून पदावनतीने मूळ पदावर पुर्नस्थापीत करणे.

☞ त्यांना ३ वर्षासाठी पदावनत करून त्यांना तीन वर्षानंतर पदस्थापना देता येईल.

☞ पदावनत पदाच्या कालावधीमधील कोणतेही फायदे त्यांना तीन वर्षानंतर देय असणार नाही.

☞ त्यांचा निलंबन कालावधी सेवानिवृत्ती वेतनाखेरीज इतर कोणत्त्याही प्रयोजनासाठी ग्राहय धरता येणार नाही.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ७:- श्री. पीडी. कोळेकर यांची उल्हासनगर महापालिका सेवेतील उपायुक्त पदावरील प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक १०.१०.२००२ च्या आदेशान्वये श्री. पीडी. कोळेकर यांची या महापालिकेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे. त्यानुसार श्री. पीडी. कोळेकर हे या महापालिकेत दिनांक ११.१०.२००२ पासुन कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ नुसार महासभा ठराव क्रमांक ५७ दिनांक २६.१२.२००२ अन्वये श्री. पीडी. कोळेकर यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस एका वर्षाकरीता मान्यता दिलेली आहे. श्री. पी. डी. कोळेकर यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीची मुदत दिनांक १०.१०.२००३ रोजी संपुष्टात येत आहे.

श्री. पी. डी. कोळेकर यांच्या प्रतिनियुक्तीच्या वाढीव कालावधीस आणखी एका वर्षाकरीता मान्यता मिळणे कामी महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ८५ दिनांक:-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नरेंदकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भावना रामचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पीडी. कोळेकर, उप-आयुक्तयांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ८:- शहरातील रस्ते व जागा नामकरण समिती शिफारसीनुसार रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अनु. क्र. | रस्त्या / चौक | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर-१ येथील सरस्वती सागर अपार्ट. ते बॅ नं २६२ (साई दिष्टी अपार्ट) पर्यतच्या रस्त्याला | ''दादी भगवंती किशीनचंद उधानी मार्ग'' |
| २ | उल्हासनगर- येथील पॅनल नं २० मध्ये सुनिता अपार्टमेंटचे समोरील राधास्वामी दाबेवाली गल्ली ते ठाकूर फरीर आश्रम च्या मार्गाचे | ''मातोश्री मोहिनीबाई मार्ग'' |
| ३ | प्रभाग क्र. मुक्ती अपार्टमेंट ते निखीलेश्वर कॅम्पलेक्स पर्यतच्या रस्त्यास | ''कै श्रीमती मीराबाई पाटकर मार्ग'' |
| ४ | उल्हासनगर-३ शांतीनगर साईबाबामंदिर ते डॉल्फीन क्लबकडे जाणा-या मार्गाचे | ''समाजसेवक स्वर्गीय श्री रामकिशन करोतिया मार्ग'' |
| ५ | उल्हासनगर-५ येथील पॅनल नं १२ मध्ये स्कुल नं १५, १९ चे मध्ये असलेल्या रस्त्याला | ''माता माई राजाइन मंदिर मार्ग'' |
| ६ | आनंदनगर फर्स्टगेट येथील कमानी पासून राजाई सोसायटी पर्यतच्या मार्गास | साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे |
| ७ | संतोषनगर महावीर किराणा स्टोअर्स समोरून सम्राट अशोकनगर मधील आर पी आय कार्यालय समोरील चौकापर्यतचा रस्ता | ''महात्मा ज्योतिबा फुले मार्ग'' |
| ८ | बॅरेक नं १३१७ व १३२८ समोरील चौकास | ''बाजी प्रभू देशपांडे चौक'' |
| ९ | उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रोडवरील स्मशान भुमी चौकाचे नामकरण | ''स्वर्गीय विनायक दामोधर सावरकर चौक'' |
| १० | उल्हासनगर-५ येथील बॅ नं २०९६ रूम नं ११ जवळ समाज मंदिरास | ''कै. श्री. टहीलराम सुगनोमल वनवारी'' |



उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव १ दिनांक ८/१०/२००३ अन्वये उपरोक्त दर्शाविलेले १० नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा. महापौर, अध्यक्ष व इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण १० नामकरण प्रस्तावांस अंतिम मंजुरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ८६</u>                  <u>दिनांकः-२० १० २००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती दिपा पंजाबी

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीला अनुसरुन वर नमूद केलेल्या उक्त रस्त्यांचे, जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र ९ :-</u>पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४७ दिनांक २०/६/२००३ मध्ये बदल करुन ३०० सफाई कामगार रोजंदारीवर भरती करणे

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नागरी घनकचरा (व्यवस्थापन / हाताळणी)अधिनियम २००० ची अंमलबजावणी प्रभाविपणे होण्याच्या दृष्टीने सफाईच्या कामामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने उल्हासनगर शहरामध्ये सफाईचे काम वर्षातील ३६५ दिवस (१५ ऑगस्ट, २६ जानेवारी, वीर गुरुदेव जयंती व महर्षी वाल्मीकी जयंतीच्या सुटटया वगळून) घेणे आवश्यक आहे. त्यासाठी उपलब्ध सफाई कामगारांना चक्रानुक्रमे सुटटया देवून सदर काम पूर्ण करुन घेणे अपेक्षित आहे. तथापी, कामगार संघटनाबरोबर दिनांक १७/१/२००३, ७/५/२००३, ४/९/२००३, २४/९/२००३ व ३०/९/२००३ रोजी बैठका घेवूनही कामगार संघटनाकडून योग्य प्रतिसाद मिळालेला नाही. सदर बैठकामध्ये कामगार संघटनांचे प्रतिनिधी २६७ रिक्त पदे कायम आस्थपनेवर भरती करावी या मागणीवर अग्रही होते.

सफाई कामगारांच्या नियमित अनुपस्थितीमुळे सफाईच्या कामावर परिणाम होत असल्याने अनुपस्थित कर्मचा-यांच्या बदली खाडा बदलीने कर्मचारी कामावर नियुक्त करुन सफाईच्या कामामध्ये सुधारणा आणण्याच्या दृष्टीने एकूण १८७ सफाई कामगार खाडा बदलीने भरणेसाठी मा. महासभेने महासभा ठराव क्र. ४७, दिनांक

२०/६/२००३ ने मान्यता दिलेली आहे. कामगार संघटना सदर प्रस्तावासाठी सुध्दा उचित प्रतिसाद देत नसून २६७ सफाई कामगारांची कायम पदावर भरती करण्याच्या मुददयावर अग्रही आहेत.

अशा परिस्थितीत वर्षातील ३६५ दिवस साफसफाई काम पूर्ण करून घेण्यास प्रशासनापूढे अडचणी निर्माण होत आहेत. त्यणवर उपाययोजना म्हणून सफाई कामगारांच्या सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी रोजंदारीने ३०० कामगार नियुक्त करून शहरांतील साफसफाई वर्षातील ३६५ दिवस करून घेणे हा पर्याय उपलब्ध आहे.

२६७ सफाई कामगारांची कायम आस्थापनेवर भरती केल्यास येणारा प्रतिमहा खर्च, खाडाबदलीने १८७ कर्मचारी भरती केल्यास येणारा प्रतिमाह अपेक्षित खर्च व सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी रोजंदारीवर कामगार लावल्यास येणारा प्रतिमाह अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे............

| २६७ सफाई कामगार कायम स्वरुपी भरती केल्यास प्रतिमाह अपेक्षित खर्च (४९८८ रुपये प्रति कामगार प्रमाणे) | खाडा बदलीने १८७ सफाई कामगार भरती केल्यास येणारा प्रतिमाह अपेक्षित खर्च | रोजंदारीवर ३०० कर्मचारी भरती केल्यास येणारा प्रतिमाह खर्च (प्रतिमाह ६ सार्वजनिक सुट्टया अपेक्षित धरुन) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| रक्कम रुपये<br>१३,३१,७९६/- | रक्कम रुपये<br>५,७९,७००/- | रक्कम रुपये<br>१,८०,०००/- |

--२--

वरील खर्चाचा तपशिल लक्षात घेता नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) आधिनियम २००० ची अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी रोजंदारी कामगार लावून शहरातील स्वच्छता करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाची तरतुदी करणे व सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करणेसाठी मंजुरी देण्याची शिफारस आहे. प्रस्ताव मान्यतेसाठी महानगरपालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र. ८७</u> <u>दिनांकः-२०.१०.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले

हि महासभा वरील परिस्थिती विचारात घेता पूर्वीचा महासभा ठराव क्र. ४७, दिनांक २०/६/२००३ यामध्ये बदल करुन त्यासाठी अंदाजपत्रकात आवश्यक खर्चाच्या तरतूदीच्या अधीन राहून, प्रशासनास रोजंदारीवर ३०० सफाई कामगार भरती करणेस मान्यता आणि अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. १०:-उल्हासनगर शहरातील एकूण ३९ विंधन विहिरींवर २ एच.पी. जेटपंप बसविणे कामी शासकिय अनुदान प्राप्त करीता १० टक्के लोकवर्गणी रक्कम भरणे.

प्रस्तावना :-

महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाने पाणी पुरवठयाची पर्यायी उपाय योजना म्हणून पुरेसे पाणी उपलब्ध असणा-या विविध ठिकाणांच्या विंधन विहिंरीवर ३९ ठिकाणी २ एच.पी. चे जेटपंप बसवून कार्यान्वीत करणे या कामासाठी रु. २५००६४१/- या रक्कमेचे प्राकलन तयार करुन तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे दि. ४.३.२००३ रोजी पाठविला होता. त्यास अनुसरुन मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र/सामान्य/का.३/टे-४. नपाकावि २८०४, दि.३०.९.२००३ अन्वये अनुदान प्राप्तीसाठी १० टक्के लोकवर्गणी रुपये २५००६४/- शासनाकडे भरणे आवश्यक आहे, असे कळविले आहे.

सदर कामाची निकड लक्षात घेऊन या १० टक्के लोकवर्गणी भरण्यासाठी मंजुरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव महापालिकेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

महासभा ठराव क्र. ८८ दिनांकः-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर

हि महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरात विविध ठिकाणी एकूण ३९ विंधन विहिरींवर दोन एच.पी. जेटपंप बसविणे कामी रुपये २५,००,६४१/- या रक्कमेच्या प्राकलनीय खर्चापोटी शासनाकडून तातडीच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत अनुदान प्राप्तीसाठी १० टक्के लोकवर्गणी रक्कम रुपये २५,००,६४/- शासनाकडे भरणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. ११:-महापालिका कर्मचा-यांना दिवाळी निमित्त भेट देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका कर्मचा-यांना वित्तीय वर्ष २००३-२००४ साठी सर्व कर्मचा-यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहून दिपावली भेट खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) दिपावली भेट गट क्रमांक क व ड मधील सर्व कर्मचा-यांना अनुज्ञेय राहिल.
२) जे कर्मचारी ३१ मार्च २००३ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २००२-२००३ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली आहे, असे कर्मचारी दिपावली भेट मिळण्यास पात्र राहतील.
३) दिनांक १/४/२००२ ते ३१/३/२००३ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी दिपावली भेट मिळण्यास अपात्र असतील.
४) सदर भेट ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावीत आहे.

अनुज्ञेय वित्तलब्धी रुपये
------------------------------ x हजर दिवस
३६५ दिवस

५) कर्मचा-यांच्या सेवा कालावधीचा विचार करता सर्व प्रकारच्या मंजूर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.
६) दिपावली भेट दिपावलीपुर्वी एक रक्कमी देण्यात यावी.
७) दिपावली भेट संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

सदर खर्चाची तरतुद वित्तीय वर्ष २००३-२००४ च्या सुधारीत अर्थ संकल्पात करण्यात यावी.

महासभा ठराव क्र. ८९ दिनांक:-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा उपरोक्त सर्व बाबींच्या अधिन राहून महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना वर्ष २००३-२००४ साठी दिपावली भेट म्हणून रुपये ३०००/- प्रति कर्मचारी देण्याचे प्रस्तावास मंजूरी देत आहे व येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. ११:-</u>महापालिका कर्मचा-यांना दिवाळी
निमित्त भेट देणे.

<u>प्रस्तावना :-</u>

महानगरपालिकेतील विविध कामगार संघटनांनी दिपावली पुर्वी कर्मचा-यांना बोनस / सानुग्रह अनुदान / भेट म्हणून रुपये ६,००० (सहा हजार रुपये) देण्याची मागणी केली आहे. या संदर्भात दि. १८/१/२००३ रोजी कामगार संघटनांशी प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत ६,०००/- रुपयांऐवजी किमान रुपये ३,००० ''ना परतफेड'' तत्त्वावर सुनग्रह अनुदान किंवा भेट म्हणून दयावेत असे आग्रही प्रतिपादन कामगार संघटनांच्या नेत्यांनी केले आहे.

राज्यातील विशेषतः ठाणे जिहयातील नवी मुंबई महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी रुपये ६,००० भेट म्हणून तर भिंवडी महानगरपालिकेने ३,००० देण्याचे मान्य केल्याचे समजते. तथापि, राज्य शासनाचा अदयाप यावर कोणताही निर्णय झालेला नाही.

सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकात उक्त बाबींसाठी कोणत्त्याही स्वरुपात आर्थिक तरतुद करण्यात आलेली नाही. परंतू कामगार संघटनांच्या मागणीप्रमाणे रुपये ३,००० दयायचे झाल्यास त्यासाठी किमान ९० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे व तशी तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात करावी लागेल व तसा धोरणात्मक निर्णय महानगरपालिकेने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दिपावली पूर्वी महासभा बोलावली लागेल किंवा मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता व विविध पक्षाचे नेते यांनी सर्वानुमते निर्णय घेतल्यास त्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुषंगाने अंमलबजावणी करणे प्रशासनास शक्य होईल.



सबब, दिनांक २०/१०/२००३ रोजी या विषयावर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पदाधिका-यांची बैठक बोलवावी किंवा दिनांक २०/१०/२००३

रोजीच्या महासभेत आयत्यावेळचा विषय म्हणून निर्णयासाठी ठेवावा, अशी विनंती मा. महापौर यांना करावी.

महासभा ठराव क्र. दिनांकः-२०.१०.२००३.

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

हि महासभा सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकात उक्त खर्चाच्या समायोजनाधिन राहून महापालिका कर्मचा-यांना ''ना परतफेड'' तत्त्वावर दिवाळी सणानिमित्त रुपये ३०००/- सानुग्रह अनुदान किंवा भेट म्हणून देणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## लक्षवेधी सूचना(पहिली)

सुचकः- श्री. प्रमोद टाले

अनुमोदक :-श्रीमती प्रेमा खांडेकर

आपणांस सुचित करु इच्छितो की, खालील विषयावर दि. २०/१०/२००३ रोजी होणा-या महासभेमध्ये ''लक्षवेधी सूचना'' स्विकारुन सविस्तर चर्चा होणेस विंनती आहे.

सुचना संदर्भ :-संपूर्ण उल्हासनगर शहरात डेंग्यु , मलेरिया व इतर साथींचा प्रादुर्भाव असुन साफसफाईंची भिषण समस्या निर्माण झाली असून दि. १/१०/२००३ पासून नविन ठेकेदारांमुळे संपूर्ण शहरात ठिकठिकाणी कच-यांचे ढिग पसरल्यामुळे सर्व जनतेचे आरोग्य धोक्यात आले असुन तावडतोब स्वरुपाची कोणती उपाययोजना करता येईल यावर चर्चा होणेस विंनती आहे.

## लक्षवेधी सूचना(दुसरी)

सुचकः- श्री. राजेंद्र शां. चौधरी

अनुमोदक :- राजेश उर्फ राज असरोंडकर

आपले लक्ष लक्षवेधीने केंदीत करून इच्छितो की, रस्ते एकत्रिक विकास योजनेअंतर्गत (आय.आर.डी.पी.) रोड क्र. डॉल्फीन हॉटेल ते शांतीनगर, उल्हासनगर-३ येथिल रोडचे दुरूस्ती, विस्तारीकरण व नूतनीकरणाचे कामास मागील चार वर्षापूर्वी मंजुरी देण्यात आली होती. परंतु डॉल्फीन हॉटेलचे मालकाने सदर कामावर स्टे घेतल्याने सदरकाम अदयापपर्यंत अपूर्ण राहिलेले होते, या कामास आता सुरूवात करण्यात आली असून पूर्वी दिलेल्या रोड कटिंग प्रमाणे काम न करता डॉल्फीन हॉटेल वाचविणेचे प्रयत्न करण्यात येत असून त्यासाठी धनदांडग्यांना संरक्षण व गोरगरीबांवर अन्याय अशी भूमीका महापालिकेने घेतलेली आहे. ही भूमीका अयोग्य वाटते आमचे रस्ता रुंदीकरणाचे काम विरोध नसून शहराचे सौंदर्यासाठी विकासकामे आवश्यक आहेत. पण त्यासाठी श्रीमंतांना संरक्षण देऊन गोरगरीबांना बेघर करणे योग्य नाही. तरी पूर्वी रोड कटींगची मार्किंग दिल्याप्रमाणेच डॉल्फीन हॉटेल ते शांतीनगर पर्यंतच्या रोडचे काम पुर्ण करण्यात यावे याबाबत महासभेत चर्चा घडवून यावी ही विनंती.

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ३:- सेक्शन १७, उल्हासनगर-३ येथिल बॅरेक क्र८४५ समोरे महापालिकेचे उदयान गुरुद्वारा संतबाबा थाहीरासिंग साहेब सरोवर ट्रस्ट यांना सुशोभिकरण करीता '' वापरा व हस्तांतरीत करा'' या पध्दतीने देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील गुरूद्वारा संतबाबा थाहि-यासिंग साहेब सरोवर ट्रस्ट सेक्शन १७ उल्हासनगर-३ यांनी गुरूद्वारा समोरील बॅ नं ८४५ येथील उद्यान ३० वर्षासाठी कराराने सौदर्य सुशोभिकरणासाठी मागणी केलेले आहे. सदरचे न्यास (ट्रस्ट) नोंदणीकृत आहे.

सदर जागेची माहिती महानगरपालिकेचीच राहील. महानगरपालिका निधीतून विद्यान विकासासाठी खर्च करणे शक्य नसल्याने केवळ उद्यानाचा विकास करण्याच्या प्रयोजनासाठी संस्थेचा सहभाग घेण्यात यावा व त्या मोबदल्यात संस्थेच्या धर्मादाय प्रयोजनासाठी संस्थेस उद्यानाचा वापर करण्याची परवानगी द्यावी असा प्रस्ताव महानगरपालिकेपुढे इतर अटी व शर्तीसह ठेवला आहे.

सदर संस्थेने सदरचे उद्यान सार्वजनिक सेवाभावी कार्य, प्रवचन, भजन यासाठी मागणी केलेले आहे. तसेच सदर उद्यानाचे सदर संस्था सुशोभिकरण व देखभाल दुरूस्ती करणेस तयार आहे. सबब खालील नमुद अटी शर्तीच्या अधिन राहून सदर न्यासास ३० वर्षासाठी भाडेतत्त्वावर सदरचे उद्यान ''वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्त्वावर देण्यासाठी चर्चा करून उचित निर्णयास्तव प्रस्ताव मा. महासभेपूढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये प्रस्तावित आहे.

अटी व शर्ती

१) संस्थेने दरमहा नाममात्र भाडे म्हणून रक्कम रू १००/- महापालिकेकडे जमा करावी लागेल
२) ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्या उद्देशाकरिताच मैदानाचा वापर करण्यात यावा.
३) संस्थेने / परवानधारकाने विद्युत पुरवठा हा स्वतःच्या खर्चाने घ्यावा.
४) उद्याने / मैदानातील रस्ते, लॉन्स इत्त्यादि ठिकाणी खड्डे खोदु नयेत.
५) वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरून न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या परवानगीने वीज मंळडाच्या मुख्य खांबावरून घ्यावा.
६) ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.
७) अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.

८) परवानगी समाप्त होताच जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा वा टाकाऊ वस्तु / अवशेष ठेवू नयेत.

९) सदर उद्यानामध्ये होणा-या धार्मीक / सामाजिक कामासाठी / कार्यक्रमासाठी पोलीस विभागाची पुर्व परवानगी घेण्यात यावी.

१०) सदर जागेवर कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची पूर्व परवानगी घ्यावी.

११) उद्यानाच्या ठिकाणी शांतता / सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याची जबाबदारी परवानगी धारकावर राहील.



१२) बॅरेक नं. ८४५ समोरील उद्यानातील जागेच्या चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : गुरूद्वार
पश्चिम : रोड
दक्षिण : रोड
उत्तर : नाला

१३) संस्थेस सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्त्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्त्याही मार्गाने अन्य पक्षाचे हित संबंध निर्माण करता येणार नाहीत.

१४) उद्यानाचा विकास करून त्याची निगा व दुरूस्ती राखणेचा कालावधी परवानगी दिलेल्या तारखेपासून पूढील ३० वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

१५) बॅरेक नं. ८४५ समोरील उद्यान विकासासाठी प्लॅन्स व इस्टीमेंट संस्थेने तयार करून आयुक्तांना सादर करावेत. आयुक्त त्यात जे बदल सुचवतील त्याप्रमाणे उद्यान विकसित करणे संस्थेवर बंधनकारक राहील. उद्यान विकसित करतांना जो खर्च संस्था करेल त्याचा तपशिल वेळोवेळी महापालिकेस सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेला आजूबाजूचे रस्ते, चौक, उद्यान विकसीत व सुशोभिकरण करणेसाठी किमान रूपये एक कोटी खर्च करावा लागेल.

१६) उद्यानातील विकास कामे एक वर्षाच्या आत पूर्ण करणे संस्थेस बंधनकारक असून मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास महापालिका उद्यानाचा ताबा स्वतःकडे घेईल व संस्थेने त्या तारखेपर्यंत केलेल्या खर्चाची कोणतीही भरपाई मागणेचा अधिकार संस्थेला असणार नाही.

१७) उद्यानामध्ये सर्वांना विनामुल्य व मुक्त प्रवेश देण्यात येईल व नियोजनाचे हक्क महापालिकेने राहतील. जागेचे कोणतेही हक्क संस्थेस राहणार नाहीत.

१८) उद्यानाची निगा व दुरूस्ती यासाठी पाणी पुरवठा व नळ जोडणी संस्थेस स्वखर्चाने घ्यावी लागेल व ३० वर्षापर्यंतच्या कालावधीत यासाठी येणारा सर्व खर्च संस्थेने करावयाचा आहे. महापालिका यासाठी कोणत्त्याही प्रकारचा खर्च अथवा अनुदान संस्थेस देणार नाही.

१९) मासिक विद्युत व पाणी देयक देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२०) उक्त नमुद ३० वर्षाच्या कालावधीत सदस्यामार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२१) उद्यानाच्या सुरक्षेसाठी दिवसभरात तीन पाळयांमध्ये आवश्यक सुरक्षा कर्मचारी नियुक्ती करणे तसेच उद्यानात वृक्ष व फळझाडांची निगा राखणेसाठी माळी व बागकामगारांची नियुक्ती करणे संस्थेवर बंधनकारक राहील. व त्यांच्या वेतनावर होणारा कोणताही प्रकारचा खर्च, अनुदान अथवा अर्थसहाय महापालिकेकडून संस्थेस देण्यात येणार नाही. भविष्यात सदर कर्मचा-यांचा नियुक्ती बाबत अथवा वेतनाबाबत वाद उदभवल्यास त्यांची कायदेशिर जबाबदारी संस्थेची राहील.

२२) उद्यानाच्या विकासा बरोबरच वृक्ष संवर्धन व पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष , फळे व फुले यांची प्रदर्शने आयोजीत करण्यात महापालिकेची कोणतीही हरकत राहणार नाही. अशा प्रकारचे वर्षभरात किमान एक प्रदर्शन संस्थेच्या खर्चाने आयोजित करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२३) उक्त नमूद ३० वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या सदस्यामार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही यांची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२४) संस्थेला उद्यानातील फुलांची विक्री करता येणार नाही अथवा अन्य मार्गाने विल्हेवाट लावता येणार नाही तथापि उद्यानात फळझाडे लावल्यास व त्यास

फळे आल्यास त्याच्या विक्रीतून येणारे उत्पन्न हे उद्यानाच्या विकास कामासाठी वापरण्यात येईल.

२५) संस्थेने सदर ठेका ३० वर्षासाठी चालू ठेवणे बंधकारक असल्याने ३० वर्षाच्या आत संस्था ठेका सोडल्यास सदर उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीवर महापालिकेला खर्च करावा लागणार आहे. सबब संस्थेने रक्कम रू १० लाख ठेका कालावधीत अनामत रक्कम म्हणून महापालिकेकडे ठेवणे बंधनकारक राहील. व संस्थेने मुदतपर्व ठेका सोडून दिल्यास सदरची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल

वरील अटी व शर्तीस अधिन राहून प्रस्तावित उद्यान ''गुरूद्वारा संत बाबा थाहि-यासिंग साहेब सरोवर ट्रस्ट'' यांना ३० वर्षासाठी ''वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्त्वावर देणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये चर्चा करून उचित निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

महासभा ठराव क्र. ९० दिनांकः-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- १) श्री. देवेंद्रसिंग खेमाणी
२) श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- १) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२) श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर व आयुक्तांस इष्ट वाटेल अशा अतिरिक्त अटी व शर्तीवर गुरुद्वारा संत बाबा थाहिरासिंग साहेब सरोवर ट्रस्ट यांना सेक्शन १७ उल्हासनगर-३ येथिल बॅरेक क्र. ८४५ समोरील महापालिकेचे उद्यान विकसित व सुशोभिकरण कामी ३० वर्षाच्या कालावधीसाठी ''वापरा व हस्तांतरीत करा'' या पध्दतीने देणेस मान्यता देत आहे.

## परंतु--

१) सदर जागी विज पुरवठा महापालिकेच्या खर्चाने करता येईल.
२) सदर जागी पाणी पुरवठा महापालिकेतर्फे निशुल्क करण्यांत येईल.

सुचकाची सही- १)
२)

अनुमोदकाची सही- १)
२)

एकमताने मंजूर

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ४:-उल्हासनगर शहराच्या पर्यावरण अहवालावर अंमलबजावणी करणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ८१ दिनांक २९.९.२००३ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७-अ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर शहराचा सन २००२-२००३ वर्षासाठीचा तयार करणेत आलेला पर्यावरण स्थितीदर्शक अहवालास मान्यता दिलेली आहे व त्यामध्ये सुचविण्यात आलेल्या उपाययोजना स्विकृत केलेल्या आहेत. तसेच सदर प्रयोजनार्थ आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिलेले आहे.

'यशदा' या संस्थेमार्फत उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये पर्यावरण अहवालावर कार्यवाही करणेसाठी कृती आराखडा बनविण्यात आला आहे. सदर कृती आराखड्यानुसार उल्हासनगर शहर पर्यावरण अहवालामध्ये सुचित केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणेसाठी 'यशदा' या संस्थेन सुचित केल्यानुसार एक कृती गट (Working group) व एक नियुक्त कार्यबल (Task force) गठीत करणे आवश्यक आहे.

कृती गट (Working group) मध्ये खालीलप्रमाणे सदस्य राहतील.

१) सहा महापालिका सदस्य.
(प्रत्येक प्रभाग समिती मधून किमान एक सदस्य पैकी ३ महिला सदस्य असणे आवश्यक )
२) उप-आयुक्त (आरोग्य) व (अ.ब्रां.नि.वि.)
३) शहर अभियंता
४) कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व मलजल निस्सारण)
५) 'यशदा' संस्थेचे एक प्रतिनिधी

नियुक्त कार्यबल (Task force) मध्ये पुढीलप्रमाणे सदस्य राहतील.

१) मा. महापौर
२) मा. उप-महापौर
३) मा. सभापती, स्थायी समिती
४) मा. आयुक्त
५) 'यशदा' संस्थेचे एक प्रतिनिधी

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण अहवालावर अंमलबजावणी करणेसाठी उपरोल्लेखित केलेप्रमाणे कृती गट (Working group) व नियुक्त कार्यबला (Task force) चे गठण करणेसाठी मान्यता मिळणे तसचे कृती गटामध्ये एकूण सहा महापालिका सदस्यांची नावे निश्चित करणेस्तव सदरचा प्रस्ताव महापालिकेच्या पटलावर प्रस्तावित करणेत आलेला आहे.



महासभा ठराव क्र. ९१ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहराच्या पर्यावरण अहवालावर अंमलबजावणी करणे कामी पूढीलप्रमाणे कृती गट व नियुक्त कार्यबलाची रचना करीत आहे.

कृती गटामध्ये खालीलप्रमाणे सदस्य राहतील.

१) प्रभाग समिती क्र. १ चे अध्यक्ष
२) प्रभाग समिती क्र. २ चे अध्यक्ष
३) प्रभाग समिती क्र. ३ चे अध्यक्ष
४) प्रभाग समिती क्र. ४ चे अध्यक्ष
५) श्रीमती भावना रामचंदानी --- पालिका सदस्या
६) श्रीमती कमला शर्मा --- पालिका सदस्या
७) श्रीमती किरण माने --- पालिका सदस्या
८) श्रीमती संगिता जावळे --- पालिका सदस्या

९) उप-आयुक्त (आरोग्य)
१०) उप-आयुक्त, ( अ.ब्रा.नि.वि )
११) शहर अभियंता
१२) कार्यकारी अभियंता(पा.पु.वि.म.नि.)
१३)यशदा संस्थेचे प्राधिकृत प्रतिनधी

नियुक्त कार्यबलामध्ये पूढीलप्रमाणे सदस्य राहतील.

१) मा. महापौर
२) मा. उप-महापौर
३) मा. सभापती, स्थायी समिती
४) मा. आयुक्त
५) मा. सभागृह नेता
६) विरोधी पक्ष नेता
७) यशदा संस्थेचे प्राधिकृत प्रतिनिधी

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय क्र. ५:-</u>श्री. अनिल खतुरानी (लिपिक) यांचे
<u>निलंबनाधिन आदेश कायम करणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. अनिल अमरलाल खातुरानी, लिपिक, कर विभागात कार्यरत असताना त्यांनी मालमत्ता करापोटी पावती पुस्तक क्र. ७८२ मधील पावती क्र. ७८२०० अन्वये दि. २२.२.२००२ रोजी वसुल केलेली रक्कम रू. १,६,१४/- महापालिका कोषागारात भरणा केली नाही. सदर रक्कमेच्या महापालिका कोषागारात भरणा न केल्यामुळे दि. २२.२.२००० ते २२.७.२००३ पर्यंत कायम अपहार केल्याचे सिध्द झाले आहे. यापुर्वीही मालमत्ता धारकांकडुन मालमत्ता करापोटी आणलेले धनादेश न वटल्यामुळे मालमत्ता धारकांकडुन धनादेशातील उल्लेखीत रोख रक्कम ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत भरणा केलेली नाही. लेखा परिक्षण विभागाकडुन वेळोवेळी ज्ञापन पत्राव्दारे आदेशित केल्यानंतर महापालिका कोषागारात भरणा केलेली आहे. अशाप्रकारे वारंवार अपहार केल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली.

त्याचप्रमाणे त्यांची एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात येणे अशा प्रकारच्या शिक्षा बजावूनही त्यांचे अपहार करणेचे वर्तनामध्य सुधारणा झालेली नाही. त्यामुळे त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१०२ दि. ८. ऑगस्ट, २००३ अन्वये निलंबित करणेत आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम १० अन्वये त्यांच्याविरूध्द दोषारोप बजावुन विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी उमपा/साप्रवि/आस्था/टे-५/५८१ दि. २९.९.२००३ अन्वये ज्ञापनपत्र देण्यात आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम (१)(ब) अन्वये श्री. अनिल खतुरानी, लिपिक (निलंबित) यांचे निलंबन कायम करणेसाठी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ९२</u> <u>दिनांक:-२०.११.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. महेंद्र मुलचंदानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील परिस्थिती विचारात घेता श्री. अनिल खतुरानी, लिपिक यांचे महापालिका सेवेतून आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधीन आदेश कायम न करता त्यांना खातेनिहाय चौकशी निकालाधीन राहून पदावर पुर्नस्थापीत करणेस मान्यता देत आहे.



कारण----

१) अपहार केलेली रक्कम नाममात्र आहे.

२) त्या रक्कमेची भरणा महापालिकेत कोषागारात केलेली आहे.
३) नाममात्र रककमेकरीता दिर्घ कालासाठी निलंबनाधीन ठेवणे योग्य राहणार नाही.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहूमताने मंजूर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय क्र. ६:-</u> श्री. रमेश कुडीया, लिपिक यांचे निलंबन आदेश रदद करून कामावर पुर्नस्थापन <u>करणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. रमेश कुडीया, लिपिक हे आरोग्य विभागात कार्यरत असताना वर्ष २०००-२००१ व २००१-२००२ या कालावधीमध्ये कॅम्प नं. १ ते ५ मधील आरोग्य निरिक्षक यांनी जमा केलेली जन्म-मृत्यु फी, कत्तलखाना फी, अशी वसुल केलेली एकुण रक्कम रू. ९४,९२३/- (रू. चौ-याण्णव हजार नऊशे तेवीस मात्र) महापालिका कोषागारात भरणा न केल्यामुळे त्यांना दिनांक २५.११.२००२ च्या आदेशान्वये निलंबित करणेत आले आहे. त्याचप्रमाणे दिनांक १८.२.२००२ च्या ज्ञापनान्वये दोषारोप ठेवून त्यांची विभागीय चौकशी सुरू करणेत आली होती. चौकशी अधिकारी यांनी विभागीय चौकशी पुर्ण केले असुन चौकशी अंती श्री. कुडीया यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द झालेले आहेत.

श्री. कुडिया यांनी अपहारीत एकूण रक्कम व कालावधी पहाता तसेच त्यांनी अपहारीत रक्कमेचा भरणा लेखा परिक्षण विभागाने उघडकीस करून दिल्यानंतर व अर्धसमास ज्ञापनपत्राव्दारे आदेशीत केल्यानंतर केलेला आहे. त्यांच्यावरील सदर आरोप गंभीर असल्याने व भविष्यात महापालिकेमध्ये महापालिका रक्कमेचा अपहाराची प्रकरणांना प्रतिबंध राहण्याच्या दृष्टीने व प्रकरणांचे गांभीर्य विचारात घेवून श्री. कुडीया यांना ०३ वर्षासाठी पदावनत करून त्यांना ०३ वर्षानंतर पदस्थापना देण्यात यावी. परंतु, पदावनत पदाच्या कालावधीतील कोणतेही फायदे त्यांना ३ वर्षानंतर देय होणार नाहीत. त्याचप्रमाणे त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्यामुळे त्यांचे निलंबन समर्थनिय होते. त्यामुळे त्यांचा निलंबन कालावधी निवृत्ती वेतनाशिवाय इतर कोणत्त्याही प्रयोजनासाठी ग्राहय धरण्यात येत नाही. अशी शिक्षा बजावुन त्यांचे निलंबन रदद करून पदावनत पदावर पुर्नस्थापित करणेसाठी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ९३ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :- श्री. नाना पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. रमेश कुडिया, लिपिक यांची खातेनिहाय चौकशीअंती गैरवर्तणूकीबददल दोषी आढळल्याने त्यावर पुढील शास्ती लादण्यात येत आहे.

--१--

- त्यांचे निलंबन रदद करुन पदावनतीने मूळ पदावर पुर्नस्थापीत करणे.
- त्यांना ३ वर्षासाठी पदावनत करुन त्यांना तीन वर्षानंतर पदस्थापना देता येईल.
- पदावनत पदाच्या कालावधीमधील कोणतेही फायदे त्यांना तीन वर्षानंतर देय असणार नाही.
- त्यांचा निलंबन कालावधी सेवानिवृत्ती वेतनाखेरीज इतर कोणत्त्याही प्रयोजनासाठी ग्राहय धरता येणार नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ७:- श्री. एम.ए. जवांदे यांची उल्हासनगर महापालिका सेवेतील उप-अभियंता पदावरील प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे जावक क्र: मजीप्रा/मु.अ./(कोवि)/प्रक ३२६/आस्था/४१६७/दि.११.०६.२००२ अन्वये श्री एम.ए.जवादे यांची उप अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री एम.ए.जवादे , उप अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दि.१३.०६.०२रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

श्री एम ए.जवादे उप अभियंता,यांची उल्हासनगर महानगरपालिकेत उप विभागीय अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी दि.२६. १२.०२.रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता. सदर प्रकरणी महासभा ठराव क्र ६८ ,दि.२६.१२.०२ अन्वये श्री एम.ए.जवादे उप विभागीय अभियंता यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.१२.०६.०३ रोजी संपुष्टात आला आहे.तथापी महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही.

तरी श्री एम.ए.जवादे, उप अभियंता,यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक १२.०६.२००४ पर्यत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभे समोर प्रस्तावित केला आहे.

महासभा ठराव क्र. ९४ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एम.ए. जवांदे, उप-अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांची उल्हासनगर महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ८:-श्री. एन.एन. जयसिंघानी यांची उल्हासनगर महापालिका सेवेतील शाखा-अभियंता पदावरील प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.

प्रस्तावना :-

मुख्य प्रशासकिय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नवी मुंबई,जा क्र:- मजीप्रा/प्रतिनि/२००२/१८/आ-६ दि.०७.०६.०२ अन्वये श्री एन.एन.जयसिंघानी, यांची शाखा अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री एन.एन.जयसिंघानी, शाखा अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दिनांक १८.०६.०२ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

श्री एन.एन.जयसिंघानी, शाखा अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी दि.२६.१२.०२ रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता. सदर प्रकरणी महासभा ठराव क्र ७५ , दि. २६.१२.०२ अन्वये श्री एन.एन.जयसिंघानी, शाखा अभियंता यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. १७.०६.०३ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही.

श्री एन.एन.जयसिंघानी, शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक १७.०६.०४ पर्यत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभे समोर प्रस्तावित केला आहे.

महासभा ठराव क्र. ९५ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. विश्वनाथ पाटिल

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ९:- श्री. एच.टी. सभागानी यांची उल्हासनगर महापालिका सेवेतील शाखा-अभियंता पदावरील प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे,जा क्र मजीप्रा/मु.अ.(को.वि.)/आस्था २/प्रक३३६/३११९ दि.१७.०५.०२ अन्वये श्री एच.टी. सभागनी,यांची शाखा अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री एच.टी.सभागनी, शाखा अभियंता हे

महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दि. १९.५.०२ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

श्री एच.टी.सभागनी, शाखा अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी दि. २६.१२.०२ रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता.सदर प्रकरणी महासभा ठराव क ८३ ,दि.२६.१२.०२ अन्वये श्री एच.टी.सभागनी, शाखा अभियंता यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २८.०५.०३ रोजी संपुष्टात आला आहे.तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही.

श्री एच.टी.सभागनी, शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक २८.०५.०४ पर्यंत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभे समोर प्रस्तावित केला आहे.

<u>महासभा ठराव क्र. ९६</u> <u>दिनांकः-२०.११.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. मोहनदास रामरख्यानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंदसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एच.टी. सभागणी, शाखा अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजूर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय क्र. १०:-श्री. आर.वाय. कांबळे यांची उल्हासनगर महापालिका सेवेतील शाखा-अभियंता पदावरील प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे जावक क मजीप्रा/मु.अ./(कोवि)/आस्था २ प्रक ३३६/३११९ दि.१७.०५.०२ अन्वये श्री आर वाय कांबळे, यांची शाखा अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री आर.वाय.कांबळे, शाखा अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दिनांकः-२४.०५.०२ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

श्री आर वाय कांबळे, शाखा अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी दि.२६.१२.०२ रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता. सदर प्रकरणी महासभा ठराव क ७३, दि.२६.१२.०२ अन्वये श्री आर वाय कांबळे, शाखा अभियंता

यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.२३.०५.०३ रोजी संपुष्टात आला आहे.तथापि महापालिकेत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही.

श्री आर वाय कांबळे, शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक २३.०५.०४ पर्यत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभे समोर प्रस्तावित केला आहे.

<u>महासभा ठराव क्र.९७</u> <u>दिनांकः-२०.११.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. आर. वाय. कांबळे, शाखा अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजूर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय क्र. ११:- श्री. डी.बी. चौधरी यांची उल्हासनगर महापालिका सेवेतील शाखा-अभियंता पदावरील प्रतिनियुक्तीचा एक वर्षाचा कालावधी वाढविणे.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे जावक क्र मजीप्रा/मु.अ.(कोवि)/आस्था २ प्रक <u>३३६/३११९</u> दि.१७.०५.०२ अन्वये श्री डी.बी.चौधरी, यांची शाखा अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री डी.बी.चौधरी शाखा अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दि.०१.०६.०२ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

श्री डी.बी.चौधरी, शाखा अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी दि.२६.१२.०२ रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता.सदर प्रकरणी महासभा ठराव क्र ७६, दि.२६.१२.०२ अन्वये श्री डी.बी.चौधरी, शाखा अभियंता यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे.त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.३१.०५.०३ रोजी संपुष्टात आला आहे.तथापि महापालिकेत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कार्यमुक्त केलेले नाही.

श्री डी.बी.चौधरी, शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक ३१.०५.०४ पर्यंत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभे समोर प्रस्तावित केला आहे.

महासभा ठराव क्र. ९८ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :-श्री.ऐडके गणपत

अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. डी.बी. चौधरी, शाखा अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांची महानगरपालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसहीत १ वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीने नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १२:- श्री. आर.पी. कदम यांची उल्हासनगर महापालिका सेवेत शाखा-अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता देणे.

प्रस्तावना :-

अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे,यांचे कार्यालयीन आदेश क्र ७५ दि. २०.०३.०३ अन्वये श्री आर पी कदम,यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री आर पी कदम, हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि. ०१.०४.०३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री आर पी कदम,यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे .तरी श्री आर पी कदम, शाखा अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र. ९९ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. सुरेश नामदेव गायकवाड

अनुमोदकाचे नाव :- श्री. नथु सोनवणे

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. आर.पी. कदम यांची महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील एका वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १३:- श्री. एल.आर. सोनाग्रा यांची उल्हासनगर महापालिका सेवेत शाखा-अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता देणे.

प्रस्तावना :-

अधिक्षक अभियंता ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,ठाणे ,यांचे कार्यालयीन आदेश क्र ८३ दि. २४.०३.०३ अन्वये श्री एल.आर.सोनाग्रा ,यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री एल.आर.सोनाग्रा , हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.०४.०४.०३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री एल.आर.सोनाग्रा ,यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे .तरी श्री एल.आर.सोनाग्रा , शाखा अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र.१०० दिनांकः-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. नाना पावार

अनुमोदकाचे नाव :- श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. एल.आर. सोनाग्रा यांची महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील एका वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १४:- श्री. यु.बी.वाड यांची उल्हासनगर महापालिका सेवेत उप-विभागीय अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता देणे.

प्रस्तावना :-

मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,कोकण विभाग,यांचे कार्यालयीन आदेश क्र मजीप्रा/मु.अ.(को.वि.)/प्र.क्र.३७६१(२)आस्था/९५९ दि.१५.०३.०३ अन्वये श्री यु.बी.वाड, यांची उपविभागीय अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री यु.बी.वाड, हे या महानगरपालिकेत उपविभागीय अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.२४.०३.०३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या उनपविभागीय अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री यु.बी.वाड यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे .तरी श्री यु.बी.वाड उपविभागीय अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र. १०१ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. संजय बठिजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. यु.बी. वाड यांची महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात उप-विभागीय अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील एका वर्षाच्या कालावधीसाठी नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजूर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १५:- शहरातील रस्ते व जागा नामकरण समिती शिफारसीनुसार रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अनु. क्र. | रस्त्या / चौक | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मठमंदिर बस स्थानकाजवळील चौकास | ''मठमंदिर चौक'' |
| २ | जूने बसस्थानक येथे | ''जय झुलेलाल चौक'' |
| ३ | बॅ.नं. २०७० जूने पोस्ट ऑफिस जवळील चौकास | ''साई गुरुमुखदास आत्माराम जग्याशी चौक'' |
| ४ | बसंत बहार अपार्टमेंट जवळील चौकास | ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक'' |
| ५ | कैलास कॉलनी येथिल चौकास | ''कैलास कॉलनी चौक'' |
| ६ | उल्हासनगर-५ येथिल तहसिलदार कार्यालय ते मठमंदिर पर्यंतच्या रस्त्यास | ''श्री. माधवदास परमानंद रोजचलानी'' |
| ७ | उल्हासनगर-४ येथिल मुख्य रस्ता ते महाराष्ट्र बॅंक मार्गे कोयंडे पुतळयाकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास | ''संत नरहरी सोनार (महाराज) चौक'' |
| ८ | उल्हासनगर-१ येथिल सेन्च्युरी रेयॉन कंपनीचे गेट समोरील चौक | ''श्री. निलकंठ महादेव चौक'' |
| ९ | उल्हासनगर येथिल प्रभाग क्र. १ मधील दुनिचंद कॉलेज जवळील चौकास | ''माता सप्तश्रृंगी चौक'' |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही कोणत्त्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव १ दिनांक ७/११/२००३ अन्वये उपरोक्त दर्शाविलेले ९ नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा. महापौर, अध्यक्ष व इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण ९ नामकरण प्रस्तावांस अंतिम मंजुरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

--२--

महासभा ठराव क्र. १०२ दिनांकः-२० ११ २००३.

सुचकाचे नाव :-श्री. लालबिहारी यादव
अनुमोदकाचे नाव :-श्री. उमाप रामदास

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीला अनुसरुन वर नमूद केलेल्या उक्त रस्त्त्यांचे, जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र १६ :- महानगरपालिकेतर्फे टॅकरद्वारे पाणीपुरवठा करणेसाठी दर आकारणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरासाठी असलेली पाणी वितरण व्यवस्था अत्त्यंत जूनी, अपु-या क्षमतेची व मोडकळीस आलेली आहे. शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी स्वतःचा स्त्रोत नसल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन पाणी विकत घेवून वितरीत केले जाते. म.औ.वि.मं. कडून होणा-या पाणी पुरवठयात वारंवार व्यत्त्यय निर्माण होत असतो. शहरात पुरेशा क्षमतेच्या साठवण टाक्या नसल्यामुळे अनेक भागांना बुस्टर पंपाच्या मदतीने पाणी पुरवठा करावा लागतो. विदयुत पूरवठा खंडीत झाल्यानंतर पाणी पुरवठयावर परिणाम हातो. वरील कारणांमुळे निर्माण होणा-या पाणी टंचाईमुळे मात करण्यासाठी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे अपरिहार्य आहे. महानगरपालिकेतर्फे मागील चार ते पाच वर्षापासून टंचाई सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी टॅकरद्वारे विनाशुल्क पाणी पुरवठा केला जात आहे. सध्य परिस्थितीत टॅकरसाठी प्रतिखेप रु. १७०/- एवढा खर्च महापालिका करत आहे. विनाशुल्क टॅकर पुरविल्यामुळे सतत मागणी वाढत आहे.

उल्हासनगर वगळता या परिसरातील महानगरपालिका/नगरपालिका टॅंकर सेवा सशुल्क पुरवित आहेत. टॅंकरने पाणी पुरवठा सेवा विना शुल्क असल्याने महानगरपालिकेवर वाढणारा आर्थिक बोजा मोठा असुन या सेवेसाठी शेजारी असणा-या महानगरपालिका/नगरपालिका प्रमाणे येथेही वाहतुक खर्च आकारणी केल्यास हा मोठया प्रमाणात असलेला आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही आणि वाहतुक खर्च आकारणी झाल्यास टॅंकर संख्यापण कमी होईल.

महानगरपालिकेने या कामासाठी गेल्या ४/५ वर्षातीत केलेला खर्च पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | खर्च |
|---|---|---|
| १. | १९९८-९९ | रु. ११ लाख |
| २. | १९९९-२००० | रु. ५० लाख |
| ३. | २०००-२००१ | रु. ५५ लाख |
| ४. | २००१-२००२ | रु. ८४ लाख |
| ५. | २००२-२००३ | रु. १२३ लाख |

उपरोक्त परिस्थिती पहाता या कामाचा खर्च दरवर्षी सारखा वाढत आहे.

शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशाप्रमाणे पाणी पुरवठा ''ना नफा ना तोटा''या तत्त्वावर चालविणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना क्र. २ मंजुर करतांना ठराव क १५ दिनांक १९.७.२००२ अन्वये योजना "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर चालविण्याची हमी दिलेली होती. शिवाय महानगरपालिकेने दिनांक २०.६.०३ रोजीच्या महासभेत पाणी पुरवठा सेवेवर श्वेतपत्रिका सादर केलेली

--२--

होती त्यास ठराव क २४ दिनांक २०.६.२००३ अन्वय मंजुरी मिळालेली असुन त्यात टॅंकरदवारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयावर शुल्क आकारण्याचा प्रस्तावाचा समावेश आहे.

दिनांक २०.०६.०३ रोजीच्या महासभेत मंजूर केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे दि ०९.०७.०३ रोजी झालेल्या स्थायी समितीस टॅंकरदवारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयास शूल्क आकारणे संबंधी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला होता.

अ) ७००० लिटर क्षमतेचा टॅंकर,पाणी व वाहतुक खर्चासह
रू २५०/-
(प्रति खेप)

ब) १०,००० लिटर क्षमतेचा टॅंकर,पाणी व वाहतुक खर्चासह
रू ३००/-
(प्रति खेप)

क) ७००० लिटर क्षमतेचा टॅंकर भरून देणे रू ७०/-

ड) १०,००० लिटर क्षमतेचा टॅंकर भरून देणे रू १००/-
(वाहतुक खर्च वगळता) (प्रति टॅंकर)

स्थायी समिती ठराव क ४१ दिनांक ०९.०७.०३ अन्वये प्रशासनातर्फे प्रस्तावित केलेल्या दरांना मान्यता दिलेली नाही.

परंतू  महानगरपालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती पहाता टॅंकरदवारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयावर दर आकारणे अपरिहार्य आहे. मा. स्थायी समितीने प्रस्तावित दर नामंजूर केले असले तरी मा. महासभा ही वरीष्ठ प्राधिकारी असल्यामुळे महासभेने निर्णय घेणे कमप्राप्त आहे.  उल्हासनगर शहराच्या पाणी समस्येर श्वेतपत्रिका सभागृहात सादर केली असता त्यात टॅंकरने होणा-या पाणीपुरवठयावर दिवसेंदिवस वाढत जाणा-या खर्चावर सभागृहाने चिंता व्यक्त केली होती.  व त्यात कपात करण्याच्या हेतूने प्रशासनाने सुचविलेल्या दर आकारणीच्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेण्याचे मान्य केले होते.

सबब, प्रशासनाने स्थायी समिती समोर सादर केलेल्या प्रस्तावावर महासभेने निर्णय घेणेसाठी महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

वरील प्रमाणे दर आकारणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी पटलावर ठेवण्यात यावा.

--३--

महासभा ठराव क्र. १०३    दिनांक:-२० ११ २००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. अंकुश म्हस्के

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेली परिस्थिती विचारात घेता उल्हासनगर शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी टॅंकरद्वारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयावर दर आकारणेस मान्यता देत नाही.

कारण---

१) सध्या शहरात पाणी पुरवठा सुरळीतपणे नाही.

२) शहरात किर्लोस्कर अहवालाप्रमाणे सुधारीत पाणी पुरवठा योजना राबविण्या अभावी टॅंकरद्वारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयावर दर आकारणे अयोग्य राहिल.

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. १७:-प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय यांना उल्हासनगर-१ येथिल महापालिकेच्या साधुवासवानी उद्यानामधील देण्यात आलेली जागा विकास करणेकामी १० वर्षाची कालमर्यादा निश्चित करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेने साधुवासवानी उद्यान मधील देण्यात आलेली जागा (३५४० चौ मी) प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांनी उद्यानाचा विकास करण्यासाठी दहा वर्षासाठी मुदतवाढ मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. तसेच अतिरिक्त १०९६८ चौ मी. जागेची मागणी केलेली आहे.

स्थायी समिती क्र. १९९ दिनांक २४/०३/१९९९ च्या अनुषंगाने प्रजापिता ब्रम्हकुमारी यांना यापूर्वी एक-एक वर्षासाठी सदरचे उद्यान नुतनीकरण करून दिलेले आहे. सदरची मुदत दिनांक ३०/०६/२००३ रोजी संपलेली आहे.

त्यांना देण्यात आलेल्या उद्यानाचा भाग चांगले प्रकारे विकसित करणेत आलेला असून उल्हासनगर येथील स्थानिक रहिवासी त्याचा चांगल्याप्रकारे लाभ घेत आहेत. आता त्यांनी पुर्वी दिलेली ३५४० चौ मी उद्यानातील जागा तसेच अतिरिक्त १०९६८ चौ मी. जागा सौदर्यीकरण / सुशोभिकरण करणेसाठी १० वर्षासाठी सदरचे उद्यान विकसित करण्याठी ते आपल्या ट्रस्ट मार्फत खर्च करणार आहेत. सदर नर्सरी व उद्यान चांद अपार्टमेंट ते कोमलपार्क पर्यत व कंपाऊंड भिंतीचा आतील भाग (३५४० व १०९६८ चौ मी) च्या क्षेत्रात आहेत

सदर जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहील. महानगरपालिका निधीतून विद्यान विकासासाठी खर्च करणे शक्य नसल्याने केवळ उद्यानाचा विकास करण्याच्या प्रयोजनासाठी संस्थेचा सहभाग घेण्यात यावा व त्या मोबदल्यात संस्थेच्या धर्मादाय प्रयोजनासाठी संस्थेस उद्यानाचा वापर करण्याची परवानगी द्यावी असा प्रस्ताव महानगरपालिकेपुढे इतर अटी व शर्तीसह ठेवला आहे.

तरी सदर मागणी केलेले साधू वासवानी उद्यानातील जागा (३५४० चौ मी + १०९६८ चौ मी) दहा वर्षाच्या मुदतीसाठी ''वापरा व हस्तांतरीत करा'' या

तत्त्वावर प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विद्यालय या सस्थेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये चर्चा करून खालील अटी व शर्तीस अधिन राहून देण्यासाठी उचित निर्णय मा. महासभेच्या परवानगीने घेणे आवश्यक आहे.

<u>अटी व शर्ती</u>

१) संस्थेने दरमहा नाममात्र भाडे म्हणून रक्कम रू १००/- महापालिकेकडे जमा करावी लागेल

२) ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्या उद्देशाकरिताच मैदानाचा वापर करण्यात यावा.

३) संस्थेने / परवानधारकाने विद्युत पुरवठा हा स्वतःच्या खर्चाने घ्यावा.

४) उद्याने / मैदानातील रस्ते, लॉन्स इत्त्यादि ठिकाणी खड्डे खोदु नयेत.

५) वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरून न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या परवानगीने वीज मंळडाच्या मुख्य खांबावरून घ्यावा.

६) ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.

७) अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.

८) परवानगी समाप्त होताच जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा वा टाकाऊ वस्तु / अवशेष ठेवू नयेत.

९) सदर उद्यानामध्ये होणा-या धार्मीक / सामाजिक कामासाठी / कार्यक्रमासाठी पोलीस विभागाची पुर्व परवानगी घेण्यात यावी.

१०) सदर जागेवर कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची पूर्व परवानगी घ्यावी.

११) उद्यानाच्या ठिकाणी शांतता / सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याची जबाबदारी परवानगी धारकावर राहील.

१२) गोल मैदान येथील उद्यानातील जागेची चतुःसिमा खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| पुर्व | : भगवंती नावानी स्टेज |
| पश्चिम | : हॉटेल बासरी समोरील मोकळी जागा |
| दक्षिण | : रोड |
| उत्तर | : महानगरपालिकेची मोकळी जागा व रोड |

१३) संस्थेस सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्त्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्त्याही मार्गाने अन्य पक्षाचे हित संबंध निर्माण करता येणार नाहीत.

१४) उद्यानाचा विकास करून त्याची निगा व दुरूस्ती राखणेचा कालावधी परवानगी दिलेल्या तारखेपासून पूढील १० वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

१५) सदर उद्यान विकासासाठी प्लॅन्स व इस्टीमेंट संस्थेने तयार करून आयुक्तांना सादर करावेत. आयुक्त त्यात जे बदल सुचवतील त्याप्रमाणे उद्यान विकसित करणे संस्थेवर बंधनकारक राहील. उद्यान विकसित करतांना जो खर्च संस्था करेल त्याचा तपशिल वेळोवेळी महापालिकेस सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेला आजूबाजूचे रस्ते, चौक, उद्यान विकसीत व सुशोभिकरण करणेसाठी किमान रूपये पंचवीस लाख खर्च करावा लागेल.

१६) उद्यानातील विकास कामे एक वर्षाच्या आत पूर्ण करणे संस्थेस बंधनकारक असून मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास महापालिका उद्यानाचा



ताबा स्वतःकडे घेईल व संस्थेने त्या तारखेपर्यंत केलेल्या खर्चाची कोणतीही भरपाई मागणेचा अधिकार संस्थेला असणार नाही.

१७) उद्यानामध्ये सर्वांना विनामुल्य व मुक्त प्रवेश देण्यात येईल व नियोजनाचे हक्क महापालिकेने राहतील. जागेचे कोणतेही हक्क संस्थेस राहणार नाहीत.

१८) उद्यानाची निगा व दुरूस्ती यासाठी पाणी पुरवठा व नळ जोडणी संस्थेस स्वखर्चाने घ्यावी लागेल व १० वर्षापर्यंतच्या कालावधीत यासाठी येणारा सर्व खर्च संस्थेने करावयाचा आहे. महापालिका यासाठी कोणत्त्याही प्रकारचा खर्च अथवा अनुदान संस्थेस देणार नाही.

१९) मासिक विद्युत व पाणी देयक देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२०) उक्त नमुद १० वर्षाच्या कालावधीत सदस्यामार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२१) उद्यानाच्या सुरक्षेसाठी दिवसभरात तीन पाळयांमध्ये आवश्यक सुरक्षा कर्मचारी नियुक्ती करणे तसेच उद्यानात वृक्ष व फळझाडांची निगा राखणेसाठी माळी व बागकामगारांची नियुक्ती करणे संस्थेवर बंधनकारक राहील. व त्यांच्या वेतनावर होणारा कोणताही प्रकारचा खर्च, अनुदान अथवा अर्थसहाय महापालिकेकडून संस्थेस देण्यात येणार नाही. भविष्यात सदर कर्मचा-यांचा नियुक्ती बाबत अथवा वेतनाबाबत वाद उदभवल्यास त्यांची कायदेशिर जबाबदारी संस्थेची राहील.

२२) उद्यानाच्या विकासा बरोबरच वृक्ष संवर्धन व पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष , फळे व फुले यांची प्रदर्शने आयोजीत करण्यात महापालिकेची कोणतीही हरकत राहणार नाही. अशा प्रकारचे वर्षभरात किमान एक प्रदर्शन संस्थेच्या खर्चाने आयोजित करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२३) उक्त नमूद १० वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या सदस्यामार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही यांची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२४) संस्थेला उद्यानातील फुलांची विक्री करता येणार नाही अथवा अन्य मार्गाने विल्हेवाट लावता येणार नाही तथापि उद्यानात फळझाडे लावल्यास व त्यास फळे आल्यास त्याच्या विक्रीतून येणारे उत्पन्न हे उद्यानाच्या विकास कामासाठी वापरण्यात येईल.

वरील अटी व शर्तीस अधिन राहून प्रस्तावित उद्यान '' प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय'' यांना १० वर्षासाठी ''वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्त्वावर देणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये चर्चा करून उचित निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर प्रस्तावित करण्यात आलेला आहे.



महासभा ठराव क्र. १०४ दिनांकः-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती भावना रामचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर व आयुक्तांस इष्ट वाटेल अशा अतिरिक्त अटी व शर्तीवर दहा वर्षाच्या कालावधीसाठी उल्हासनगर महापालिकेचे गौल मैदान येथिल साधु वासवानी उद्यानामधील वर प्रस्तावित केलेली जागा ( ३५४०चौ.मी. + १०९६८ चौ.मी. ) या एकत्रित जागेवर विकास व सुशोभिकरण प्रयोजनासाठी प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय यांना ''वापरा व हस्तांतरीत करा'' या पध्दतीने देणेस मान्य करीत आहे.

परंतु----

१) सदर जागी वीज पुरवठा महापालिकेच्या खर्चावर करता येईल.
२) सदर जागी पाणी पुरवठा महापालिकेतर्फे विनाशुल्क करण्यांत येईल.

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. १९:-उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे ''क्रांतीबा ज्योतीबा फुले'' यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे ''क्रांतीबा ज्योतीबा फुले'' यांचा पुर्णाकृती पुतळा खालील जागांवर बसवून मिळण्याकरीता प्रस्ताव आलेला आहे.

१) कैलाश कॉलनी, उल्हासनगर-५ येथिल गार्डन सर्कल
२) लालचक्की चौक, वीर सावरकर मार्ग, उल्हासनगर-४
३) व्हिनस टॉकीज मागील वखारी जवळील चौक, उल्हासनगर-४
४) मा. नगरसेवक विनोद ठाकूर यांच्या कार्यालयासमोर चौक, उल्हासनगर-४.

शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याने निर्गमित केलेला दिनांक ४/२/२००० च्या शासन निर्णयानुसार व ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांच्या दिनांक ६/२/२००१ च्या शासन निर्णयानुसार अनुक्रमे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम

खात्त्याच्या रस्त्यावर व जिल्हा परिषद रस्त्यांवर पुतळे उभारण्यात येऊ नये असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याबाबतचे राज्य सरकारचे धोरण लक्षात घेता तेथे उपरोक्त नमूद केलेली ठिकाणे सार्वजनिक रस्ते असल्यामुळे तेथे पुतळा बसवू नये असे स्पष्ट मत आहे. तथापि महापालिका कार्यालयासमोरील मोकळया जागेत किंवा कोणत्त्याही सार्वजनिक उद्यानात ''महात्मा क्रांतीबा ज्योतीबा फुले'' यांचा पुतळा बसविणे संयुक्तीक होईल.

चर्चेअंती महासभा अशा निष्कर्षापर्यंत येते की, वरील सुचविलेल्या जागांपैकी कोणत्त्याही एका जागेवर महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा उभरणे कामी शासनाकडुन हरकत येवू शकते म्हणून वरील सुचविलेल्या जागांऐवजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या क्षेत्रातील योग्य जागेवर महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा बसविणे सोयीचे राहिल. त्याव्यतिरिक्त महापालिका मुख्यालयाच्या क्षेत्रातील योग्य त्या जागी पुज्य साई झुलेलाल व साहित्त्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचे सुध्दा पुतळे उभारण्यास महासभेपुढे प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. १०५</u> <u>दिनांकः-२०.११.२००३.</u>

सुचकाचे नाव :-१) श्रीम. ज्योती कालानी
२) श्री. किशोर वनवारी
३) श्री. नाना पवार

अनुमोदकाचे नाव :-१) श्री. राजेंद चौधरी
२) श्री. राज असरोंडकर
३) श्री. मोहन साधवानी



ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या क्षेत्रातील योग्य जागेवर महात्मा ज्योतिबा फुले, पुज्य साई झुलेलाल, साहित्त्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचे पुतळे उभारण्यास समंती देत आहे.

सूचकाची सही-१)
२)
३)

अनुमोदकाची सही-१)
२)
३)

<u>एकमताने मंजुर</u>

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. २०:-उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा
टप्पा क्र. १ योजनेच्या सुधारीत
वाढीव रक्कमेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणे मार्फत सुधारीत पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत असून योजनेची अंदाजीत किंमत रुपये १८.८० एवढी होती. काही आवश्यक कामांचा समावेश मुळ योजनेत करावा लागल्यामुळे योजनेची किंमत वाढुन रु. २५ कोटी एवढी झाली. वाढीव किंमतीस मा. महासभेने ठराव क्र. ८५, दिनांक २८/१/२००३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मुळ योजना मंजूर झाली तेव्हा १० टक्के लोकवर्गणीची अट लागु नव्हती. सबब वित्तीय आकृती बंधात १० टक्के लोकवर्गणी उल्लेख करणेत आला नव्हता.

परंतु महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. पा.पु.यो.११०३/प्र.क्र. १५३/पा.पु.१८, दिनांक १०.११.२००३ नुसार १० टक्के लोकवर्गणी भरणे बंधनकारक असल्याचे कळविले आहे. सबब १० टक्के लोकवर्गणीची अट लागू झाल्यामुळे ठराव क्र. ८५, दिनांक २५/१/२००३ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

१० टक्के लोकवर्गणीसह वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | शासकिय अनुदान | ५३८.२५ लक्ष |
| २. | आयुर्विमा महामंडळाचे कर्ज | ७०८.५० लक्ष |
| ३. | खुल्या बाजारातून कर्ज उभारणी | ८५०.०० लक्ष |
| ४. | लोकवर्गणी (वाढीव रक्कमेच्या १० टक्के) | ६२.०० लक्ष |
| ५. | हुडकोकडून कर्ज | २९६.२५ लक्ष |
| एकूण--- | | २५००.०० लक्ष |

ठराव क्र. ८५, दिनांक २८.१.२००३ मधील इतर बाबी व खालील अटी व शर्तीमध्ये काहीही बदल नाही.

अटी व शर्ति

७. महा. जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे यांनी उल्हासनगर साठी तयार केलेल्या सुधारीत उल्हासनगर पा. पु. योजना टप्पा १ या योजनेची सुधारीत रक्कम रू. २१२७. १९ लक्ष निव्वळ व रूपये २५०० लक्ष ढोबळे, रक्कमेस महानगरपालिका मान्यता देत आहे. योजनेची किंमत वाढल्यास व योजना

सुधारण्यात आल्यास जास्तीचा आर्थीक भारही सोसण्यास महानगरपालिका तयार आहे. तसेच योजनेच्या आकृती बंधास (२३. ३३ टक्के शासकीय अनुदान, ३१.४४ टक्के आयुर्विमा कर्ज, ४५. २३ टक्के खुल्या बाजारातील कर्ज ) ही महानगरपालिका मान्यता देत आहे.

८. प्रस्तूत योजना पुर्ण झाल्यानंतर शासनाच्या/ मंडळाच्या आदेशानुसार ती एक महिन्याच्या आत ताब्यात घेवून राबविण्यास उल्हासनगर महानगरपालिका तयार आहे.

९. योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आवश्यक ती पाणी पट्टी बसविण्यास व आवश्यकता असल्यास पाणी पट्टी दरात वाढ करण्यास तयार आहे.

१०. योजना राबविताना अस्थाई आस्थापना खर्चाच्या तसेच यंत्र घसारा, मशिनरी दुरूस्ती वगैरे खर्चासाठी ही महानगरपालिका शासनाकडुन कोणत्त्याही अनुदानाची मागणी करणार नाही ही उल्हासनगर महानगरपालिका हा खर्च योग्य तो कर बसवुन भागविण्यास तयार आहे व त्यासाठी लागणारा निधी राखून ठेवील.

११. जर महानगरपालिकेने वरील बाबींचे अनुसरण न करता योजना ताब्यात घेण्याची व राबविण्याची जबाबदारी टाळण्यास सदर योजना राबविण्याच्या व्यवस्थेसाठी शासनाच्या /मंडळाच्या झालेला सर्व खर्च उल्हासनगर महानगरपालिका करीता शासनाकडुन मिळणा-या पैशातुन किंवा अनुदानातुन शासनाने वळता करून घेण्यास ही महानगरपालिका मान्यता देत आहे.

१२. योजना पुर्ण झाल्यानंतर येणारा देखभाल व दुरूस्ती व कर्ज फेडीसाठीचा वार्षिक बोजाही महानगरपालिकेस मंजुर आहे.

१३. एस्क्रो अकाऊंट उघडण्यास महापालिका मान्यता देत आहे.

१४. हुडको या संस्थेच्या कर्जासंबधीच्या सर्व अटी व शर्ती महापालिकेस मान्य आहेत.

वरील प्रमाणे नविन वित्तीय आकृती बंधास व १० टक्के लोकवर्गणी भरणे साठीचा प्रस्ताव मंजूरी करीता महासभेपूढे सादर.

<u>महासभा ठराव क्र. १०६</u> <u>दिनांकः-२०.११.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. अंकुश म्हस्के
अनुमोदकाचे नाव :-श्री. ऐडके गणपत

ही महासभा वरील परिस्थिती विचारात घेता उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अंदाजित किंमतीपैकी १० टक्के लोकवर्गणी रक्कम भरण्याच्या अटपूर्ततेसाठी पूर्वीचा महासभा ठराव क्र. ८५, दिनांक २८/१/२००३ मध्ये अंशतः बदल करून योजनेच्या सुधारीत लोकवर्गणीपोटी रुपये ६२.०० लक्ष या वाढीव रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे व त्या प्रयोजनार्थ पूर्वीचा ठरावात सदरच्या अटीचा समावेश मानण्यात येईल.

सूचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. २१:-उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासंबंधी उपाययोजना राबविणे.

प्रस्तावना

जिल्हा परिषद, ठाणे व उल्हासनगर महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने उल्हासनगर महापालिकेच्या क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणेबाबत एक योजना आखण्यात येत आहे. नागरी विभागात भटक्या कुत्र्यांची समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. या कुत्र्यांना मालक नसल्याने त्यांना पुरेसे खाद्य मिळत नाही. त्यामुळे अन्नासाठी ही कुत्री शहरात फिरतात व त्यांच्या ओरडयाचा, कधीकधी चावण्याचा नागरिकांना उपद्रव होतो. कुत्रा चावल्याने रेबीज (श्वानदंश) हा प्राणघातक रोग होवू शकतो. याची कल्पना असल्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त झाल्यास नागरीक समाधानी होतील.

महाराष्ट्र राज्यात प्राणी छळ व क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० हा केंद्र शासनाचा कायदा अस्तित्त्वात आहे. या कायद्यातील तरतुदी व नियम यांचे अधिन राहुन भटकी कुत्री पकडण्यात येतील. व त्यांच्या संख्येवर नियंत्रण राहण्यासाठी त्यांच्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करुन त्यांची जननक्षमता नष्ट करण्यात येईल. तसेच त्यांना रेबीज रोगाची प्रतिबंधक लस टोचुन त्यांना परत सोडण्यात येईल.

यामुळे या कुत्र्यापासुन नवीन पैदास होणार नाही व त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवले जाईल. तसेच रेबीज रोगाची प्रतिबंधक लस टोचल्याने या रोगाच्या प्रादुर्भावावर नियंत्रण राखणे शक्य होईल. महाराष्ट्र राज्यात पिंपरी चिंचवड व औरंगाबाद महापालिका क्षेत्रात ही योजना केंद्र शासनाच्या अनुदानाने पशुसंवर्धन विभागाच्या सहकार्याने राबविली जात आहे. त्याच धर्तीवर ही योजना तयार करण्यात आली आहे.

योजना सुरु करण्यापूर्वी महापालिका हददीत महापालिकांकडुन योजनेची माहिती जनतेला कळविण्यात येईल. व त्याद्वारे ज्याच्याकडे स्वत:च्या मालकीची कुत्री आहेत त्यांनी ती रस्त्यावर, घराबाहेर सोडण्यात येवु नयेत तसेच त्यांच्या गळयात पटटे बांधावेत. तसेच सर्व पाळीव कुत्र्यांचे रेबीज प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. शक्य असल्यास महापालिकेने लसीकरण बंधनकारक करावे. यानंतर शहरातील भटक्या कुत्र्यांवर निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया व लसीकरण झाल्यानंतर ही कुत्री एखाद्या नागरिकाने किंवा संस्थेने दत्तक घेतल्यास त्यांना देण्यात येतील किंवा त्यांना पुन्हा शहरात सोडण्यात येईल. या कुत्र्यांचे १ वर्षानंतर पुन्हा लसीकरण करण्यात येईल.

सदर योजनेसाठी लागणारा निधी उल्हासनगर महापालिकेकडुन उपलब्ध करुन दिला जाईल. तर भटक्या कुत्र्यांच्या लसीकरणाची व निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद, ठाणे यांच्या पशुसंवर्धन विभागाकडुन पार पाडली जाईल. या तांत्रिक कामाचा मोबदला म्हणून उल्हासनगर महापालिकेकडून जिल्हा परिषद, ठाणे यांना प्रति शस्त्रक्रियारु ४००/- प्रमाणे रक्कम देण्यात येईल.

## योजनेचे स्वरुप

उल्हासनगर महापालिकेच्या हददीतील भटकी कुत्री ठेवण्यासाठी त्यांचेवर शस्त्रकिया व लसीकरण करणेसाठी सुमारे ५००० चौ. फुटाची जागा निश्चित करुन त्या ठिकाणी शस्त्रकिया कक्ष, शस्त्रकिया झालेल्या कुत्र्यांसाठी देखभालीसाठी कक्ष, परिचराचे निवासस्थान, पशुवैद्यकांसाठी कक्ष इत्त्यादी बांधकामे केली जातात. नगरपालिका हददीतील भटकी कुत्री पकडण्यासाठी १० ते १२ व्यक्तिंना प्रशिक्षीत करुन त्यांना कंत्राटी पध्दतीने आठवडयातील चार दिवस कुत्री पकडण्याचे काम देण्यात येईल. यासाठी महापालिका कंत्राटी पध्दतीने एखादे वाहन घेईल. यासाठी त्या वाहनाच्या रचनेत आवश्यक ते फेरफार करण्यात येतील. पकडलेल्या कुत्र्यांची निर्बीजी करणाची शस्त्रकिया करण्यासाठी तज्ञ पशुवैद्यकांची आठ पथके तयार करुन त्यांचेकडून दर आठवडयाला २५ शस्त्रकिया केल्या जातील. वर्षभरात १००० शस्त्रकिया करणे अपेक्षित आहे.

पकडलेल्या कुत्र्यांमध्ये एखादा रेबीज रोगाने संशयित कुत्रा असल्यास त्यास दयामरण देवून त्याच्या शवाची योग्य रीतीने विल्हेवाट लावण्यात येईल. या कुत्र्याच्या संपर्कात येणा-या सर्व व्यक्तिंना खबरदारीचा उपाय म्हणून दरवर्षी रेबीज रोगाची लस टोचण्याची कार्यवाही करण्यात येईल.

महापालिकेकडुन अपेक्षित सहाय्य:-
१) कुत्री पकडण्यासाठी वाहन.
२) वाहनांवर वाहनचालक व कुत्री पकडणारे २ प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग
३) कुत्र्याची शस्त्रकिया करण्यासाठी जागा.

कुत्र्यांवरील शस्त्रकिया:-
कुत्री पकडण्याच्या पथकामध्ये वाहनचालक, कुत्री पकडणारा दोन प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग व एक पशुवैद्यक असेल. पकडलेली कुत्री ही पुनर्वसन केंद्रात आणण्यात येतील. पशुवैद्यक आणलेल्या कुत्र्यांची तपासणी करुन आजारी कुत्री अन्य कुत्र्यांपासुन वेगळी करतील. आजारी कुत्र्यांवर प्रथमत: उपचार केला जाईल व त्यांचा आजार पुर्णत: बरा झाल्याची खात्री केल्यानंतर त्यांना ज्या ठिकाणाहुन पकडुन आणण्यात आले होते त्याच ठिकाणी सोडुन देण्यात येईल. प्रौढ कुत्री व कुत्र्यांची पिल्ले ही वेगवेगळी ठेवली जातील तसेच प्रौढ नर आणि मादी कुत्रे सुध्दा वेगवेगळे ठेवले जातील. त्यांना आवश्यक अन्न व पाणी दिले जाईल. मादी कुत्र्यांमध्ये गर्भधारणा आढळुन आल्यास त्यांचा गर्भपात न करता त्यांच्यावर उपचार करुन प्रसुती होइपर्यंत सोडुन देण्यात येईल.

अभिलेख ठेवणे:-
उपचार केलेले व निर्बीजीकरण केलेले कुत्र्यांचा अभिलेख ठेवण्यात येईल तसेच निर्बीजीकरण करण्यात आलेल्या कुत्र्यांची ओळख पटावी म्हणुन त्यांना सोडुन देण्यापूर्वी त्यांच्या कानामध्ये क्लीप / पीन लावण्यात येईल किंवा कानावर गोदण्यात येईल.

वेदनारहित मरण :-
मरणासन्न अवस्थेत असणा-या व रेबीजची लागण झालेल्या कुत्र्यांची पशुवैद्याकडुन तपासणी करुन त्यांना मारणे आवश्यक असल्याची खात्री



झाल्यास दयाळु वृत्तीने सोडिअम पेंटॅथॉल (प्रौढ कुत्र्यांसाठी) व थिओ पेंटल इंट्रो टेरिटोनील (कुत्र्यांच्या पिल्लांसाठी) औषधे वापरुन त्यांना वेदनारहित मरण देण्यात येईल. सदर प्रकारचे मरण देताना अन्य कुत्र्यांची उपस्थित असणार नाही याची दक्षता

घेण्यात येईल. उपस्थित पशुवैद्यक मृत कुत्र्यांची विल्हेवाट लावण्यापूर्वी तो मेलेला आहे याची खात्री करुन घेईल.

<u>माथेफिरु / पिसाळलेली कुत्री :-</u>
नागरिकांकडुन माथेफिरु / पिसाळलेल्या कुत्र्यांबाबत तक्रार प्राप्त होताच अशा कुत्र्यास पकडुन आणण्यात येईल व सदर कुत्र्यास आलिप्त ठिकाणी ठेवुन दोन पशुवैद्यांच्या पथकामार्फत अशा कुत्र्यांची तपासणी करण्यात येईल. व तपासणीमध्ये अशा प्रकारच्या कुत्र्यामध्ये जास्त प्रमाणात रेबीजचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळुन आल्यास सदर कुत्र्यास नैसर्गिक मृत्यु येईपर्यंत अन्य कुत्र्यां पासुन आलिप्त ठेवण्यात येईल. अशा प्रकारच्या कुत्र्याला सर्वसाधारणपणे १० दिवसांच्या आत मरण येते.

<u>योजनेसाठी आवश्यक आर्थिक खर्च :-</u>
जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडुन प्राप्त प्रस्तावानुसार सदर योजनेसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अनावर्ती खर्च

| तपशिल | आवश्यक खर्च |
| --- | --- |
| १) १०० कुत्र्यांना राहण्यासाठी जागा (१० चौ. फुट x१०० कुत्री x ३०० रु) | रु ३०० ,००० |
| २) शस्त्रक्रिया कक्ष (१५०चौ फुट x रु ३००) | रु ०४५ ,००० |
| ३) पशुवैद्यकासाठी/पशुधन पर्यवेक्षकासाठी विश्रामगृह (२००चौ फुट x ३०० रु) | रु ०६० ,००० |
| ४) अन्य फर्निचर | रु १०० ,००० |
| एकुण | रु ५०५ ,००० |

आवर्ती खर्च (प्रती वर्षासाठी)

| | |
| --- | --- |
| १) कुत्री पकडण्यासाठी कंत्राटी पध्दतीने वाहन (रु १०००० प्रति माह x १२ महिने) | रु १२० ,००० |
| २) शस्त्रक्रियेसाठी खर्च (रु ४०० x१००० कुत्री) | रु ४०० ,००० |
| ३) कुत्र्यांना खाद्यासाठी खर्च (२ ते ५ दिवस) (रु ५० प्रति कुत्रा x१००० कुत्री) | रु ०५० ,००० |
| ४) औषधे व शस्त्रक्रिया साहित्य (रु १५० प्रति x१००० कुत्री) | रु १५० ,००० |
| ५) कुत्री पकडणारे प्रशिक्षीत कर्मचारी (रु ५० x १००० कुत्री) | रु ०५० ,००० |
| ६) लसीकरण (रु ५० x १००० कुत्री) | रु ०५० ,००० |
| ७) संपर्कात येणा-या व्यक्तिंसाठी प्रतिबंधक लसीकरण खर्च (रु ३०० x३ मात्रा x१०) | रु ०९० ,००० |



| | |
| --- | --- |
| ८) अभिलेख ठेवणे(रु १० प्रति कुत्रा) | रु ०१० ,००० |
| | रु ९२० ,००० |

अशाप्रकारे उल्हासनगर महापालिकेत सदर योजना राबविणेसाठी प्रथम वर्षी आवर्ती व अनावर्ती खर्च रु १४ ,२५ ,००० येणार आहे व त्यानंतरच्या पुढील वर्षामध्ये आवर्ती खर्च रु ९२० ,००० अपेक्षित आहे. सदर योजनेची तात्काळ अंमलबजावणी करणेसाठी सुधारित अर्थसंकल्पात उर्वरित दिवसांसाठी अंदाजे रु ७ लाख ची तरतुद

करणे आवश्यक आहे. सबब, महापालिकेसमोर सदर योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता मिळणे व सुधारित अर्थसंकल्पात तरतुद करणेसाठी महासभेच्या पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र.१०७ दिनांक:-२०. ११. २००३.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त संबंधी वरील योजना राबविण्यास व आवश्यक उल्लेखिलेल्या खर्चाची सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्यावेळचा विषय

विषय क्र. २२:-श्री. कृ. वि. जिरे यांची उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यकारी अभियंता पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता देणे.

प्रस्तावना

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई, यांचेकडील शासन आदेश क्र. पीओजी/११०३/सीआर-२४५ /(१०)/सेवा-१, दिनांक ४ सप्टेंबर, २००३ अन्वये श्री. कृ.वि.जिरे यांचे या महापालिकेत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक केलेली आहे.

त्यानुसार श्री. कृ.वि.जिरे हे या महापालिकेत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर दिनांक ६.११.२००३ रोजी मध्यांपूर्व रुजु झालेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार श्री. कृ. वि. जिरे यांच्या प्रतिनियुक्ती वरील नेमणूकीस मान्यता मिळणेकामी महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र१०८ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. शाम रोहडा

अनुमोदकाचे नाव :-श्री. लालबिहारी यादव

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता श्री. कृ. वि. जिरे यांची उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.) पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणूकीस मान्यता देत नाही.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्यावेळचा विषय

विषय क्र. २३:-महापालिका मालकीचे शाळा इमारतीचे भाडे मिळणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळा इमारती भाडे तत्त्वाने उल्हासनगर शिक्षण मंडळास दिनांक २१/१०/१९९६ पासून दिलेले आहेत. सदर महापालिका शाळापैकी १९ शाळांच्या इमारतीचे भाडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडुन निश्चित करुन सदर भाडयाच्या रक्कम रुपये १,५३,३३,५१२/- ची मागणी मा. शिक्षण उप-संचालक नाशिक विभाग यांचेकडील पत्र क्र. उमपा/मालमत्ता/१८१/०३, दिनांक ४/८/२००३ अन्वये मागणी केलेले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने शिक्षण उप-संचालक यांचे जा.क्र. शि.उ.सं/प्राथ.-१/न.पा.शि.मं./०३-०४, दिनांक ३/९/२००३ च्या पत्रान्वये सदर भाडे बाबत शिक्षण मंडळ व महानगरपालिका ठरावाची मागणी केलेली आहे. सावजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडून तदनंतर ६ शाळांचे भाडे ठरवून रक्कम रुपये ४२,४४,२८१/-भाडे ठरविले आहे. अशाप्रकारे सर्व २५ शाळांच्या इमारतींचे एकूण भाडे रुपये १,९५,८२,७९३/-ची मागणी करणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी ठराव क्र. ६२, दिनांक २१/१०/२००३ अन्वेय उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे असणा-या एकूण २५ प्राथमिक शाळांच्या इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडून निश्चित करुन घेवून शासनाच्या शिक्षण विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेबाबत ठराव पारीत केलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी पारीत केलेला ठराव क्र. ६२, दिनांक २१/१०/२००३ यांस मान्यता देवून सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांनी ठरविलेले इमारतीच्या भाडयाची रक्कम शासनाच्या शिक्षण विभागाकडून उल्हासनगर महापालिकेस मिळणेसाठी महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सदर प्रस्ताव महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र१०९ दिनांक:-२०.११.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका शिक्षण मंडळाचा दिनांक २१/१०/२००३ चा ठराव क्र६२ विचारात घेता महापालिका २६ शाळांच्या इमारतींचे भाडे रुपये १,९५,८२,७५३/- ची शासनाचे शिक्षण विभागाकडून मागणी करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्या वेळचा विषय क्र. १८:-उल्हासनगर शहरात वस्तू ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणेकरीता परवाना संबंधी प्रारुप उपविधी आणि प्रारुप नियमावलीला मान्यता देणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरीता व इतर प्रयोजनांकरीता व्यवसायधारकाकडून विवक्षित वस्तुची साठवणूक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३ व ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरुन कोणत्त्याही व्यक्तीस नियमात विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वस्तू कोणत्त्याही जागेत किंवा जागेवर परवान्याशिवाय ठेवता येणार नाही.

आसपासच्या इतर महापालिकेचे सदर विषयासंबंधी उपविधी पडताळून अधिनियमाचे कलम ४५८ (२०), ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असून सदर विषयी वस्तू व व्यापार साठवणूकीसंबंधी संपूर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावली तयार केली आहे.

सदर उपविधी व नियमावलीची छाननी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली ठराव क्र. ४२, दिनांक १९/१०/२००० नुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीला प्रारुप उपविधी व नियमावलीबाबतचा अहवाल ६ महिन्यात द्यावयाचा होता. परंतु, ती कालमर्यादा संपलेली आहे. त्यामुळे महासभेने मूळ प्रस्तावावर अंतिम निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

महासभा ठराव क्र. दिनांकः-

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## प्रस्तावाची सुचना

सुचकः- श्री. रामदास उमाप
अनुमोदकः- श्री. होयियारसिंग लबाना

उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस.के. सेठ या व्यक्तीस आयक्तांनी स्वअधिकारे विेष कार्य अधिकारी म्हणून नेमलेले आहे. त्यांच्या नेमणूकी पोटी अंदाजे रुपये ५०,०००/- एवढा प्रतिमाह खर्च येवू ाकतो. त्यांची नेमणूक ६ महिन्यासाठी कॉन्ट्रक्ट पध्दतीवर असून महासभेची मंजुरी न घेता करण्यांत आलेली आहे.

सद्या महापालिकेचे सेवेत श्री. पी.डी. कोळेकर यांना उपआयुक्त म्हणून व श्री. व्ही. आर. गर्जे यांना सहा. नियंत्रक म्हणून पदभार सोपविण्यांत आलेला आहे. ाहरातील अनाधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमणे हटविणे हे त्यांच्या कार्यकक्षेत आहे. या दोन्ही अधिका-यांच्या उपस्थितीत तिस-या अधिका-याची नेमणूक करण्याची आवयकता का भासली? महापालिकेवर अतिरिक्त खर्चाचे ओझे का टाकण्यांत आले? जर वरील दोन्ही अधिकारी आपल्या कर्तव्यात सक्षम नसतील तर त्यांना त्या विभागातून का हटविण्यांत आलेले नाही? जर ते दोन्ही अधिकारी सक्षम असतील तर तिस-या अधिका-याच्या नेमणूकीची का आवयकता भासली? तिस-या अधिका-यामध्ये असे काय विेष आहे व त्यांची कार्यक्षमता अी काय जास्त आहे की ज्यामुळे वरील दोन अधिका-यांवर विवास ठेवता येण्यासारखे नाही. सदरच्या तिस-या अधिका-याने वरील दोन अधिका-यापेक्षा काय अतिरिक्त विेषतः सिध्द केलेली आहे?

त्यांचे नेमणूकीनंतर ाहरात अनाधिकृत बांधकाम हटविण्यास गती मिळाली आहे असे ही महासभा म्हणू ाकते का? जर असे असेल तर बाकी दोन अधिका-यांच्या कार्यक्षमतेबाबत प्रनचिन्ह असून त्यांचेवर कारवाई का करण्यांत आलेली नाही? या महापालिकेच्या माहितीप्रमाणे तिस-या अधिका-याने काही चमत्कार केलेला नाही किंवा प्राासकिय गती दाविली नाही , जर सदर तिस-या अधिका-यास जास्त कालावधीसाठी थेट ठेवण्यात आले तर ते योग्य होणार नाही व महापालिकेला विनाकारण अतिरिक्त आर्थिक ओझे सोसावे लागेल. त्या अर्थी सदर अधिका-यांला महापालिकेच्या सेवेतून त्वरीत कार्यमुक्त करावे असे महासभेपूढे प्रस्तावित

प्रस्तावित महासभा ठराव क्र. दिनांक :-१९/१२/२००३

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता प्राासनास श्री. एस.के. सेठ यांना महापालिका सेवेतून त्वरीत कार्यमुक्त करणेस निर्दो करीत आहे.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही /-

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ३:- शहरातील रस्ते व जागा नामकरण समिती शिफारसीनुसार रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अ. क्र | रस्त्या/ चौक | प्रस्तावित नांव |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ , प्रभाग कमांक.१९ , मधील विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनजवळील खन्ना कंम्पाऊंडकडे जाणा-या रस्त्यास | ''हरि गोविंद राय''(छट्टू सेठ) मार्ग |
| २ | उल्हासनगर-३ , मधील प्रभाग कमांक. २४ , मधील बॅरेक नंबर ९०६ च्या मागील झोपडपट्टी वसाहतीस | स्वर्गीय इंदू भठिजा नगर |
| ३ | उल्हासनगर-५ , मधील प्रभाग कमांक. ११ , मधील सेक्शन-३५ या वसाहतीस | संत प्रभाराम नगर |
| ४ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक. ११ मधील सेक्शन-३६ या वसाहतीस | साई वसन शाह नगर |
| ५ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक. ११ मधील सेक्शन-३७ या वसाहतीस | स्वामी शांती प्रकाश नगर |
| ६ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक. १२ मधील, ब्लॉक नंबर ७९९ ते ८०३ व त्याचा समोर ब्लॉक व त्याचा पाठीमागील परिसरास | नुतन नगर |
| ७ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक. १२ मधील, बॅरेक नंबर १७७९ ते १७९१ व त्याचा आजूबाजुच्या परिसरास | गोल्डन नगर |
| ८ | उल्हासनग-५ प्रभाग कमांक.१२ मधील मेकर टॉवर्स ते भाटिया रिक्षा स्टॅंड पर्यतच्या रस्त्यास | कै.श्री.रहंदोमल फत्तुमल साधवानी मार्ग |
| ९ | उल्हासनगर-५ प्रभाग कमांक.१२ मधील पंचरतन कॉ.हौ.सोसायटी (पाणी पुरवठा कार्यालयाचा समोर ते स्वामी शांती प्रकाश उद्यान पर्यतच्या रस्त्यास | मास्टर जुरियोमल दुसेजा मार्ग |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही नांवाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव कमांक. ३ दिनांक.९/१२/२००३ अन्वये उपरोक्त दर्शाविलेले ९ नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा.महापौर/अध्यक्ष व इतर चार सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण ९ नामकरण प्रस्तावास अंतिम मंजूरी देणेस मा.महासभेसमोर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ११०                                        दिनांक:-१९.१२.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार रस्ते व जागा नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीला अनुसरून वर नमूद केलेल्या उक्त रस्त्यांचे, जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र. ३(अ):- शहरातील रस्ते व जागा नामकरण समिती शिफारसीनुसार रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-४ येथील भरत नगर उल्हासनगर आणि अंबरनाथ शहराला जोडणा-या पुलास ''कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुल'' असे नामकरण करणेबाबत. महापालिका सदस्य श्री. प्रमोद टाले, यांचा प्रस्ताव आलेला आहे.

सदर पुल सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र शासन) यांचे मार्फत बांधण्यात आलेला आहे. त्यामूळे तदर्थ समितीचे शिफारसीनुसार सर्व साधारण सभेने मान्यता दिल्यानंतर मंजूर झालेल्या ठरावाची प्रत अंतीम मंजूरीसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवावी लागेल.

उक्त पुलाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्यात आढळत नाही. तसेच उक्त पुलास कोणत्त्याही नांवाचा नामफलक लावल्याचा आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव कमांक. ४ दिनांक.९/१२/२००३ अन्वये भरत नगर उल्हासनगर आणि अंबरनाथ शहराला जोडणा-या पुलास ''कर्मवीर

दादासाहेब गायकवाड पुल'' असे नामकरण मान्य केलेले आहे. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा.महापौर/अध्यक्ष व इतर चार सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त ''कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुल'' नामकरण प्रस्तावास अंतिम मंजूरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ११० (अ)</u> <u>दिनांक:-१९.१२.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार रस्ते व जागा नामकरण तदर्थ समितीचे ठराव क्र. ४, दिनांक ९/१२/२००३ ला अनुसरून उल्हासनगर-४ येथिल भरत नगर उल्हासनगर व अंबरनाथ जोडणा-या पुलास ''कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुल'' असे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सूचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषय क्र. ४:- उल्हासनगर शहरात वस्तू ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणेकरीता परवाना संबंधी प्रारुप उपविधी आणि प्रारुप नियमावलीला मान्यता देणे.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका हददीतील अनेक प्रकारचे व्यवसाय करण्यात येतात तसेच व्यवसाय चालविण्याकरिता व इतर प्रयोजना करिता विवक्षीत गोष्टी/ वस्तूंची साठवणूक करण्यात येते . मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ नुसार (१)आयुक्तांनी दिलेल्या अटी व शर्ती या अन्वये आणि त्यास अनुसरुन असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस (अ)नियमात विनिर्दिष्ठ केलेली कोणतेही वस्तू कोणत्याही जागेत किंवा जागेवर

i) अशा वस्तूंचे जे कमाल परिमाण त्या जागेत किंवा जागेवर एका वेळी ठेवता येईल म्हणून नियमात विनिर्दीष्ठ केले असेल अशा कोणत्याही परिमाणात किंवा त्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणात लायसन्स शिवाय ठेवता येणार नाहीत आणि .

ii) अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा विकीसाठी किंवा नियमात प्रत्त्येक वस्तूच्या बाबतीत विनिर्दीष्ट करण्यात येईल अशा घरगुती वापरा व्यतिरिक्त अन्य वापरासाठी ठेवता येणार नाही .

ब) राहाण्याची जागा म्हणून योजलेल्या किंवा वापरण्यात येणा-या कोणत्याही इमारतीत किंवा जागांवर किंवा आशा इमारती पासून पंधरा फुटाच्या आत, चार

हंड्रेड वेटपेक्षा अधिक कापूस दाबलेल्या गासंडयाच्या स्वरुपात, किंवा बारदाणांत किंवा सुटा ठेवता येणार नाही .

क) कोणत्त्याही जागेत किंवा जागेवर घोडे ,गुरेढोरे किंवा अन्य चतुष्पाद प्राणी-
(एक) विक्रीसाठी,
(दोन) भाडयाने देण्यासाठी,
(तीन) ज्या प्रयोजनासाठी कोणताही आकार घेण्यात येत असेल किंवा कोणतेही परिश्रमिक करण्यात येत असेल अशा कोणत्त्याही प्रयोजनासाठी, किंवा
(चार) त्यापासुन मिळणा-या कोणत्त्याही मालाच्या विक्रीसाठी ठेवता येणार नाही किंवा ठेवण्याची परवानगी देता येणार नाही .

ड) कोणत्त्याही जागेत किंवा जागेवर
१. नियमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्त्याही व्यवसायाशी संबधित असलेल्या व्यवसायापैकी किंवा कामापैकी कोणताही व्यवसाय किंवा काम -
दोन) आयुक्तांच्या मते जो कोणताही व्यवसाय किंवा काम जीवितास किंवा आरोग्यास किंवा मालमत्तेस घातक असेल किंवा त्याच्या स्वरुपामुळे,किंवा त्या रीतीने किंवा ज्या परिस्थितीत तो चालवण्यात येत असेल किंवा चालविण्याचे योजले असेल त्यारीतीमुळे किंवा परिस्थितीमुळे उपद्रव होण्याचा संभव असेल तर असा कोणताही व्यवसाय किंवा काम चालवता येणार नाही किंवा चालवण्याची परवानगी देता येणार नाही .

मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियमाचे कलम ४५४ व ४५७ (१३) (आय) प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका हददीतील व्यवसाय व वस्तूंच्या साठवणूकीसाठी नियम तसेच कलम ४५८ (२०) प्रमाणे जागेच्या वापरासंबंधी उपविधी तयार करण्यात आलेले असून . सदर उपविधी व नियमावली संबंधी

--२--

अंतिम रित्त्या निर्णय घेण्याकरिता अधिनियमाच्या कलम ४५५ व ४६० नुसार निदान सहा आठवडयापुर्वी शासकीय राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रामध्ये नोटीस देणे आवश्यक आहे . त्यानंतर विचाराधीन उपविधी व नियम संबंधी लेखी आक्षेप महानगरपालिकेने विचारात घेवून अधिनियमाचे कलम ४६१ प्रमाणे राज्य शासनाकडून उपविधी कायम करुन घेणे व कलम ४५५ व ४६२ नुसार राजपत्रात प्रसिध्द करणे अनिवार्य आहे .

महानगर पालिकेतर्फे सदर बाबी संबंधी तयार करण्यांत आलेल्या उपविधी व नियमाच्या कच्चा मसुदा महासभेपुढे विचारार्थ सादर

<u>महासभा ठराव क्र. १११</u> <u>दिनांक:-१९.१२.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरात परवान्या शिवाय जागा वापर न करणे, विवक्षित वस्तु-गोष्टी न ठेवणे आणि विवक्षित व्यवसाय धंदे व कामे न करण्याचे प्रयोजनासाठी प्रशासनाने तयार केलेल्या प्रारुप उपविधी आणि प्रारुप नियमावलीला मान्यता देत आहे.

**परंतु--**

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६०व ४५५(१)नुसार शासकीय राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रामध्ये नोटीस देवून उपविधी व नियमा संबंधि लेखी आक्षेप मागविण्यास संबंधि कार्यवाही पुर्ण करण्यासाठी प्रशासनास निर्देश देत आहे .

२) प्राप्त झालेल्या आक्षेपाबाबत योग्य तो निर्णय घेण्याकरीता ही महासभा आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे . तसेच आक्षेपांबाबतची कार्यवाहीचा संपुर्ण तपशिल पुढील महासभेसमोर सादर करण्या स निर्देश देत आहे .

३) अशा उपविधी व नियमावलीची एक मुद्रीत प्रत महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात यावी आणि दिलेल्या नोटिसीच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून निदान एक महिन्यापर्यंत तीचे अवलोकन करु इच्छिणा-या कोणत्त्याही व्यक्तीस कोणत्त्याही वाजवी वेळी सार्वजनिक पहाणीसाठी विनामूल्य किंवा आयुक्त ठरवतील अशा मूल्यावर उपलब्ध करुन देण्यांत येईल.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. ७ :-श्रीमती चांदीबाई महाविदयालयास रुपये १.००(एक लाख) देणे.

प्रस्तावना :-

अखिल भारतीय बॅडमिंटन स्पर्धा २००३ ही मुंबई विदयापीठ व श्रीमती चांदीबाई महाविद्यालय यांनी संयुक्तपणे आयोजित केलेली आहे. या स्पर्धेसाठी देशभरातून ७२ विदयापीठांनी भाग घेतलेला आहे. या स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणामध्ये खर्च अपेक्षित आहे. देशपातळीवरील सांस्कृतिक व पारंपारीक बाबींची देवाणघेवाण होण्यासाठी अशा स्पर्धा आवश्यक आहेत. म्हणून अशा स्पर्धांना प्रोत्त्साहन देणे आवश्यक आहे.

मुंबई विदयापीठ व चांदीबाई महाविदयालय यांनी देशपातळीवरील ही स्पर्धा उल्हासनगर शहरामध्ये आयोजित केलेली आहे. ही बाब शहरवासीयांसाठी अभिमानाची आहे. अखिल भारतीय स्पर्धेसाठी होणा-या खर्चासाठी काही प्रमाणामध्ये हातभार लावणे महापालिकेचे कर्तव्य असून त्यांना प्रोत्त्साहीत करणे आवश्यक आहे. त्यामूळे सन २००३-२००४ या वित्तीय वर्षामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा या उपशिर्षामधून श्रीमती चांदीबाई महाविदयालयास रुपये १.०० (रुपये एक लक्ष) अनुदान मंजुर करण्यास महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ११२ दिनांक:-१९.१२.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा, वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती चांदीबाई महाविदयालयास अखिल भारतीय बॅडमिंटन स्पर्धा २००३ या सांस्कृतिक क्रिडा कार्यक्रम उपाययोजना पोटी या महानगरपालिकातर्फे रुपये १ लाख अनुदान देणे मान्य करीत आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका